फेब्रुवारी २०१३। किंमत ₹ १०

# लोकराज्य

## समृद्ध आणि शाश्वत
# मराठी भाषा



तीर्थखांब, पैठण

RABHA

# राज्य मराठी वाङ्मय पुरस्कार २०१०-२०११

| वाङ्मय प्रकार | पुरस्कार | लेखक | पुस्तक |
|---|---|---|---|
| काव्य प्रौढ | कवी केशवसुत पुरस्कार | गणेश विसपुते | आवाज नष्ट होत नाही |
| काव्य प्रौढ | बालकवी पुरस्कार | अनिल कांबळी | किलकिल्या उजेडाची तिरीप |
| काव्य प्रथम | बहिणाबाई चौधरी पुरस्कार | संतोष शेणई | घटकापळाने |
| काव्य विशेष | इंदिरा संत पुरस्कार | संजीवनी तडेगावकर | अरुंद दारातून बाहेर पडताना |
| नाटक प्रौढ | राम गणेश गडकरी पुरस्कार | अशोक पाटोळे | अग्निदिव्य |
| नाटक प्रौढ | अण्णासाहेब किर्लोस्कर पुरस्कार | जयंत पवार | काय डेंजर वारा सुटलाय |
| नाटक विशेष | वि.वा.शिरवाडकर पुरस्कार | विलास सारंग | गांधीजींचं माकड |
| कादंबरी प्रौढ | हरी नारायण आपटे पुरस्कार | मीना देशपांडे | हुतात्मा |
| कादंबरी प्रौढ | वि.स.खांडेकर पुरस्कार | अशोक कोळी | कुंधा |
| कादंबरी प्रथम | श्री.ना.पेंडसे पुरस्कार | आनंद बिंगकर | अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट |
| कादंबरी विशेष | उध्दव ज.शेळके पुरस्कार | जी.के.ऐनापुरे | जाईच्या घरी जाई |
| लघुकथा प्रौढ | दिवाकर कृष्ण पुरस्कार | रवींद्र शोभणे | चंद्रोत्सव |
| लघुकथा प्रौढ | पु.भा.भावे पुरस्कार | जयंत पवार | फिनिक्सच्या राखेतून उडला मोर |
| लघुकथा प्रथम | ग.ल.ठोकळ पुरस्कार | निशिकांत गुरव | वाणीकिडे |
| लघुकथा विशेष | बी.रघुनाथ पुरस्कार | प्रा.डॉ.देवेंद्र पुनसे | पोळा आणि बाहुली |
| ललितगद्य-प्रौढ | अनंत काणेकर पुरस्कार | डॉ.प्रकाश जोशी | अशी माणसे असा निसर्ग |
| ललितगद्य-प्रौढ | वि.द.घाटे पुरस्कार | अशोक डांगे | लंगडी आजी आणि रावणमामा |
| ललितगद्य-प्रथम | ताराबाई शिंदे पुरस्कार | धोंडुजा इंगोले | रेल्वाई कोटर |
| ललितगद्य-विशेष | मधुकर केचे पुरस्कार | इंद्रजित भालेराव | नाद |
| एकांकिका-प्रौढ | मामा वरेरकर पुरस्कार | दिवाकर मोहिते | कुणाच्या खांद्यावर |
| एकांकिका-विशेष | जयवंत दळवी पुरस्कार | डॉ.हरिश्चंद्र बोरकर | वात्सल्य |
| विनोद-प्रौढ | श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कार | भा.ल.महाबळ | नवे ते हवे |
| विनोद-विशेष | दत्तू बांदेकर पुरस्कार | बंडा यज्ञोपवित | दणका |
| संकीर्ण-प्रौढ | भाई माधवराव बागल पुरस्कार | प्रा.राम बापट | परामर्श |
| संकीर्ण-विशेष | कृष्णराव भालेकर पुरस्कार | सतीश काळसेकर | वाचणाऱ्याची रोजनिशी |
| ललित विज्ञान | र.धों.कर्वे पुरस्कार | राहुल गोखले | विज्ञानातील सरस आणि सुरस |
| ललित विज्ञान | संत तुकडोजी महाराज पुरस्कार | संजय ढोले | अश्मजीव |
| चरित्र-प्रौढ | लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार | नरेंद्र चपळगांवकर | तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ |
| चरित्र-प्रौढ | (विभागून) | डॉ.अनंत देशमुख | समाजस्वास्थ्यकार |
| चरित्र-विशेष | धनंजय कीर पुरस्कार | विलास खोले | आचार्य प्र.के .अत्रे |
| आत्मचरित्र-प्रौढ | न.चिं. केळकर पुरस्कार | चंद्रकांत वानखडे | आपुलाचि वाद आपणांसी |
| आत्मचरित्र-प्रौढ | (विभागून) | ज्योत्स्ना कदम | सर आणि मी |
| आत्मचरित्र | यशवंतराव चव्हाण पुरस्कार | विजय फळणीकर | पराजय नव्हे विजय |
| समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र | श्री.के.क्षीरसागर पुरस्कार | डॉ.हरिश्चंद्र थोरात | कादंबरी : एक साहित्य प्रकार |
| समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र | कै.नरहर कुरुंदकर पुरस्कार | डॉ.वसंत पाटणकर | कवितेचा शोध |
| समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र | कुसुमावती देशपांडे पुरस्कार | प्रा.रवीन्द्र किंबहुने | किंबहुना |
| समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र | वा.ल.कुलकर्णी पुरस्कार | डॉ.श्यामल वनारसे | सत्यजित राय आणि भारतीय मन्वंतर |
| इतिहास-प्रौढ | महात्मा जोतीराव फुले पुरस्कार | गजानन मेहेंदळे/संतोष शिंत्रे | शिवछत्रपतींचे आरमार |
| इतिहास-विशेष | क्रांतीसिंह नाना पाटील पुरस्कार | डॉ.सतीश साळुंके | बीड जिल्हयाचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास |
| अर्थशास्त्र-प्रौढ | सी.डी.देशमुख पुरस्कार | मिलींद संगोराम | बखर भारतीय प्राप्तिकरांची |
| राज्यशास्त्र व समाजशास्त्र | डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार | डॉ.नरेंद्र दाभोलकर | तिमिरातून तेजाकडे |

(उर्वरित यादी मुखपृष्ठ ३ वर)

वर्ष ६४ वे | अंक ११ | फेब्रुवारी २०१३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

- मुख्य संपादक — प्रमोद त्र्यं. नलावडे
- व्यवस्थापकीय संपादक — प्रल्हाद जाधव
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रभाकर मुराळकर
- उपसंपादक — किरण केंद्रे
- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी — विलास बोडके, दत्तात्रय कोकरे
- साहाय्य — विद्या कदम
- मुखपृष्ठ — राभा
- मांडणी, सजावट — संदीप पवार, सुहास सावंत
- मुद्रण — एच. टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

**संपादकीय पत्ता**
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२८८२८८८

e-mail : lokrajya@dgipr.maharashtra.gov.in
lokrajya2011@gmail.com

ई-लोकराज्यसाठी
Website : http://dgipr.maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी संपर्क - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२०२३९५७

e-mail : lokvitran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com

# अंतरंग



## ज्ञानभाषेकडे वाटचाल

जगभरात संगणकाची भाषा ही ज्ञानभाषा समजली जाते. याद्दष्टीने सर्व संगणकीय व्यवहार युनिकोड प्रमाणित करून व संगणकाचे मराठीकरण करून राज्य शासनाने मराठीला ज्ञानभाषा बनविण्याचा निर्धार केला आहे.

६

## अभिजात मराठी




सव्वाअकरा कोटी लोकांची मराठी ही जगातील दहाव्या क्रमांकाची भाषा आहे. संपन्न ज्ञानभाषा असणारी मराठी महानुभवांची धर्मभाषाही आहे. मराठी ही राजभाषा असणारे सातवाहन, राष्ट्रकुट आणि मराठे हे राज्यकर्ते भारतभर राज्य करत होते. ही भाषा बोलणारे लोक आज जगातील ७२ देशांत पसरलेले आहेत. ही फक्त एका प्रांताची भाषा नसून, ती महत्त्वाची राष्ट्रीय भाषा आहे.

८

## आपली भाषा, आपली अस्मिता



नोव्हेंबर २०१० मध्ये मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली. विभागाच्या अधिपत्याखाली भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था या चार संस्था कार्यरत आहेत. या विभागामार्फत मराठी भाषा संवर्धनासाठी अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

१९

वाचू आनंदे

## भाषा वैभव

भाषा संचालनालयाच्या प्रकाशनांना जनतेकडून प्रचंड मागणी आहे. भाषा संचालनालयाच्या काही पुस्तकांचा परिचय...

५७

| | | |
|---|---|---|
| लाभले अम्हास भाग्य | संपादकीय | ५ |
| बोलावे मराठी... | उपमुख्यमंत्री | ७ |
| शोध प्राचीनत्वाचा | डॉ. सु.र. देशपांडे | ११ |
| साहित्यिक यशवंतराव | प्रा. नवनीत देशमुख | १५ |
| महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित | डॉ. सुनीलकुमार लवटे | २२ |
| अद्‌भुत आणि अद्वितीय | डॉ. चारुशीला ओक | २५ |
| सक्षम आणि समर्थ | ललिता देठे | २७ |
| मराठी भाषेची अभिवृद्धी | डॉ. अशोक सोलनकर | ३१ |
| मराठीच्या माहेरी तीर्थस्तंभ | डॉ. रा.श्री. मोरवंचीकर | ३४ |
| साक्षीदार वैभवाचा | डॉ. हंसराज जाधव-वजीरगांवकर | ३५ |
| दलित साहित्य मराठी भाषेचे भूषण | डॉ. गंगाधर पानतावणे | ३६ |
| भाषा आणि अस्मिता | वसंत आबाजी डहाके | ३८ |
| संक्रमणातील मराठी भाषा | राजन खान | ४० |
| संपन्न कोशवाङ्‌मय | विलास खोले | ४४ |
| ज्ञानेश्वरी शब्दार्थकोश | प्राचार्य रामदास डांगे | ५२ |
| मारवा अनुभवताना | हेमंत टकले | ५५ |
| भाषा वैभव | गौतम शिंदे | ५७ |
| जावे ग्रंथांच्या गावा... | भ्रमंती | ५९ |
| द्रष्टे निर्णय... अभिनव योजना | मंत्रिमंडळ निर्णय | ६२ |
| महाराष्ट्राचा गौरव | मोहन राठोड | ६४ |
| मोफत औषधोपचार | स्वाती हेमंत शिवशरण | ६६ |

## छान अंक

महसुलासारखा रूक्ष विषय असूनही छान अंक आहे. शिवरायांची जमीन महसूल व्यवस्था ही समर्पक संकल्पना आहे.

– समीर कर्वे, महाराष्ट्र टाईम्स, मुंबई





## उपयुक्त आढावा

लोकराज्यचा मी नियमित वाचक आहे. जानेवारी महिन्याचा 'महसूल विशेष' अंक खूप आवडला. महसूल विषयाशी संबंधित अनेक बाबींचा आपण घेतलेला आढावा अतिशय उपयुक्त आहे. सामान्य माणसाबरोबरच शेतकरी, पक्षकार, वकील आणि महसूल विभागात काम करणाऱ्यांना या अंकाची मोलाची मदत होणार आहे. अतिशय महत्त्वाच्या विषयावर देखणा अंक काढल्याबद्दल आपले अभिनंदन. यापुढेही अशाच दर्जेदार अंकांची परंपरा कायम राहील, असा विश्वास वाटतो.

– ॲड. प्रवीण मंडलिक, औरंगाबाद.

## शुभेच्छा

शासनाच्या तीन वर्षपूर्तीनिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रकाशित करण्यात आलेले मराठी लोकराज्य, **Maharashtra Ahead** व उर्दू लोकराज्यचे अंक वाचून आनंद वाटला.




लोकांच्या कल्याणासाठी शासनामार्फत अनेक योजना राबविल्या जातात. या योजनांची माहिती प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचविण्यात लोकराज्य महत्त्वाची भूमिका बजावत आहे. नोव्हेंबर, २०१२ चा तीन वर्षपूर्ती विशेषांकही असाच माहितीने परिपूर्ण झाला आहे. शासन आणि जनतेमध्ये संवाद साधण्याचे लोकराज्य हे एक महत्त्वाचे माध्यम ठरत आहे. लोकराज्यने यापुढील काळातही कामगार, वृद्ध, विधवा, घटस्फोटित स्त्रिया आदी वंचित घटकांसाठी प्रबोधनाचे काम करावे, अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करतो.

– श्री. हसन मुश्रीफ, मंत्री, कामगार आणि विशेष सहाय्य

## मौलिक आणि संग्राह्य


डिसेंबर, २०१२ 'लोकराज्य'चा वसंतराव नाईक जन्मशताब्दीचा अंक अतिशय मौलिक आणि संग्रहणीय आहे. मा.वसंतराव नाईक यांच्या संदर्भातील अत्यंत महत्त्वाचे लेख प्रस्तुत अंकात आहेत. मा.वसंतराव नाईक यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंची माहिती वाचकांना उपलब्ध झाली आहे. तसेच प्रस्तुत अंकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त दोन विशेष लेख आहेत. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी वसंतराव नाईक यांचा 'शेतकऱ्यांचा मुख्यमंत्री' म्हणून केलेला उल्लेख अत्यंत हृदयस्पर्शी आहे. 'लोकराज्य'चे संपादक मंडळ अभिनंदनास पात्र आहे.

– डॉ.प्रदीप आगलावे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर
विचारधारा पदव्युत्तर विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ


शेतकऱ्यांचा मुख्यमंत्री

सर्वाधिक काळ महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद भूषविणारे मुख्यमंत्री असा स्व. वसंतराव नाईक यांच्या कारकिर्दीचा गौरवाने उल्लेख केला जातो. त्यांच्या कारकिर्दीत घडलेल्या धवलक्रांती आणि हरितक्रांती राज्यातील शेतकरी आणि शेतीशी संबंधितांचे अवघे जीवनच बदलले. त्यांनी शेतीक्षेत्रात घडविलेल्या बदलांची फळे आपण आजही चाखत आहोत. आधुनिक राहणीमुळे प्रसिद्ध असलेले स्व. नाईक त्यां ऐतिहासिक निर्णयांसाठीही कायमचे स्मरणात राहतील.... सांगत आहेत, **मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण**

गळ्याचा कोट, तोंडात चिरूट,




## हरितक्रांतीचा अक्षय फुलोरा

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे 'लोकराज्य'चा डिसेंबर महिन्याचा अंक हा वसंतराव नाईक जन्मशताब्दी विशेषांक म्हणून प्रसिद्ध करण्यात आला असून त्यातून हरितक्रांतीचे प्रणेते असणारे वसंतराव नाईक अलगदपणे उलगडत जातात. त्यांच्या एकूणच वाटचालीतून थक्क होणे भाग पडते. नव्या पिढीपुढे शेतकऱ्यांचा मुख्यमंत्री म्हणून त्यांचे दर्शन होते.

सर्वाधिक काळ महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषविणारे मुख्यमंत्री आणि धवलक्रांती व हरितक्रांतीचे प्रणेते अशी त्यांची ओळख आहे. महाराष्ट्रात कृषीविषयक सुबत्तेचा पाया या नेत्याने घातला. एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची ओळख यातून होते. अनेक दुर्मीळ छायाचित्रांचा समावेश यात आहे. 'शासकीय प्रकाशन' म्हणजे दुर्लक्षित करणारी प्रकाशने असा समज पार पुसून टाकणारे दर्जेदार 'लोकराज्य' अंक सध्या दिमाखात प्रसिद्ध होत आहेत. महाराष्ट्राच्या शेतीविषयक अभ्यासकांना हे पुस्तक सुवर्णयोगच असून मांडणी, छायाचित्रे, जीवनयात्रा, नोंदी याने परिपूर्ण हा अंक आहे. एक संदर्भग्रंथ म्हणून याचा लाभ वाचक, अभ्यासकांना होईल.

– सुवर्णा साळ्वे, दै.सामना,दि.२० जानेवारी २०१३

### 'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

वार्षिक वर्गणी – वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी**

http://dgipr.maharashtra.gov.in

*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

# लाभले अम्हास भाग्य



रोजच्या संघर्षात जगण्यासाठी उमेद देणाऱ्या मान्यवरांचे स्मरण करण्याची संधी देणारा हा फेब्रुवारी महिना. परकीय अंमलास झुगारून स्वराज्याची स्थापना करणारे छत्रपती शिवाजी महाराज, समाजसुधारकांचे अग्रणी महात्मा जोतिबा फुले, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, स्वच्छतेचे पुजारी संत गाडगेबाबा, संगीत शिरोमणी भारतरत्न पं.भीमसेन जोशी आणि कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचे जन्मदिवस या महिन्यात येतात. याच महिन्यात स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी चंद्रशेखर आझाद, स्वा.सावरकर, डॉ.राजेंद्र प्रसाद, मौलाना अब्दुल कलाम आझाद ही थोर व्यक्तिमत्त्वे काळाच्या पटलावर आपला अमिट ठसा उमटवून अंतिम प्रवासासाठी प्रस्थान करती झाली. त्यांच्या स्मृती आपणा सर्वांना स्फुर्तीदायी ठरणाऱ्या आहेत.

महाराष्ट्राचे भूषण ठरलेल्या कविवर्य कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी रोजी येणारा जन्मदिवस हा शासनाने मराठी भाषा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या दिनाचे औचित्य साधून लोकराज्यचा फेब्रुवारीचा अंक 'मराठी भाषा विशेषांक' म्हणून प्रकाशित करण्यात येत आहे.

भारतात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठी भाषेचा चौथा क्रमांक आणि जगात दहावा क्रमांक लागतो. वैभवशाली वारसा लाभलेली मराठी भाषा विसाव्या शतकात अनेक प्रवाहांना आपल्यामध्ये सामावून घेत अधिक समृद्ध झाली आहे. एकविसाव्या शतकात ती आधुनिकतेचा बाज लेऊन अधिक व्यापक होत आहे.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी ऐतिहासिक आणि पौराणिक कादंबऱ्यांनी मराठी साहित्याचे दालन संपन्न केले. त्यानंतरच्या काळात सामाजिक आशय असणाऱ्या साहित्यकृतींनी भाषेचे सौंदर्य खुलविले आणि सोबतच सामाजिक अभिसरणाला गती दिली. मराठी साहित्याने वेगळी उंची गाठली असतानाच रोमँटीसिझम अर्थात स्वप्नवादाचा प्रवाह रविकिरण मंडळाने रुजवला. या मंडळाने साहित्यविषयक आधुनिक संकल्पना आणि जाणिवा देशी स्वरूपात इथे आणल्या. मराठी साहित्याच्या इतिहासात रविकिरण मंडळ हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

१९४० ते १९६० ची दशके मराठी साहित्य आणि भाषेच्या अनुषंगाने विविध घटना घडामोडींनी भारून गेलेली ठरली. १९६० साली महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर नव्या प्रतिभेचे प्रतिबिंब मराठी साहित्यात पडले. त्यामुळे मराठी भाषा आणखी समृद्ध झाली. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, जीवनवादी साहित्य या साहित्याच्या प्रवाहांतून सकस साहित्याची मेजवानी मराठीभाषकांना मिळाली.

भाषा वैज्ञानिकांच्या दृष्टीने हा काळ महत्त्वाचा ठरला. भाषेच्या शुद्ध-अशुद्धाचा आग्रह, व्याकरण, शुद्धलेखनाचे नियम अशा अनेक बाबींवर वैशिष्ट्यपूर्ण मंथनाचा हा काळ होता. साहित्यातल्या नव्या प्रवाहांनी मराठी भाषेत आणलेले शब्द, वाक्यरचना, मांडणीची बंडखोरी, वैविध्यपूर्ण लेखनशैली अशा बाबींनी या मंथनाला खाद्य पुरवले.

मराठीच्या वैशिष्ट्यांमध्ये मोडी लिपीचा ठळक उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. मात्र आधुनिक काळात मोडी लिपी मोडकळीत निघाली. आपण हा वैभवशाली वारसा जपणे आवश्यक आहे. मराठीमध्ये गतीने लिखाण करण्यासाठी मोडी लिपीचा उपयोग होऊ शकतो.

मराठी भाषेच्या वैभवास सुंदर हस्ताक्षरांनी वेगळे कोंदण लावले आहे. वळणदार, मोतीदार, ठाशीव आणि ठसठशीत हस्ताक्षर असणे हे बुद्धिमत्तेचे लक्षण समजले जाई. सध्याच्या काळात सुरेख हस्ताक्षरांकडे पालक आणि पाल्याचे दुर्लक्ष होताना दिसते. सुलेखन हे अभिजाततेचे लक्षण समजून त्यादृष्टीने व्यापक प्रयत्न प्रत्येक कुटुंबात आणि शालेय स्तरावर झाल्यास अक्षर संस्कृती वृद्धीस चालना मिळेल.

संस्कृतीची जोपासना आणि संवर्धनासाठी भाषेचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन, भाषा संचालनालय व साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना करण्यात आली. या दोन्ही संस्थांनी मराठी भाषेचे वैभव वृद्धिंगत होण्यासाठी केलेले कार्य हे महत्त्वाचे ठरले. कालांतराने मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना होऊन जागतिक पातळीवरील ज्ञानाची कवाडे मराठी माणसांसाठी खुली झाली. कोणत्याही प्रादेशिक भाषेत इतका प्रचंड व्याप्तीचा व आवाका असलेला ज्ञानकोश निर्माण झाला नाही असे म्हणता येते. विश्वकोशाच्या विविध खंडांनी मराठी कोशवाङ्मयाच्या समृद्ध परंपरेला अधिक प्रगल्भ केले आहे.

मराठी भाषेच्या विकासाला नवे परिमाण मिळावे या हेतूने राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्राच्या निर्मितीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये सांस्कृतिक धोरण जाहिर केले गेले. त्यानुसार स्वतंत्र अशा मराठी भाषा विभागाची स्थापना केली गेली. वेगवेगळ्या विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या भाषा संचालनालय, राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, विश्वकोश निर्मिती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्था यांना मराठी भाषा विभागाच्या अंतर्गत आणण्यात येऊन मराठी भाषेचा विकास हा एकसूत्री आणि समन्वयाने होण्याचा मार्ग खुला केला गेला.

२९ नोव्हेंबर २०१०च्या शासननिर्णयानुसार या विभागाची स्थापना झाल्यानंतर संबंधित संस्थांच्या नियमित स्वरूपाच्या कार्यासोबत मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम घेण्यात आले. यामध्ये भाषा सल्लागार समितीची स्थापना, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून मसुदा तयार करण्यासाठी समितीची स्थापना, इ-बुक्सची निर्मिती, विश्वकोशाचे १६ खंड महाजालावर ठेवणे, कुमार विश्वकोश, कन्याकोश, युनिकोड टंकमुक्तस्रोत स्वरूपात देणे, प्रत्येक जिल्ह्यांमध्ये ग्रंथोत्सव, छोट्या साहित्य संमेलनांना अर्थसाहाय्य, बृहन्महाराष्ट्रातील मराठी संस्थांना अर्थसाहाय्य, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील मराठी भाषा व संस्कृतीच्या जोपासनेसाठी अर्थसाहाय्य, श्राव्य स्वरूपात दासबोधाची संकेतस्थळावर उपलब्धता आदी उपक्रमांचा ठळकपणे उल्लेख करता येईल.

मराठी भाषा विभागाने याच कालावधीत http://marathibhasha.maharashtra.gov.in या संकेतस्थळाची निर्मिती केली असून मराठी भाषा विभागांतर्गत येणाऱ्या सर्व संस्था, विविध योजना, उपक्रम, निर्णय यांची माहिती त्यावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या अंकात मराठी भाषेच्या सौंदर्याचे आणि सामर्थ्याचे विविध पैलू नोंदवणाऱ्या मान्यवरांच्या लेखांचा समावेश केला आहे. हे लेख आपली ज्ञानकक्षा आणखी विशाल करण्यासाठी उपयुक्त ठरतील, असा विश्वास वाटतो. 'लोकराज्य'च्या या अंकापासून दिल्लीतील महाराष्ट्र आणि मंत्रिमंडळ निर्णय ही दोन नवी सदरे सुरू करण्यात आली आहेत, तीसुद्धा वाचकांना आवडतील अशी आशा आहे. वाचक नेहमीप्रमाणे या अंकाचे मन:पूर्वक स्वागत करतील, असा विश्वास वाटतो.


**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
संपर्क : ०२२-२२०४१५८५/२२०२७९५६
dg@dgipr.maharashtra.gov.in

# ज्ञानभाषेकडे वाटचाल

ऑनलाईन हा आजचा परवलीचा शब्द बनला आहे. अर्थातच हा शब्द किंवा संकल्पना ही संगणक आणि इंटरनेटशी संबंधित आहे. संगणक आणि इंटरनेटने संपूर्ण जगात मोठी क्रांती केली आहे. आपल्या दैनंदिन व्यवहाराचा तो एक भाग बनला आहे. कोणताही व्यवहार असो, प्रत्यक्ष बँकेत जाण्याची किंवा रोख पैसे हाताळण्याची गरज उरलेली नाही. केंद्र सरकारनेही नुकतीच आधार क्रमांक निगडित आपका पैसा आपके हाथ, ही थेट लाभार्थींच्या खात्यात पैसे जमा करण्याची योजनाही सुरू केली आहे. कोठेही गेलात तरी कनेक्टिव्हिटीला आणि संगणकाला अनन्यसाधारण महत्त्व मिळालेले आपल्याला दिसते.

शासकीय कार्यालये आणि व्यवहारही याला अपवाद राहिलेली नाहीत. जवळपास सर्व शासकीय कार्यालयांचे संगणकीकरण झालेले आहे. प्रत्येक तालुक्यातील सेतू सेवा केंद्रे आणि ठिकठिकाणची महा-ई-सेवा केंद्रे याची साक्ष देत आहेत. राज्य शासनाने आपले ई-गव्हर्नन्स धोरण २०११ मध्ये जाहिर केले आहे. शासकीय कारभारात मराठी राज्यभाषेचा शंभर टक्के वापर करण्याचे शासनाचे धोरण आहे. मात्र संगणकाची भाषा ही मुख्यत्वे इंग्रजी आहे. यामुळे संगणकामध्ये मराठीचा जास्तीत जास्त वापर व्हावा, यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने बरेच प्रयत्न केले आहेत. ई-गव्हर्नन्स धोरणामधील कलम ६ मध्ये ई-गव्हर्नन्समधे मराठीच्या संपूर्ण वापराबाबत स्पष्टपणे तरतूद करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या सर्व विभागांना ई-गव्हर्नन्स वापरात मराठी ही पहिली आणि अनिवार्य भाषा करण्यात आली आहे.

मराठीचा अनिवार्य वापर हे या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी युनिकोडचा वापर ही यातील सर्वात महत्त्वाची बाब आहे. सी-डॅकने तयार केलेले आयएसएम (इंटेलिजंट स्क्रिप्ट मॅनेजर) हे उपकरण (टुल) शासन व्यवहारात मराठी टंकलेखनासाठी वापरले जाते. आतापर्यंत हे युनिकोडशी प्रमाणित नव्हते. मात्र त्याची ६ आणि ६.१ ही आवृत्ती युनिकोड प्रमाणित करून एक मोठा अडथळा दूर झाला आहे. या आवृत्त्यांमध्ये पूर्वीच्या आवृत्त्यांमधील मजकूर युनिकोडमध्ये परावर्तित करण्याचीही सोय करण्यात आली आहे. युनिकोड वापराच्या प्रशिक्षणाचाही मोठा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या सगळ्याचा परिणाम संगणकीय शासन व्यवहारात मराठीचा संपूर्ण वापर होण्यात झाला आहे.



**आज जगभरात संगणकाची भाषा ही ज्ञानभाषा असे मानले जाते. संगणकाचे ज्ञान नसलेला निरक्षर समजला जातो. यादृष्टीने सर्व संगणकीय व्यवहार युनिकोड प्रमाणित करून व संगणकाचे मराठीकरण करून महाराष्ट्र शासनाने मराठीला ज्ञानभाषा बनविण्याचा चंग बांधला आहे आणि आम्ही त्यात चांगलेच यश मिळवले आहे. 'लोकराज्य'च्या वाचकांसाठी सांगत आहेत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण.**

आज जगभरात संगणकाची भाषा ही 'ज्ञानभाषा' असे मानले जाते. संगणकाचे ज्ञान नसलेला निरक्षर समजला जातो. यादृष्टीने सर्व संगणकीय व्यवहार युनिकोड प्रमाणित करून व संगणकाचे मराठीकरण करून महाराष्ट्र शासनाने मराठीला 'ज्ञानभाषा' बनविण्याचा चंग बांधला आहे आणि आम्ही त्यात चांगलेच यश मिळवले आहे. आज शासनाची सर्व संकेतस्थळे युनिकोड प्रमाणित आहेत.

मराठी भाषा विभागाच्या सहकार्याने मराठी ग्रंथांच्या डिजिटायझेशनचा एक महत्त्वाचा निर्णय नुकताच म्हणजे गेल्या आठवड्यात झाला आहे. पहिल्या टप्प्यात ४९० मराठी ग्रंथ अणि शासन व्यवहार कोषांचे डिजिटायझेशन करण्यात येणार आहे. अर्थात हे काम केवळ पुस्तकांचे स्कॅनिंग या स्वरूपाचे नसेल तर ही सगळी पुस्तके 'इ-बुक' स्वरूपामध्ये तयार करण्यात येणार आहेत. ही इ-पुस्तके कोणालाही डाऊनलोड करून घेता येतील. मराठी 'श्राव्यग्रंथ' (ऑडिओ बुक्स) ही संकल्पनाही आम्ही शासन स्तरावर प्रत्यक्षात आणीत आहोत. लवकरच ज्ञानेश्वरी आणि दासबोध हे ग्रंथ श्राव्यग्रंथाच्या रूपात मराठीप्रेमींना राज्य विकास संस्थेच्या संकेतस्थळावर मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.


अशा पद्धतीने संगणकाच्या माध्यमातून मराठीचा सर्व स्तरांवर वापर करण्याचे आमचे प्रयत्न यशस्वी होत आहेत. पुणे येथील सी-डॅक संस्थेशी सामंजस्य करार करून मराठी भाषेतील कॉम्प्युटिंगसाठी सेंटर फॉर एक्सलन्स स्थापन करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. वारंवार वापरले जाणारे इंग्रजी शब्द आणि त्यासाठी मराठी प्रतिशब्दांची योजना हे एक महत्त्वाचे आव्हान आहे. यादृष्टीनेही माहिती तंत्रज्ञान विभागाने मराठी भाषा विभागाच्या सहकार्याने नुकतीच दोन दिवसांची कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेच्या मंथनातून सुमारे ४०० प्रतिशब्द आज्ञावली विकासकांना उपलब्ध करून देण्यात आले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्याचे प्रयत्न करीत असतानाच संगणकीय व्यवहारांमध्ये मराठीचा संपूर्ण वापर करून मराठी जागतिक स्तरावर नेण्यात आम्ही यशस्वी होत आहोत. यामुळे मराठीच्या प्रचार व प्रसाराला मोठी गती येईल, याचा मला विश्वास आहे.

**शब्दांकन : सतीश लळीत**
मुख्यमंत्र्यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी
संपर्क : ९४२२४१३८००

# बोलावे मराठी...

**भाषा हे केवळ संवादाचं माध्यम नसून ते संस्कृती आणि अस्मितेचं प्रतीक असते. आपली मराठी भाषा ही केवळ आपली राज्यभाषा नाही, तर आपलं सांस्कृतिक वैभव आणि महाराष्ट्रीय माणसाचा मानबिंदू आहे. मराठी भाषेच्या विकासातच या राज्याचा सर्वांगीण विकास सामावलेला आहे, त्यामुळे मराठी भाषेचा विकास ही आपल्या सर्वांची जबाबदारी आणि सर्वाधिक प्राधान्याने करण्याची गोष्ट आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मनोगत.**



फेब्रुवारी महिन्यात २७ तारखेला आपण सर्वजण मराठी भाषा दिवस विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करीत असताना, लोकराज्यच्या वाचकांना मी मराठी भाषा दिवसाच्या मनापासून शुभेच्छा देतो.

मराठी भाषा ही प्राचीन, समृद्ध आणि गौरवशाली परंपरा असलेली भाषा आहे. सातवाहन, राष्ट्रकुट आणि अनेक मराठी राजांनी मराठी भाषेला राज्यभाषेचा दर्जा दिला. इतिहासकारांनी केलेल्या संशोधन आणि अभ्यासानुसार दोन ते अडीच हजार वर्षांपूर्वीपासून मराठी भाषेच्या अस्तित्वाच्या खुणा आढळून येतात. या अडीच हजार वर्षांच्या वाटचालीत अनेक संतांनी, साहित्यिकांनी, कलावंतांनी, संशोधकांनी आणि दैनंदिन व्यवहारात मराठी बोलणाऱ्या, लिहिणाऱ्या, वाचणाऱ्या आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसांनीही मराठी भाषा समृद्ध करण्यात मोलाचं योगदान दिलं आहे.

महानुभवांनी मराठी भाषेला आपली धर्मभाषा मानली. संत ज्ञानेश्वरांनी, *माझिया मऱ्हाटीचि बोलु कवतुके। परी अमृतातेंही पैजा जिंके।।* अशा शब्दांत मराठी भाषेचा मोठेपणा सांगितला. कविवर्य कुसुमाग्रजांनी, *हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू। वसे आमुच्या मात्र हृदयमंदिरी।। जगन्मान्यता हीस अर्पू प्रतापे। हिला बैसवू वैभवाच्या शिरी।।* असं सांगून मराठीला वैभवाच्या शिखरावर नेण्याचं आवाहन केलं. कविवर्य सुरेश भटांनी, *लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी। जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी।। धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी। एवढ्या जगात माय मानतो मराठी।।* असं म्हणत मराठी असणं हे किती भाग्याचं आहे ते सांगितलं.

संत तुकाराम महाराजांनी तर मराठी भाषेला वैभवाच्या शिखरावर नेलं. त्यांनी आपल्या साहित्यातून 'कसं जगावं?' याचं आतापर्यंतचं सर्वोत्कृष्ट मार्गदर्शन अखिल मानव जातीला केलं आहे. काळाच्या ओघातही अखंड आणि चिरकाल टिकून राहील अशी साहित्य निर्मिती तुकाराम महाराजांनी मराठी भाषेत केली.

मराठी भाषेबद्दल आज काही जणांच्या मनात न्यूनगंड आहे. मराठी बोलताना त्यांना कमीपणा वाटतो. परंतु, ज्यांनी संत तुकारामांचं साहित्य वाचलं आहे आणि त्या साहित्याचा अभ्यास केला आहे, त्यांना हा न्यूनगंड कधीच येणार नाही.

मराठी भाषेचा विकास सध्या विविध स्तरांवर करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. भाषा विकासाच्या कार्याला निधी कमी पडू नये याची दक्षता घेण्यात आली आहे. मराठी भाषा वाढवायची आणि समृद्ध करायची असेल तर इथल्या साहित्य, कला आणि सांस्कृतिक क्षेत्राला प्रोत्साहन देण्याची गरज लक्षात घेऊन राज्य शासनानं नेहमीच या क्षेत्रांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका घेतली आहे. साहित्य, नाटक, चित्रपट, लोककलांच्या निर्मितीसाठी कोट्यवधी रुपयांचं भरीव अनुदान शासनातर्फे देण्यात येत आहे. कला आणि कलावंतांना विविध माध्यमातून मदत केली जात आहे. याचा उपयोग निश्चितच मराठी भाषेच्या संवर्धनासाठी होत आहे.

मराठी भाषा ही व्यवहाराची आणि ज्ञानाची भाषा बनल्याशिवाय भाषेच्या विकासप्रक्रियेला गती येणार नाही. जगभरात घडणाऱ्या विविध घडामोडी, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगानं होणारं संशोधन, समाजाच्या विविध क्षेत्रातलं अद्ययावत ज्ञान तसेच या नवनवीन क्षेत्रातल्या तांत्रिक शब्दांना पर्यायी मराठी शब्द अशा अनेक गोष्टी मराठी भाषेत तातडीनं उपलब्ध झाल्या पाहिजेत. माहिती-तंत्रज्ञानाचा उपयोग मराठीच्या विकासासाठी प्रभावीपणे करून घेतला पाहिजे.

इंटरनेटवरही मराठीचा वापर वाढला पाहिजे. व्यवहारात नसलेली वस्तू जशी हळू-हळू बाद होते, तोच नियम भाषेलाही लागू पडतो. त्यामुळे मराठी भाषा जगवायची आणि तिचा विकास करायचा असेल तर आपल्यापैकी प्रत्येकानं दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा वापर केला पाहिजे. वाढवला पाहिजे. मराठी असणं किंवा मराठी भाषा बोलणं ही अभिमानाची गोष्ट आहे, हे आपण सर्वांनी लक्षात घेतलं पाहिजे.

मराठीला राज्यभाषेचा दर्जा यापूर्वीच मिळाला आहे. तालुका आणि जिल्हा न्यायालयांचं कामकाज आज मराठीतून होत आहे. मराठी साहित्य, नाटक आणि चित्रपट क्षेत्रात नवनवीन प्रयोग होत आहेत. दरवर्षी हजारो पुस्तके प्रकाशित होत आहेत. देशात सर्वाधिक ग्रंथालये महाराष्ट्रात आहेत. मराठीला ज्ञानभाषा आणि न्यायव्यवहाराची भाषा बनविण्यास आपण काही अंशी यशस्वी झालो आहोत. मराठी भाषेच्या विकासासाठी शासनानं मराठी भाषा विभाग स्थापन केला असून त्याच्या माध्यमातून विविध उपक्रमांची अंमलबजावणी सुरू आहे. मराठी भाषेच्या समृद्धीची ही घोडदौड सुरू असली तरी, आपल्याला एवढ्यावरच समाधानी राहून चालणार नाही. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देणं हा देखील याच वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. मराठी भाषेचा विकास हा दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर वाढविल्यानेच शक्य आहे, त्यामुळे आपण सर्वांनी आपले दैनंदिन व्यवहार मराठी भाषेतच करण्याचा दृढ संकल्प करावा, असं माझं आपल्या सर्वांना आवाहन आहे.

**शब्दांकन : संजय देशमुख**
उपमुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी
संपर्क : ९८२१३६८२१०

# अभिजात मराठी

**सव्वाअकरा कोटी लोकांची मराठी ही जगातील दहाव्या क्रमांकाची भाषा आहे. संपन्न ज्ञानभाषा असणारी मराठी महानुभवांची धर्मभाषाही आहे. मराठी ही राजभाषा असणारे सातवाहन, राष्ट्रकुट आणि मराठे हे राज्यकर्ते भारतभर राज्य करत होते. आजच्या पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानावरही मराठी सत्तेची पताका फडकत होती. ही भाषा बोलणारे लोक आज जगातील ७२ देशांत पसरलेले आहेत. ते भारताच्या ३५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशात महत्त्वाच्या पदांवर काम करत आहेत. त्यामुळे ही फक्त एका प्रांताची भाषा नसून, ती महत्त्वाची राष्ट्रीय भाषा आहे.**

## प्रा. हरी नरके

अमृतातेही पैजा जिंकणाऱ्या आणि भाषामाजी भाषा साजरी असणाऱ्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे सर्व प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट स्थापन केला आहे. आजवर तमीळ, तेलगू, कन्नड व संस्कृत या चार भाषांना केंद्र शासनाने हा दर्जा दिलेला आहे.

भाषेच्या अभिजातपणासंबंधीचे केंद्र सरकारचे निकष पुढीलप्रमाणे आहेत.

1. High antiquity of its early texts/recorded history over a period of 1500-2000 years.

- भाषेची प्राचीनता

2. A body of ancient literature / texts, which is considered a valuable heritage by generations of speakers.

- भाषेची मौलिकता आणि सलगता

3. The literary tradition be original and not borrowed from another speech community.

- भाषिक आणि वाङ्मयीन परंपरेचे स्वयंभूपण

4. The Classical language and literature being distinct from modern, there may also be a discontinuity between the Classical language and its later forms of its offshoots.

- प्राचीन भाषा व तिचे आधुनिक रूप यांच्यात पडू शकणाऱ्या खंडासह जोडलेले / असलेले नाते.

या चारही मुद्यांच्या अनुषंगाने विचार करता मराठी भाषा ही अभिजात भाषा आहे हे सबळ पुराव्यानिशी सिद्ध करता येते. मराठी भाषा अभिजात ठरण्यासाठी काही पूर्वग्रह आणि खोलवर रुजलेल्या गैरसमजुती यांचा अडथळा आहे. मराठी ही संस्कृतोद्भव भाषा आहे आणि तिचे वय १ हजार वर्षांपेक्षा कमी आहे अशी लोकसमजूत करून देण्यात आली आहे.


प्राचीन महारट्ठीभाषा, मरहट्टी भाषा, महाराष्ट्री प्राकृत भाषा, अपभ्रंश मराठी भाषा




**ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर, राजारामशास्त्री भागवत, दुर्गा भागवत, वा. वा. मिराशी, डॉ. कृ. पां. कुलकर्णी, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. शं. गो. तुळपुळे, ल. रा. पांगारकर, डॉ. ह. धि. सांकलिया आणि इतर अनेक मान्यवरांच्या ग्रंथांचे पुरावे पाहता मराठीचे वय सुमारे २५०० वर्षे असल्याचे सिद्ध होते.**

आणि आजची मराठी भाषा असा मराठीचा प्रवास झाला आहे. या वेगवेगळ्या भाषा नसून ती मराठी या एकाच भाषेची तीन रूपे आहेत, असे ल. रा. पांगारकर यांनी सोदाहरण दाखवून दिले आहे. लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू हे मराठीतले आद्यग्रंथ नाहीत; तर ते मराठी प्रगल्भ व श्रीमंत झाल्यानंतरचे श्रेष्ठ ग्रंथ आहेत. हे जागतिक तोडीचे ग्रंथ आठशे वर्षांपूर्वी ज्या भाषेत लिहिले गेले, ती त्याच्या आधी बारा-पंधराशे वर्षे अत्यंत समृद्ध भाषा होती याचे शिलालेख, ताम्रपट, पोथ्या आणि हस्तलिखित ग्रांथिक पुरावे आज उपलब्ध झाले आहेत. मराठीतला आज उपलब्ध असलेला पहिला ग्रंथ सुमारे २ हजार वर्षे जुना असून त्याचे नाव 'गाथासप्तशती' असे आहे. संस्कृतवाणी देवे केली मग प्राकृत काय चोरापासून झाली, असा संतप्त सवाल संत एकनाथांनी विचारला होता. एकनाथांची भाषा आजची मराठी भाषा असूनही ते तिला प्राकृत म्हणतात यावरूनही या दोन वेगळ्या भाषा नाहीत हेच स्पष्ट होते. ज्ञानेश्वरांनी मराठीला देशी भाषा म्हटलेले आहे. हेमचंद्राचे 'देशी नाममाला' हे या भाषेचे व्याकरण प्रसिद्ध आहे. पाणिनीच्या समकालीन वररुची (कात्यायन) याने लिहिलेला 'प्राकृत प्रकाश' हा व्याकरण ग्रंथ ख्यातनाम आहे. भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेकडे सुमारे ३० हजार प्राचीन पोथ्या उपलब्ध असून त्यातील दीड ते दोन हजार वर्षे जुन्या असलेल्या सुमारे ८० ग्रंथांमध्ये मराठी भाषा त्यात प्रामुख्याने कालिदासाचे शाकुंतल (४ थे शतक), शुद्रकाचे मृच्छकटीक (६ वे शतक), प्रवरसेनाचे सेतुबंध (५ वे शतक), भद्रबाहुचे आवश्यक नियुक्ती (३ रे शतक), विमलसुरीचे पौमचरिया (१ ले ते ३ रे शतक) यांचा समावेश आहे.

रामायण, महाभारतातही शेकडो मराठी शब्द सापडतात. २ हजार वर्षांपूर्वी बृहत्कथा हा पैशाची भाषेतील ग्रंथ गुणाढ्य या मराठी लेखकाने लिहिलेला आहे. 'विनयपिटक', 'दीपवंश', 'महावंश' या बौद्ध ग्रंथांमध्ये पाली व सिंहली भाषेत महाराष्ट्राचा उल्लेख आलेला आहे. मोगलिपुत्ततिष्य याने काही 'थेर' म्हणजे श्रेष्ठ धर्मोपदेशक निरनिराळ्या देशांना पाठविल्याचा उल्लेख आहे. पैकी 'महारट्ठ' देशात थेरोमहाधम्मरखिता यास पाठविले असे त्यात म्हटले आहे, 'रक्खितथेरं वनवासि योनक धम्मरक्खित थेरं अपरंकतं महाधम्मरक्खित थेरं महारट्ठ.'



**मराठीत दरवर्षी सुमारे दोन हजार पुस्तके प्रकाशित होतात, पाचशे दिवाळी अंक निघतात आणि छोटी - मोठी सुमारे दोनशे साहित्य संमेलने होतात. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला लाखो रसिक उपस्थिती लावतात. दरवर्षी कोट्यवधी रुपयांची मराठी पुस्तकांची विक्री होत असते. नामवंत खासगी प्रकाशन संस्था आणि सरकारी प्रकाशने यांची वैचारिक आणि ललित पुस्तकांची वार्षिक उलाढाल वीस ते पंचवीस कोटी रुपयांपर्यंत असून पाठ्यपुस्तके, धार्मिक ग्रंथ, पाककृती, व्यक्तिमत्त्व विकासविषयक तसेच ललित आणि वैचारिक ग्रंथ यांची एकत्रित बाजारपेठ सुमारे २५० कोटी रुपयेआहे. देशातील एकूण ग्रंथालयांपैकी २५ टक्के ग्रंथालये एकट्या महाराष्ट्रात आहेत. मराठीत जेवढे कोश वाङ्मय आहे तेवढे भारतातील अन्य कोणत्याही भाषेत नाही. ज्ञानेश्वर, तुकारामांवरून शेकडो नोबेल ओवाळून टाकावीत असे जागतिक दर्जाचे श्रेष्ठ लेखन मराठीत झालेले आहे. मराठी भाषेत आजवर सुमारे एक लाख ग्रंथ प्रकाशित झाले असून त्यातील असंख्य ग्रंथ वैश्विकदृष्ट्या श्रेष्ठ ठरावेत असे आहेत.**

**लोकभाषेतून निर्मिती**

मराठी ही मुख्यत: महाराष्ट्राची भाषा असून वेदपूर्वकाळापासून चालत आलेल्या लोकभाषांमधून ती तयार झाली आहे. अशाच दुसऱ्या एका लोकभाषेतून संस्कृत जन्माला आलेली आहे. आजपर्यंत मराठीवर आर्यांची बोलभाषा, वैदिक, संस्कृत व विविध प्राकृत तसेच द्रविडी भाषा यांचा परिणाम झाला आहे. मराठीत तत्सम, तद्‌भव व देश्य यात तीनही प्रकारचे शब्द आढळतात. महाराष्ट्री म्हणून जी प्राकृत भाषेतील विशेष प्रौढ व वाङ्‌मयीन भाषा तीच मराठी होय.

मराठी भाषेतील पहिला शिलालेख २२२० वर्षांपूर्वीचा आहे. तो ब्राह्मी लिपीतील असून तो पुणे जिल्ह्यातील जुन्नर जवळच्या नाणेघाटातील आहे. या शिलालेखात 'महारठिनो' लोकांचा स्पष्ट उल्लेख आहे. डॉ. वा. वि. मिराशी यांनी आपल्या 'सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख' या ग्रंथात हा शिलालेख प्रकाशित केला आहे. (''...य महरठिनो अंगियकुलवधनस सगरगिरिवलयाय पथविय पथमवीरस वस... य महतो मह.... '' अनुवाद- ''....महारठी अंगिय कुलोत्पन्न गिरिसमुद्रवलयांकित पृथ्वीवरील वीरश्रेष्ठ.... महान अशा पुरुषात श्रेष्ठ अशा...'') ज्या महारठी भाषेत हा शिलालेख लिहिला गेला आहे ती त्याआधी किमान २०० ते ३०० वर्षे अस्तित्वात असली पाहिजे.

महाराष्ट्र या देशनामापेक्षा महाराष्ट्री भाषा जुनी आहे. अश्मक, कुंतल, अपरान्त, विदर्भ

या प्रदेशांत प्राकृत महाराष्ट्री प्रचारात होती. इतकेच नाहीतर सातवाहनांच्या राजवटीत (इ.स.पूर्व २ रे शतक ते इ.स.२ रे शतक) त्यांचा राज्यविस्तार कुरुक्षेत्र, पेशावर इथपर्यंत झाल्यामुळे ती भारताच्या बऱ्याच मोठ्या भूभागात प्रचलित होती. म्हणूनच 'गाहासत्तसई' ऊर्फ 'गाथासप्तशती' या हाल सातवाहन राजाने संकलित केलेल्या गाथांच्या प्रतींची हस्तलिखिते देशभर अनेक ठिकाणी सापडलेली आहेत.

### महाराष्ट्री हे महारड्डी

महारड्डी-मरहट्टी-मऱ्हाटी-मराठी असा उच्चारभ्रमाचा प्रवास 'महाराष्ट्री हे महारड्डी'चे नामकरण संस्कृत भाषेने, तिच्यातल्या पंडितांनी केले. संस्कृत भाषेला संस्कृत हे नाव मिळण्याआधी महाराष्ट्री भाषा अस्तित्वात होती, एवढेच नाही, तर ती प्रगल्भ झालेली होती. हाल सातवाहनाची 'सत्तसई' जयवल्लभाचा 'वज्जालग्ग' हा सुभाषित कोश, प्रवरसेन वाकाटकाचे 'रावणवहो' वाक्पतीराजाचे 'गऊडवहो' ही महाकाव्ये हे महाराष्ट्री प्राकृतातील मुख्य ग्रंथ. पैकी सत्तसई व रावणवहो नि:संशय महाराष्ट्रात लिहिले गेले.

''महाराष्ट्राश्रया भाषां प्रकृष्ट प्राकृतं विदु:।'' असे महाकवी दंडी म्हणतो. म्हणूनच महाराष्ट्री प्राकृत हा महाराष्ट्रीयांचा अभिमानविषय आहे. मूलत: ही भाषा महाराष्ट्राचीच, हे नि:संशय. शिवाय प्रचलित मराठीशी महाराष्ट्रीचे निकटचे नाते व साम्य आहे हे अनेक उदाहरणांवरून व व्युत्पत्त्यांवरून सिद्ध होते. महाकवी बाणभट्ट (सातव्या शतकाचा प्रथमार्ध) याने हर्षचरिताच्या प्रास्ताविकात गाथा कोशाचा उल्लेख केला आहे.

यानंतर गाथासप्तशतीचा महत्त्वाचा उल्लेख राजशेखराने (इ.स. ८८० ते ९२०) केलेला आहे. सातवाहन राजाने अनेक ठिकाणांहून गाथा जमवून त्यांचा संग्रह केला. यामुळे लोकांचा आनंद संकोच पावला नाही, उलट विस्तार पावला. केवढी ही आश्चर्याची परंपरा !

'गाथासप्तशती'तील भौगोलिक स्थाने, नद्या सारे महाराष्ट्र देशातीलच आहे. गिरणा, गोदावरी, तापी, नर्मदा, मुळा या नद्या या ग्रंथात प्रामुख्याने आहेत. बहुसंख्य उल्लेख त्र्यंबकेश्वर, गोदावरी, पैठण यांचे आहेत. गाथासप्तशती हे महाराष्ट्राचे आद्य लोकसाहित्य आहे. त्यात काव्यगत कृत्रिमता अजिबात नाही. जीवनाची करुण, दारुण व हृदयस्पर्शी अशी सर्व अंगे सारख्याच कुशलतेने तिच्यात रेखाटलेली आहेत.

### अपभ्रंशापासून मराठी

अपभ्रंशापासून मराठी निघाली हे डॉ. वि. भि. कोलते यांनी वाङ्मयीन पुराव्याने सिद्ध केले आहे. ज्ञानेश्वरीत मराठी भाषेला 'मऱ्हाठी' या शब्दाबरोबरच 'देशी' हा शब्दही वापरलेला आहे. किंबहुना मराठीचे 'देशी' हेच नाव अधिक रूढ होते. अपभ्रंशग्रंथातून त्यातील भाषेलाच म्हटले आहे. अपभ्रंश भाषेचे साहित्यांतर्गत नाव 'देसी' असेच आहे. अपभ्रंश नव्हे. या देसीचा विकास होऊन जी भाषा निर्माण झाली ती देशी किंवा मराठी. ती अपभ्रंशाच्या 'नागर' या प्रकारापासून निघाली.

देशी याचा अर्थ त्या त्या भूमीशी जोडलेले असणे असा होतो. ज्ञानेश्वरसुद्धा 'दाऊ वेल्हळ देशी नवी' असे आक्रमक होतात आणि भटोबाससारख्या गाढ्या पंडितालाही 'तुमचा अस्मात कस्मात मी नेणे गा : मज श्रीचक्रधरे, निरुपिली मऱ्हाटी : तियाचि पुसा' असे म्हणावे लागते.



इ.स. ७७८ मध्ये लिहिलेल्या उद्योतनसुरी याच्या 'कुवलयमाला' या ग्रंथात अठरा देशी भाषांचा उल्लेख आहे. ग्रंथ अपभ्रंश भाषेतला अठरा देशी भाषांपैकी एकीचे नाव 'मरहट्ट' असे आहे. मरहट्टांचे भाषेचे वर्णन येणे प्रमाणे-

दढमडह सामलंगे सहिरे अहिमाण कलहसले य।

दिण्णले गहिल्ले उल्लविरे तत्थ मरहट्टे।।

(अर्थ : धरमुट, काळासावळा, सहनशील, अभिमानी, कलहशील व 'दिण्णले गहिल्ले' बोलणारा मरहट्टा....)

गाथा सप्तसती या ग्रंथातील गाथा पाहिल्या की, या गाथांमधील समाजजीवन आणि सामाजिक पर्यावरण मराठी असल्याचे, महाराष्ट्रीय असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

महाराष्ट्राचा प्राचीनतम, परंतु अप्रत्यक्ष उल्लेख पहिल्या शतकात रचिलेल्या वररुचीच्या प्राकृत व्याकरणात मिळतो. वररुचीने 'महाराष्ट्री' हे त्या प्रदेशांतील प्राकृत भाषेचे नाव दिले आहे. हा ग्रंथ पाणिनीच्या काळातील आहे. त्यात त्याने शौरसेनी, मागधी, पैशाची, महाराष्ट्रीचे सगळे नियम सांगून झाल्यानंतर सर्वांत महत्त्वाचा नियम सांगितला आहे की, शेषं महाराष्ट्रीवत ('बाकी सर्व नियम मराठीप्रमाणे असतील.') यावरून मराठी ही प्रमुख भाषा होती हे निर्विवाद आहे. देशावरून भाषेला नाव पडते हे लक्षात घेता यानंतरचा उल्लेख शकनृपति श्रीधर वर्मा याच्या चौथ्या शतकातील (इ. स. ३६५) एरण येथील स्तंभलेखात सापडतो. त्यात श्रीधर वर्मा याचा सेनापती सत्यनाग आपणास 'महाराष्ट्र' म्हणजे महाराष्ट्रीय म्हणवितो. (''सेनापति सत्यनागेन... प्रमुखेन महाराष्ट्रेन..'').

पुढे वराहमिहिराने 'बृहत्संहिते'त महाराष्ट्रीयांविषयी 'भाग्ये रसविक्रयिग: पण्यस्त्रीकन्यका महाराष्ट्र:' असे म्हटले आहे. (बृहत्संहिता १०.८) ऐहोळे शिलालेखात (इ.स. ६३४) सत्तयाश्रय पुलकेशी (चालुक्य) हा तीनही महाराष्ट्राचा सार्वभौम राजा झाल्याचा उल्लेख आढळतो. (एपि. इं. ६.४). प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएनत्संग (इ. स. ६२९ ते ६४५) महाराष्ट्रास 'मोहोलाश' असे संबोधून त्याविषयी विस्ताराने लिहितो. वात्स्यायन, वररुची व दंडी यांनी केलेले महाराष्ट्राचे उल्लेख प्रसिद्धच आहेत. राजशेखर स्वत:ला महाराष्ट्र चुडामणी म्हणवून घेतो.

शिलालेख, ताम्रपट, हस्तलिखित पोथ्या, प्रकाशित ग्रंथ, या साऱ्यांच्या संशोधनातून मराठीबाबत एक 'प्रमाणक परिवर्तन' (पॅराडाईम शिफ्ट) होणार आहे.

❒ ❒

# शोध प्राचीनत्वाचा

**डॉ. सु. र. देशपांडे**

अभिजातता, वाङ्‌मयातील वा कलेतील ही एक केवळ ऐतिहासिक विचारसरणी अथवा केवळ एक इतिहासनिरपेक्ष तत्त्वप्रणाली मानली, तर याचे यथार्थ स्वरूप समजणार नाही. अभिजातवादाने वाङ्‌मयविषयक विशिष्ट शैली, विशिष्ट दृष्टिकोन, विशिष्ट मनोवृत्ती, विशिष्ट प्रेरणा, विशिष्ट कालखंड व विशिष्ट वाङ्‌मयीन मूल्यकल्पना यांपैकी एक, अनेक किंवा सर्वच गोष्टी सुचविल्या जातात. त्यामागे परंपरा, लोकरीती, लोकवाङ्‌मय, कोरीव लेख, मौखिक परंपरा, लिखित साहित्य इत्यादींची पार्श्वभूमी असते.

मराठी भाषेतील आद्य ग्रंथांच्या जन्मकाळापासून मोजणी केली, तर सुरुवातीस 'लीळाचरित्र' आणि 'ज्ञानेश्वरी' यांसारख्या सर्व दृष्टींनी अपूर्व व अलौकिक वाङ्‌मयीन कृतींची निर्मिती देवगिरीकर यादव वंशाच्या राजवटीत (इ.स. ११८५ ते १३१८) झाली. महानुभाव पंथाचे प्रमुख व संस्थापक श्री चक्रधर यांनी आपला उपदेश मराठीत केल्यामुळे त्यांच्या पंथीयांनी मराठीत ग्रंथरचना केली. 'लीळाचरित्रा'सारखा अष्टपैलू महात्म्य असणारा ग्रंथ या कालखंडाच्या प्रारंभीच आहे; किंबहुना त्यानेच या कालखंडाला प्रारंभ होतो. ज्ञानेश्वरीसारखे रत्न, की ज्याची प्रभा पुढे दीर्घकाळ, किंबहुना चिरकाल फाकत राहिली आणि राहील, ती याच काळात निपजली. मराठी साहित्यातून ज्ञानेश्वरी वजा केली तर ''मराठी साहित्य - ज्ञानेश्वर = शून्य'' असे विनोबा भावे म्हणत असत. चक्रधरस्वामींच्या ज्या सूत्रपाठावर महानुभावीय वाङ्‌मयाचे मंदिर उभे राहिले, तो सूत्रपाठ याच काळातील होय. नरेंद्रसारखा ललितमधुर आणि तितकाच स्वाभिमानी कवी याच काळाने महाराष्ट्राला-मराठी भाषेला दिला. महानुभावांच्या 'सातीग्रंथा'सारखी काव्ये, नामदेवांसारख्यांच्या हृदयीच्या व्यथा



सांगणाऱ्या गाथा, ही सर्व निर्मिती या काळात झाली. 'प्रथमवयसाकाळी' प्रकट झालेली मराठी भाषेच्या लावण्याची ही 'नव्हाळी' खरोखरच अपूर्व म्हटली पाहिजे. मुकुंदराजाचे 'विवेकसिंधु' व 'परमामृत' आणि ज्ञानदेवांची 'भावार्थदीपिका' नामक गीतेवरील टीका हे त्या काळचे वेदान्तविषयक मराठी ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. मराठी भाषेच्या इतिहासात प्रारंभीच इतकी अभिजात समृद्ध ग्रंथरचना झाल्याचे हे कदाचित एकमेव उदाहरण असेल! विशेष म्हणजे सुरुवातीचे हे ग्रंथ पुढील पिढीला अखंड स्फूर्ती देत आले आहेत.

प्रारंभीच्या वाङ्‌मयाचा विचार करताना पहिली गोष्ट लक्षात येते ती ही की, हे अभिजात वाङ्‌मय एका नवीन भाषेत प्रकट होत होते. तसे पाहिल्यास या काळापर्यंत म्हणजे १२ व्या - १३ व्या शतकापर्यंत मराठी भाषेचा जन्म झाल्यास किमान चार-पाचशे वर्षे निश्चितपणे लोटली असणार; पण ह्या कालावधीत तिने वाङ्‌मयाच्या दिशेने काही वाटचाल केलेली होती का? तत्संबंधी ठोस

पुरावा मिळत नाही. याचा अर्थ या चार-पाचशे वर्षांत मराठी भाषेत काहीच निर्माण झाले नाही, असे नव्हे. लोकगीते, लोककथा, ओव्या-अभंग, ज्योतिषवैद्यकाची बाडे यांसारखी निर्मिती झालीच असणार. म्हणजे मराठी वाङ्‌मयाचा प्रारंभ लीळाचरित्र किंवा ज्ञानेश्वरी यांपासून न होता, तो त्यापूर्वी काही शतकांपासून झालेला असणार, हे निर्विवाद होय. मराठी भाषा चारशे वर्षे 'ज्ञानेश्वरी'पूर्वी अस्तित्वात होती, असे डॉ. ग. वा. तगारेंसारखे अभ्यासक म्हणतात. तिला राष्ट्रकूटकालीन मराठी संबोधितात. पण यादवकालापूर्वी राष्ट्रकुटांच्या, शिलाहारांच्या, चालुक्यांच्या राजवटीत काही मराठी ग्रंथ निर्माण झालेच असतील. ज्ञानेश्वरीसारखा अभिजात अद्वितीय ग्रंथ काही एकदम निपजला नसणार! पण अद्यापि यादवपूर्व प्रदीर्घ काळ काही शिलालेख सोडल्यास पूर्णपणे अंधारात आहे. 'लीळाचरित्र' किंवा 'ज्ञानेश्वरी' निर्माण होण्यापूर्वी जी चारशे वर्षे गृहीत धरली जातात, त्या प्रदीर्घ काळात असे कितीतरी वाङ्‌मय लोकांच्या तोंडून उत्स्फूर्तपणे निर्माण झाले असावे; परंतु ते लेखनविष्ट न झाल्याने ते जसे निर्माण झाले तसे निमालेही असेल. अशा प्रकारच्या वाङ्‌मयाची, ज्याला आज आपण लोकवाङ्‌मय या नावाने गौरवितो, त्याची थोडी चाहूल लीळाचरित्रसारख्या एखाद्या अपवादात्मक ग्रंथात लागते.

### लोकवाङ्‌मयाचे विशेष स्थान

मराठी भाषेत लोकवाङ्‌मयाला विशेष स्थान आहे. अलीकडच्या काळात लोकांनी लिहिलेले नव्हे, तर बोललेले वाङ्‌मय उदा. रूढ असणाऱ्या पारंपरिक कथा, कहाण्या, गाणी, म्हणी, उखाणेपाखाणे, आजीबाईच्या गोष्टी, अंगाईगीते, जात्यावरील ओव्या, पुराणकथा इत्यादी. रा. चिं. ढेरे म्हणतात, ''ज्या काळात श्रवण हेच बहुजनांच्या ज्ञानसाधनेचे माध्यम होते, त्या काळात पुराणकथा हे सामान्य समाजाचे खुले विद्यापीठ (ओपन युनिव्हर्सिटी) होते.'' या सिद्धान्ताला लीळाचरित्रात पुरावा सापडतो. ओव्या, आरत्या, पदे याप्रमाणे गोंधळी गीतेही महाराष्ट्रात फार प्राचीन काळापासून रचली जात असावीत. इ.स. १२४० मध्ये लिहिलेल्या जायणाच्या 'नृत्यरत्नावली' ग्रंथात असा उल्लेख आहे की, ''कल्याणीचा राजा तृतीय सोमेश्वर याने कल्याणीमध्ये भूतमातृमहोत्सवाच्या निमित्ताने गोंडली नृत्य करविले होते.'' महाराष्ट्रात ते 'गोंडला' या नावाने प्रसिद्ध होते व सोमेश्वराने त्यात सुधारणा करून त्याला 'चित्रगोंडली' हे नाव दिले. हे गोंडली नृत्य म्हणजेच आजच्या गोंधळाचे प्राचीन रूप होय, असे ढेरे म्हणतात. ओवी हा मराठी लोकसाहित्याचा प्राचीनतम प्रकार असणार.



मराठीतील ओवी ही जानपद स्वरूपाची आहे व ती मुळात गेय आहे. ओवीची ही वैशिष्ट्ये तिसऱ्या सोमेश्वर लिखित 'मानसोल्लास' किंवा 'अभिलषितार्थ चिंतामणी' या विश्वकोशसदृश ग्रंथात सूचित झाली असून महाराष्ट्रातील स्त्रिया दळणकांडण करताना ओव्या गात अशा अर्थाचा स्पष्ट उल्लेख त्यात मिळतो. म्हाइंभटकृत 'गोविंदप्रभूचरित्रा'त कांडताना गायलेल्या लीलेचा उल्लेख आहे. तात्पर्य, ओवीसारखी लोकगीते फार पूर्वीपासून रूढ असावीत, हे 'मानसोल्लास' किंवा 'लीळाचरित्र' या ग्रंथावरून स्पष्ट होते. अशा प्रकारे नाना प्रकारचे लोकाचार, इत्यादी अनेक प्रवाहांना आपल्या पोटात घेऊन ही लोकवाङ्‌मयाची गंगा वाहत असते. लोकवाङ्‌मय हा शब्द सुसंस्कृतांनी बनविलेला असला, तरी प्रत्यक्ष हे वाङ्‌मय मुख्यत्वेकरून सामान्य लोकांच्या तोंडातून जन्माला आलेले असते. समाजाच्या अनेक थरांतून ही लोकवाङ्‌मयाची गंगा वाहत असल्याने ती विशाल समाजाचे प्रतिनिधित्व

**विद्यमान मराठी आधी महाराष्ट्री अपभ्रंश व त्याहि आधी महाराष्ट्री प्राकृत या भाषा प्रचारात होत्या. महाराष्ट्री प्राकृत ही भारतातील सर्व प्राकृत भाषांमध्ये सर्वाधिक महत्त्वाची मानली जात होती. वररुचीने प्रामुख्याने तिचेच व्याकरण रचले आहे. त्या काळी लेखक कोणत्याही प्रदेशातला असला, तरी ललित लेखनासाठी महाराष्ट्री प्राकृताचाच स्वीकार केला जात असे. साहजिकच प्राकृताची क्षेत्रमर्यादा केवळ महाराष्ट्र ही नव्हती, तर त्याहून व्यापक प्रदेशात तिचा संचार होता. प्राचीन महाराष्ट्रातील साहित्यसृष्टीकडे नजर टाकल्यास एका मोठ्या परंपरेचे दर्शन घडते. मराठी भाषेत उत्तम प्रतीचे वाङ्‌मय तेराव्या शतकात निर्माण झाले; पण त्यापूर्वी या भूभागात राहणाऱ्या अनेकांनी संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश भाषांत वाङ्‌मय निर्मिती केली. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कविकुलगुरू कालिदास होय. त्याने मेघदूताची निर्मिती रामगिरी येथे केली. मृच्छकटिकाचा कर्ता शुद्रक हा महाराष्ट्रीय होता. 'दशकुमारचरित'कर्ता दंडी हाहि मूळचा महाराष्ट्रीय मानला जातो. प्रसिद्ध ज्योतिषी व गणिती भास्कराचार्य हाही महाराष्ट्रीय होता. याचा अर्थ असा की, प्रत्यक्ष मराठी भाषेत प्रौढ स्वरूपाची ग्रंथरचना सुरू होण्यापूर्वी महाराष्ट्रातील पूर्वकवींनी मोठ्या प्रमाणात ग्रंथनिर्मिती करून लौकिक मिळविला होता. पूर्वसुरींच्या या ग्रंथांचा काही एक परिणाम यादवकालीन मराठी लेखकांवर निश्चितपणे झाला असला पाहिजे; महानुभाव व वारकरी पंथातील कवींनी गाठलेल्या वाङ्‌मयीन उंचीला त्याआधीची चार-पाचशे वर्षांची परंपरा कारणीभूत ठरली.**

करते आणि त्या समाजाची विविध जीवनांगे तीत सहज प्रतिबिंबित होतात. शास्त्र व कला अशा दोन्ही दृष्टींनी या वाङ्मयास महत्त्व आहे. कलादृष्ट्या तर ते अजर, अमर होऊन बसते. अनेक राजवटी येतात आणि कालौघात नाहीशा होतात; पण लोककथा, लोकगीते, रूढीपरंपरा या निरंतर असतात; कारण सारस्वताची सर्व अंगे त्यात असल्याने या लोकवाङ्मयास लोकप्रियताही लाभते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'पंचतंत्र' होय. लोकरूढ समजुतींचा उपयोग करून अनेक कवींनी काव्यनिर्मिती केल्याची काही उदाहरणे एकनाथांच्या भारुडात मिळतात. पोवाडे व लावण्या रचणाऱ्या शाहिरांनी लोकवाङ्मयाचा उपयोग आपापल्या कवनांच्या रचनेत कौशल्याने करून घेतला आहे. मानवशास्त्र, समाजशास्त्र, भाषाशास्त्र यांसारख्या शास्त्रांना लोकसाहित्याचा आधार उपकारक ठरतो. उलट ती शास्त्रे या वाङ्मयाच्या अभ्यासातून साकार होतात. लोकसाहित्याचे आविष्कार भिन्न आहेत. कधी ते एखाद्या लोककथेचे रूप घेते, तर कधी लोकगीताच्या रूपाने प्रकट होते. कधीकधी ते वाक्प्रचारांतून किंवा समाजाच्या चालरीतींतून जाणवते. कधी ते ग्रांथिक वाङ्मयाला बीजभूत ठरते. ह्यातून ग्रंथांची निर्मिती होते. असा हा लोकसाहित्य आणि ग्रांथिक वाङ्मय यांचा पाठशिवणीचा खेळ आहे. थोडक्यात, प्रारंभीच्या काळातील विशेषत: कथात्मक साहित्याची निर्मिती मोठ्या प्रमाणावर लोकांच्या श्रवणशक्तीतून झाली असावी. मुखपरंपरेने मराठी भाषा जिवंत असल्याची अनेक उदाहरणे आढळतात. यावरून लोकवाङ्मयात आढळणारी भाषा लिखित भाषेपूर्वी अनेक शतके तरी प्रचारात असली पाहिजे.



**मराठी भाषेचा उगमकाल**

मराठी भाषेचा उगमकाल व उगमकालीन स्वरूप जाणून घ्यावयाचे असेल, तर प्राचीन शिलालेखांचा व ताम्रपटांचा विचार अनिवार्य ठरतो; कारण कोरीव लेखांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यांच्या आधारे मराठी भाषेचा माग पुष्कळ मागे जाऊन काढता येतो. किंबहुना हे ताम्रशिलालेख हे लोकवाङ्मयाने रूढ केलेल्या भाषेचा प्रकट आविष्कार होत. इतिहासाचे हे एक विश्वसनीय साधन अमोल आहे, यात शंकाच नाही. आद्य मराठी कोरीव लेख कोणता, हा एक वादाचा विषय आहे; तथापि आजमितीस अभिलेखतज्ज्ञांच्या मते 'अक्षी शिलालेख' (तालुका अलिबाग, जिल्हा रायगड) हाच आद्य मराठी लेख म्हणता येईल. तो शके ९३४ म्हणजे इ.स. १०१२ मधील असून केशिदेव या शिलाहार राजाच्या कारकीर्दीतील आहे. त्याच्याच कारकिर्दीतील आणखी एक 'ठाणे ताम्रपट' उपलब्ध असून त्यांचा काळ शके ९३९ म्हणजे इ.स. १०१७ आहे. तेव्हा कालविषयक तपशील आणि तत्कालीन कारकीर्द यांचा मेळ बसतो, यावरून त्याची प्राचीनता निश्चित होते. दुसरा कुडल शिलालेख (सोलापूर जिल्हा) हा केवळ तीन ओळींचा असून त्याचा काल शके ९४० (इ.स. १०८१) आहे; तर दिवे-आगर ताम्रपट शके ९८२ (इ.स. १०६०) हा संपूर्ण मराठी भाषेत असून तो अस्सल आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. कोकणात मिळालेल्या या ताम्रपटात वैसास व देवल ही कुलनामे उल्लेखनीय असून लेखनात पृष्ठमात्रा व शिरोमात्रा आढळतात. त्या इतरत्र क्वचित दृष्टोत्पत्तीस येतात. याच शतकातील आणखी एक लेख आंबेजोगाईजवळ चनई नामक गावी उपलब्ध झाला असून तो कलचुरी सिंघणदेवाचा आहे. हा दानलेख शके १००२ (इ.स. १०८०) मधील आहे. हे सर्व शिलालेख पूर्वी ज्याचा आद्य शिलालेख म्हणून उल्लेख करीत होते, त्या श्रवणबेळगोळ शिलालेखापूर्वीचे आहेत; कारण श्रवणबेळगोळे हा शके १०३८-३९ (इ.स.१११६-१७) मधील असून तो मराठीतील पहिला म्हणून समजला गेला होता; कारण हुल्ट्झ यांनी तो शके ९०५ म्हणजे इ.स. ९८३ चा ठरविला होता. परंतु नंतरच्या संशोधकांनी विशेषत: लूई राईस, द. वा. पोतदार, नरसिंहाचार प्रभृतिनी समप्रमाण त्याचा काल ठरविला आहे; तथापि कन्नड प्रदेशात (कर्नाटक) तो दोन ओळींचा मराठी मजकूर आढळल्याने त्याचे महत्त्व उल्लेखनीय आहे. त्यावरून मराठी त्या भागात कुठेतरी प्रचारात असली पाहिजे, हे निश्चित.


> **इतिहासाचार्य वि. का. राजवाड्यांनी विसाव्या शतकाच्या पहिल्या दुसऱ्या दशकांत सुमारे ५२ ताम्रपट - शिलालेखांचे वाचन केले आणि प्रथमच काही शिलालेख प्रकाशित केले. त्यांचा हेतू मराठीचे प्राचीनत्व शोधणे आणि व्याकरणदृष्ट्या त्याचा छडा लावणे हा होता. शके ११०२ म्हणजे इसवी सन ११८० मधील पवळ येथील शिलालेखापासून शके ६०२ म्हणजे इ.स. ६८० मधील विक्रमादित्य चालुक्याच्या ताम्रपटापर्यंत मराठी शब्दांची परंपरा अविच्छन्न आढळते असे राजवाडे यांचे अनुमान आहे.**

अकराव्या शतकातील ताम्रशिला-शासनावरून तसेच अन्य काही पूर्वीच्या संस्कृत-प्राकृत-कानडी शिलालेखांतून (उदा. सिंदगोवन्न याच्या नारायणगाव ताम्रपटात) खडक, चिंचवृक्ष, गोहवारी (गवारभाजी), तणिका (संस्कृत तृण) असे मराठी शब्द आढळतात; तर शके ६७१ (इ.स. ७४९) च्या मानोर ताम्रपटात 'सोनार' हा शब्द आहे. तो पूर्ण मराठी शब्द आहे. अर्थात हे सर्व सुटे शब्द आहेत. कुडलच्या लेखात एक संपूर्ण वाक्य मराठीत आहे.

**कोकणातील २७ कोरीव लेख**

मराठीतील सुमारे पाऊणशे लेखांपैकी २७ म्हणजे सुमारे एक तृतीयांश लेख कोकणातील आहेत. ही गोष्ट कोकणवासीयांना निश्चितच भूषणास्पद वाटेल; मात्र हे सर्व लेख मराठीत आहेत. त्यांपैकी एकही कोकणी भाषेत नाही.

किंबहुना, महाराष्ट्रभर विखुरलेल्या या मराठी भाषिक पाऊणशे लेखांत मराठीच्या प्रादेशिक बोलीची चाहूल विशेष अशी कुठेच आढळत नाही. तसेच काही किरकोळ अपवाद वगळल्यास प्राचीन मराठी कोरीव लेखांचे स्वरूप भाषादृष्ट्या संमिश्र आहे; कारण त्यांत संस्कृत व मराठी अशा दोन्ही भाषांची योजना कमीजास्त प्रमाणात केलेली दिसून येते. संस्कृतचा स्पर्शही न झालेले शुद्ध मराठी लेख तुलनात्मकदृष्ट्या फार थोडे आहेत; मात्र या कोरीव लेखांतील मराठीचे स्वरूप तत्कालीन ग्रांथिक भाषेशी पुष्कळसे मिळतेजुळते आहे. एक खाटेग्राम ताम्रपट सोडता सर्व लेख देवनागरी लिपीत आहेत; मात्र हा लेख मराठी भाषेत पण कानडी लिपीत आहे. पुढे काही लेखांतून मोडी लिपी दृष्टोत्पत्तीस येते, पण ते सर्व लेख उत्तरकालीन म्हणजे यादव काळानंतरचे आहेत. लेखनदृष्ट्या आणखी एक विशेष म्हणजे या लेखांतून उपयोजलेली संक्षेप चिन्हे ही होत. या संक्षेप चिन्हांचा उपयोग मात्र सूचक आहे. प्राचीन मराठी कोरीव लेखांत असे सुमारे पन्नास एक निरनिराळे संक्षेप वापरलेले आहेत. लेख कोरीव असल्यामुळे त्यांना शब्द मर्यादेचे बंधन तद्वतच मर्यादित जागा (स्पेस) असल्यामुळे संक्षेप चिन्हांची आवश्यकता विशेष वाटत असावी हे उघड आहे. वाकटकांचा वाशिम ताम्रपट सहाव्या शतकातील असून या लेखाची भाषा संस्कृत-प्राकृत अशी संमिश्र असल्याने त्यात 'जिवज्जोसिं', 'सद्दज्जोसी' यांसारखी चतुर्थ्यन्त पुल्लिंगी विशेषनामे, आणि 'जो', 'आम्हेहीं', 'आपूणे' व 'चउत्थ' यांसारखी मराठीला फार जवळ असणारी शब्दरूपे सापडतात. यावरून इतिहासाचार्य वि. का. राजवाड्यांच्या वरील विधानास पुष्टीच मिळते. मराठी वळणाची व्यक्तिनामे तर अनेक लेखांतून दृग्गोचर होतात. बहुतेक सर्व कोरीव लेखांचे लेखन थोड्याफार प्रमाणात अशुद्ध असतेच! कारण खोदकाम करणारा कोरक्या लेखकाप्रमाणे जाणता नसून सामान्यपणे अडाणीच असतो. त्यामुळे साहजिकच त्याच्या हातून अनेक प्रकारची अशुद्धे लेखात शिरतात; तथापि एक निश्चित की, या मराठी भाषिक शिलाताम्रशासनापूर्वी मराठी भाषा लिखित स्वरूपात नक्कीच असावी, किंबहुना ती प्रचारात असल्याशिवाय शिलालेखात शब्दबद्ध कशी होईल?




मराठी वाङ्मयाचे वैकासिक रूप इ.स. ७ व्या शतकापासून १२ व्या शतकापर्यंतच्या प्राचीन शिलाताम्रशासनात जसे आढळते, तद्वतच त्याचे उगमस्थान एकच म्हणजे लोकसाहित्य होय; पण त्याचे आविष्कार भिन्न आहेत. कधी ते एखाद्या लोककथेचे रूप येते, तर कधी लोकगीताच्या रूपाने प्रकट होते; कधी वाक्प्रचारांतून तर कधी समाजाच्या पारंपरिक चालीरितींतून जाणवते आणि ग्रांथिक वाङ्मयाला बीजभूत होते, असा हा लोकसाहित्य आणि ग्रांथिक वाङ्मय यांचा पाठशिवणीचा खेळ आहे व तो गेली बारा-तेराशे वर्षे सातत्याने चालू आहे. याचा अर्थच मुळी हा आहे की, मराठी भाषा राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे इसवी सनाच्या सातव्या-आठव्या शतकात प्रचारात होती व बोलली जात असावी, तिला अभिजात स्वरूप इ.स. १० व्या - ११ व्या शतकांत प्राप्त झाले असावे; कारण तत्कालीन शिलाताम्रशासनांत आढळणारी भाषा किरकोळ अशुद्ध व व्याकरण दोष सोडता प्रगल्भ आहे.

**संदर्भ :** १. शं. बा. जोशी, मऱ्हाटी संस्कृती, १९८०

२. रा. चिं. ढेरे, लोकसंस्कृतीची क्षितिजे, पुणे, १९७१

३. शं.गो. तुळपुळे, संपा. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, पुणे १९८४.

४. सु.र. देशपांडे, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, पुणे, २०१०

५. वि. ल. भावे, महाराष्ट्र सारस्वत (६ वी आवृत्ती), खंड २, पुरवणी, शं.गो. तुळपुळे, मुंबई, १९८३

६. बाळकृष्ण अनंत भिडे, मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास (मानभाव अखेर), पुणे, १९३३

७. स.गं. मालशे, संपा. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २, भाग पहिला, पुणे, १९८०

८. मु.ब. शाह, संपा. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य, खंड १ ते १३, धुळे, १९९५-१९९८.

**संपर्क : ९६२३१८५१४०**

"पूर्व चालुक्य (बादामी), राष्ट्रकूट, उत्तर चालुक्य (कल्याणी) व यादव यांच्या कारकिर्दीमध्ये महाराष्ट्रात मराठी भाषा प्रचारात होती. या सुमारास हाल सातवाहन वगैरेंची मराठी भाषा सामान्य लोकांच्या बोलण्यातून बहुतेक गेली होती. या शिलाताम्रशासनातील सकु, सवतु, ऊसर, वावर, स्थैपाटी ही रूपे नि:संशय मराठी आहेत. महाराष्ट्री प्राकृत नाहीत. या संस्कृत शिलाताम्रशासनात हे मराठी शब्द येतात; कारण अक्षरे कोरणारे कारागीर आणि लेखाचा मसुदा तयार करणारे अधिकारी यांच्या बोलण्यात लोकभाषेतील शब्द नेहमी येत असतात. हे लोक गाढे संस्कृत तज्ज्ञ नसत. हे त्यांचे अज्ञान भाषाशास्त्राला फार उपयोगाचे झाले आहे. शिलालेख खोदणाऱ्या सामान्य कारागिरांना संस्कृत भाषेचे तोडके ज्ञान असे. त्यामुळे ते तत्कालीन ज्ञात बोलीभाषेचाच अधिकतर वापर करीत." पुढे राजवाडे म्हणतात, "इतके मात्र निश्चित आहे की शके ६०२ च्या सुमारास हाल सातवाहन वगैरेंची महाराष्ट्री भाषा सामान्य लोकांच्या बोलण्यातून बहुतेक गेली होती आणि तिच्याऐवजी मराठी भाषा सुरू झाली होती."

# साहित्यिक यशवंतराव

**यशवंतरावांनी राजकारणाचा, समाजकारणाचा व्याप सांभाळूनही भरपूर लेखन केले. असे असताना मराठी सारस्वतांनी त्यांच्या लेखनाची फारशी दखल घेतली नाही. साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना कधी मिळाले नाही. किंबहुना यशवंतराव चव्हाण राजकारणी म्हणून त्यांना साहित्याच्या प्रांतात हाताच्या अंतरावर ठेवण्यात आले. यशवंतरावांचे साहित्य त्यांनी लिहिलेली ग्रंथसंपदा म्हणजे मराठी साहित्यातील अक्षर वाङ्मय होय. सर्व विद्यापीठांत अभ्यासक्रमात यशवंतरावांची पुस्तके तरुण पिढीला वाचायला, महाविद्यालयांतून अभ्यासायला दिली पाहिजेत. समाजसेवा म्हणजे काय? राजकारण म्हणजे काय? हे या नवतरुण पिढीला कळायला हवे. यासाठी यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व शाळा-महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात न्यायला हवे.. तरच येणाऱ्या काळात काही संस्कार घेऊन, देशसेवेचे ब्रीद घेऊन चांगले नेतृत्व तयार होऊ शकते.**




**प्रा. नवनीत देशमुख**


यशवंतरावांचा पिंड हा साहित्यिकाचा पिंड होता. राजकारणात राहूनही साहित्याशी त्यांची बांधिलकी राहिली. प्रचंड वाचन, चिंतन यावर यशवंतरावांचा पिंड पोसला होता. शाळेत शिकत असतानाच देशासाठी काही केले पाहिजे म्हणून चळवळी सुरू झाल्या. ब्रिटिशांनी सोळा वर्षांच्या यशवंताला अठरा महिन्यांची शिक्षा सुनावली. या कैदेत थोरामोठ्यांच्या सान्निध्यात वाचन, चिंतन, प्रगल्भता वाढीस लागली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देवराष्ट्रमधील एका सामान्य शेतकऱ्याचा मुलगा देशाचा संरक्षणमंत्री होतो, उपपंतप्रधान होतो, अर्थमंत्री होतो, ही यशवंतरावांची झेप आश्चर्यचकित करणारी आहे.

आश्चर्यजनक यशवंतरावांची प्रगतीची झेप, ही त्यांच्या अंगभूत गुणांनी साकारली आहे. गरिबीतही ते वाढले, पोसले गेले चांगल्या संस्कारात. आईचे संस्कार खोलवर उमटलेले. या संस्कारांनी त्यांना आचरण दिलं. मनाचा साफसुथरेपणा दिला. मनाची श्रीमंती दिली.

आईच्या संस्काराचं हे ऋण त्यांनी आपल्या लिखाणातूनही अनेकदा मान्य केलं आहे. ‘श्यामची आई’ या ग्रंथाचं हस्तलिखित त्यांना वाचायला मिळालं. साने गुरुजींचं हस्ताक्षर, त्यांच्या विचारातील सहिष्णुता, नैतिकता, वैश्विकता हे सारं त्यांना प्रत्यक्ष अनुभवता आलं. ग्रंथांचे मार्ग चोखाळताना त्यांची स्वत:ची दृष्टी व्यापक झाली. यशवंतरावांचा, त्यांच्या साहित्याचा अभ्यास करताना माझ्या मनासमोर प्रश्न उभा राहिला.. यशवंतराव राजकारणी म्हणून मोठे की साहित्यिक म्हणून मोठे? लक्ष्मणशास्त्री जोशी, ग. दि. माडगूळकर यांच्यासारखे थोर साहित्यिक यशवंतरावांच्या साहित्याला मानाची पावती जोडतात, मग उभ्या महाराष्ट्राने साहित्यिक यशवंतराव यांचा साहित्यिक म्हणून गौरव का केला नाही? एका साहित्य संमेलनाचे यजमानपद यशवंतरावांनी सांभाळले, त्यावेळी व्यासपीठावरच्या साहित्यिकांनी म्हटले की, यशवंतराव जर व्यासपीठावर आले

तर आम्ही व्यासपीठावर थांबणार नाही. यशवंतरावांना साहित्यिक मंडळींचा रोख लक्षात आला. संमेलनाची सगळी व्यवस्था ते जातीने बघत होते. दुसऱ्या दिवशी साहित्यिक मंडळींच्या जेवणाचा बेत यशवंतरावांनी शेतावर आयोजित केला होता. या साहित्यिकांजवळ नम्रपणे येऊन यशवंतराव म्हणाले, ''मी जरी आपल्याला चालत नसलो तरी मला आपण चालता. म्हणून शेतावर जेवणाचा बेत आखला आहे, आपण साऱ्यांनी त्याचा आस्वाद घ्यावा.'' त्यावेळी यशवंतरावांनी साहित्यिकांना आपल्या मोठ्या मनाचा परिचय दिला.


यशवंतराव श्रेष्ठ दर्जाचे साहित्यिक होते. यासंदर्भात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिहितात, ''विदेश मंत्रीपद स्वीकारल्यावर त्यांनी पश्चिमेकडील आणि पूर्वेकडील राष्ट्रांच्या यात्रा केल्या. एक तऱ्हेची सबंध पृथ्वीप्रदक्षिणा घडली. महानद्यांच्या काठची आणि सागर किनाऱ्यांवरची शहरे पाहिली. नद्या, सरोवरे, जंगले, उद्याने यांच्यात विहार केला. निरनिराळ्या राष्ट्रांच्या विकासाचे कार्यक्रम अंमलात आलेले प्रत्यक्ष अवलोकिले. या सर्वांचे मोठे रसिकतेने मार्मिक वर्णन त्यांनी आपल्या विविध लेखसंग्रहातून केले आहे. ते प्रत्यक्ष प्रशासनाच्या व्यापात नसते, तर मराठीतील प्रवासवर्णनाच्या साहित्यात त्यांनी अभिजात यात्रावर्णनाची भर घातली असती. त्यांच्या त्या यात्रावर्णनावरून त्यांचे मराठी शब्दकलेवरील प्रभुत्व प्रत्ययास येते. प्रत्यक्ष अनुभव आणि त्यांना तात्त्विक चिंतनाची जोड अशा तऱ्हेचे सुभग लेखन करण्यात यशवंतरावांचा हातखंडा होता.''


साहित्यिक म्हणून यशवंतरावांचे योग्य मूल्यमापन झाले नाही. ही खंत बहुधा त्यांनाही असावी. 'युगंधर नेते यशवंतराव चव्हाण' या ग्रंथात 'साहित्यिक यशवंतराव' हा भा. ल. भोळे यांचा लेख आहे. या लेखात सुरुवातीलाच 'ऋणानुबंध' या यशवंतरावांच्या ग्रंथातील एक उतारा भा. ल. भोळे यांनी घेतला आहे, तो उतारा असा -

''पण त्यांचे मूल्यमापन मात्र त्यांच्या राजकीय जीवनाच्या अनुषंगाने झाले आहे. त्यामुळेच त्यांच्यावर काहीसा अन्याय झाला आहे. राजकारणातील आवेश, अभिनिवेश, पूर्वग्रह, त्या त्या काळचे वातावरण या सर्वांमुळे राजकीय व्यक्तींचे मूल्यमापन वस्तुनिष्ठ व साक्षेपी नसते. पूर्वग्रहाच्या दाट छायेने राजकीय महापुरुषाचे अनेक सद्‌गुण झाकले जातात किंवा त्यांचे धूसर दर्शन होते. अनेकदा राजकीय पुरुष त्यांच्या कमी महत्त्वाच्या गुणांनी प्रसिद्ध पावतात. म्हणून राजकीय मापाने अशा अष्टपैलू व्यक्तींचे मूल्यमापन करणे तर्कदुष्ट व अशास्त्रीय आहे.'' (ऋणानुबंध २३५-६)

तात्यासाहेब केळकर जन्मशताब्दी निमित्ताने 'यशवंतराव चव्हाणांनी केलेले हे भाषण होय'. आज हेच यशवंतरावांचे विचार त्यांच्या संदर्भातही लागू होतात. भा. ल. भोळे यशवंतरावांच्या साहित्यिक गुणांबद्दल बोलताना लिहितात, ''वाङ्‌मयीन संस्काराचे पाथेय जन्मभर कृतज्ञतापूर्वक मिरवणारे, उत्कटतेने अनुभव घेऊन तितक्याच प्रत्ययकारी शैलीत ते शब्दबद्ध करणारे, भाषेवर मनापासून प्रेम करणारे आणि साहित्याविषयी चोखंदळ जाणकारी बाळगणारे यशवंतराव राजकीय पूर्वग्रहामुळे वा मतभेदामुळे दुर्लक्षिले जाता कामा नयेत. अनेक राजकारणी धुरंधरांपेक्षा यशवंतरावांचे वेगळेपण हे की, त्यांचा आपल्या मायबोलीवर खूप जीव होता. ते स्वत: एक सर्जनशील कलावंत व उत्तम समीक्षक होते.

यशवंतरावांच्या तालमीत तयार झालेल्या नेत्यांनीही यशवंतरावांचे साहित्यिक म्हणून वेगळेपण स्वीकारले नाही. पुढे साहित्याच्या विशेषत: समीक्षेच्या पुस्तकांच्या रचनेतही यशवंतरावांच्या साहित्यावर पुरेसा प्रकाश कुण्या साहित्यिकाने टाकलेला नाही. लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतिचित्रे' या आत्मचरित्राचा जेवढा बोलबाला त्या काळात झाला किंवा हंसा वाडकर यांच्या 'सांगत्ये ऐका'चा बोलबाला झाला, कऱ्हेचं पाणी, (प्र. के. अत्रे), माझं जीवन एक कादंबरी (ना. सी. फडके) ही आत्मचरित्रे गाजत होती. लेखक, समीक्षक, पत्रकार वेगवेगळ्या आयामांनी या ग्रंथांवर लेखन करीत होते; त्या प्रमाणात 'कृष्णाकांठ' साहित्यिकांनी पाहिजे तसे किंवा 'कृष्णाकांठ'ची जी वाङ्‌मयीन दखल घ्यायला हवी होती तशी घेतली गेली नाही. यशवंतरावांनी आत्मचरित्राची तीन खंडांत विभागणी केली होती. कृष्णाकांठ, (बालपणापासून तारुण्याच्या उंबरठ्यावरचा कालखंड), सागरतीर (मुख्यमंत्री झाल्यानंतरचा मुंबईचा कालखंड) आणि






यमुनाकाठ (दिल्ली येथे संरक्षणमंत्री झाल्यानंतरचा कालखंड) कृष्णाकांठ हा पहिला खंडच ते लिहू शकले. प्रकृती अस्वास्थामुळे पुढचे लिखाण थांबले.

साहित्यातील वाङ्मयीन प्रवाहाचे यशवंतरावांना उत्तम ज्ञान होते. आत्मचरित्र लिहिण्याआधी इतर लेखकांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांचे त्यांनी वाचन केले होते. आत्मचरित्रासंबंधीची वैशिष्ट्ये सांगताना ते म्हणतात.. आत्मचरित्रे वाचताना वाचकांनी नैतिक न्यायाधीशाची भूमिका न घेणे बरे, किंवा ''लेखकाच्या खाजगी जीवनाविषयी अकारण जिज्ञासाही बाळगू नये'' (कित्ता २१९) असा सल्लाही ते देतात. आत्मचरित्राविषयी त्यांची स्वत:ची मते तयार झाली होती. आयुष्यात घडलेल्या घटनांचे सूक्ष्म विश्लेषण करता येणे ज्यांना स्वयंविशेषणाची व आविष्काराची सवय आहे अशा कलावंतालाच शक्य होते. स्वत:च्या जीवनात घडलेल्या घटना प्रसंगाकडे त्रयस्थपणे पाहण्याची दृष्टी आत्मचरित्रकाराला हवी असते. 'कृष्णाकांठ' या यशवंतरावांच्या आत्मचरित्रात आत्मचरित्राचे सगळे निकष प्रभावीपणे प्रकट होताना दिसतात. कृष्णाकांठ (प्रथमावृत्ती ७ फेब्रुवारी १९८४ पृ. ५३) यशवंतराव लिहितात..

पुढे पुढे मी पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेतो, यामधे श्रद्धेचा भाग किती, असे लोक मला विचारीत. मी त्यांना नेहमी सांगत आलो की,


''मी कुठल्या एका दगडाच्या मूर्तीत ईश्वर आहे, असे कधी मानत नाही. परमेश्वर म्हणून कुणी एक व्यक्ती कुठे बसून आहे आणि सर्व जग चालविते आहे, असे माझे मत नाही. परंतु आपल्याला न समजणारी अशी एक जबरदस्त शक्ती आहे व तिचे अस्तित्व मानणे आवश्यक आहे, त्याशिवाय अनेक गोष्टींचा उलगडाच होत नाही.'' आपल्या या विधानाचे स्पष्टीकरण करताना यशवंतराव पुढे लिहितात,

बुद्धिवादाने, ईश्वर आहे, हे सिद्ध करता येत नाही, तसेच तो नाही, हेही सिद्ध करता येत नाही. म्हणून ज्या ठिकाणी शेकडो वर्षे समाज पुरुष नतमस्तक होत आला, तेथे नतमस्तक होणे मी श्रेयस्कर मानतो, मंदिरात जाण्याच्या पाठीमागची माझी भावना हीच आहे. याच भावनेने तुळजापूरला जातो, प्रतापगडला जातो. यामधे देवभोळेपणाचा भाग नसतो. परंतु हे करण्याने माझ्या मनाला एक प्रकारचे आंतरिक समाधान लाभते, ही गोष्ट मी कबूल केली पाहिजे.''

अतिशय प्रांजळ निवेदनातून कुठल्याही संवेदनशील भावनेला धक्का लागू नये ही घेतलेली दक्षता 'कृष्णाकांठ' या आत्मचरित्राचे वैशिष्ट्य होय. सारे आत्मचरित्र या अशा प्रांजळ निवेदनाने आणि सरळ मानसिकतेने ओथंबून वाहताना दिसते.

### सह्याद्रीचे वारे आणि युगांतर

यशवंतरावांच्या निवडक व्याख्यानांची ही दोन पुस्तके होत. १९५७ ते १९६१ या काळात यशवंतरावांनी जी भाषणे दिली ती 'सह्याद्रीचे वारे' यामधे समाविष्ट करण्यात आली आहेत. महाराष्ट्र शासनाने २६ जानेवारी १९६२ रोजी हे पुस्तक प्रकाशित केले. यशवंतराव चव्हाण एक द्रष्टे साहित्यिक, विचारवंत आणि समीक्षक म्हणून या भाषणांतून समोर येतात. यशवंतरावांची ही भाषणे म्हणजे त्यांच्या पी.ए.नी लिहिलेली भाषणे नव्हेत किंवा प्रशासकीय सेवेतील एखाद्या अधिकाऱ्याने पडद्याआड लिहिलेली भाषणे नव्हेत. यातील प्रत्येक भाषणातून यशवंतराव डोकावतात. महाराष्ट्र घडविताना त्यांना अपेक्षित अशी समाजव्यवस्था, त्यांची दूरदृष्टी, त्यांची कल्पकता एवढेच नव्हेतर विकासाकडे महाराष्ट्राला नेताना लागणारी मूलगामी उपाययोजनाही ते सुचवतात. नवपदवीधरांकडून अपेक्षा, महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर, विविधतेतील एकता यासारख्या लेखांमधून यशवंतरावांची व्यापक दृष्टी, सकारात्मक चिंतनशीलता आणि भविष्याचा वेध घेणारी मनोशीलता यांचे दर्शन घडते. महाराष्ट्राची व्याप्ती, महाराष्ट्राचा विस्तार, विविधतेतील एकता हे सांगताना त्यांची शैली काव्यमय होते.




''महाराष्ट्राचा शेतकरी म्हणजे तुमच्या आमच्या टापूतील लोक किंवा तुमचे आमचे नातेवाईक नव्हेत. पंचगंगेच्या आणि कृष्णेच्या काठाला काम करणारा जसा मराठा शेतकरी आहे, तसाच ठाण्याचा, कुलाब्याच्या बाजूला सुरेख शेती करणारा आगरी शेतकरी आहे; आणि वसईच्या अवतीभवती सुंदर बागायत व भातशेती करणारा ख्रिश्चन शेतकरीही आहे. रत्नागिरीच्या भागाला गेलात तर तेथे आपणाला कुणा शेतकऱ्याची बाग सापडेल आणि वर खानदेशच्या बाजूला जाल तर आरशासारखी स्वच्छ शेती करणारा लेवा पाटीदार शेतकरी आपल्याला भेटेल. सगळ्या नद्यांच्या काठाने फिरा... आणि मग... वेगवेगळ्या जमातीतून आलेले हे सर्व शेतकरी आहेत. शेतीतून सोने निर्माण करणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्यांचे चित्र आहे. बहुजन समाज याचा अर्थ आपली एक जमात आणि आपले काही पाव्हणेरावळे असा जर कोणी समज करत असतील तर ती चुकीची कल्पना आहे.

शेतकऱ्याची आणि बहुजनसमाजाची व्याख्या करताना यशवंतरावांची दृष्टी सर्वसमावेशक अशी दिसून येते. कष्ट करणारा, घाम गाळणारा, काळ्या मातीत सोनेचांदी पिकवणारा प्रत्येक हात हा शेतकऱ्याचा होय. 'सह्याद्रीचे वारे' यातील लेखांचा गौरव करताना रवींद्र किंबहुने म्हणतात, ''हा भाषण संग्रह मराठी मनाने पाहिलेल्या उज्ज्वल भवितव्याच्या स्वप्नांचा मौलिक दस्तऐवज होय.'' नवमहाराष्ट्राच्या निर्मितीची धुरा यशवंतरावांनी मोठ्या निष्ठेने वाहिली. उदार मानवतावादी दृष्टिकोनातून सगळा समाज एकजिनसी करण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले.

'युगांतर' या ग्रंथात यशवंतरावजींची १९६२ ते १९६९ या कालखंडात त्यांनी दिलेली भाषणे संग्रहीत केली आहेत. १९६२ साली 'हिंदी चिनी भाई भाई' म्हणत चीनने भारतावर आक्रमण केले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशांतर्गतच खूप समस्या आव्हान म्हणून उभ्या होत्या. त्यात चीनचे आक्रमण. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्यांदाच परकीय आक्रमणाचे सावट भारतापुढे उभे राहिले. पंडित नेहरू चिंताक्रांत होते. त्यांनी यशवंतराव चव्हाणांना संरक्षणमंत्री म्हणून ताबडतोब बोलावून घेतले. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर असलेले यशवंतराव क्षणाचाही विलंब न लावता दिल्लीला रवाना झाले. जाताना मुंबईच्या चौपाटीवर त्यांनी भाषण केले. त्यात ते म्हणाले, संरक्षणमंत्रीपदाची मोठी हाव आहे म्हणून नव्हे, तर देशाची हाक व देशाच्या नेत्याने मारलेली हाक आलीय म्हणून एक सैनिक बनून आपण दिल्लीला जात आहोत.

प्राथमिक शिक्षणाचा विचार, सहकार क्षेत्राची

समीकरणे, लोकभाषा, मातृभाषेचा विचार, सामाजिक क्षेत्रातील आजची आव्हाने, देशातील अन्नधान्याचे प्रश्न, तांत्रिक-विज्ञान-विकासाच्या बाबी या विषयांवर सखोल चिंतन 'युगांतर'मधील लेखांतून आढळते.

हैद्राबाद येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात साहित्यिकांकडून आणि आजच्या लेखकांकडून भारताची अखंडता, एकात्मता अबाधित राहिली पाहिजे हा विचार मांडताना त्यांनी सांगितले की, जिद्दीने उभ्या राहिलेल्या भारत देशाच्या सामर्थ्य-संवर्धनाचे काम साहित्यिकांनी केले पाहिजे. साहित्यिकांनी त्यांच्या अनुभवाच्या मर्यादा आहेत त्यापेक्षा अधिक विस्तृत केल्या पाहिजेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



**भूमिका**

'युगांतर'नंतर जवळजवळ १० वर्षांनी प्रकाशित झालेले 'भूमिका' हे यशवंतरावांचे तिसरे भाषणाचे पुस्तक. १९६६ ते १९७९ या कालखंडातील काही निवडक भाषणांचा यात समावेश आहे. या भाषणांबरोबर काही मुलाखतींवर आधारलेले आणि स्वतंत्र असे लेखही आहेत. भाषणे किंवा मुलाखती या स्वरूपात जशाच्या तशा न देता त्यांचे रूपांतर आणि संपादन करण्यात आले आहे. स्वत: आणि पक्ष या दोन्हीबाबत यशवंतरावांनी जे बांधिलकीचे राजकारण केले. त्याचे परिणाम व प्रतिक्रिया 'भूमिका'तील भाषणांमधून जाणवते. 'भूमिका'मधील लेखांचे वैशिष्ट्य विशद करताना डॉ. एस. एस. भोसले सांगतात, ''अत्यंत मर्मज्ञतेने, काटेकोर सावधपणे लोकमनाला वळण देऊन नवनिर्मितीचे सर्जनशील कार्य करण्याची यशवंतरावांची भूमिका आहे; आणि चतुर राजकारणी, शैलीदार वक्ता व सावध सुधारक या माध्यम-त्रयीमधून त्यांनी तिची राबवणूक केली आहे. समाजाच्या रचनापर्वात नव्या विचारांची, ज्ञानाची व मूल्यांची भर टाकत राहणे हे विचारवंत, साहित्यिक, राजकारणी यांचे पहिले व शेवटचे कर्तव्य असते, हे यशवंतरावांच्या 'भूमिका'चे स्तर होय.''

'ऋणानुबंध' हा यशवंतरावांचा ग्रंथ वेगळ्या आयामाचा ग्रंथ आहे. त्यांना भेटलेल्या व्यक्ती, चटका लावून गेलेल्या व्यक्ती, त्यांच्या स्मृती, तर कधी एखाद्या स्थळाच्या स्मृती, बालपणातल्या काही आठवणी, गावाच्या मायमातीवर जिवापाड माया करणारा यशवंत या ऋणानुबंधातून आपल्याला भेटतो. प्रा. एस. एम. कानडजे 'ऋणानुबंधा'विषयी लिहितात, माता आणि माती यांची सर्जनशील पोषणक्षमता मानवाच्या कल्याणासाठी राबणारा हा जाणता, सेवाभावी, नीतिमान, पुण्यवंत लोकप्रतिनिधी मराठी लोकमानसात दैवत रूपाने चिरंजीव झाल्यास नवल ते काय? 'ऋणानुबंध'मधील त्यांचे प्रतिबिंब हे साजिरे-गोजिरे, लोभसवाणे आणि प्रसन्नमधुर आहे.

**यशवंतरावांचा विविध विषयांचा सखोल अभ्यास होता. त्यांच्याजवळ सर्वांगीण माहिती असायची. जीवनाचा कोणताही विषय यशवंतरावांना वर्ज्य नव्हता. साहित्याच्या विविध अंगांचा त्यांचा सखोल अभ्यास होता. साहित्य, संस्कृती, इतिहास, क्रीडा, तत्त्वज्ञान, राजकारण इत्यादी जीवनाच्या विविध क्षेत्रांत यशवंतरावांचा वावर एकसारख्या सफाईने होत असे. वि. स. खांडेकर, नरहर कुरुंदकर, पु. ल. देशपांडे या साहित्यातील दिग्गजांप्रमाणेच अनेकांना त्यांच्या प्रस्तावना हव्या असायच्या.**

**उत्कृष्ट प्रस्तावना**

यशवंतरावांनी अनेक पुस्तकांना उत्कृष्ट प्रस्तावना लिहिल्या. विविध प्रकारच्या साहित्य कृतींचे वाचन निवांतपणे व विचारपूर्वक मनन करून कितीतरी पुस्तकांना त्यांनी मौलिक प्रस्तावना लिहून दिल्या. त्यातील काही पुस्तके अशी ...

१) पुस्तकाचे नाव : कर्मवीर भाऊराव पाटील, लेखकाचे नाव : मा. भि. काटकर, प्रकाशन वर्ष : १९८२. २) लोकसाहित्य : साजशिणगार, संपादक : डॉ. सरोजिनी बाबर, प्रकाशन वर्ष :१९६४. ३) संघर्ष (इंदिरा गांधी यांच्या जीवनावरील कादंबरी), संपादन : मीना जोशी प्रकाशन वर्ष : १९८२. ४) खंडेराव बागल यांचे निवडक लेख, संपादक : भाई माधवराव बागल, प्रकाशन वर्ष : १९७६. ५) लता (गौरवग्रंथ), संपादक : सरोजिनी वैद्य, शांता शेळके, प्रकाशन वर्ष :१९६७. ६) स्वर (काव्यसंग्रह), कवी सुधांशू (ह. न. जोशी), प्रकाशन वर्ष : १९७०. ७) सूर्यपंख, प्रा. बा. ह. कल्याणकर, प्रकाशन वर्ष : १९८४. ८) भारताची राज्यघटना, त्र्यंबक कृष्ण टोपे. ९) छत्रपती शिवराज (महाकाव्य), य. हि. पेंढारकर (यशवंत), प्रकाशन वर्ष : १९६८. १०) हिरोशिमा, भा. द. खेर, प्रकाशन वर्ष : १९८४. ११) भूमिपुत्र, राजा मंगळवेढेकर, प्रकाशन वर्ष : १९७७. १२) श्री. जगजीवनराम व्यक्ती आणि विचार, डॉ. प्रभाकर माचवे, प्रकाशन वर्ष : १९७७. १३) अठराशे सत्तावनचा महाराष्ट्र, पुरुषोत्तम पांडुरंग गोखले, प्रकाशन वर्ष : १९५७. १४) अमृतपुत्र, भा. द. खेर, प्रकाशन वर्ष : १९७०. १५) लोकमान्य टिळक चरित्र युगकर्ता, सविता भावे, प्रकाशन वर्ष : १९८४

याशिवाय आणखी कितीतरी पुस्तकांना यशवंतरावांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत. लेखाची मर्यादा लक्षात घेता सर्व पुस्तकांचा आणि प्रस्तावनांचा जागेअभावी उल्लेख करता येत नाही.

जीवनाच्या विविध क्षेत्रांत कर्तृत्वाची शिखरे गाठणाऱ्या यशवंतरावांचे मराठी साहित्यातील योगदानही तितकेच तोलामोलाचे आहे. शब्दाला अर्थ आणि अर्थाला परिणाम असतो याचे भान असल्यानेच राजकारणातही त्यांनी भाषा जपून वापरली. साहित्य आणि संस्कृती मंडळ, विश्वकोश निर्मिती मंडळ यासारख्या संस्था स्थापून त्यांनी मराठी भाषा आणि साहित्याच्या विकासाला राजाश्रय तर दिलाच मात्र स्वत:ही दर्जेदार साहित्य निर्मिती केली. राजकारणी-साहित्यिक असणारे असे उदाहरण दुर्मीळ आहे. साहित्यातील त्यांचे योगदान पाहता मराठी साहित्याला साहित्यिक यशवंतरावांची दखल घ्यावीच लागेल.

**यशवंतरावांची ग्रंथसंपदा** - १. आपले नवे मुंबई राज्य (इ.स.१९५७), २. ऋणानुबंध (आत्मचरित्रपर लेख) (१९७५), ३. कृष्णाकांठ (आत्मचरित्र १ला खंड) (१९८४), ४. भूमिका (१९७९), ५. महाराष्ट्र राज्य निर्मिती विधेयक (१९६०), ६. विदेश दर्शन - (यशवंतराव यांनी परदेशाहून सौ.वेणूताईंस पाठविलेल्या निवडक पत्रांचा संग्रह) (१९८८),

**भाषण संग्रह/पुस्तिका** - १. असे होते कर्मवीर (भाऊराव पाटलांवर सह्याद्रीच्या दिवाळी अंकातील **(पान २१ वर)**




# आपली भाषा, आपली अस्मिता

२९ नोव्हेंबर २०१० रोजी मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली. विभागाच्या अधिपत्याखाली भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था या चार संस्था कार्यरत आहेत. या विभागामार्फत पुढील उपक्रम राबविण्यात येत आहेत.

**मराठी भाषा भवन :** मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या कामात सुसूत्रता व गतिमानता आणण्याच्या दृष्टीने सर्व कार्यालये एकाच ठिकाणी आणण्यासाठी मुंबईमध्ये भाषा भवन उभारण्याची बाब विचाराधीन आहे. मुंबईतील रंगभवन, धोबीतलाव येथील जागा यासाठी विचारात घेण्यात आली आहे.

**महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागात मराठी भाषा व संस्कृती समृद्धीसाठी अर्थसाहाय्य :** ही योजना राज्य शासनाने २०११-१२ पासून

वर्षा जोशी

हाती घेतली आहे. या योजनेत मराठी भाषा विभागासह पर्यटन व सांस्कृतिक कार्य, उच्च व तंत्र शिक्षण आणि शालेय शिक्षण व क्रीडा या विभागांचा समावेश आहे. २०११-१२ मध्ये या योजनेखाली उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत ९४ लक्ष इतका खर्च झाला आहे. २०१२-१३ साठी या योजनेखाली ५ कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात आला आहे.

या योजनेचे नियंत्रण व समन्वयन मराठी भाषा विभागाकडे सोपविण्यात आले आहे.

**ठळक नोंदी**

- भाषा सल्लागार समितीच्या अध्यक्ष पदी डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची ९ एप्रिल २०१२ रोजी नियुक्ती करण्यात आली आहे.
- भाषा सल्लागार समितीकडून मराठी भाषेच्या विकासाच्या दृष्टीने प्राप्त झालेल्या ठरावांच्या अनुषंगाने संबंधित विभागांशी विचारविनिमय सुरू करण्यात आला.
- भाषा सल्लागार समितीच्या ३ बैठका



**वाङ्मय पुरस्कार**

मराठी साहित्य क्षेत्राशी संबंधित वाङ्मय पुरस्काराचे वितरण सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आतापावेतो करण्यात येत होते. २०१२-१३ या वर्षापासून मराठी भाषा विभागाकडे या पुरस्कारांच्या निवडीची व वितरणाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या पुरस्कारांची पूर्वीची संख्या कमी करून या पुरस्कारांच्या रकमेमध्ये २०१२-१३ या वर्षापासून लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. हे पुरस्कार पुढीलप्रमाणे आहेत:-

१) मराठी वाङ्मय क्षेत्रात मोलाचे कार्य व भरीव योगदान देणाऱ्या साहित्यिकांना विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार - रु. ५,००,०००/-

२) साहित्य निर्मितीमध्ये मोलाचे कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस श्री. पु. भागवत पुरस्कार - रु. ३,००,०००/-

३) उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठी लेखकांना उत्तेजन देण्यासाठी उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीस राज्य पुरस्कार - रु. २,००,०००/-

प्रौढ वाङ्मय (संख्या २२) - प्रत्येकी १ लाख, बालवाङ्मय (संख्या ६) - प्रत्येकी ५० हजार

प्रथम प्रकाशन (संख्या ६) - प्रत्येकी ५० हजार, बृहन्महाराष्ट्र (संख्या १) - प्रत्येकी १ लाख

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे पुरस्कार**

१. **गौरववृत्ती** (संख्या-२) - साहित्य व लोककला क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या दोन ज्येष्ठ व्यक्तींना गौरविण्यात येते. आतापर्यंत ५८ व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. पारितोषिकाची रक्कम प्रत्येकी रु. ५०,०००/-

२. **यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार** (संख्या-१) - नवलेखकांच्या पुस्तकांपैकी काव्य, कथा, नाटक/एकांकिका, कादंबरी, ललित गद्य, बाल वाङ्मय या ६ प्रकारांतील उत्कृष्ट पुस्तकाला पुरस्कार देण्यात येतो. पारितोषिकाची रक्कम रु. २,०००/-.

३. **सरफोजी राजे भोसले पुरस्कार** (संख्या-१) - नवलेखकांच्या उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीसाठी प्रकाशकांना दिला जातो. पारितोषिकाची रक्कम रु. २,०००/-.

आयोजित करण्यात आल्या. यात मराठी भाषेच्या विकासाची योजना आखण्याच्या दृष्टीने विविध ठराव संमत करण्यात आले. ■ सिंगापूर येथील तिसऱ्या विश्व साहित्य संमेलनासाठी रु. ५० लाख अर्थसाहाय्य मंजूर करण्यात आले. ■ विभागाचे स्वतंत्र संकेतस्थळ निर्माण करण्यात आले - http://marathibhasha.maharashtra.gov.in/

**नवे उपक्रम**

■ अमरावती व नाशिक येथे भाषा संचालनालयाची विभागीय कार्यालये.

■ महसुली प्रादेशिक विभागीय स्तरावर भाषा भवनाची निर्मिती.

■ एतदर्थ मंडळाच्या मराठी टंकलेखन परीक्षेबाबत शासनास प्रस्ताव सादर करणे.

**भाषा संचालनालय**

मुंबई येथील मुख्य कार्यालयासह नवी मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद येथे विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. याशिवाय अमरावती व नाशिक येथे विभागीय कार्यालये स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**नवे उपक्रम**

■ भारताचे संविधान ७ वी सुधारित आवृत्ती डिग्लॉट स्वरूपात (मराठी - इंग्रजी) प्रकाशित करणे.

■ त्रिभाषा सूत्रानुसार कार्यालयांची तपासणी करणे.



**अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी**

भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी केंद्र शासनाने काही निकष निश्चित केले आहेत. या निकषांना अनुसरून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा कसा प्राप्त करून घेता येईल यासाठी शासनाने प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे. या समितीमध्ये शासकीय व अशासकीय असे एकूण १६ सदस्य आहेत. या समितीच्या आतापर्यंत ६ बैठका झाल्या आहेत. मसुदा तयार करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या तज्ज्ञांच्या उपसमितीच्या आतापर्यंत १८ बैठका घेण्यात आल्या आहेत. या समितीकडून मसुदा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदस्यांकडून मसुदा अंतिम केल्यानंतर लवकरात लवकर हा अहवाल समितीमार्फत शासनास सादर करण्यात येईल. या समितीकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यास शासनाची मान्यता घेऊन प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

**विधी अनुवाद व परिभाषा सल्लागार समिती**

राज्यातील न्यायदानात मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनातर्फे संमत करण्यात येणारे अधिनियम/नियम इत्यादींचा मराठी अनुवाद उपलब्ध करून देण्यासाठी सेवानिवृत्त न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये शासकीय व अशासकीय असे एकूण १९ सदस्य आहेत. या समितीच्या एकूण २३५ बैठका झाल्या असून आतापर्यंत २० केंद्रीय, ५ राज्य अधिनियम व सुधारित न्यायव्यवहार कोश यांना अंतिम स्वरूप देण्यात आले आहे.

**साहित्य आणि संस्कृती मंडळ**

मराठी भाषा, साहित्य, संस्कृती व कला या क्षेत्रामध्ये महाराष्ट्रास लाभलेला वारसा जतन आणि संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

**नवे उपक्रम**

■ बोली भाषा अकादमी स्थापन करणे.

■ इ-बुक तयार करणे.

■ सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास तसेच मराठी ग्रंथ अनुवाद प्रोत्साहन या प्रकल्पांसाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून समिती गठित.




**भाषा सल्लागार समिती**

राजभाषा मराठीचे धोरण राबविण्यासाठी या समितीचे कायमस्वरूपी गठन करण्यात आले असून या समितीमध्ये २२ अशासकीय सदस्य व ५ शासकीय सदस्य आहेत. ९ एप्रिल २०१२ च्या शासन निर्णयान्वये डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीने पुढील ठराव पारित केले आहेत.

- धर्मकारण, राजकारण, न्यायव्यवस्था, व्यापार-उद्योग, संपर्क माध्यमे यासारख्या क्षेत्रांमध्ये मराठी भाषा व्यवहार समर्थपणे राबविणे.
- राज्यातील सर्व विद्यापीठ स्तरावर सर्व विद्याशाखांमध्ये मराठी भाषेचा किमान एक अभ्यासक्रम उत्तीर्ण होणे अनिवार्य करणे.
- राज्यातील सीबीएसई, आयसीएसई शाळांमध्ये मराठीचा अभ्यासक्रम अनिवार्य करण्यासाठी पाठपुरावा करणे.
- औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये परीक्षेच्या प्रश्नपत्रिका इंग्रजीऐवजी मराठीत काढणे.
- राजभाषा मराठीचे शैक्षणिक स्थान उंचावण्यासाठी केंद्र शासनाच्या नवोदय विद्यालयांच्या धर्तीवर राज्य शासनाकडून प्रत्येक जिल्ह्यात आदर्श शाळा निर्माण करणे. ● विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाचे पुनरुज्जीवन करणे.
- मराठी माध्यमाच्या शाळांना ऊर्जितावस्था आणण्यासाठी ठोस कृती कार्यक्रम सुचविण्यासाठी स्वतंत्र अभ्यासगटाची निर्मिती करणे.
- राज्य व्यवहार व न्याय व्यवहार यांमध्ये मराठीचा वापर परिणामकारकपणे वाढविणे.
- मराठीतून इतर भाषांमध्ये व इतर भाषातून मराठीत अनुवाद करण्यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारणे.
- परराज्यातील मराठी भाषिकांच्या शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था, ग्रंथालये यांना विशेष अनुदान देणे.
- ग्रंथ वितरणासाठी प्रभावी यंत्रणा उभारणे तसेच, सवलतीच्या दरात ग्रंथ प्रकाशन, ग्रंथ वितरण, ग्रंथ प्रदर्शन यांसारख्या योजना आखणे.
- नव्याने निर्माण झालेल्या ज्ञानशाखांचे कोश तयार करणे.
- भाषा संचालनालयाने आतापर्यंत तयार केलेले पारिभाषिक कोश अद्ययावत करणे.
- राज्याचे भाषा धोरण ठरविण्यासाठी जनमत व तज्ज्ञांची मते जाणून घेण्यासाठी विभागवार बैठका आयोजित करणे.

■ मराठी व्युत्पत्ती कोश - प्रा. रामदास डांगे / संतवचनांचे अनुवाद - रामदास भटकळ, आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्र / वचनकोश - डॉ. अशोक केळकर / अलंकार व वेषभूषा कोश - डॉ. वर्षा जोशी / खाद्य संस्कृती कोश - श्रीमती अनुपमा उजगरे / मराठी वाङ्मय कोश - प्रा. दिलीप धोंडगे / मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास - प्रा. दत्ता भगत / आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास - डॉ. के. के. चौधरी याप्रमाणे प्रस्तावित प्रकल्पांचे काम संबंधित नमूद तज्ज्ञांकडे सोपविण्यात आले आहे.



**विश्वकोश**

एन्सायक्लोपिडीया ब्रिटानिकाच्या धर्तीवर मराठीतून सामान्य माणसाला ज्ञान पोहोचविण्याची ग्रंथरूपी चळवळ, विश्वातील सारे शब्द, त्यामागचा इतिहास, भूगोल, तत्त्वज्ञान, विज्ञान मराठीतून ज्ञानार्थींना मिळावे या मुख्य उद्देशाने मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

**नवे उपक्रम**

■ मराठी विश्वकोश खंड २० चे प्रकाशन आणि खंड १४ ते १८ महाजालकावर लोकार्पण करणे.

■ विश्वकोशाचे अद्ययावतीकरणासाठी नवीन नोंदसूची, नोंदी अद्ययावत करणे व नवीन नोंदणीचे लेखन करणे.

■ कुमार विश्वकोश खंड-२ भाग-२ चे लेखन, संपादन.

■ कुमार विश्वकोश खंड-३ (विश्व आणि पृथ्वी) चे लेखन आणि संपादकीय काम करणे.

■ कुमार विश्वकोश खंड-४ (प्राचीन संस्कृती) चे लेखन आणि संपादकीय काम करणे.

■ कुमार विश्वकोश खंड-९ (ललित कला) चे लेखन आणि संपादकीय काम करणे.

**राज्य मराठी विकास संस्था**

१ मे १९९२ रोजी या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. मुख्यमंत्री हे या संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष व शालेय शिक्षण मंत्री हे पदसिद्ध उपाध्यक्ष आहेत. संस्थेचे कामकाज तिच्या नियामक मंडळाच्या सल्ल्यानुसार चालते.

विविध क्षेत्रांत होणारा मराठीचा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जाण्यासाठी व मराठी भाषेच्या अभिवृद्धीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम या योजनेअंतर्गत घेण्यात आले आहेत.

**नवे उपक्रम**

■ युनिकोड टंक मुक्तस्रोत स्वरूपात उपलब्ध करून देणे.

■ भारतात तसेच परदेशात मराठीसाठी कार्य करणाऱ्या मंडळांविषयी सविस्तर माहिती असलेली पुस्तिका मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषांमध्ये प्रकाशित करणे.

■ परप्रांतातून आणि इतर देशांतून नोकरी व पर्यटन यानिमित्ताने येणाऱ्या लोकांना स्थानिक लोकांशी संवाद साधणे शक्य व्हावे या दृष्टीने व्यवहारोपयोगी मराठी पुस्तिका व ऑडिओ सीडीची निर्मिती करणे.

■ अनुवादाचे प्रशिक्षण मिळविण्यासाठी अनुवाद प्रशिक्षण प्रकल्प राबविणे.

■ मोडी भाषेचे देवनागरीकरण प्रस्तावित आहे.

■ दासबोध या ग्रंथाचे श्राव्य पुस्तकात रूपांतर करून शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे.


■ वैद्यकीय व्यवहारात मराठी, वस्त्रनिर्मिती माहितीकोश खंड-४, मराठी ग्रंथसूची, मराठी भाषिक टप्पे - सीडी, संस्थेकडून प्रकाशित झालेल्या प्रकाशनांचे पुनर्मुद्रण व इ-पुस्तके, मानव्य विद्याविषयक पुस्तकांचा अनुवाद.

■ स्व. यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या जीवनावरील पुस्तकांचे श्राव्यपुस्तकात रूपांतर करून शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे.

❒ ❒

# साहित्यिक यशवंतराव

**(पान १८ वरून)** लेख - १९६८), २. उद्याचा महाराष्ट्र - (भाषण पुस्तिका -१९६०), ३. काँग्रेसच्या मागेच उभे राहा - औरंगाबाद येथील भाषण - पुस्तिका, ४. कोकण विकासाची दिशा (कोकण विकासाचे यशवंतराव चव्हाण यांनी केलेले विवेचन - पुस्तिका -१९६०), ५. ग.वा.मावळंकर स्मारक व्याख्यानमालेमध्ये 'प्रत्यक्ष आंदोलन और संसदीय लोकतंत्र' या विषयावरील व्याख्यान, (पुस्तिका - १९६१), ६. जीवनाचे विश्वरूप : काही श्रद्धा, काही छंद (पुस्तिका - १९७३), ७. पत्र - संवाद (संपादक: स.मा.गर्गे - २००२), ८. पक्षावर अभंग निष्ठा (राजकारणातील माझी भूमिका- पुस्तिका), ९. महाराष्ट्र- म्हैसूर सीमा प्रश्न (पुस्तिका - १९६०), १०. महाराष्ट्राची धोरण सूची - (पुस्तिका - १९६०), ११. यशवंतराव चव्हाणांची महत्त्वपूर्ण भाषणे - सत्तरीच्या दशकाचा शुभारंभ - १९७१, १२. युगांतर (निवडक भाषणांचा संग्रह - १९७०), १३. लोकांचे समाधान हीच यशस्वी राज्यकारभाराची कसोटी (राज्याच्या ४१ जिल्ह्यांच्या कलेक्टर परिषदेपुढे केलेल्या भाषणाची पुस्तिका- १९५७), १४. वचनपूर्तीचे राजकारण - अखिल भारतीय




काँग्रेसच्या फरिदाबाद व बंगलोर अधिवेशनातील दोन भाषणे (पुस्तिका - १९६९), १५. विचारधारा - (भाषण संग्रह - १९६०), १६. विदर्भाचा विकास (महाराष्ट्राचे कर्तृत्व जागे केले पाहिजे) -(भाषण पुस्तिका - १९६०), १७. शब्दाचे सामर्थ्य ( भाषणे - २०००; संपादक : राम प्रधान), १८. शिवनेरीच्या नौबती (भाषण संग्रह) - तळवळकर गोविंद व लिमये अ.ह. - १९६१, १९. सह्याद्रीचे वारे (भाषण संग्रह - १९६२) हवाएँ सह्याद्रिकी, (सह्याद्रीचे वारे या पुस्तकाचा हिंदी भाषेत अनुवाद), २०. India's foreign Policy - 1978, २१. The Making of India's Foreign Policy - 1980, २२. Winds of Change - 1973

संपर्क : ८६००६७६५५६

❒ ❒

# महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित

**मराठी भाषा, संस्कृती व इतिहासाच्या संशोधनार्थ प्रकल्प हाती घेणे, या संदर्भातील ग्रंथ प्रकाशित करणे, मराठी ग्रंथ, चरित्रे, नियतकालिके, शब्दकोश इ. संदर्भ ग्रंथ प्रकाशित करणे, विश्वभाषांतील श्रेष्ठ ग्रंथांची मराठी भाषांतरे प्रकाशित करणे, मराठी साहित्य विकासाच्या नवनवीन ज्ञान-विज्ञान शाखांचा शोध घेणे, महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि साहित्यिक जडणघडणीचा इतिहास लिहिणे आणि इतर वाङ्मयीन उपक्रम राबवून महाराष्ट्रातील साहित्य आणि सांस्कृतिक उपक्रमांना चालना देण्यासाठी राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना करण्यात आली. मंडळाने गेल्या ५० वर्षांत या अनुषंगाने मोठे कार्य केले आहे.**

डॉ. सुनीलकुमार लवटे

मराठी भाषा आणि संस्कृती विकासासाठी स्वतंत्र राज्याची मागणी करून महाराष्ट्राच्या जनतेने दीर्घकाळ लढा दिला. त्यानंतर १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते स्वतंत्र राज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. नामदार यशवंतराव चव्हाण मराठी भाषिक स्वतंत्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्र राज्याच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी महाराष्ट्र राज्याच्या विकासाचे स्वप्न स्पष्ट करताना मुख्यमंत्री म्हणून केलेल्या आपल्या पहिल्याच भाषणात यशवंतराव चव्हाण म्हणाले होते की, ''महाराष्ट्र ही भूमी अनेक संत, पराक्रमी वीर, त्यागी समाज सुधारक व विद्वान देशभक्त यांच्या वास्तव्याने पुनीत झालेली आहे. संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले व लोकमान्य टिळक ही आमची प्रातिनिधिक प्रतीके आहेत. त्यांनीच महाराष्ट्राच्या संस्कृतीची जोपासना केली व तिचा वारसा आपल्या हाती दिला. हा अमोल ठेवा आपल्या हृदयात जपून ठेवणे व त्याचा विकास करणे, हे प्रत्येक मराठी माणसाचे आद्य कर्तव्य ठरते. आज आपले मराठी भाषी राज्य स्थापन होत असताना आपल्या देशाची भरभराट करण्यास व त्याची कीर्ती दिगंत पसरविण्यास आपले शक्तिसर्वस्व देऊ अशी आपल्यापैकी प्रत्येकाने प्रतिज्ञा केली पाहिजे.'' या प्रतिज्ञेनुसार महाराष्ट्र शासनाने १९ नोव्हेंबर १९६० रोजी 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ' स्थापन केले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली दहा सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली. त्यात सर्वश्री महामहोपाध्याय वि. वि. मिराशी, डॉ. ए. एम. घाटगे, प्राचार्य दिनकर कर्वे, प्रा. गोवर्धन परीख, डॉ. पी. एम. जोशी, प्रा. न. र. फाटक, प्रा. वा. ल. कुलकर्णी प्रभृति मान्यवरांचा समावेश होता.




**ग्रंथ प्रकाशन**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीत मंडळाने अनेक मौलिक ग्रंथांचे प्रकाशन करून महाराष्ट्राच्या साहित्य विकासात मोठे योगदान दिले आहे. प्रा. अशोक रानडे लिखित 'स्टॅविन्स्कीचे सांगीतिक सौंदर्यशास्त्र', डॉ. वा. वि. मिराशी लिखित 'कालिदास', 'शेक्सपिअर परिचय ग्रंथ', 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ', डॉ. सं. ग. मालशे लिखित 'साहित्य सिद्धान्त', 'कौटिलीय अर्थशास्त्र', स्वातंत्र्यवीर सावरकरांचे 'भाषाशुद्धी', 'संपूर्ण गडकरी' (भाग १, २), 'आगरकर वाङ्मय खंड', 'महात्मा गांधी-रवींद्रनाथ ठाकूर', 'भारतीय लिपींचे मौलिक एकरूप', 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय', 'ग्रीक शोकनाट्ये', 'कलेची मूलतत्त्वे', 'बुद्धलीला सारसंग्रह', 'फार्सी-मराठी अनुबंध', 'केशवसुतांची कविता' (यथामूल आवृत्ती) सारखे ग्रंथ मराठी सारस्वतातील दीपस्तंभ म्हणून ओळखले जातात.

**कोश प्रकाशन**

एकविसावे शतक हे ज्ञान-विज्ञानाच्या विस्फोटाचे शतक म्हणून ओळखले जाते. ज्या भाषेतील संदर्भ वाङ्मय श्रेष्ठ ती समृद्ध ज्ञानभाषा. या दृष्टीने मंडळाने स्थापनेपासूनच विविध प्रकारच्या कोश निर्मितीवर भर दिला आहे. स्वतंत्र मराठी विश्वकोश मंडळ स्थापन करून महाराष्ट्र शासनाने मराठी विश्वकोशाचे १९ खंड सिद्ध करून हिंदीनंतर विश्वकोश




असलेली राज्यभाषा म्हणून गौरव प्राप्त केला आहे. साहित्य आणि संस्कृती मंडळाने आयुर्वेद, मराठी वाङ्मय, शब्द इ. कोशांची निर्मिती करून कोश वाङ्मय क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. अनुवाद साहित्य कोशासारखे अनेक कोश सध्या अप्राप्त आहेत. त्यांचे पुनर्मुद्रण त्वरित होणे गरजेचे आहे.

**भाषांतरांचे प्रकाशन**

देवाणघेवाणीतून संस्कृती विकसित होत असते तशी भाषाही. स्वभाषेत परभाषी वाङ्मय अनुवादित होऊन आले की अनुभव, शैली वैचित्र्य, भाषा प्रयोग इत्यादींच्या कक्षा रुंदावतात. जगभर इंग्रजी भाषेतून स्वभाषेत भाषांतरांची मोठी परंपरा आहे. साहित्य आणि संस्कृती मंडळाने इतिहास, साहित्य, नाटक, कादंबरी, काव्य इ. विविध प्रकारचे अभिजात साहित्य मराठीत भाषांतरित करून घेऊन प्रकाशित केले आहे. न्यायमूर्ती रानडे यांच्या Rise of Maratha Power, आनंद मिश्रा यांच्या Nanasaheb Peshwa and Fight for Freedom, निकालाओ मनुक्कीच्या Storia Do Mogar ची मराठी भाषांतरे प्रकाशित केली आहे. संस्कृतमधून 'भरतमुनीचे नाट्यशास्त्र', 'मुद्राराक्षस' रशियनमधून सुर्गनेवच्या 'Father and Son' कादंबरीचा अनुवाद, उर्दूमधून जाफर शरीफच्या 'कानून-इ-इस्लाम'चे भाषांतर अशी मोठी परंपरा आहे. मराठी साहित्यात आज इंग्रजी ललित साहित्यकृतींच्या अनुवादाची मोठी लाट आली असून मराठी प्रकाशक यावर अहमहमिकेने स्वार होत असताना आपणास हे विसरून चालणार नाही की या भाषांतर युगाचा पाया साहित्य आणि संस्कृती मंडळाने पन्नास वर्षांपूर्वी घातला होता. आज केवळ इंग्रजी भाषांतरे होतात. या पार्श्वभूमीवर मंडळाचे भाषा वैभव व वैविध्य लक्षात घेण्यासारखे आहे.

**ऐतिहासिक ग्रंथांचे प्रकाशन**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर हे मंडळ स्थापन करण्याच्या अनेक उद्देशांपैकी एक उद्देश संस्कृती व इतिहासाचे संशोधन व प्रकाशन होता. त्यानुसार मंडळाने दुर्मीळ इंग्रजी, उर्दू इतिहास ग्रंथांची भाषांतरे जशी प्रकाशित केली तसेच मौलिक ग्रंथही प्रकाशित केलेत. 'धर्मशास्त्राचा इतिहास', 'औरंगजेबचा इतिहास', 'दुसरे महायुद्ध', 'सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास व कोरीव लेख', 'सम्राट अकबर'सारखे ग्रंथ या संदर्भात उल्लेखनीय म्हणून सांगता येतील.

**वैज्ञानिक ग्रंथ प्रकाशन**

मूलभूत वैज्ञानिक ग्रंथ प्रकाशनाची मराठीतील क्षीण परंपरा लक्षात घेता, ५० वर्षांपूर्वी साहित्य आणि संस्कृती मंडळाने या संदर्भात घेतलेला पुढाकार व केलेले प्रयत्न अनुकरणीयच म्हटले पाहिजे. 'वैज्ञानिक तत्त्वज्ञानाचा उदय'सारख्या ग्रंथापासून ते 'वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा' स्थापत्यशास्त्र, भूगोल, 'विज्ञान व तंत्रज्ञान'सारखे ग्रंथ महत्त्वाचे आहेत.

**नवलेखन प्रोत्साहन**

ग्रंथ प्रकाशनाबरोबर हे मंडळ सतत नवलेखक शिबिरे, नवलेखक प्रकाशन, नवलेखन पुरस्कार अशा विविध पद्धतीने मराठी साहित्याची मशागत करीत आले आहे. मंडळाच्या या शिबिरातून मार्गदर्शन घेतलेले अनुदान व पुरस्कार मिळवणारे कितीतरी साहित्यिक आज प्रथितयश झाले आहेत. भारतातल्या फार कमी राज्यांत अशा प्रकारचे प्रयत्न सातत्याने व जाणीवपूर्वकपणे होताना दिसतात. यशवंतराव चव्हाण व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची यातून दूरदृष्टी दिसून येते. आजवर मंडळाने नवलेखकांची २ हजार पुस्तके प्रकाशित केली आहेत. या संख्येवरूनही या योजनेचा आवाका ध्यानी येतो. मंडळ नवलेखक तयार करून त्यांच्या ग्रंथांना अनुदान देऊन थांबत नाही, तर नवलेखकांच्या ग्रंथांना पुरस्कार देऊन प्रोत्साहन देत असते.

**साहित्य संस्थांना अर्थसाहाय्य**

महाराष्ट्रात आठ महसूल विभाग असले तरी विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण व पश्चिम, दक्षिण महाराष्ट्र हे त्यांचे पारंपरिक सांस्कृतिक विभाग होत. या विभागांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या साहित्यिक संस्था आहेत. या संस्थांमार्फत साहित्य संमेलने, व्याख्यानमाला, पुस्तक प्रकाशन, साहित्यिक गौरव, मुखपत्र प्रकाशन, ग्रंथालय संचालन, वाचक मेळावे, चर्चासत्रे इ. उपक्रम केले जात असतात. अशा उपक्रमांना प्रोत्साहन व आर्थिक बळ मिळावे म्हणून महाराष्ट्र शासन या मंडळामार्फत प्रतिवर्षी प्रत्येक संस्थेला रु. ५ लक्ष इतके भरघोस अनुदान देत असते. अखिल भारतीय साहित्य महामंडळ, विदर्भ मराठी साहित्य संघ, नागपूर, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, मुंबई मराठी साहित्य संघ, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर, कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी या संस्थांचा यात अंतर्भाव आहे.

**साहित्यिक पुरस्कार व गौरववृत्ती**

मराठीतील उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती, श्रेष्ठ

**महाराष्ट्रातील मराठी नियतकालिकांची परंपरा गेल्या शंभर ते दीडशे वर्षांची आहे. ही नियतकालिके काळाच्या प्रवाहात बंद पडू नये, त्यांचे सत्त्व व स्वत्व सुरक्षित राहावे म्हणून विशेष ज्ञान शाखा, विषय इत्यादींची जपणूक करणाऱ्या नियतकालिकांना मंडळाकडून प्रतिवर्षी १५ हजार ते ३५ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. आजमितीस सुमारे ५० नियतकालिकांना या योजनेतून अर्थसाहाय्य दिले जाते. 'नव-अनुष्टुभ', 'पंचधारा', 'ब्रेन टॉनिक', 'मराठी विज्ञान पत्रिका', 'मिळून साऱ्याजणी', 'हाकारा', 'ब्रेल-जागृती', 'भाषा आणि जीवन', 'संशोधक', 'केल्याने भाषांतर' ही नियतकालिकांची नावे वाचली तरी मंडळ केवढे मोठे सांस्कृतिक संचित जोपासते आहे याची प्रचिती आल्यावाचून राहणार नाही.**

प्रकाशक, श्रेष्ठ लेखक व कलावंत गौरववृत्ती अशातून साहित्य व साहित्यिक सन्मानाची परंपरा मंडळाने स्थापनेपासून जपली आहे. प्रतिवर्षी रु. १० हजार रोख व सन्मानचिन्ह स्वरूपात दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारात महाराष्ट्र शासनाने घसघशीत वाढ जाहीर करून अवघ्या महाराष्ट्राचे साहित्य प्रेम सिद्ध केले आहे. साहित्यिक जीवन गौरवाच्या रूपात दिला जाणारा रु. ५० हजार रोख, मानपत्र व सन्मानचिन्ह अशा स्वरूपात दिला जाणारा साहित्यिक व लोक कलावंतांचा गौरव म्हणजे महाराष्ट्राचा सन्मानच होय! आजवर गौरविल्या गेलेल्या या सन्मानसूचीत भाई माधवराव बागल, कवी नारायण सुर्वे, आनंदीबाई शिर्के, कुसुमाग्रज, शाहीर वामनदादा कर्डक, भाऊ पाध्ये, इंदिरा संत, शंकरराव खरात, शांता शेळके, राम नगरकर, कवी ग्रेस, प्रा. म. द. हातकणंगलेकर, यमुनाबाई वाईकर, डॉ. भालचंद्र नेमाडे प्रभृती मान्यवरांचा समावेश आहे.

या उपक्रमांशिवाय मंडळाने सुवर्ण महोत्सवी उपक्रम म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक महोत्सव, जिल्हा ग्रंथ महोत्सव, सीमा भागातील साहित्य संमेलनांना अर्थसाहाय्य, जागतिक मराठी संमेलनास अर्थसाहाय्य, इ-बुक्स, संकेतस्थळ निर्मिती अशा बहुविध उपक्रमांतून कार्यविस्तार केला आहे. महाराष्ट्र राज्याचे नवे सांस्कृतिक धोरण, भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग इ. माध्यमातून मराठी भाषा, साहित्य व संस्कृती विकासाचा समन्वित प्रयत्न सुरू केला असून विविध योजना व उपक्रमांचे एकीकरण आरंभिले आहे. त्यातून मराठी राजभाषा वापरात वाढ, शासकीय व न्यायालयीन कामकाजात मराठीचा उपयोग, बृहन्महाराष्ट्रातील मराठी संस्थांना सहाय्य असे धोरण अंगीकारल्याने लवकरच त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येतील.

मंडळाचे वर्तमान अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक यांच्या नेतृत्वाखाली (विविध शब्दकोशांच्या सीडी तयार करणे), (बोलीभाषा प्रकल्प), मराठी प्रमाणभाषा कोश, ग्रामीण जीवन कोश, दुर्मीळ ग्रंथ संकेतस्थळांवर प्रकाशित करणे, रंगभूमी, वेषभूषा, हस्तकला, इतिहास लेखन, युवक अभ्यासवृत्ती अशा कालसंगत नव्या योजना, उपक्रम, प्रकाशनांचा संकल्प सोडला असून लवकरच या योजना अंमलात येऊन मराठी भाषा, साहित्य, संस्कृती विकासास गती येईल अशी आशा आहे. दुर्मीळ ग्रंथांचे पुनर्मुद्रण, महाराष्ट्र शिल्पकार मालिका प्रकाशन, इत्यादीतूनही महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र समाज विकास व उत्थानाचे महत्त्वाचे कार्य करीत आहे. या मंडळाचे आजवरचे अध्यक्ष व सदस्य यांनी या कार्यात वेळोवेळी केलेल्या साहाय्य व मार्गदर्शनातून हे मंडळ राज्यातील कार्यक्षम व गतिमान मंडळ म्हणून लोकादरास निरंतर पात्र राहिले आहे.

ई-मेल : drsklawate@gmail.com
संपर्क : ९८८१२५००९३

❑ ❑

**अधिक माहितीसाठी कार्यालयाचा पत्ता**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, दुसरा मजला, रवींद्र नाट्य मंदिर इमारत, पु.ल. देशपांडे कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.
दूरध्वनी ०२२- २४३२५९३१
फॅक्स ०२२- २४३२५९३१
संकेतस्थळ -http://mahasahityasanskriti.in
ई-मेल- secretary.sblc@gmai.com

**आजच्या मराठी वाचकांची शब्दकोशविषयक गरज व्यापक झाली आहे. म्हणून भाषिक पृथ:करणाचा व ऐतिहासिक आणि तुलनात्मक भाषिक अभ्यास पद्धतीचा उपयोग करून अभिनव कोशाची रचना करण्यात आली आहे. या कोशात जवळजवळ दीड लाख शब्द असतील व तो ७ खंडात प्रकाशित करण्यात येईल. मंडळाच्या वतीने आतापर्यंत चार खंड प्रकाशित झाले असून पाचवा खंड प्रकाशन पूर्व अवस्थेत आहे.**

**मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त बोलीभाषाविषयक संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. प्रकल्पांतर्गत मराठी भाषेच्या प्रमुख बोली असलेल्या अहिराणी, वऱ्हाडी, आगरी, मराठवाडी या बोलींचा संशोधन प्रकल्प अनुक्रमे महाराष्ट्रातील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, मुंबई विद्यापीठ, मुंबई, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या मार्फत राबविण्यात येत आहे. ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान या योजने अंतर्गत मराठीतील वैचारिक व शास्त्रीय विषयांवरील ग्रंथांची उणीव लक्षात घेऊन मराठीत लिहिलेल्या शास्त्रीय व तांत्रिक विषयावरील संशोधन व वैशिष्ट्यपूर्ण अशा उच्च दर्जाच्या लेखनाचा विचार अनुदानासाठी केला जातो. मंडळाच्या पुस्तक प्रकाशन योजने अंतर्गत मंडळाने आतापावेतो ४९० पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यापैकी महाराष्ट्राचे शिल्पकार योजनेतील १) बॅ. नाथ पै, २) ना.ग. गोरे, ३) एस. एम. जोशी, ४) स्वातंत्र्यवीर सावरकर, ५) यशवंतराव चव्हाण, ६) शंकरराव चव्हाण, ७) तुळशीदास जाधव, ८) पंडिता रमाबाई ९) शंकरराव मोहिते-पाटील ही नऊ पुस्तके व १) मी पाहिलेले यशवंतराव २) यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तिमत्व ही दोन पुस्तके अशी एकूण ११ पुस्तके मंडळाने इ-बुक स्वरूपात प्रकाशित केली आहेत. तसेच उर्वरित प्रकाशित पुस्तकांचे इ-बुक करण्याचे मंडळाच्या वतीने प्रस्तावित आहे. वरील ११ पुस्तके मंडळाच्या http://mahasahityasanskriti.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

# अद्‌भुत आणि अद्वितीय

डॉ. चारुशीला ओक


तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे नाव विश्वकोशाशी कायमचे जोडले गेले आहे इतकी ग्रंथसंपदा त्यांनी विश्वकोशासाठी निर्माण केली. एक नव्हे, दोन नव्हे, तब्बल १४ खंड त्यांनी संपादित केले. तद्‌नंतर मे. पुं. रेगे ह्यांच्या काळात खंड १५ तर रा. ग. जाधव यांच्या काळात खंड १६ चे संपादन झाले. या दोघांच्या काळात निर्माण होत असलेला कुमार विश्वकोश परिचय ग्रंथ डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या काळात प्रकाशित झाला, तसेच मराठीतून स्पर्धा परीक्षांना बसणाऱ्या युवक-युवतींसाठी जिचकारांनी 'विश्वकोश वार्षिकी' काढली. डॉ. विजया वाड यांच्या काळात खंड १७, खंड १८, खंड १९ त्यांनी संपादित केले तसेच होमी भाभा विज्ञान शिक्षण संस्थेच्या वतीने 'कुमार विश्वकोश - जीवसृष्टी आणि पर्यावरण' भाग - १ हा समन्वयक डॉ. हेमचंद्र प्रधान व संपादक विजया वाड या द्वयीने महाराष्ट्रातील शास्त्रज्ञांच्यासह तयार केला. ही सारी मराठी भाषेच्या विकासासाठीच चाललेली धडपड आहे. मराठीतून ज्यांना ज्यांना शिकायचे आहे त्यांच्या त्यांच्या गरजा ह्या ग्रंथांनी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. पत्रकार मित्रही या ग्रंथांचा पुष्कळ उपयोग करून घेतात. विश्वकोश हा माहितीचा खजिना असून त्याची विश्वासार्हता सर्व संपादकांनी जपली आहे. नोंद तयार करणे हे काम त्या त्या विषयातील ज्ञानी लोक करतात. त्यानंतर त्याची समीक्षाही महाराष्ट्रातले ज्ञानवंत करतात. मग संपादन होते; त्यामुळे मराठी भाषेतील हे ग्रंथ अधिकाधिक सधन होतात. आता इंटरनेटचे माध्यम आले आहे आणि त्याचा अचूक उपयोग विश्वकोश मंडळाने करून घेतला आहे.

### विश्वकोशाची सीडी

विश्वकोशाचे एक क्रांतिकारी पाऊल विजया वाड यांच्या काळात उचलले गेले. विश्वकोशाची सीडी करावी असा ठराव त्यांनी मंडळापुढे ठेवला. २०१८२ पृष्ठे समाविष्ट असलेला ६ सीडींचा १ ते १७ खंडांचा सीडी संच केवळ ७५० रुपयांना संगणक तज्ज्ञ माधव शिरवळकर यांच्या तांत्रिक सहकार्याने उपलब्ध झाला. शासनाची भूमिका मराठीच्या विकासासाठी उपकारक असल्याने व त्यातून नफा कमावणे हे शासनाचे उद्दिष्ट नसल्यानेच हा संच केवळ ७५० रुपयांत जनतेस उपलब्ध झाला. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी सीडी संचाचे उद्‌घाटन केले. सुरुवातीचे २ महिने तो ५०० रुपयांस जनतेला द्या व मराठी वाचनाची वृद्धी करा,




मराठी विश्वकोशाच्या १९व्या खंडाचे प्रकाशन सांस्कृतिक कार्यमंत्री संजय देवतळे यांनी केले. यावेळी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या अध्यक्षा डॉ. विजया वाड, मराठी भाषा विभागाचे सचिव प्रमोद त्र्यं. नलावडे व इतर मान्यवर उपस्थित होते.




**कुमार विश्वकोश**

मंडळाने तयार केलेला बोलका विश्वकोश तर मराठी भाषेच्या दालनातील आणि कोशवाङ्‌मयातील एक अभिनव उपक्रम आहे. ही सीडी अंध बांधवांसाठी तयार केली गेली तर कुमार विश्वकोश जीवसृष्टी आणि पर्यावरण भाग - १ हा marathivishwakosh.org.in या संकेतस्थळावर जनतेस मोफत दिसू लागला आणि त्याची ब्रेल आवृत्तीही तयार झाली. यासाठी मंडळाच्या अध्यक्षा डॉ. विजयाताई वाड यांनी पुढाकार घेतला. आजपर्यंत ब्रेलमध्ये अनेक पुस्तके झाली आहेत, पण जगातील एकही कोश ब्रेलमध्ये झाल्याचे कुठे वाचले नाही म्हणून या कामाचे मनमोकळेपणे कौतुक करावयास हवे. विश्वकोश मंडळ सातत्याने नवनव्या योजनांद्वारे काळाच्या बरोबर पावले टाकीत मराठी भाषा सर्वदूर पोचविण्याचा प्रयत्न करीत आहे.

असे त्यांनी सूचित केले.

**विश्वकोशराज स्पर्धा**

विश्वकोश कोशात न राहता विश्वात यावा, युवक - युवती, किशोर - किशोरी, भगिनी, वाचक, ज्येष्ठ नागरिक या सर्वांपर्यंत पोचविण्याची मनीषा बाळगून सारे सदस्य अध्यक्षांबरोबर महाराष्ट्रभर फिरले. २२ जिल्हे पिंजून काढले. विलास खोले, सदानंद मोरे, दादा गोरे, जयकुमार मगर, माधव शिरवळकर, सुधा काळदाते, वर्षा शिरगावकर, चारुशीला ओक, शरयू बबनराव तायवाडे, शोभा शिंदे, हेमचंद्र प्रधान, दत्ता भगत, डॉ. सु. र. देशपांडे अशी कितीतरी मंडळी वेळोवेळी विजयाबाईंबरोबर होती आणि ग्रंथवाचनाची गोडी त्यातून अनेकांना निर्माण झाल्याची पत्रे विश्वकोश कार्यालयात प्राप्त झाली आहेत. लोकांनी ग्रंथ विकत घेऊन या स्पर्धेत भाग घेतला हे विशेष. औरंगाबादेत तर हरसूल जेलमध्येही ही स्पर्धा झाली. तेव्हा बंदिवानांचे डोळे सजल झाले होते. अपंगांसाठी, अंधांसाठी ही स्पर्धा होणे हा विश्वकोशाच्या पर्वातील कळसाध्याय होय. कामगारांनीही या स्पर्धांत भाग घेऊन 'हम भी कुछ कम नहीं' हे दाखवून दिले. कोल्हापूर, सोलापूर, रायगड, सिंधुदुर्ग, ठाणे, पुणे, मुंबई, नवी मुंबई, औरंगाबाद, गडचिरोली, नागपूर, तुळजापूर... किती म्हणून नावे घ्यावी?

''वाचनाची गोडी लागली तर विचारही परिपक्व होतात हे या स्पर्धांनी आम्हांस शिकविले,'' हे उद्‌गार आहेत महाविजेता अजिंक्य आपके या युवकाचे. तो कोल्हापूरचा आहे. हा तर मराठी भाषेचा 'बोलका' विकासच म्हणू या.

**महाराष्ट्र कन्या**

महिला सबलीकरणाच्या गोष्टी समाजात होत असतात आणि प्रत्येकच संस्था आपापल्या परी त्यास हातभार लावीत असते. विश्वकोश मंडळाने २२ तासांचा ३ सीडींचा संच असलेली भेट जगास अर्पण केली आहे. याची सर्जन संकल्पना विजया वाड यांची तर समन्वयक आहेत माधवी कुंटे, मी, चारुशीला ओक. या कामात आम्ही अगदी प्रथमपासून रस घेतला. आतिश सोसे, हेमांगी कद्दू, मनीषा कदम, क्रांती केळकर या तरुण मुलांनी अपार मेहनत घेतली. ज्येष्ठ निवेदक प्रदीप भिडे, शिबानी जोशी, नितीश भारद्वाज, नीला सत्यनारायण, गौरी देशमुख अशांनी वाचन केले आहे. याचे शीर्षकगीत गौरी कुलकर्णी यांचे असून ते देवकी पंडित गायल्या आहेत. २७५ महिलांचे स्फूर्तिदायक चरित्रे ही उमलत्या वयाच्या किशोरींसाठी ही मराठी भाषेला विश्वकोशाने दिलेली एक प्रेमभेट आहे.




**आपला विश्वकोश**

आपला विश्वकोश हा आहे एक नितांत सुंदर लघुपट. यात विश्वकोश गीत आहे. भाष्यकार जयंत नारळीकर यांनी विश्वकोशाचा इतिहास उलगडला आहे. रिमा या प्रसिद्ध अभिनेत्रीचे निवेदन आहे. विश्वकोश कार्य विजयाबाईंनी वर्णिले आहे. हा लघुपट जनमानसात विश्वकोशाबद्दल आणि तद्‌अनुषंगाने मराठी भाषेबद्दल निश्चित प्रेम निर्माण करेल असा विश्वास वाटतो.

**वामनाचे पाऊल**

मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी विश्वकोशाचा ऐतिहासिक दस्तावेज २५ ऑक्टोबर २०११ रोजी जगास अर्पण केला. तो marathivishwakosh.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. आमच्या मदतीला आहेत सीडॅक कंपनीचे सहसंचालक महेश कुलकर्णी, त्यांचे सहकारी, चंद्रकांत, दीपक, राहुल व इतर.

डॉ. विजय भटकर, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. स्नेहलता देशमुख, डॉ. विजया राजाध्यक्ष, डॉ. नेहा राजपाल, डॉ. अनिल काकोडकर, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजन वेळूकर, रा. ग. जाधव, सांस्कृतिक कार्यमंत्री संजय देवतळे, आनंद देशपांडे, डॉ. माधवी पेठे यांनी माननीय मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या पाठोपाठ एकेका खंडाचे लोकार्पण प्रतिमास केले आहे. सध्या १३ खंड उपरोक्त संकेतस्थळावर मोफत उपलब्ध असून आतापर्यंत २२ देश आणि ५ लाख लोकांनी जगभरातून या संकेतस्थळास भेट दिलीय. मराठी भाषेचा विकास आणि विस्तार करीत विश्वकोशाचा शेवटचा शरीरखंड २७ फेब्रुवारी २०१३ पासून आपण दर महिन्याला काही अद्ययावत नोंदी स्वरूपात हळूहळू पाहू शकाल. ❑ ❑

# सक्षम आणि समर्थ

**ललिता देठे**

मराठीचा शासन व्यवहाराची भाषा म्हणून विकास घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ६ जुलै १९६० रोजी सामान्य प्रशासन विभागांतर्गत भाषा संचालनालयाची स्थापना केल्यानंतर मराठीतील नामवंत कोशकार, भाषातज्ज्ञ, पत्रकार व समाजप्रबोधक यांचा अंतर्भाव असलेले एक भाषा सल्लागार मंडळ नेमण्यात आले. या सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाखाली शासन व्यवहारातील मराठीची जडणघडण करण्याचे काम सुरू झाले. विविध विषयांतील शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा निर्मितीसाठी महाराष्ट्रामधील प्रत्येक विद्यापीठातील तज्ज्ञ प्राध्यापक प्रतिनिधींचा अंतर्भाव असलेल्या उपसमित्या स्थापन करण्यात आल्या व त्यांच्या साहाय्याने परिभाषा निर्मितीचे काम करण्यात आले.

भाषा संचालनालयाने भाषा सल्लागार मंडळाच्या सल्ल्याने पदनाम कोश, प्रशासन वाक्प्रयोग, प्रशासनिक लेखन, वित्तीय शब्दावली, शासन व्यवहार कोश, शासन व्यवहारात मराठी ही पुस्तके प्रसिद्ध केली. ही सर्व प्रकाशने मार्गदर्शक स्वरूपाची आहेत. पदनाम कोशाची दुसरी सुधारित आवृत्ती मार्च १९९० मध्ये प्रसिद्ध करण्यात आली. शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात मराठी शुद्धलेखनाच्या बाबतीत योग्य मार्गदर्शन व्हावे या उद्देशाने भाषा संचालनालयाने 'प्रमाणलेखन नियमावली' व 'कार्यदर्शिका' ह्या पुस्तिका प्रसिद्ध केल्या आहेत.

**शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा**

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांना परिभाषा निर्मितीच्या या प्रक्रियेत सहभागी करून घेऊन शास्त्रीय व तांत्रिक विषयांच्या क्षेत्रात एकरूप सुसंघटित परिभाषा तयार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने परिभाषा निर्मितीचे काम ऑक्टोबर १९६७ पासून हाती घेतले.

या संचालनालयाने भाषा सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या शास्त्रीय व तांत्रिक विषयांतील परिभाषा तयार केल्या. आजतागायत विज्ञान, कला, वाणिज्य, अभियांत्रिकी, वैद्यक इत्यादी शास्त्रांशी संबंधित असे एकूण ३४ परिभाषा कोश प्रसिद्ध झाले आहेत. त्यामध्ये विकृतीशास्त्र, न्यायवैद्यक व विषशास्त्र, भूगोल, वृत्तपत्रविद्या, जीवशास्त्र (सुधारित), औषधशास्त्र, भाषाविज्ञान व वाङ्मयविद्या, भौतिकशास्त्र, ग्रंथालयशास्त्र, गणितशास्त्र, रसायनशास्त्र व वाणिज्यशास्त्र या कोशांचा समावेश होतो. शासन व्यवहार शब्दावली व

**१ मे १९६० रोजी महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर मराठी ही राज्याची राजभाषा असेल असे घोषित करण्यात आले. त्यानुसार राजभाषा मराठीचा शासन व्यवहारात वापर करण्याबाबतचे धोरण राबवण्यासाठी ६ जुलै १९६० रोजी भाषा संचालनालयाची स्थापना करण्यात आली.**

शब्द कोश




परिभाषा कोश




शब्दावल्या




इतर प्रकाशने



**भाषा संचालनालय काय करते...**

■ राजभाषा मराठीविषयक शासनाचे धोरण राबवणे. ■ प्रशासनिक परिभाषा कोश व मार्गदर्शक पुस्तिका तयार करणे. ■ महाविद्यालयीन अभ्यासासाठी शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा कोश तयार करणे. ■ विधिविषयक अनुवाद व परिभाषा तयार करणे. ■ अर्थसंकल्पीय तसेच प्रशासनिक व विभागीय नियमपुस्तिकांचा अनुवाद करणे. ■ अमराठी कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा प्रशिक्षण व परीक्षा आयोजित करणे. ■ हिंदी भाषा परीक्षा आयोजित करणे. ■ महाराष्ट्र राज्यातील केंद्र सरकारच्या कार्यालयात त्रिभाषा सूत्राचा वापर करणे. ■ इंग्रजी टंकलेखक व लघुलेखक यांच्या मराठी टंकलेखन व लघुलेखन परीक्षा आयोजित करणे. ■ अल्पसंख्याक भाषांतून अनुवाद करणे. ■ शासन व्यवहारात मराठीचा अधिकाधिक वापर करण्यासंबंधीच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कार्यालयांची तपासणी व त्यांना मार्गदर्शन करणे.

वित्तीय शब्दावली या दोन शब्दावल्याही प्रकाशित झाल्या आहेत.

**विधिविषयक अनुवाद व परिभाषा**

राज्य अधिनियम व केंद्रीय अधिनियम यांच्या अनुवादाचे काम या संचालनालयाच्या स्थापनेपासून करण्यात येत आहे. त्यासाठी कायद्याची अशी विशिष्ट लेखनशैली या संचालनालयाने विकसित केली असून 'न्याय व्यवहार कोश' त्यादृष्टीने प्रकाशित केला आहे. तसेच, आतापर्यंत सुमारे २१२ राज्य अधिनियमांचा व १२६० राज्य नियमांचा अनुवाद करण्यात आला आहे. न्यायदानात मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने विधिविषयक परिभाषा विकसित करण्यासाठी शासनाने निवृत्त न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 'विधी अनुवाद व परिभाषा सल्लागार समिती'ची स्थापना केली.

**प्रशासनिक व नियमपुस्तिकांचा अनुवाद**

वित्त विभागामार्फत विधानमंडळास सादर केल्या जाणाऱ्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा मराठी अनुवाद करण्याचे प्रचंड काम या कार्यालयाकडून अनेक वर्षे केले जात आहे. प्रत्येक वर्षी विधानमंडळाची तीन अधिवेशने होतात. या तीन अधिवेशनांकरिता सुमारे ८ ते १० हजार पृष्ठांचा मराठी अनुवाद अधिवेशन पूर्वकाळात अल्पमुदतीत प्राथम्याने करावा लागतो. मंत्रालयीन सर्व विभागांच्या, कार्यालयांच्या, महामंडळांच्या नियमपुस्तिका, विविध चौकशी समित्यांचे अहवाल, शासकीय कार्यालयातून वापरले जाणारे सर्व प्रकारचे साधारण, विशेष व प्रमाण नमुने, शासन निर्णय, परिपत्रके, मंत्रिमंडळ टिप्पण्या, मा. राज्यपालांचे अभिभाषण, वित्तमंत्री यांचे अर्थसंकल्पीय भाषण, लोकआयुक्त अहवाल, लोकसेवा आयोगाच्या प्रश्नपत्रिकांचे संच, महालेखापालांचे प्रत्येक वर्षाचे चार लेखापरीक्षा अहवाल, निवडणूक आयोगाचे काम इत्यादींचा मराठी अनुवाद या कार्यालयाकडून करण्यात येतो. सुमारे १९६ नियमपुस्तिकांचा मराठी अनुवाद करून या कार्यालयाने मंत्रालयीन विभागातील दैनंदिन व्यवहारांना गतिमान केले आहे.



**मराठी भाषा परीक्षा**

शासकीय सेवेत असलेल्या अमराठी भाषिक कर्मचाऱ्यांना मराठी भाषेचा सर्वांगाने परिचय करून देण्यासाठी 'राजभाषा परिचय' हे पुस्तक तयार केले गेले. मुद्रणालयातील या पुस्तकांच्या प्रती संपल्यामुळे त्यांचे पुनर्मुद्रण करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. शासकीय सेवेत असलेल्या अमराठी भाषिक राजपत्रित अधिकाऱ्यांच्या व अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या मराठी भाषा परीक्षा एतदर्थ मंडळामार्फत वर्षातून दोन वेळा घेण्यात येतात.

**हिंदी भाषा परीक्षा**

शासकीय सेवेत असणाऱ्या सर्व राजपत्रित

**राजभाषा मराठीविषयक शासनाचे धोरण**

■ आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे विविध विषयांवरील शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा कोश तयार करणे, शासन व्यवहारासाठी आवश्यक परिभाषा घडविणे, शब्दावल्या तयार करणे. ■ केंद्रीय व राज्य अधिनियम, नियम यांचा मराठी अनुवाद करणे, तो पुस्तक स्वरूपात तसेच संकेतस्थळावर जनतेला उपलब्ध करून देणे. ■ केंद्राच्या त्रिभाषासूत्रानुसार मराठी भाषेचा वापर होत असल्याचे पाहणे. ■ राष्ट्रीय ऐक्यासाठी मराठी संज्ञा व हिंदी संज्ञा यांच्यात हिंदीशी एकरूपता ठेवण्याचा प्रयत्न करणे. ■ मराठी शुद्धलेखनाचा प्रसार करणे. ■ विधान मंडळ, उच्च न्यायालय व इतर कार्यालयांमधील अनुवादकांशी संवाद साधून संज्ञांमध्ये एकरूपता राखणे. ■ भाषातज्ज्ञांच्या नामिकेमार्फत इंग्रजी व उर्दू या भाषांमध्ये मानधन तत्त्वावर अनुवाद करून देण्याची सोय करणे. ■ केंद्र सरकार, महामंडळे इत्यादींकडून आलेले अहवाल इत्यादी अनुवादाचे काम मानधन तत्त्वावर करून देणे. ■ मराठी व हिंदी भाषा परीक्षा व टंकलेखन व लघुलेखन परीक्षांसाठी अर्ज व परीक्षांची वेळापत्रके, प्रश्नसंच संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे. ■ टंकलेखन परीक्षा संगणकावर घेणे. ■ शासकीय कार्यालयांतून मराठीचा शंभर टक्के वापर होत असल्याची खात्री करून घेण्यासाठी कार्यालयीन तपासण्या आयोजित करणे. ■ आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे मराठीच्या विकासासाठी विविध क्षेत्रांचा शोध घेणे व नवनवीन उपक्रम राबविणे. ■ प्रशासनिक परिभाषा कोश व मार्गदर्शक पुस्तिका तयार करणे.




**भाषा संचालनालयाच्या संकेतस्थळाचा पत्ता http://bhasha.maharashtra.gov.in. या कार्यालयाच्या एकूण ४९ प्रकाशनांपैकी ४५ प्रकाशने या संकेतस्थळावर टाकण्यात आली असून, उर्वरित प्रकाशने या संकेतस्थळावर टाकण्याचे काम सुरू आहे; तसेच कार्यालयाची एकूण ३५ प्रकाशने स्कॅन करून पुनर्मुद्रणासाठी शासकीय मुद्रणालयाकडे पाठवण्यात आली आहेत.**

अधिकाऱ्यांच्या व अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या हिंदी भाषा परीक्षा एतदर्थ मंडळामार्फत वर्षातून दोन वेळा नियमितपणे विभागीय कार्यालयांच्या ठिकाणी घेण्यात येतात.

**मराठी टंकलेखन व लघुलेखन परीक्षा**

मराठी टंकलेखक व लघुलेखक यांच्यासाठी एतदर्थ मंडळामार्फत वर्षातून दोन वेळा मराठी टंकलेखन व लघुलेखनाच्या परीक्षा नियमितपणे आयोजित केल्या जातात.

संगणकाने लघुलेखन क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे. आजच्या संगणकयुगात काळानुरूप जुनी टंकलेखन पद्धती बदलून संगणकाचा अधिकाधिक वापर करणे व कागदपत्रविरहित (पेपरलेस) शासन व्यवहाराकडे वाटचाल करण्याची गरज आहे. त्यास अनुसरून एप्रिल २००९ पासून टंकलेखनाच्या परीक्षा टंकलेखन यंत्रावर न घेता संगणकावर घेण्यात येतात.

**त्रिभाषा सूत्राचा वापर**

केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार महाराष्ट्रातील केंद्र शासनाच्या कार्यालयांमधून / प्राधिकरणांमधून जनतेच्या माहितीसाठी नामफलक व सूचनाफलक यावर हिंदी व इंग्रजी भाषेसह मराठी भाषेचा वापर केला जातो की नाही, हे पाहण्याचे काम व वापर केला जात नसल्यास या कार्यालयाकडे त्याचा पाठपुरावा करण्याचे काम जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यात केंद्र शासनाची जी कार्यालये / प्राधिकरणे आहेत त्यांमधून त्रिभाषा सूत्रानुसार मराठी भाषेचा आवश्यक तो वापर केला जातो किंवा नाही हे तात्काळ जाणून घेऊन शासनाकडे तसा अहवाल सादर करण्यासंबंधी आदेश दिले आहेत. याबाबत मार्गदर्शन करण्याची जबाबदारी शासनाने भाषा संचालनालयावर सोपवली आहे.

**अल्पसंख्याक भाषांतील अनुवाद**

१९६६-६७ मध्ये अल्पसंख्याक भाषांना संरक्षण देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार नवी मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद येथे विभागीय (प्रादेशिक) कार्यालये स्थापन करण्यात आली. अल्पसंख्याक भाषांना संरक्षण मिळावे आणि अल्पसंख्य भाषिकांना शासनाचे महत्त्वाचे आदेश, अधिसूचना, नियम इत्यादी उपलब्ध करून देता यावेत यासाठी भाषा संचालनालयाच्या मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या चार विभागीय कार्यालयांत मराठी अनुवादाबरोबरच अल्पसंख्याक भाषांतील अनुवादाची सोय करण्यात आली. भाषा संचालनालयाची विभागीय कार्यालये विभागीय पातळीवरील मराठीकरणाचे काम सांभाळतात.

उर्दू मजकुरांचा इंग्रजी / मराठी अनुवाद करण्यासाठी भाषा संचालनालयात उर्दू भाषा तज्ज्ञांची नामिका (पॅनल) स्थापन करण्यात आले आहे.

शासन व्यवहारात मराठीचा अधिकाधिक वापर करण्यासंबंधीच्या धोरणाची अंमलबजावणी करणे, त्यादृष्टीने कार्यालयांची तपासणी व त्यांना मार्गदर्शन करणे. शासनाच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजात मराठीचा वापर जास्तीतजास्त होण्याच्या दृष्टीने व तो तसा होतो आहे किंवा नाही हे प्रत्यक्ष पाहून कार्यालयांची तपासणी करून त्याचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर करण्याचे काम भाषा संचालनालयाकडे सोपवण्यात आले आहे. प्रत्येक शासकीय कार्यालयाची मराठीकरणाच्या दृष्टीने तपशीलवार तपासणी करून तपासणीचा अहवाल त्या कार्यालयास व संबंधित प्रशासकीय विभागास पाठवण्यात येतो. तपासणीच्या वेळी मराठीकरणाच्या संदर्भात आवश्यक ते मार्गदर्शन त्या त्या कार्यालयांना करण्यात येते. १९८९ पासून ७०४ शासकीय कार्यालये, मंडळे, महामंडळे, जिल्हा परिषदा या कार्यालयांची तपासणी

**इंडियन लॉ रिपोर्ट्सच्या धर्तीवर महत्त्वाच्या न्यायनिर्णयांचा मराठी अनुवाद करण्याचे कामही या कार्यालयात सुरू होते. आतापर्यंत सुमारे १७१ न्यायनिर्णयांचा अनुवाद करण्यात आला आहे. भारताच्या संविधानाची मराठीतील अद्ययावत अशी सहावी आवृत्ती काढण्यात आली आहे. भारताच्या संविधानाची सुधारित सातवी आवृत्ती ही मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषेत डिग्लॉट स्वरूपात काढण्याचे काम सुरू असून त्याची मुद्रिते मान्यतेसाठी राजभाषा खंड, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविण्यात आली आहेत. न्यायालयीन कामकाज मराठीतून करणे सुकर होण्याच्या दृष्टीने नेहमी उपयोगी पडणारे व महत्त्वाचे अनेक केंद्रीय अधिनियम उदा. भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, दिवाणी प्रक्रिया संहिता, मर्यादा अधिनियम, साक्षीपुरावा अधिनियम, संविदा अधिनियम व इतर अनेक केंद्रीय अधिनियम यांचा अनुवाद करण्यात येऊन ते पुस्तकरूपाने प्रकाशित करण्यात आले आहेत. आतापर्यंत १५१ केंद्रीय अधिनियमांचा अनुवाद झालेला आहे. शासनाकडून वेळोवेळी काढण्यात येणारे अध्यादेश, विधेयके, अधिनियम, नियम, विनियम, उपविधी व अधिसूचना यांचा मराठी व काही बाबतीत हिंदी अनुवाद या कार्यालयात केला जातो.**

करण्यात आली आहे.

जिल्हा न्यायालयात मराठीचा वापर अधिकाधिक होण्यासाठी विधी अनुवाद व परिभाषा सल्लागार समितीने काही न्यायालयांना भेट देऊन त्यांना मार्गदर्शन केले आहे.

**भाषा सल्लागार समिती**


भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अनेक कोशांमध्ये नवीन प्रचलित शब्दांची भर घालून कोश अद्ययावत करणे, नवीन परिभाषा कोशांची उदा. आयुर्वेद, सागरविज्ञान, संगणकशास्त्र, पर्यावरण शास्त्र निर्मिती करणे, परिभाषा कोशांचे पुनर्मुद्रण, परिभाषेतील अत्यावश्यक परिष्करणे, शब्दव्युत्पत्ती, मराठी पारिभाषिक संज्ञांच्या समस्या सोडविणे, यासारखी कामे पार पाडण्यासाठी तसेच महाराष्ट्र राज्याचे साधारणपणे पुढील २५ वर्षांतील मराठी भाषेचे धोरण ठरविणे, भाषा अभिवृद्धीसाठी नवनवे उपाय व कार्यक्रम सुचविणे व त्या अनुषंगाने शासनाला मार्गदर्शन करण्यासाठी भाषा संचालनालयाच्या अंतर्गत भाषा सल्लागार समिती कायमस्वरूपी स्थापन करण्यात आली असून तिच्या अशासकीय सदस्यांची ३ वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

या समितीच्या बैठकांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असून मुख्यत्वेकरून समितीने पुढील २५ वर्षांत मराठी भाषेचे संवर्धन व विकास करण्यासाठी धोरण ठरवावयाचे आहे. नवीन ज्ञान शाखांचे परिभाषा कोश निर्माण करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली असून सुरुवातीला पुढील १० परिभाषा कोशनिर्मितीचे काम हाती घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

- कृषिअभियांत्रिकीशास्त्र परिभाषा कोश
- सूक्ष्मजीवशास्त्र परिभाषा कोश
- संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान परिभाषा कोश

**राज्याचे पुढील २५ वर्षांचे मराठी भाषाविषयक धोरण ठरवण्यासाठी राज्यातील विविध भागांतील जनतेची मते जाणून घेण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या विभागांमध्ये विभागवार बैठका आयोजित करण्यासंबंधीचा निर्णय भाषा सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.**










- जल व भूमी व्यवस्थापनशास्त्र परिभाषा कोश
- सागरविज्ञानशास्त्र परिभाषा कोश
- योगशास्त्र परिभाषा कोश
- आहारशास्त्र परिभाषा कोश
- जैवतंत्रज्ञानशास्त्र परिभाषा कोश
- जनसंवाद परिभाषा कोश / सौंदर्यप्रसाधनशास्त्र परिभाषा कोश
- आपत्ती व्यवस्थापनशास्त्र परिभाषा कोश
- भाषा संचालनालयाने यापूर्वी तयार केलेले पुढील ५ परिभाषा कोश अद्ययावत करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.
- शासन व्यवहार कोश
- कृषिशास्त्र परिभाषा कोश
- तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश
- अर्थशास्त्र परिभाषा कोश
- शिक्षणशास्त्र परिभाषा कोश

**विधी अनुवाद व परिभाषा सल्लागार समिती**

निवृत्त न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली या समितीची स्थापना १२ नोव्हेंबर १९९२ रोजी करण्यात आली. या समितीमध्ये सध्या अध्यक्षांसह १३ सदस्यांचा समावेश आहे.

**उद्दिष्टे**

- न्यायदानात मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने केंद्रीय अधिनियमांचा व राज्य अधिनियमांचा मराठी अनुवाद त्वरेने प्राधिकृत पाठाच्या स्वरूपात उपलब्ध करून देणे.
- विद्यमान कायद्यांचा अनुवाद अधिक सुलभ करणे.
- कायदेविषयक शिक्षणाचे माध्यम मराठी करण्याच्या दृष्टीने विद्यापीठांच्या व त्यांच्या कक्षेतील महाविद्यालयांच्या सहकार्याने या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके मराठी भाषेतून तयार करण्याच्या संबंधात विद्यापीठांना आदेश व सूचना देणे.
- उच्च न्यायालयाने दिलेल्या निवडक व महत्त्वाच्या न्यायनिर्णयांची निवड करून त्यांचे मराठी भाषांतर प्रसिद्ध करणे.
- समितीच्या सदस्यांचे 'निरीक्षण पथक' स्थापन करून विविध न्यायालयांची पाहणी करून न्यायालयात मराठीच्या वापरात येणाऱ्या अडीअडचणींसंदर्भात न्यायालयांना सूचना देणे व मार्गदर्शन करणे.
- विधिविषयक मराठी मसुदा लेखनाची प्रशिक्षण योजना तयार करणे.
- इंग्रजी प्रमाण नमुने व त्यांचे संच मराठीत उपलब्ध करून घेऊन त्यास अधिकृत मान्यता देऊन ते पुस्तक स्वरूपात उपलब्ध करून देणे.

**कार्ये**

- समिती स्थापन झाल्यापासून आतापर्यंत समितीच्या सुमारे २३५ बैठका झाल्या आहेत.
- विधी अनुवाद व परिभाषा सल्लागार समितीने २० केंद्रीय अधिनियम व ५ राज्य अधिनियम यांच्या अनुवादाला अंतिम स्वरूप दिले आहे.
- भारताच्या संविधानाच्या मराठी अनुवादावर लोकांकडून आलेल्या अभिप्रायांवर विचार करून, पर्यायांमधील क्लिष्टता टाळावी म्हणून भारताच्या संविधानाच्या अनुवादावर चर्चा करून अनुवाद अधिक सुलभ व्हावा या दृष्टीने अनुवादात सुधारणा करण्यात आली. त्यानंतर राजभाषा खंड, नवी दिल्ली यांच्या मान्यतेने सहाव्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले.
- न्यायालयीन कामकाजात मराठीचा वापर सुलभ होण्याच्या दृष्टीने सुधारित न्याय व्यवहार कोश तयार केला.
- न्यायालयात मराठीच्या वापरात येणाऱ्या अडचणींसंदर्भात न्यायालयांना सूचना देण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी समितीच्या सदस्यांच्या निरीक्षण पथकाने ठाणे व रायगड जिल्ह्यातील तसेच पुण्यातील न्यायालयांना भेटी दिल्या.
- सध्या समितीकडून फौजदारी प्रक्रिया संहिता या केंद्रीय अधिनियमाचा अनुवाद अधिक सुलभ करण्याचे काम सुरू आहे.

# मराठी भाषेची अभिवृद्धी

महाराष्ट्र राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा गुणवत्तापूर्ण विकास व्हावा ह्या हेतूने राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना करण्यात आली.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा देण्यात आला. राजभाषा मराठीच्या संवर्धनासाठी आणि विकासासाठी शासनाच्या वतीने विविध स्वरूपाचे प्रयत्न करण्यात आले. २५ जून १९७९ रोजी महाराष्ट्र-शासनाने आयोजित महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक अभ्यासक्रमात व प्रशासनात मराठी भाषेचे स्थान ह्या विषयावरील परिषदेत मराठी भाषेकरिता राज्यस्तरीय संस्था स्थापण्यात यावी अशी सूचना मांडण्यात आली. ह्या संस्थेची स्थापना आणि तिचे स्वरूप याविषयी निर्णय घेण्यासाठी प्रा. वसंत बापट यांना निमंत्रक नेमून शासनाने अभ्यासगट स्थापन केला. प्रा. मे. पुं. रेगे, प्रा. वसंत दातार, डॉ. अशोक केळकर, प्रा. मं. वि. राजाध्यक्ष हे या अभ्यासगटाचे सदस्य होते. या गटाने केलेल्या आराखड्यात मराठी भाषेच्या विकासासाठी अन्य राज्यांप्रमाणेच महाराष्ट्रातही एक स्वतंत्र संस्था असावी. ती शासनाशी संलग्न परंतु बऱ्याच अंशी स्वायत्त असावी. तिचे काम विद्वत्सुलभ (ॲकॅडेमिक) पद्धतीने चालावे अशा सूचना करण्यात आल्या होत्या. भाषेचा विकास हा अखेर भाषकांचा विकास असतो. परिभाषा, साक्षरताप्रसार, शुद्धलेखनसुधारणा या किंवा अशा मोजक्या व अतिपरिचित विषयांमध्येच भाषेच्या विकासाचा विचार अडकून पडणे हिताचे नाही.



मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

१ मे १९९२ या दिवशी राज्य मराठी विकास संस्थेची औपचारिकरीत्या स्थापना करण्यात आली. सर्व कायदेशीर बाबी पूर्ण झाल्यानंतर दिनांक १ मार्च १९९३ पासून संस्थेच्या कामकाजास प्रत्यक्ष सुरुवात झाली.

**डॉ. अशोक सोलनकर**

### संस्थेच्या कामकाजाचे स्वरूप

राज्य मराठी विकास संस्था ही शासनपुरस्कृत स्वायत्त संस्था असून नियामक मंडळाच्या सल्ल्यानुसार संस्थेचे कामकाज चालते. एकूण ३० सदस्यांच्या नियामक मंडळात १० सदस्य हे पदसिद्ध सदस्य असून ते शासनाचे प्रतिनिधी असतात आणि २० सदस्य हे अशासकीय सदस्य असतात. राज्याचे मुख्यमंत्री हे संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष तर शालेय शिक्षणमंत्री हे संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष असतात. अशासकीय सदस्य हे विविध विषयांतील तज्ज्ञ असतात. संस्थेचे संचालक हे संस्थेचे प्रशासकीय प्रमुख व मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.

### संस्थेचे उपक्रम व प्रकल्प

मराठीच्या मुळाक्षरांतून साकारलेले झाड हे संस्थेचे बोधचिन्ह आहे. त्याला अनुसरून संस्थेने विविध उपक्रम आणि प्रकल्प स्थापनेपासून आजवर राबवले आहेत. त्यात विविध विषयांवरील प्रकाशने, कार्यशाळा, सर्वेक्षणे आदींचा समावेश होतो.

### दलित-ग्रामीण साहित्य-शब्दकोश

दलित व ग्रामीण साहित्यात वापरलेले विशिष्ट प्रदेशातील वा बोलींतील शब्द, संज्ञा, संकल्पना, म्हणी, वाक्यप्रयोग इत्यादींचा नेमका अर्थ देणाऱ्या शब्दकोशाच्या निर्मितीचे काम संस्था करत आहे. या शब्दकोशाचा प्रथम खंड (अ ते य) २७ फेब्रुवारी २०१२ रोजी मराठी भाषा दिनी मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. या कोशात विविध साहित्यकृतींमधून निवडलेले शब्द आणि त्यांचे अर्थ, तसेच शब्द ज्यात वापरण्यात आले ते मूळ वाक्यही संदर्भासाठी त्या त्या नोंदीमध्येच दिलेले आहे. साहित्यकृतींचे वाचन करून त्यातील अपरिचित शब्दांच्या नोंदी करणे तसेच तज्ज्ञांद्वारे शब्दांची अर्थनिश्चिती करणे ही कामे

**विविध क्षेत्रांत होणारा मराठीचा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जावा यासाठी प्रयत्नशील राहावे व मराठी भाषेच्या अभिवृद्धीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करावी ही राज्य मराठी विकास संस्थेच्या स्थापनेमागील मुख्य उद्दिष्टे आहेत. त्यानुसार विविध स्तरावर मराठीचा विकास साधण्यासाठी संस्था विविध उपक्रम राबवते. भाषा व संस्कृती या क्षेत्रांत मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी काम करणाऱ्या शासकीय तसेच अशासकीय संस्थांमध्ये समन्वय राखून त्या संस्थांच्या साहाय्यानेही काही प्रकल्प संस्था राबवत असते.**



संस्थेत चालली आहेत.

### वस्त्रनिर्मिती माहितीकोश

वस्त्रनिर्मितीतील विविध प्रक्रियांची माहिती देणारा वस्त्रनिर्मिती-माहितीकोश तयार करण्याचे काम इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम तांत्रिक शिक्षण संस्था यांच्या सहकार्याने संस्थेत चालले आहे. संकल्पित आठ खंडांपैकी तीन खंड प्रकाशित झाले आहेत.

### विज्ञान संकल्पना कोश

शालेय विद्यार्थ्यांना पदार्थविज्ञान, रसायनविज्ञान व जीवविज्ञान या विषयांतील संज्ञा, संकल्पना या सोप्या मराठीत समजावून देणारा हा कोश मराठी विज्ञान-परिषदेच्या सहकार्याने संस्थेने प्रकाशित केला आहे.

### फार्सी-मराठी-व्युत्पत्तिकोश

मध्ययुगीन व वर्तमानकालीन मराठीमध्ये असंख्य अरबी, तुर्की, फारसी शब्द आहेत. १४ व्या शतकापासून या शब्दांचा मराठीत समावेश झाला. या शब्दांचे मूळ दाखवून देणारा फार्सी-मराठी-व्युत्पत्तिकोश संस्थेने प्रकाशित केला आहे. मराठी व फार्सीचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. यू. म. पठाण यांनी या व्युत्पत्तीकोशाचे काम केले आहे.

**संस्थेचे सूचिकार्य :** विविध संदर्भांची माहिती देणारी सूची हे अभ्यासकांच्या दृष्टीने उपयुक्त साधन असते. आजवर संस्थेने या क्षेत्रात मौलिक असे कार्य केले आहे.

### मराठी ग्रंथसूचीमाला (१९५१-२०००)

कै. शं. ग. दाते यांनी १९५० पर्यंतच्या मराठी ग्रंथांची सूची दोन खंडांत तयार केली होती. तिचे सटीप पुनर्मुद्रण संस्थेने यापूर्वी केले आहे. १९५१ ते २००० या कालखंडात मराठीमध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथांची विषयवार ग्रंथसूची तयार करण्यासाठी संस्थेने मराठी ग्रंथसूचीमाला हा प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत आजवर १९५१ ते १९७८ या कालखंडातील ग्रंथांच्या सूचीचे ३ खंड (मराठी ग्रंथसूची खंड ३, ४, ५) प्रकाशित झाले आहेत. ग्रंथसूचीच्या ६ व्या खंडाचे

> **मराठीतील वर्णक्रम निश्चित करण्यासाठी संस्थेने अखिल भारतीय मराठी-साहित्य-महामंडळाच्या सहकार्याने भाषातज्ज्ञ व संगणकतज्ज्ञांशी चर्चा केली. त्यावर आधारित वर्णमाला आणि वर्णलिपीविषयक शासन निर्णय ६ नोव्हेंबर २००९ या दिवशी शासनाने प्रसिद्ध केला.**

(१९७९ ते १९८५) प्राथमिक हस्तलिखित तयार असून त्यावरून संगणकीय प्रत करून मुद्रणप्रत तयार करण्याचे काम संस्थेत चालले आहे.

### हस्तलिखितांच्या सूची

त्रिवेंद्रम, मद्रास, तंजावूर येथील ग्रंथालये व अभिलेखागारे यांतील मराठी हस्तलिखितांच्या सूचीही संस्थेने प्रकाशित केल्या आहेत.

### बोलीभाषांचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास

संस्थेने सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर यांच्या सहकार्याने मुंबईजवळील पालघर तालुक्यामध्ये बोलल्या जाणाऱ्या अनेक बोलींचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास करून त्या बोलींविषयीचा संदर्भग्रंथ तयार केला आहे. आदिवासी, आगरी, कुणबी या बोली व त्यांचे इतर भिन्न प्रकार बोलत असलेल्या समाजांविषयीची सविस्तर तसेच या समाजाची आडनावे, सण, शेती, शिकारीची पद्धत, जीवनशैली, संस्कार, गीते, शब्द-वाक्ये-म्हणी, समजुती, अंधश्रद्धा, गाव, परिसर इत्यादी अनेक विषयांची माहिती या ग्रंथात दिली आहे.

### शासकीय प्रकाशनांचे प्रदर्शन

संस्थेने २००२ साली आंतरराष्ट्रीय पुस्तक-वर्षाच्या निमित्ताने पहिल्यांदा शासकीय विभागांनी व शासनपुरस्कृत संस्थांनी प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन मुंबईत आयोजित केले. त्यानंतर अशा प्रकारची आणखी प्रदर्शने आयोजित करण्यात आली. या प्रदर्शनांना लोकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याने महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी अशी प्रदर्शने संस्था आयोजित करत असते.

### विधी व न्याय व्यवहारात मराठीचा वापर

निवृत्त न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या विधी-अनुवाद व परिभाषा सल्लागार समितीचे सदस्यत्व संस्थेला देण्यात आले आहे. या सर्व कामामध्ये भाषिकदृष्ट्या गुणवत्ता निर्माण व्हावी यासाठी संस्था समितीला सहकार्य करते.

### कार्यशाळा

संस्थेने आजवर विविध कार्यशाळा आयोजित केल्या आहेत. त्यांपैकी काही पुढीलप्रमाणे आहेत.

१. प्रशासनात मराठीचा गुणवत्तापूर्ण वापर व्हावा यासाठी महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी सहा महिन्यांचा प्रशिक्षणवर्ग. (१९९४)

२. इंग्रजी माध्यमातील शाळांमधून मराठीचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी कार्यशाळा. (२ सप्टेंबर १९९४)


३. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील शिक्षकेतर (प्रशासकीय) कर्मचाऱ्यांना प्रशासनिक लेखनासंबंधात मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळा. (१४ ते १६ ऑक्टोबर १९९७)

४. 'लोकवैद्यक' या प्रकल्पाखाली वैद्यक व्यवसायींना मराठीतून कामकाज करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यासाठी विविध कार्यशाळा.

५. सर्जन-आनंद शिक्षण केंद्र, कोल्हापूर यांच्या सहकार्याने प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी लेखन कौशल्य कृतीसत्र. (५ फेब्रुवारी २००६)

### सर्वेक्षणे

संस्थेने मराठीशी संबंधित काही सर्वेक्षणे



केलेली आहेत. उदा. एप्रिल १९९४ मध्ये अमराठी शाळांतील मराठीचे अध्यापन या विषयावर मुंबईतील शाळांमधून तर फेब्रुवारी १९९६ मध्ये मराठीच्या संदर्भातील प्रश्नांविषयी एक प्रश्नावली तयार करून त्या आधारे मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आळंदी येथे सर्वेक्षण करण्यात आले.

महाराष्ट्रातील विविध बोलींचा परामर्श घेऊन राज्याचा भाषिक नकाशा सिद्ध करण्याचा प्रकल्प संस्थेने हाती घेतला आहे. त्याची पूर्वतयारी म्हणून महाराष्ट्रातील काही शहरे व गावे निवडून जून १९९५ मध्ये चाचणी सर्वेक्षण करण्यात आले.

**नवे उपक्रम**

मराठी विभागाच्या अधिपत्याखाली संस्थेने अनेक नवे उपक्रम हाती घेतलेले आहेत.

**ऑडिओ कॅसेट / सीडीज् (Talk Books)**

या प्रकल्पांतर्गत मराठीतील पुरस्कारप्राप्त पुस्तके निवडून त्यांच्या ऑडिओ कॅसेट / सीडीज् ( Talk Books ) तयार करण्यात येत आहेत. त्यांत कविवर्य कुसुमाग्रांचे 'प्रवासी पक्षी' आणि 'रसयात्रा' हे काव्यसंग्रह तसेच विंदा करंदीकर यांचे 'आदिमाया' आणि 'संहिता' हे काव्यसंग्रह श्राव्य रूपात रूपांतरित करण्यात आले आहेत.

**संतसाहित्याचे श्राव्य माध्यमात रूपांतर**

मराठीतील संतसाहित्यातील महत्त्वाच्या साहित्याचे श्राव्य माध्यमात रूपांतर करून ते विनामूल्य उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने राबवण्यात येत आहे. त्यात मराठीतील नामवंत कलावंतांचा सहभाग आहे. पहिल्या टप्प्यात समर्थ रामदास यांच्या दासबोधाचे श्राव्य रूपांतर करण्यात आले आहे. हे श्राव्य स्वरूपातील साहित्य संस्थेच्या संकेतस्थळावरून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संत तुकाराम यांच्या साहित्याचे श्राव्य रूपांतर करण्याचे काम संस्था लवकरच हाती घेत असून तेही उपलब्ध करून देण्यात येईल.




**नवी प्रकाशने आणि प्रकाशनांचे पुनर्मुद्रण**

**दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश** या प्रकल्पांतर्गत दलित ग्रामीण साहित्य : रूढी, प्रथा, परंपरा, विधिकोश या कोशाचे काम पूर्ण झाले आहे.

**विज्ञानविषयक पुस्तकांचे अनुवाद**

मराठी विज्ञान परिषद आणि राज्य मराठी विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान प्रसार या संस्थेने प्रकाशित केलेल्या विज्ञानविषयक पाच पुस्तकांची भाषांतरे करण्यात आली आहेत.

**मानव्यविद्याविषयक पाठ्यपुस्तकांचे अनुवाद**

एन. सी. ई. आर. टी. या संस्थेने तयार केलेल्या सामाजिक शास्त्रे या विषयाच्या ६ पाठ्यपुस्तकांचा मराठीत अनुवाद करण्यात आला आहे.

**मराठी संकेतस्थळांची स्पर्धा**

अलीकडे संगणकावर मराठीतून माहितीची देवाणघेवाण करण्याचे प्रमाण वाढले आहे. शासनातील विविध विभागांकडे असणारी माहिती लोकांना सहज उपलब्ध व्हावी यासाठी प्रयत्न होत आहेत. कला, क्रीडा, संस्कृती, विज्ञान, अर्थव्यवहार अशा विषयांवरील माहिती मराठीतून संगणकावर उपलब्ध होऊ लागली आहे. या व्यवहाराला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने राज्य मराठी विकास संस्थेमार्फत मराठी संकेतस्थळांची स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. या स्पर्धांना उत्तम प्रतिसादही लाभला आहे.

**ज्ञानदेव मराठी नागरी योजना**

मराठी भाषेचा वापर शासन व्यवहारात आणि लोकव्यवहारात वाढावा या हेतूने आपल्या कामकाजात आणि कार्यक्षेत्रात मराठीचा अधिकाधिक वापर करणाऱ्या ग्रामपंचायत/ जिल्हा परिषद/ नगर परिषद/ नगरपालिका/ महानगरपालिका/ विभाग (वॉर्ड) यांना पुरस्कार देण्याची ही योजना असून ही योजना लवकरच कार्यान्वित होणार आहे.


**यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी**

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षात संस्थेने त्यांच्या 'कृष्णाकांठ,' 'ऋणानुबंध,' 'शब्दांचे सामर्थ्य' या पुस्तकांच्या तसेच 'यशवंतराव: राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व' या त्यांच्यावरील पुस्तकाच्या श्राव्य सीडी काढण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणारा रंगमंचीय कार्यक्रम आयोजित करण्याचा उपक्रमही हाती घेतला आहे. संस्थेने या दोन उपक्रमांसाठी एक तज्ज्ञ समिती नेमली असून तिच्याद्वारे या उपक्रमांची आखणी करण्यात येत आहे.

संपर्क : ९८५०८५८७२०

**मराठीसाठी युनिकोड आधारित किमान ४ ते ५ चांगले, देखणे तसेच २००९ मधील वर्णमाला आणि वर्णक्रमविषयक शासन निर्णयातील सूचनांनुसार टंक तयार करून घेऊन ते लोकांना मुक्त (फ्री ॲण्ड ओपन सोर्स) परवान्यासह उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प संस्थेने हाती घेतला आहे.**

# मराठीच्या माहेरी तीर्थस्तंभ



**महाराष्ट्री- प्राकृत अपभ्रंश भाषा ही महाराष्ट्रात विकसित झाली. ती अशोकपूर्व कालापासून वाचनात होती. यादवकाळात म्हणजेच इसवीसनाच्या तेराव्या शतकात म्हणजेच ज्ञानेश्वरीमध्ये तिचा पूर्ण विकास झाल्याचे स्पष्ट होते.**

**डॉ. रा.श्री. मोरवंचीकर**

भाषेच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास भारतीय भाषा या संस्कृतपासून विकसित झाल्या असा समज होता. तथापि, प्रस्तुत सिद्धान्त आता कालबाह्य झाला असून संस्कृतशिवाय प्रत्येक भूप्रदेशाची स्वत:ची अशी एक बोली, एक भाषा होती. अशा प्रकारच्या बोलीच्या भाषा त्या प्रादेशिक नामावरून ओळखल्या जात होत्या. जसे मगधची मागधी, शूरसेनाची सौरसेनी, व्रजभूमी प्रदेशाची व्रजी बोली. त्याचप्रमाणे महाराष्ट्राची महाराष्ट्री वगैरे.... या सर्व प्रादेशिक म्हणजेच प्राकृत भाषा होत. कालौघात यामध्ये अनेक बोलींचे प्रवाह सामील होऊन अपभ्रंश भाषेचा उदय झाला.

अपभ्रंश भाषेच्या प्रदीर्घ प्रचलनानंतर इ.स.पूर्वी साधारण पाचव्या/सहाव्या शतकात अपभ्रंश, मराठी, कानडी, तेलुगु आदी भाषाभगिनींचा उदय झाला असे मानले जाते. भारतीय भाषा कोविंदांनी महाराष्ट्र आणि महाराष्ट्री प्राकृत तथा मराठी या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे ठामपणे म्हटले आहे. म्हणूनच महाराष्ट्राला मराठीचे माहेर म्हणून गौरविले जाते. तथापि, हा प्रवास करण्यास अनेक शतकांचा कालावधी जावा लागला हे निश्चित. सर्वसामान्यत: इ.स.पूर्व तिसऱ्या शतकापासून महाराष्ट्रीच्या (प्राकृत-अपभ्रंश - मराठीच्या) वेगळेपणाचे अस्तित्व समकालीन भाषा, शिलालेख, नाणी, लोकसाहित्य व लोकसंस्कृती यामधून जाणवू लागले होते.

यापूर्वीच्या कालखंडावर प्रकाश टाकण्यासाठी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी उत्खनने करण्यात आली. त्यामधून समकालीन भौतिक संस्कृतीवर बराचसा प्रकाश पडण्यास मदत झाली. तथापि, त्या समाजाच्या भाषा व मनोव्यापार यावर म्हणावा तसा प्रकाश पडला नाही. जोपर्यंत एखाद्या समाजाचा मनोव्यापार भाषेच्या माध्यमातून समजू शकत नाही, तोपर्यंत त्या समाजाचे सांस्कृतिक वेगळेपण म्हणावे तसे जाणवत नाही.

महाराष्ट्री भाषा ही केवळ लोकभाषा नसून राजभाषाही होती. महाराष्ट्राचे आद्य राजघराणे म्हणजे शालिवाहन (सातवाहन) घराणे होय. आजचे पैठण (प्रतिष्ठान) ही त्यांची आद्य राजधानी होती. या घराण्याने सर्वसामान्यत: ४५० वर्षे राज्य केल्याचे मानले जाते. त्यांच्या साम्राज्यांत नर्मदेपासून जवळजवळ सर्व दक्षिण भारताचा भूप्रदेश अंतर्भूत होता. महाराष्ट्रीला म्हणजे प्राकृतला राजभाषेचा दर्जा देणारे हे आद्य राजघराणे होय. यांचे सर्व राजकीय व्यवहार महाराष्ट्री भाषेतून चालत होते. त्यामुळे महाराष्ट्री प्राकृत भाषा समृद्ध होण्यास मदत झाली.

या घराण्यातील अनेक श्रेष्ठ नृपतींनी आपली नाणी, आपले शिलालेख, आपले राजदरबारी व्यवहार तथा शिष्टाचार महाराष्ट्री भाषेतूनच केल्याचे ज्ञात आहे. त्यामुळे महाराष्ट्री भाषेचा भारतभर, जगभर प्रसार होण्यास मदत झाली. राजमाता गौतमी बलश्रीचा नाशिक येथील शिलालेख हे याचे उत्तम उदाहरण होय.

या घराण्यातील 'हाल' सातवाहनाची 'गाथासत्तसई' हा काव्यसंग्रह इ.स.नाच्या पहिल्या शतकात निर्माण झाल्याचे मानले जाते. हा महाराष्ट्री प्राकृत भाषेमधील आद्यग्रंथ होय. यावरून असा निष्कर्ष निघतो की, साहित्याची भाषा म्हणून महाराष्ट्री- प्राकृत यापूर्वी अनेक शतके लोकमनात रुजलेली होती. ते 'गाथासत्तसई'मधील भाषा आणि उपरोक्त शिलालेखामधील भाषेवरून स्पष्ट होते.

सातव्या शतकात होऊन गेलेल्या 'दंडी' या संस्कृत कवीने महाराष्ट्री प्राकृत भाषेबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. यानंतर झालेल्या दरम्यानच्या कवी आणि साहित्यिकांनी अपभ्रंश भाषेचा वापर केल्याने प्राकृत भाषेचा विकास होण्यास मदत झाली. या सर्व जडणघडणीचे केंद्र प्रतिष्ठान म्हणजे आजचे पैठण होते. पैठणी संस्कृतीच्या वर्चस्वाखाली येणारा भूप्रदेश म्हणजे आजचा सर्व महाराष्ट्र आणि दक्षिणेकडील काही भूभाग होय. या सर्व वाटचालीचे पैठण प्रमुख केंद्र होते. म्हणून या कीर्तिस्तंभाकडे, धर्मस्तंभाकडे आपण पाहू शकतो. परिसरातील सर्व राजघराण्यांनी आश्रय दिलेल्या संस्कृतीचे हे प्रतीक होय. प्रस्तुत स्तंभ पूर्व यादवकालीन असून यामध्ये समकालीन कलेचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. आज याला तीर्थखांब म्हणतात. या विषयीच्या शेकडो दंतकथा पैठण परिसरात आजही मोठ्या चवीने सांगितल्या जातात. या स्तंभामुळेच पैठणला दक्षिणकाशी मानले जाते. स्वर्ग, मृत्यू, पाताळ ही संकल्पना या स्तंभाद्वारे दर्शविण्यात आली आहे. महाराष्ट्री भाषेच्या विकासाचे आणि गतकालीन प्रतिष्ठानच्या वैभवाचे हे एकमेव प्रतीक. माय मराठीचा आग्रहाने पुरस्कार करणारे प्रतिष्ठानीचे चांगदेव राऊळ, श्री चक्रधर, अमृतातेही पैजा जिंकणाऱ्या श्री ज्ञानदेवांच्या पदस्पर्शाने आणि माझी प्राकृत काय चोरापासून झाली असे म्हणणाऱ्या शांतीब्रह्म एकनाथांच्या वास्तव्याने हा परिसर पावन झाला आहे. त्याचा हा एकमेव साक्षीदार होय.

(शब्दांकन : अनिल देशपांडे)

# साक्षीदार वैभवाचा

डॉ. हंसराज जाधव-वजीरगांवकर

महाराष्ट्राच्या राजकीय भौगोलिक, सांस्कृतिक, धार्मिक, व्यापार-उदिम अशा चोहोअंगाच्या इतिहासाची साक्ष आपणास प्रतिष्ठान नगरीत म्हणजेच पैठण नगरीत पदोपदी सापडतात. पैठणमधील तीर्थखांब हा त्या इतिहासाचा साक्षीदार ठरतो.

पैठणच्या दक्षिण भागात म्हणजेच नागघाटाच्या परिसरात प्राचीन प्रतिष्ठानच्या 'पालथी नगरी'चा भूभाग आहे. प्राचीन प्रतिष्ठान नगरीचे शेकडो अवशेष याठिकाणी इतरत्र विखुरलेले दिसतात. अगदी त्या 'पालथी नगरी'च्या परिसरातच 'तीर्थखांब' उभा आहे.

### 'तीर्थखांबा'च्या उभारणीचा काळ

या 'तीर्थखांबा' च्या संदर्भात अनेक आख्यायिका सांगितल्या जातात. दक्षिण भारतात इ.स. पूर्व २३० ते इ.स. २३० या कालखंडात सातवाहन घराण्याची सत्ता होती. त्या काळात प्रतिष्ठान हे राजधानीचे ठिकाण होते आणि म्हणून या राजवटीच्या इतिहासाचा संदर्भ देत 'तीर्थखांबा'विषयीच्या अनेक दंतकथा निर्माण झाल्या.

सातवाहन घराण्यातील राजसत्तेत जे एकूण ३० सम्राट झाले त्यापैकी इ.स. पूर्व १५९ नंतर सत्तेवर आलेला सातकर्णी (प्रथम) हा जसा पराक्रमी होता तसाच धार्मिक प्रवृत्तीचाही होता. त्याने दोन अश्वमेध यज्ञ, एक राजसूर्य यज्ञ आणि अनेक श्रौतयाग करून हजारो गायी, अश्व दान केल्याचे उल्लेख शिलालेखात आढळतात. पैठण येथील इतिहास संशोधक कै. बाळासाहेब पाटील यांच्या मते सातवाहनांनी या अश्वमेध यज्ञानंतर जो विजयोत्सव साजरा केला त्यावेळी हा कीर्तीस्तंभ निर्माण करण्यात आला.

सातवाहनांनी दक्षिणभूभागावरील 'शक, क्षत्रपांची' आक्रमणे परतवून लावली. त्या विजयाची साक्ष म्हणून या 'तीर्थखांबाची' उभारणी केली असल्याची ही आख्यायिका सांगितली जाते.

परंतु पैठणच्या इतिहासाचे अभ्यासक डॉ. रा.श्री. मोरवंचीकर यांनी मात्र तीर्थखांबावरील शिल्पकलेचा दाखला देत 'शिल्पशास्त्राच्या दृष्टीने विचार केल्यास हे उत्तरयादवकालीन शिल्प असावे असे वाटते, असे मत नोंदवले आहे.

### 'तीर्थखांबा'तील शिल्पकला

वेरूळच्या कैलासलेणीचा शिल्पकार काक्रोस हा मूळ पैठणचा. त्याच्या नेतृत्वाखाली ८०० कारागिरांचे पथक लेण्याच्या कामासाठी वेरूळला गेल्याची नोंद इतिहासात आढळते. म्हणूनच की काय तीर्थखांबाचे शिल्प बऱ्याच प्रमाणात वेरूळच्या शिल्पकलेशी नातं सांगते.

तीर्थखांबाची रचना चार विभागात (तुकड्यात) केलेली दिसते. यातील चार विभागांतील शिल्पाच्या आधारे स्वर्ग, पाताळ, मृत्यू लोकांची कल्पना केल्याचे जाणवते. हे चारही तुकडे नंतर एकत्र आणलेले वाटतात. वरचा भाग, तळाचा चौथरा, सुरूदार दगडी स्तंभ आणि त्यांना जोडणाऱ्या दगडी अणकुचीदार कमानी नंतरच्या मोगल, मराठा काळातील वाटतात. स्तंभाच्या तळच्या तुकड्यावर मातृका मंडळ आणि भैरव उत्तम पद्धतीने कोरण्यात आले आहेत. भैरवाच्या गळ्यातील मुंडमाळ, त्यातून गळणारे रक्त व रक्त चाटणारा कुत्रा हे सारेच बारकावे शिल्पकाराने अचूक टिपले आहेत. मातृका मंडळासोबत गणेश नृत्यही चितारले आहे. मधल्या तुकड्यात मकर मुखाचे अष्टकोनी पट्टीदार वर्तुळ असून वरील अंगास सुंदर घंटा वर्तुळाकृती पट्टीत बसविल्या आहेत. त्यावरील पटात 'मैथून शिल्पे' कोरली आहेत अशी शिल्पे वेरूळच्या लेण्यात आढळतात.

अखेरच्या तुकड्यात एकूण बारा खाने असून सप्तमातृका, नृत्य करणारा गणपती - श्रीदेवी, शिव आणि इंद्र दाखविला आहे. यावरच्या भागावर जैन विमान आहे.

गोदावरी नदीला महापूर येऊन प्रलय झाला आणि तीर्थखांबाच्या टोकावर बसून त्या महापुराचे कावळ्याने पाणी प्यायले तर जगबुडी होणार अशी ही काही लोकांची धारणा आहे.

सातवाहनाच्या पराक्रमाची साक्ष देणारा हा तीर्थखांब हा पैठणच्या भाषिक वैभवाचेही द्योतक ठरतो. पैठण ही विद्वान विप्रांची, पंडितांची नगरी आणि म्हणून तिथे संस्कृतचे प्राबल्य, तरीपण पैठणच्या इतिहासाने मराठी भाषेचा केलेला गौरव या तीर्थखांबाने अनुभवलाय. सातवाहन राजवटीतल्या सातकर्णीच्या दरबारातला पंडित गुणाढ्याने 'बृहत्कथा' हा ग्रंथ लिहिला. पुढे पैठणच्या इतिहासाचा संदर्भ असलेला 'गाथासत्तसई' हा राजा हलाने लिहिलेला ग्रंथ भाषेची ओळख करून देतो. पुढे बाराव्या शतकात श्रीचक्रधरांनी मराठीचा स्वीकार करून तिला देववाणीचा दर्जा दिला आणि तोच धागा पकडून पुढे महानुभाव ग्रंथकारांनी मराठीत विपूल ग्रंथ निर्मिती केली. तो श्रीचक्रधर चरणांकित परिसर तीर्थखांबाच्या अगदी जवळच आहे. म्हणजेच मराठी साहित्याच्या आदयत्वाच्या ग्रंथ निर्मितीचा एकाअर्थाने तीर्थखांब साक्षीदारच ठरत नाही काय?

मराठी भाषेत अमृताला जिंकण्याचे सामर्थ्य असल्याची खात्री पटलेल्या संत ज्ञानेश्वरांनी रेड्यामुखी वेद बोलवल्याचे (वेदाचे सार्वत्रिकीकरण केल्याचे) ठिकाण नागघाटावर म्हणजेच तीर्थखांबाच्या परिसरातच आहे. ज्ञानदेवांच्या भाषा विस्तारणीकरणाच्या या घटनेचाही तो एक मूक साक्षीदार ठरतो.

तीर्थखांबाच्या संदर्भातल्या अनेक आख्यायिका, दंतकथा हया पैठणच्या लोकवाङ्मयाचे अविभाज्य अंग बनल्या आहेत. पुढे संत एकनाथांच्या काळात भारूडाच्या रूपाने पैठणच्या लोकवाङ्मयाचे पर्यायाने मराठी भाषेचे एक अनोखे दर्शन संपूर्ण महाराष्ट्राला झाले.

हा तीर्थखांब आजही युगा-युगाचे उन्हाळे-पावसाळे (नैसर्गिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक संघर्षाचे या अर्थाने) झेलत तेवढ्याच्या अभिमानाने उभा आहे हे मात्र निश्चित...

संपर्क : ७५८८४२९२२८


# दलित साहित्य मराठी भाषेचे भूषण

**दलित साहित्याची निर्मिती केवळ वाङ्मयीन क्षेत्रातील एक घटना नसून ती सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मौलिक घटना आहे. दलित लेखक निर्मितीच्या संदर्भात केवळ एक व्यक्ती उरत नाही, तर त्याच्या अनुभवात समाजाच्या अंत:प्रवाहाचे ओघ समूर्त झालेले असतात. त्याच्या अभिव्यक्तीतून प्रक्षोभ संक्रमित होत असतो. म्हणजे तो अनुभव नंतर व्यक्तिनिष्ठ राहात नाही, तर तो समष्टीचा अनुभव होतो. दलितेतर वाङ्मयाच्या संदर्भात असे म्हणता येणार नाही. दलितेतर लेखकाच्या निर्मितीत त्याचे व्यक्तिमत्त्व सतत व्यक्त होत असते. म्हणूनच जीवनाचा, समाजाचा कलाकृतीशी संबंध नसतो असा आकृतीवादी समीक्षकांचा आग्रह असतो. सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ त्यांना अभिप्रेत नसतो. दलित साहित्यनिर्मितीच्या संदर्भात आकृतीवाद केवळ अप्रस्तुत आहे. म्हणूनच दलित साहित्याचा विचार समीक्षा, भाषा, अनुभवसृष्टीचं वेगळेपण अशा विविध अंगांनी करावा लागतो. दलित साहित्याचे या सर्व क्षेत्रात मोठे योगदान आहे. मराठी भाषेला दलित साहित्याने समृद्ध केले आहे.**

**डॉ. गंगाधर पानतावणे**

साहित्यनिर्मितीच्या संदर्भात व्यक्ती ही निखळ व्यक्ती राहातच नाही; तर ती समष्टीनिष्ठ होते. म्हणूनच व्यक्तीच्या समष्टीनिष्ठ अनुभवाचे स्वरूप त्याच्या अन्य अनुभवांपेक्षा वेगळे असते. दलित साहित्याची स्थिती अशीच आहे. अशा प्रकारच्या साहित्याची निर्मिती सामाजिक स्वरूपाच्या स्थित्यंतराची असते. समाजामध्ये घडणाऱ्या परिवर्तनाचा प्रभाव अपरिहार्यपणे साहित्यनिर्मितीवर होतो. म्हणूनच साहित्य हे समाजनिष्ठ असते.

दलित साहित्यातील मराठी भाषेचा विचार करताना एक बाब स्पष्ट केली पाहिजे की, साहित्यनिर्मिती केवळ प्रमाण भाषेतच असायला हवी या पारंपरिक समजाला दलित साहित्यनिर्मितीने छेद दिला आहे. या संदर्भात दलित कवितेतील भाषेचा प्राधान्याने विचार करता येईल. दलित कवितेत पुराण व्यवस्था, वर्णवाद, विषमता, शोषण याविरुद्ध निषेध व्यक्त करणारी भाषा प्रतीत होते. अर्थातच मानवी मूल्यांचा, परिवर्तनाचा, क्रांतीचा गौरव करणारी भाषा अभिव्यक्त होते. निषेधात्मकता आविष्कृत होताना पुष्कळदा निषेधाचा चढा



सूरही असतो. अशावेळी केवळ निंदात्मकता आणि शिवराळपणाचा अवलंबही होतो. केवळ शब्दांची मोडतोड किंवा आशयशून्य भाषा समर्थनीय नाही. काही दलित कवितेत असे दृग्गोचर होते. पण बरीचशी दलित कविता निषेधात्मकता व्यक्त करताना उपरोधिक भाषेचा आश्रय घेते, हे उल्लेखनीय आहे. बऱ्याचशा दलित कवितेतील औपरोधिकता धारदार असते. आव्हानास्पद भाषा, कवितामूल्य हरवून बसते. काही दलित कवितेतील शब्दबंबाळपणासुद्धा आवाजी व आवेशी असतो हे नाकारता येणार नाही. परंतु प्राधान्याने दलित कवितेतील प्रक्षोभाला औपरोधिकतेला, सहस्रावधी वर्षांच्या सामाजिक व सांस्कृतिक दु:खाचा संदर्भ आहे. शतकानुशतके भोगलेल्या शोषणाचा, अन्यायाचा, छळाचा, अवमानाचा, नाकारलेला मनुष्यत्वाचा संदर्भ आहे. म्हणून दलित कवितेतील प्रक्षोभ, दाहकता, वांझ नाही. या संदर्भाची जाण असल्याशिवाय दलित कवितेतील निषेधात्मक भाषा आकलन होणार नाही.

कवी केशव मेश्राम यांच्या ‘उपदेशमंत्र’ या कवितेतील काही ओळीत तीव्र भाषा असली तरी तिचे सांस्कृतिक व सामाजिक संदर्भ दुर्लक्षिता येणार नाहीत. ते म्हणतात.

जो कोणी या देशात जात न विचारील  
त्याचा बाप षंढ गणला जाईल.  
मानली जाईल त्याची आई व्यभिचारी  
मूळ त्याचे ठिसूळ ठरेल,  
गोत्र ठरेल कुत्र्याचे  
पोरे होती त्यांची खुजी, पोरी होती लंगड्यालुळ्या  
कसेबसे जमेल लग्न, वधु असेल समंगळ, वांझोटीही  
जावई मिळतील दुराचरणी, कदाचित छक्केबुळेही  
म्हणून तुम्ही लक्षात ठेवा- येता जाता!  
चतुराईचे बोल ध्यानी धरा.......

संवादात्मक भाषा ही दलित साहित्यनिर्मितीचं आणखी एक विशेष. स्वच्छंतावादाचा पुरस्कार करताना, नेहमीच कलावंताच्या भावस्थितीच्या रूपाचा संदर्भ लक्षात घ्यावा लागतो. कलावंत

झपाटलेपणातून निर्मिती करतो, कविता म्हणजे 'स्पोन्टॅनियस ओव्हरफ्लो ऑफ पॉवरफूल फिलिंग्ज' असेही म्हटले जाते. दलित साहित्याला मात्र प्रयोजनमूल्य आहे. दलित साहित्यिक एक जीवनदृष्टी घेऊनच लिहित असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे क्रांतिकारी तत्त्वज्ञान हीच त्याची ऊर्जाभूमी असते. म्हणून स्वच्छंदतावाद किंवा कल्पनारंजनाची अपेक्षा दलित साहित्याकडून वा साहित्यिकाकडून गैर आहे. आत्मविलोपी व आत्मरतीवृत्ती दलित साहित्याला मान्य नसल्याने आत्मगुंजन किंवा आत्मसंवादाला येथे स्थान नाही. दलित साहित्यिक सतत संवाद करीत असतो. तो स्वत:च्या समाजाशी तरी बोलतो किंवा स्वेतर समाजाशी संवाद करतो. त्याची संवादभाषा अकृत्रिम आणि आकलनसुलभ असते. त्याचा श्रोता अमूर्त नसतो तर तो समूर्त असतो. या संदर्भात वामन निंबाळकर यांच्या काही ओळी उद्धृत करता येतील.

या गावकुसाबाहेचा काळोख
मावळणार आहे
आमच्या ओठातील प्रकाशगीताचे स्वर
दाही दिशांना धुंद करणार आहे
असे सारे एकत्रित या
हातात हात घालून प्रकाशाचे गीत गा..

दलित साहित्यात विविध प्रादेशिक बोली, भाषा दृग्गोचर होतात. त्यामुळे एकूणच मराठी भाषेला एक आगळा आयाम प्राप्त झाला आहे, हे नि:संशय! दलित साहित्याच्या सर्वच प्रवाहातील लेखनात ज्या बोली भाषा येतात त्या आपल्या समवेत, प्रादेशिक मातीच्या गंधाबरोबरच शब्द व वाक्यरचना, शैली आणि अभिव्यक्तीची लकब घेऊन येतात; आणि त्यांचा बाजही ग्रामीण वा नागरी असतो.

महाराष्ट्रालगत अन्य भाषी सीमा आहेत. त्या त्या भाषेतील अनेक शब्द व वाक्प्रचार यांचा प्रभाव सीमावर्ती दलित साहित्यात फार नाही, पण जाणवतो. विशेषत: दलित आत्मकथनात त्याचा प्रयत्न होतो. हिंदी, तेलुगु, कानडी भाषेतील शब्दांचा वापर इतक्या सहजतेने काही दलित लेखकांनी केला आहे की त्याचे रूप मराठीमयच झाले आहे. डॉ. भीमराव गुरुजी (बेरड), केशव मेश्राम (हकीकत व जटायु, उत्खनन), वसंत मून (वस्ती), प्र. ई. सोनकांबळे (आठवणींचे पक्षी), शरणकुमार लिंबाळे (अक्करमाशी), रुस्तुम अचलखांब (गावकी) या वाङ्मयीन कृतींतून त्याचा आढळ होतो.

सहज म्हणून विचार करू जाता दलितातीत भिन्न भिन्न जातींचेही शब्दविशेष आणि भाषाविशेषही आढळतात. येथे एका शब्दाचा उल्लेख करतो. मांस (मटन) या शब्दाची किती विविध रूपे आहेत बघा. सागुती, चाण्या (वाळत घातलेले मांसाचे तुकडे), बरबाट (मांसाचा रस्सा), उरकुंदा (छातीचे मांस), गुडसा (मांस लागलेली नळी), खांडऱ्या (वाळलेल्या मांसाचे तुकडे), केन (वजडी), डली (मांसाचा तुकडा), जिजी (मटन), गेळवण (मांस) हे. यासारखे एकाच वस्तूशी निगडित असणारे शब्द, मराठी भाषेचे सौष्ठव नव्हे काय? दलित वाङ्मयीन कृतीत येणारे अनेक शब्द स्वत:ची नवी मुद्रा देणारे आहेत. प्रमाण भाषेचा व्यर्थ आग्रह धरणाऱ्या अभ्यासकांनी, दलित शब्दांची स्वतंत्र प्रतिमा व मुद्रा लक्षात घेणे आवश्यक आहे. हे शब्द अन्यत्र आढळत नाहीत पण ते मराठी आहेत. या शब्दांचा तोंडवळा आणि प्रकृती स्वतंत्र आहे. मराठी भाषेचे ते भूषणच होय. मराठवाडी, वऱ्हाडी, खानदेशी (अहिराणी), कोकणी, या बोली भाषांतील काही शब्दांचा निर्देश करतो. म्हणजे मराठी भाषेचे हे वैभव, मराठी भाषेचे भविष्य अंधारात आहे, अशी ओरड करणाऱ्यांना दिलासा देऊ शकेल. शब्द व त्यांचे अर्थ येणेप्रमाणे -



बेंडवा (खुराड), फोकनाड (थाप), फोकनाड्या (थापाड्या), हिरोती (लाल तिखट), इचकइंद (मोडतोड), गागरा (धूळ), अगोशी (रुमाल), आभरान (पोतराजाचा रंगीबेरंगी घागरा), काळजिभ्या (अपशकुनी), आरदकांडी (पोक्त), इगोड (विचका), झुंबरघाई (कलकलाट), घेटाळ (मोहल्ला), इस्तारी (पत्रावळ), उबुरगुबूर (उघडउघड), आभाळणी (उंच), खुलवरी (कमाई), घनघाव (मजबूत), कोंडार (गुराढोरांना बसण्याची जागा), घमड्या (लाचार), उकीर (उकरलेला मातीचा ढीग), किताल (ढिगारा), तितंबा (गोंधळ), उला (चुलीचा एक भाग), आळूचलावी (मनकवडी), खंगोल (झुपका), घुमाळ (सुंदर) उदाहरणे म्हणून या दलित साहित्यात येणाऱ्या या थोड्याच शब्दांचा निर्देश केला. मराठी भाषेतीलच हे शब्द आहेत. या शब्दांखेरीज नमुना म्हणून काही वाक्प्रचारांचा व म्हणींचा उल्लेख करता येईल. उदा : एक गाव सूना तर दस गाव पूना (एकावरच अवलंबून न राहाणे), गरीब गाय आन् डांग्यातलं कणीस खाय (वरकरणी साधा पण आतून बेरकी), घोड्यावरून पडावं आन् शिंगराचं कान मोडावं (एकाची करणी, दुसऱ्यास शिक्षा), आडात गुळवणी, आन् झाडाला कानवली (अतिशयोक्ती करणे).

तेव्हा दलित साहित्यनिर्मितीने मराठी भाषेला अनेक नवे अर्थपूर्ण शब्द, वाक्प्रचार, म्हणी दिल्या आहेत. मराठी भाषा म्हणजे केवळ प्रमाण भाषा हा समज दूर करून दलित साहित्याने मराठी भाषेला वैभव दिले आहे यात शंका नाही.

संपर्क : ९४२२२०५१८७

**दलित साहित्यकृतीतील अनेक शब्द, वाक्प्रचार, म्हणी मराठी भाषेला अपरिचित आहेत. मराठी भाषेला ते फार मोठे योगदान आहे. वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशांत एकाच शब्दाचे भिन्न भिन्न अर्थही होतात. हे वैविध्य लक्षणीय आहे. त्यातून संस्कृतीचे वेगळे आविष्कारही प्रतीत होतात.**

# भाषा आणि अस्मिता

आपली भाषा आपल्या जीवनाच्या सर्व क्षेत्रांत कार्य करीत असते. उदा. व्यवहार, शास्त्र, कला. धार्मिक क्षेत्रात कर्मकांडाची भाषा असते, कृषिक्षेत्राची भाषा असते, निरनिराळ्या व्यवसायांची भाषा असते, प्रत्येकच भाषा आपल्या परीने स्वयंपूर्ण असते. वर्षानुवर्षे अनेक पिढ्यांचे व्यवहार त्या भाषेच्या आधारे चाललेले असतात. दुसऱ्या समाजाशी, दुसऱ्या संस्कृतीशी संपर्क होतो तेव्हा भाषेत भर पडत असते. ब्रिटिश राजवटीत रेल्वे, पोस्ट, टेलिग्राम, अकाउंट्स इत्यादी क्षेत्रातली भाषा आली. जीवनात नवी क्षेत्रे निर्माण होतात तेव्हा आपल्या भाषेतही परिवर्तन घडत असते. काल आणि परिस्थिती यांनुसार भाषेत बदल होतात.

यादवकालीन, शिवकालीन, पेशवेकालीन, अव्वल इंग्रजीतील भाषेत बदल होत आजची, आताची भाषा तयार झालेली आहे. प्राकृत, संस्कृत, पर्शियन, अरेबिक, इंग्रजी, पोर्तुगीज इत्यादी भाषांचे संस्कार झाले. आताच्या भाषेत कॉम्प्युटर, इंटरनेट, मोबाइल फोन अशा नव्या गोष्टी आलेल्या आहेत. नव्या ज्ञानशाखा आलेल्या आहेत. कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये नवे विचार आलेले आहेत, नव्या संकल्पना आलेल्या आहेत.

व्यवहाराच्या आणि ज्ञानाच्या नवनव्या

**वसंत आबाजी डहाके**




क्षेत्रांमध्ये आपल्या भाषेने संचार केला पाहिजे असे आपल्याला वाटत असते. त्यासाठी नवी शब्दरूपे घडवली जाणे आवश्यक ठरते. भाषा समृद्ध होत असते.

मराठी भाषेचा विचार करताना आपल्याला मराठी बोलींचा विचार करावा लागतो. मराठीच्या अनेक बोली आहेत. वेगवेगळ्या भागांतल्या जनजीवनातील व्यवहारांच्या त्या वाहक आहेत. त्या रोजच्या संभाषणातल्या आहेत, तशाच त्या लग्नादी विधीत वापरल्या जाणाऱ्या आहेत, त्या बोलींमध्ये खेळ, स्वयंपाकाचे पदार्थ, भिन्नभिन्न वनस्पती यांसाठीदेखील शब्दभांडार आहे. प्रत्येक समाज गटाची स्वत:ची अशी बोली असते. एक मध्यवर्ती भाषा असावी, ज्ञानाच्या-विचाराच्या क्षेत्रात सर्वांना ती वापरता यावी यासाठी प्रमाण भाषेचा आग्रह धरला जातो. प्रमाण भाषा हे भाषेचे एक सर्वमान्य असे रूप असते. ते अनेक वर्षांतून घडत आलेले असते. प्रमाण भाषा ही कोणत्याही एका भूभागातल्या, कोणत्या एका गटाची भाषा नसते. भाषेचा राजकारणासाठी उपयोग करताना काही वेळा असा अपसमज तयार केला जातो. कोणत्याही एका भाषक गटाची ती भाषा नसूनही सर्वच भाषक गटांची ती भाषा असते. त्याचबरोबर बोली ही अज्ञानी, निरक्षर लोकांची भाषा असते हाही गैरसमजच आहे. बोलींमध्ये अनेक पिढ्यांच्या ज्ञानाचा आणि शहाणपणाचा साठा असतो.

बोलींमुळे प्रमाण भाषा समृद्ध होत असते. त्यामुळे बोली नष्ट होता कामा नये असे भाषेच्या हितचिंतकांना वाटत असते. शेतीमध्ये यावर्षीच्या पिकांमधून पुढच्या वर्षात पेरण्यासाठी बीबियाणे नियू नयेत अशी बियाणी आलेली आहेत. परंपरेने चालत आलेली उत्कृष्ट बियाणी त्यामुळे नष्ट झालेली आहेत. बोली अशाच नष्ट झाल्या तर आपली प्रमाण भाषा नि:सत्त्व होईल. शिक्षणक्षेत्रात भाषा तीन प्रकारे येते. भाषेचे शिक्षण, साहित्याचे शिक्षण आणि विषयांचे माध्यम. विषयाचे माध्यम म्हणून एखाद्या भाषेचा स्वीकार करताना मुख्य अडचण पारिभाषिक संज्ञांची असते. आधुनिक काळात सर्वच विषयांतील ज्ञानाचा स्रोत युरोप व अमेरिका येथील ज्ञानाचा साठा हा आहे. युरोपमध्ये वेगवेगळ्या भाषा आहेत. त्यातले ज्ञान इंग्रजी भाषेत येत असते. आपल्यासाठी इंग्रजी हाच खरा स्रोत आहे. इंग्रजी विद्या म्हणजे इंग्रजी भाषेतील विद्या. इंग्रजी भाषा आणि साहित्य हा वेगळा ज्ञानविषय आहे.

वेगवेगळ्या ज्ञानशाखांमधले ज्ञान इंग्रजीतून मराठीत आणताना पारिभाषिक संज्ञा घडवाव्या लागतात. सामाजिक विज्ञाने असोत की भौतिक विज्ञाने, सर्वच विषयांत नवनव्या ज्ञानाची भर पडत असते. हे ज्ञान

**वेगवेगळ्या ज्ञानशाखांमधले ज्ञान इंग्रजीतून मराठीत आणताना पारिभाषिक संज्ञा घडवाव्या लागतात. सामाजिक विज्ञाने असोत की भौतिक विज्ञाने, सर्वच विषयांत नवनव्या ज्ञानाची भर पडत असते. हे ज्ञान इंग्रजी भाषेत ज्या वेगाने, सक्षमतेने आणि समर्थपणे येते तो वेग, ती सक्षमता, ती समर्थता हे ज्ञान मराठीत आणण्याच्या दृष्टीने दिसत नाही.**



**भाषेचे शिक्षण म्हणजे कवितांचे, कथांचे शिक्षण नव्हे. व्यवहारात भाषा कशी वापरली जात असते, शास्त्रीय लेखनात भाषेचे रूप कसे असते, विविध व्यवसायांत भाषा कशी वापरली जाते, साहित्यकृतींमध्ये भाषेची अभिव्यक्ती कशी असते हे क्रमाक्रमाने शिकायचे**

इंग्रजी भाषेत ज्या वेगाने, सक्षमतेने आणि समर्थपणे येते तो वेग, ती सक्षमता, ती समर्थता हे ज्ञान मराठीत आणण्याच्या दृष्टीने दिसत नाही. या संदर्भात काही उपक्रम सुरू केले होते. पुढे ते मंद झाले, अथवा बंद पडले. सर्व विषयांसाठी मराठी माध्यमाचा आग्रह अवश्य करावा, त्याचवेळी तो विषय मराठीतून शिकण्यासाठी चांगली पाठ्यपुस्तके असली पाहिजेत, इतर पूरक साहित्य मराठीतून असले पाहिजे आणि अधिक पुढचे ज्ञान देणारी पुस्तकेही मराठीतून असली पाहिजेत याचाही आग्रह धरला पाहिजे. अन्यथा पुस्तके नाहीत म्हणून माध्यमाचा विचार करता येत नाही अशी स्थिती कायमच असणार.

भाषेच्या संदर्भात साहित्याचे शिक्षण हाही एक महत्त्वाचा भाग आहे. तेराव्या शतकापासून आजतागायत मराठी साहित्य लिहिले जात आहे. मराठी साहित्याची अतिशय समृद्ध परंपरा आहे. हा वारसा आपल्याला लाभलेला आहे याची जाणीव मराठी भाषकांना व्हावी, या साहित्याचा त्यांनी सूक्ष्म अभ्यास करावा यासाठी शिक्षणात साहित्याचा अंतर्भाव करण्यात येतो. कविता, कथा, ललित लेख, एकांकिका, कादंबरी, नाटक, निबंध हे रूपबंध कसे विकसित होत गेले, तेराव्या शतकापासून आजपर्यंत भाषेमध्ये कसकसे बदल होत गेले, जाणिवांचे वेगवेगळे प्रवाह कसे आले, आविष्काराचे वेगवेगळे प्रयोग कसे झाले हे अभ्यासकांना समजावे हा साहित्याच्या शिक्षणामागचा उद्देश असतो. त्याचप्रमाणे साहित्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनभानाचा, मूल्यांचा संस्कार व्हावा हेही उद्दिष्ट असते. साहित्यामुळे भाषेचे संस्कार होतात, शब्दसंपत्ती वाढते, अभिव्यक्तीच्या निरनिराळ्या रीती कळतात. त्यामुळे भाषा शिकवायची तर त्यासाठी कविता, कथा, ललित गद्य इत्यादी प्रकारांतील वेच्यांचा पाठ्यपुस्तकात समावेश केला पाहिजे अशी समजूत आहे. मराठी विषयाची पाठ्यपुस्तके याचा अर्थ निरनिराळ्या लेखकांच्या वेच्यांचा संग्रह असे समीकरण झालेले आहे. मात्र इयत्ता बारावीपर्यंतच भाषेचे-साहित्याचे हे शिक्षण सार्वत्रिक स्वरूपाचे असते. त्यानंतर केवळ बीएला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना ते खुले असते. वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकविद्या, व्यवस्थापनविद्या इत्यादी ज्ञानशाखांकडे जाणाऱ्यांना साहित्यशिक्षणापासून वंचित ठेवले जाते.

बीएला जाणारे विद्यार्थी साहित्याचा 'साहित्य : एक कला' या दृष्टीने अभ्यास करतात असे मानले तर ते बारावीपर्यंत भाषा शिकत होते की साहित्य शिकत होते की साहित्यकृतींच्या माध्यमातून भाषा शिकत होते? असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचप्रमाणे जीवनभान, मूल्यसंस्कार इत्यादी गोष्टी बारावीपर्यंत ठीक आहेत, पुढे त्यांची काही गरज नाही, विशेषत: वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकविद्या, व्यवस्थापनविद्या इत्यादी ज्ञानशाखांकडे जाणाऱ्यांना तर काही गरजच नाही असे समजायचे काय?

भाषेचे शिक्षण हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. स्वभाषेचे शिक्षण आणि परभाषेचे शिक्षण असे दोन विषय आहेत. स्वभाषेचे, उदा. मराठीचे. ही भाषा मुलांना अवगत असते. मुले बोलत असतात. लिहिणे शिकायचे असते. त्याचप्रमाणे टप्प्याटप्प्याने जीवनाच्या विविध क्षेत्रांत वापरली जाणारी भाषा शिकायची असते. स्वभाषेचे शिक्षण घेत असतानाच स्वभाषेच्या बोलींचीही ओळख व्हायला हवी. खरेतर विविध बोली बोलणारी मुले प्रमाण भाषा शिकायला आलेली असतात. प्रमाण भाषा आणि बोली यांत उच्च-नीचतेचा भेदभाव न करता त्या दोन्हींमध्ये सांधा जोडला पाहिजे.

संपर्क : ९८९०३६२७०३

❑ ❑



# संक्रमणातील मराठी भाषा

राजन खान

राज्यकर्त्यांची जी भाषा असते ती त्या प्रदेशातली प्रजा स्वीकारायचा प्रयत्न करते, हा जगभराचा इतिहास आहे. माणूस माणसाला कळण्यासाठी भाषा उपयोगी असली तरी, पोटाला अन्न देणं हाही भाषेचा एक उपयोग असतो, आणि राज्यकर्त्यांमध्ये पोटाला देण्याची ताकद असल्यानं, त्यांची भाषा प्रजेकडून स्वीकारली जाणं हे साहजिक आहे.

दुसऱ्या बाजूला राज्यकर्त्यांनाही प्रजेची गरज असतेच. त्यामुळं जगभरच्या कित्येक ठिकाणी राज्यकर्ते आणि प्रजा यांच्या भाषांचे संकर झाल्याचंही दिसून येतं. संकरित भाषांचा असा इतिहास तर भारतात दांडगा आहे.

भारत हा बहुभाषिक देश आहे. अगदी थोड्या थोड्या अंतरासाठी एकेक स्वतंत्र भाषा असं आजचं चित्र आहे. ही बहुभाषिकता कशी निर्माण झाली, कशी विकसित झाली याचा वास्तव आणि दीर्घ इतिहास माझ्या वाचनात तरी आला नाही. किमान वीस ते चाळीस हजार वर्षांचा हा भारतीय भाषा घडणीचा इतिहास असावा असं मला मानव वंशशास्त्राच्या आणि मानवी स्थलांतरांच्या आधारावर वाटतं. एक स्वतंत्र आणि सतत कार्यरत असणारा अभ्यास गट निर्माण करून या इतिहासाचं व्यवस्थित उत्खनन व्हायला हवं. या भाषा इतिहास संशोधनातला मोठा अडथळा ठरेल तो - आणि आजही ठरतो आहे तो- संस्कृत ही सर्व भारतीय भाषांची जननी आहे, हे विधान. अगदी वर वर पाहिलं तरी या विधानाला काहीही अर्थ नाही, असं लक्षात येतं. आणि भारतातल्या सर्व भाषा संस्कृतमधून कशा जन्माला आल्या याची लिखित मांडणीही कुठं उपलब्ध होत नाही. या विधानाच्या सत्यतेचा काबूलपासून कोहिम्यापर्यंतचा आणि काश्मीरपासून केरळपर्यंतचा इतिहास कुणीतरी मांडायला हवा असं मला नेहमी वाटतं.

आजच्या या सर्व भारतीय भाषा एकमेकींचा संकर आहेत एवढं मात्र निश्चित वाटतं. संस्कृत ही या देशातल्या कोणत्याही राज्यकर्त्यांची भाषा नव्हती आणि प्रजेची तर ती नव्हतीच कधी. सर्व आर्यांनासुद्धा संस्कृत भाषा वापरण्याचा अधिकार नव्हता, आर्यांमधल्या फक्त उच्चवर्णीयांना आणि त्यातही केवळ पुरुषांनाच ती भाषा वापरण्याचा अधिकार आहे- असं त्या भाषेबद्दलचं विधान आहे, आणि ते सत्य असेल तर - ती भाषा राज्यकर्त्यांची, राज्यकारभाराची आणि प्रजेच्या वापराची असणं शक्य नाही आणि तसं असेल तर सर्व भारतीय भाषा संस्कृतमधून जन्माला आल्या या विधानाला काही अर्थ नाही. कारण काही विशिष्ट आणि मोजके लोक संस्कृत वापरत होते, तेव्हा समाजातले बहुसंख्य लोक भाषेशिवाय मुके राहत होते, काही विशिष्ट मोजके लोक एकमेकांशी संस्कृतमध्ये बोलत होते, तेव्हा बाकीचे बहुसंख्य लोक त्यांना एकमेकांशी बोलायला भाषाच नसल्यानं मुके जगत होते, कारण ते संस्कृतमधून आपापल्या भाषा जन्माला येण्याची वाट पाहत होते, असा याचा अर्थ होईल आणि तो सर्वथा चुकीचा आहे.

आज जगातली एकही भाषा स्वतंत्र नाही आणि जन्माला आल्यापासूनच्या शुद्ध स्वरूपात उपलब्ध आहे असंही नाही. मुळात भाषेचं स्वरूप शुद्ध-अशुद्ध असणं असं शक्य नाही. विविध भाषिक माणसांचा संबंध जिथं जिथं येत राहणार, तिथं तिथं भाषांची एकमेकांत मिसळण होत राहणार. हा खेळ जुनाच आहे आणि आजही चालूच आहे आणि जगातल्या सर्वच भाषांबद्दल तो सत्य आहे. एकमेकींच्या संपर्कात येणाऱ्या भाषा एकमेकींचे संस्कार घेणारच. त्या नियमानं मराठी भाषा आपला आकार घेत गेली आणि पुढंही ती आकार घेत राहणारच.

### मराठीला मिळाला आकार

गेल्या चार-पाच हजार वर्षांत मराठी भाषेला जो आकार आला, त्यात तुळू, पाली, अर्धमागधी, अरबी, फारसी या भाषांचा मोठा वाटा आहे असं मला वाटतं. (भारतातल्या आजच्या इतर भाषांचा इतिहासही असाच असणार.) जनांच्या-प्रजेच्या एकमेकांच्या संसर्गानं तर ही भाषा आकाराला आलीच, पण राज्यकर्त्यांचा प्रभावही या भाषांच्या आकारात

**मराठी समाजातल्या साहित्यसृष्टी या क्षेत्रानं जेवढ्या तळमळीनं दीर्घ काळ मराठी भाषेच्या चिंतेचा मुद्दा लावून धरलाय, तेवढ्या तळमळीनं मराठी समाजातल्या इतर क्षेत्रांनी, घटकांनी तो मुद्दा लावून धरलेला दिसत नाही. उद्योग, आरोग्य, शेती, शिक्षण, न्याय, राजकारण, व्यापार इत्यादी जी मराठी समाजाची इतर सर्व क्षेत्रं आहेत, त्यांची मराठी भाषेबद्दलची याच्या मागच्या काळात काय भूमिका होती नि आज काय आहे? तर ती भूमिका सातत्यानं अनास्थेची आणि दुर्लक्षाचीच राहिलेली. भाषा जगवणं, टिकवणं, तिची वृद्धी करणं हे काही फक्त साहित्यसृष्टीचं काम नसतं, तर एकाच वेळी सर्वच क्षेत्रांनी ह्या विषयात पूर्ण आस्थेनं सहभाग घ्यायचा असतो.**



राहिला. अरबी-फारसीचा मराठीतला प्रभाव हा केवळ राज्यकर्त्यांमुळं राहिला असं मला वाटत नाही, तर अरबी-फारसी भाषिक राज्यकर्ते भारतात येण्याआधीपासून स्थलांतरं, व्यापार या निमित्तानं येणारे अरबी-फारसी भाषिक लोक, भाषिक संसर्गात मुख्य राहिले असं वाटतं. हा प्रकार तीन ते पाच हजार वर्षं जुना असावा. अरबी-फारसी भाषा या मुस्लिमांच्या आहेत असा एक गैरसमज आपल्याकडं आहे. इस्लामची स्थापना होऊन फक्त पंधराशे वर्षं झाली, अरबी-फारसी या भाषा त्याआधीपासूनच्या आहेत. जगातल्या कोणत्याही भाषा कधी कुण्या धर्माच्या-जातीच्या मालकीच्या नव्हत्या. अपवाद संस्कृत. मुसलमान राज्यकर्ते भारतात येण्याआधीपासून अरबी-फारसी भाषिक राज्यकर्ते भारतात नांदल्याचा इतिहास आहे. पुढं अरबी-फारसी भाषिक राज्यकर्ते आणि भारतीय भाषा यांच्या संकरातून उर्दू ही भाषा जन्माला आली.

मराठी भाषिक प्रांतावर राज्य केलेल्या राज्यकर्त्यांनी मराठी भाषेचा वापर केल्याची उदाहरणं फार नाहीत. आदिलशाही, नगरची निजामशाही आणि शिवाजी महाराजांनी अरबी-फारसीबरोबर दखनी आणि मराठी भाषेचा वापर केल्याचे उल्लेख आढळतात.

इंग्रज येईपर्यंत भारतात प्रादेशिक भाषा आणि राज्यकर्त्यांची भाषा यांच्या मिसळणीचा खेळ चालत राहिला. इंग्रजांनी राज्य ताब्यात येताना फारसी-उर्दूचा आधार येतलेला दिसतो. पण पुढं राज्य पूर्णपणे ताब्यात आल्यावर त्यांनी इतर सर्व भाषांना डच्चू देऊन केवळ इंग्रजी भाषा लादायला सुरुवात केली. केवळ तीच एकमेव राज्यकारभाराची भाषा ठेवली. नंतर ते गेले, पण जाताना इथल्या लोकशाही राज्यकर्त्यांना इंग्रजी ही आत्मीय भाषा वाटेल याची व्यवस्था करून गेले.

**भाषावार प्रांतरचना**

स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचना अंमलात आली, पण प्रांतांची सरकारं आणि केंद्र सरकार यांना जोडणारी भाषा अनधिकृत म्हणत म्हणत अधिकृतपणे इंग्रजीच राहिली. १९४७ साली सीमांची निश्चिती झालेला आकारबद्ध असा एक देश, भारत या नावानं आपल्याला मिळाला, पण आख्ख्या देशाला, देशातल्या प्रत्येक नागरिकाला एकमेकांशी जोडून येईल, अशी एकही देशी भाषा आपल्याला मिळाली नाही. आपण सगळ्यांशी मिळून तशी एकही भाषा राष्ट्रीय होणार नाही, याची तजवीज करण्यातच आपलं स्वातंत्र्य घालवलं. परिणामत: इंग्रजी ही भाषा राज्यकारभाराची झाली. भारतीय भाषांना प्रादेशिक डबक्यांचं स्वरूप आलं आणि राष्ट्रीय पातळीवरसुद्धा एकाही राज्यीय किंवा प्रादेशिक भाषेला महत्त्व येणार नाही याची व्यवस्था केली.

भारत बहुविध संस्कृतींनी नटलेला, बहुभाषिक देश असल्याचं बऱ्याचदा अभिमानानं बोललं जातं. पण हा अभिमान मला वृथा आणि निरर्थक वाटतो. आख्ख्या राष्ट्राला स्वत:ची अशी कोणतीही एक भाषा नसणं हे मला हे राष्ट्र, 'राष्ट्र' म्हणून अखंड उभं राहिलं नसल्याचं लक्षण वाटतं. राज्यकर्त्यांनी कारभारासाठी इंग्रजीचा वापर करणं, हे प्रादेशिक किंवा देशी भाषांनी डोकी वर काढू नयेत म्हणून केलेली व्यवस्था वाटते.

आता तर जागतिकीकरणाचा काळ आहे आणि त्याची अधिकृत संपर्क भाषा इंग्रजीच आहे. जागतिकीकरणात राज्यकर्ते तर ओढले गेलेले आहेतच, पण त्यांच्या पाठोपाठ समाजही




ओढला जाणार हे निश्चित आहे. तेच आताच्या या जागतिकीकरणाचं मोठं वैशिष्ट्य आहे. या जागतिकीकरणाची भाषा उघडपणे इंग्रजी असल्याने समाजही आता या भाषेच्या छत्रछायेत ओढला जाणार हेही अपरिहार्य आहे.

राष्ट्र नावाची संकल्पना जन्माला येण्याआधी- दीडशेदोनशे वर्षांपूर्वी माणसांची स्थलांतरं, व्यापार, राज्य करायला जाणं, प्रदेश लुटायला जाणं अशा रूपांमधली जागतिकीकरणं पृथ्वीभर कायमच चालू होती आणि त्यात भाषांच्या संकराचे खेळही कायमच चालू होते. पण त्या जागतिकीकरणामध्ये कोणत्याही एका भाषेचं वर्चस्व नव्हतं. आताच्या या जागतिकीकरणाचं मात्र तसं नाही. या जागतिकीकरणाची भाषा गेल्या दोनतीनशे वर्षांतल्या इंग्रजांच्या सर्वदूर पोहोचण्यामुळं आपोआप इंग्रजी ठरून गेली असून ती जगभरच्या प्रत्येक प्रादेशिक भाषेला मागं हटवून आपलं स्थान बळकट करत निघाली आहे. स्वत:चा भाषिक अभिमान आणि अस्मिता असलेले जे प्रदेश आहेत. उदा. फ्रान्स, जर्मनी, चीन, इटली, स्पेन, पोर्तुगाल, अरब राष्ट्रं, जपान इत्यादी, तेही आता इंग्रजीसमोर गुडघे टेकताना दिसू लागले आहेत. दक्षिण अमेरिका, आफ्रिका आणि आशियामधलं जे विकसनशील राष्ट्रांचं तिसरं जग आहे, त्याला भाषिक अस्मिता- किमान जागतिक पातळीवरची - कधीच नव्हती. या तिसऱ्या जगातल्या कित्येक राष्ट्रांना स्वत:च्या भाषा होत्याच, पण इंग्रजी, स्पॅनिश, फ्रेंच भाषा आक्रमण करायला आल्या तेव्हा त्यांनी त्याही स्वीकारल्या. तिसऱ्या जगातल्या राष्ट्रांना मात्र स्वत:ची एकच भाषा कधीच नव्हती. या देशातल्या छोट्या छोट्या प्रदेशांना स्वत:च्या भाषा आणि त्यांच्या अस्मिता होत्या, पण अखंड राष्ट्रीय पातळीवर किंवा सर्व राष्ट्र मिळून एका भाषेची अस्मिता असण्याची अवस्था कधीच नव्हती. त्यामुळं इंग्रजी भाषेची प्रभाव प्रक्रिया भारतात अगदी सहजच झाली. देशाची बहुभाषिकता आणि भाषिक अस्मितांची विखंडित, विस्कळीत अवस्था इंग्रजीच्या शिरकावाला सोयीस्कर ठरली. जागतिकीकरणातल्या इंग्रजी भाषेसाठी भारत हा जणू आधीपासून आयताच पायघड्या अंथरून बसलेला होता.

आताच्या या जागतिकीकरणाची प्रक्रिया

खंडित होत नाही किंवा जग आपापल्या राष्ट्रांमध्ये पुन्हा आकसत नाही, तोवर, किंवा येत्या पन्नास-साठ वर्षांत जगाची मुख्य भाषा इंग्रजी होणार, हे निश्चित आहे. ही अवस्था कुणा राज्यकर्त्यांच्या भाषेनं, समाजाच्या भाषेत मिसळण्याची नाही, तर गेल्या दोनतीनशे वर्षांत जगभर जे स्वत:चं राज्य इंग्रजी भाषेनं निर्माण केलेलं आहे, त्याची परिणती म्हणून, व्यापारी आणि पोटार्थी जगाची संपर्काची अपरिहार्य गरज म्हणून इंग्रजीचा प्रभाव येत्या काळावर आणि जगावर राहणार आहे.

**मराठीचं काय होणार?**

अशात आपल्या मराठी भाषेचं काय होणार, असा प्रश्न आहे. खूप लोक म्हणतात, आणि असं वाटतं की, खूप लोकांचा आवडता सूर आहे की, मराठी भाषा मरणासन्न आहे, ती मरणार आहे. काही थोडे लोक गुर्मीनं म्हणतात की, काही होत नाही मराठी भाषेला, ती मरणार नाही. (शहरं मराठी भाषेच्या बाबतीत बिघडली असली तरी मराठी खेड्यांमध्ये जिवंत आहे आणि खेडीच ती भाषा जगवतील असंही त्यातले काही लोक म्हणतात, आधुनिक सुविधांची जी भाषा असते आणि जी भाषा पोटाला देते, ती भाषा टिकून राहते, हा नियम लावला तर, खेड्यांमध्ये पोहोचलेल्या आधुनिक साधनांची भाषा इंग्रजी आहे आणि खेडी आता आर्थिकदृष्ट्या दुर्बळ झालीयंत आणि तिथंही इंग्रजी शिक्षणाची ओढ वाढलीय, ही गोष्ट ते लोक विसरतात.)

**मराठीची चिंता**

गेल्या शंभर-सव्वाशे वर्षांत जेवढी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनं झालीत, त्या सर्वांच्या अध्यक्षांची भाषणं वाचल्यावर एक मुद्दा लक्षात येतो की, ह्या सर्वांनी मराठी भाषेच्या अस्तित्वाची काळजी आणि वृद्धीची अपेक्षा व्यक्त केलेली आहे. म्हणजे मराठी भाषा जिवंत ठेवण्याची चिंता ही गेले शे-सव्वाशे वर्षं साहित्य वर्तुळातल्या लोकांकडून केली जातेय.

पण एखादा समाज म्हणताना, त्यातली केवळ साहित्यसृष्टी म्हणजे तो समाज नसतो. प्रत्येक समाजाची वेगवेगळी क्षेत्रं, वेगवेगळे घटक आणि विभाग असतात. मराठी समाजातल्या साहित्यसृष्टी या क्षेत्रानं जेवढ्या तळमळीनं दीर्घ काळ मराठी भाषेच्या चिंतेचा मुद्दा लावून धरलाय, तेवढ्या तळमळीनं मराठी समाजातल्या इतर क्षेत्रांनी, घटकांनी तो मुद्दा लावून धरलेला दिसत नाही. उद्योग, आरोग्य, शेती, शिक्षण, न्याय, राजकारण, व्यापार इत्यादी जी मराठी समाजाची इतर सर्व क्षेत्रं आहेत, त्यांची मराठी भाषेबद्दलची याच्या मागच्या काळात काय भूमिका होती न् आज काय आहे? तर ती भूमिका सातत्यानं अनास्थेची आणि दुर्लक्षाचीच राहिलेली. भाषा जगवणं, टिकवणं, तिची वृद्धी करणं हे काही फक्त साहित्यसृष्टीचं काम नसतं, तर एकाच वेळी सर्वच क्षेत्रांनी ह्या विषयात पूर्ण आस्थेनं सहभाग द्यायचा असतो. इतर क्षेत्रांची काही भाषेची जबाबदारी नाही. जी भाषा व्यवसाय देईल, पैसा देईल, पोटाला देईल, ती भाषा स्वीकारायची त्यांची तयारी. पण सर्वांनी मिळून आपलीच भाषा व्यवसायाची, पैशाची, पोटाची करावी असा मात्र सर्व मिळून प्रयत्न नाही. भाषेबद्दल सामूहिक अस्मिता नाही.

**शिक्षण क्षेत्राची जबाबदारी**

कोणत्याही प्रांतातल्या भाषेची जबाबदारी शिक्षण क्षेत्र सक्षमपणे घेऊ शकतं. पण त्यासाठी संपूर्ण शिक्षणव्यवस्था त्या प्रांताच्या भाषेत, म्हणजेच एक भाषिक असावी लागते. आणि शिक्षण व्यवस्थेतून पार होणाऱ्या मानवी पिढ्यांना जगवण्याची जबाबदारी त्या भाषेनं घ्यावी लागते. मराठी प्रांतातल्या शिक्षण व्यवस्थेत भाषेची स्थिती नेहमी गोंधळाची राहिली. एकट्या मराठी भाषेच्या जिवावर माणसं जगतील अशी अवस्था मराठी प्रांतात कधीच नव्हती. माणसांना मराठी भाषेतून पोटाला मिळेल याची परिपूर्ण हमी देण्याचा काळ कधीच नव्हता. जे लोक शिक्षण व्यवस्थेत येत नाहीत, अडाणी म्हणवले जातात, निरक्षर असतात, त्याच लोकांकडं परंपरेनं चालत आलेली मराठी भाषा टिकून राहते. जे लोक शिक्षण प्रक्रियेत शिरतात, त्यांचा मात्र भाषेचा अवाढव्य गोंधळ उडतो. त्यांच्यावर लहान वयात एकाच वेळी मराठी, हिंदी, संस्कृत, उर्दू, इंग्रजी अशा अनेक भाषांचा दबाव आणला जातो. त्या भाषांची ज्ञान आणि पोट यांच्या बाजूनं उपयोगिता-निरुपयोगिता पाहिली जात नाही. कोणत्या तरी एकाच भाषेत माणूस घडवला पाहिजे, त्याचं जगणं घडवलं हे नैसर्गिक आणि व्यवहारी सत्य पाहिलं जात नाही. एकाच वेळी अनेक भाषा शिकण्यानं बौद्धिक ताण वाढतो आणि बुद्धीचा वेळ वाया जातो हेही पाहिलं जात नाही. शिक्षण व्यवस्थेतल्या या भाषिक खिचडीनं आज अशी अवस्था केली आहे की, मराठी प्रांतातल्या शिक्षण व्यवस्थेच्या नादी लागणाऱ्या माणसाला कोणतीही एक भाषा परिपूर्ण येत नाही. त्याला स्वत:ची मराठी भाषाही परिपूर्ण येत नाही. शिक्षणात भाषा असूनही भाषिक अडाणी किंवा अर्धवट माणसं घडवणं हेच आजवरच्या मराठी शिक्षण व्यवस्थेनं केलेलं काम आहे. आज मराठी प्रांतातली शिक्षण व्यवस्था माणसांना कोणत्याही एका भाषेचं परिपूर्ण ज्ञान देण्याच्या बाजूनं अक्षम आहे.

**प्रसारमाध्यमांची जबाबदारी**

भाषेच्या समृद्धीत प्रसारमाध्यमांचीही महत्त्वाची भूमिका असते. पण आपली ती भूमिका असते, याचं भान आजच्या मराठी प्रसारमाध्यमांना आहे असं दिसत नाही. नव्या काळाच्या नावाखाली त्यांनी संमिश्र किंवा खिचडी भाषांचं धोरण स्वीकारलं आहे. (मराठी साहित्यसृष्टीही त्याच खिचडी धोरणाच्या वळणावर येऊ ठेपली आहे. तीही प्रसारमाध्यमांचंच एक अंग असते.) प्रसारमाध्यमांची जबाबदारी ही समाजाच्या भाषिक-बौद्धिक नेतृत्वाची असते, हेच आजची प्रसारमाध्यमं विसरली आहेत. त्यांनी आपलं नेतृत्व समाजाकडं सोपवलं आहे. आणि समाज तर भाषिक-बौद्धिक संक्रमणात आहे, गोंधळलेला आहे. अशा गोंधळलेल्या नेतृत्वाच्या सावलीत प्रसारमाध्यमांचाही



भाषिक-बौद्धिक गोंधळ चालू आहे. खरंतर प्रसारमाध्यमं- त्यात वर्तमानपत्र, चित्रवाणी, कला, साहित्य, चित्रपट असे सगळे घटक येतात- अगदी ठाम राहून भाषिक-बौद्धिक पातळीवर समाजाची घडण करू शकतात. समाज त्यांच्याकडून आदर्श घेतो. पण तीच जेव्हा समाजाला हवं तेच आम्ही देणार, तसंच वागणार अशी मिंधी, व्यावसायिक भूमिका घेतात, तेव्हा सामाजिक विकासाचा मार्गच खुंटतो. इतर सर्वच बाबतीत आज ते खरं आहे, पण भाषिक बाबतीतही जास्त खरं आहे. प्रसारमाध्यमं जर भाषिक बाबतीत आग्रही, ठाम राहिली तरी समाजातल्या भाषेचा विकास, वृद्धी आणि टिकाऊपणा दिसून येईल. (समाजाच्या मागं फरफटत जाणं हे प्रसारमाध्यमांच्या स्वत:च्या विकासालाही नुकसानकारक आहे. कारण प्रसारमाध्यमांकडं समाज मार्गदर्शकाच्या दृष्टीनं पाहत असतो. स्वत:च्या सर्व प्रकारच्या गोंधळाला प्रसारमाध्यमं उत्तरं मिळवून देईल असं समाजाला वाटतं. पण प्रसारमाध्यमं स्वत:च गोंधळलेली आहेत किंवा गोंधळ घालतायंत असं लक्षात आलं तर- आणि ते कधी ना कधी येतंच- समाजाची प्रसारमाध्यमांवरची श्रद्धा, आस्था ढळते आणि प्रसारमाध्यमांना व्यवसायाच्या, विश्वासार्हतेच्या बाबतीत ते हानिकारकच ठरतं. एकूणच सर्व मराठी प्रसारमाध्यमांचं भाषेच्या बाबतीत तेच झालेलं आहे.)

### संक्रमणातले प्रयत्न

मग मराठी भाषा जगवण्याचे, वाढण्याचे, टिकवण्याचे प्रयत्न चालू नाहीत का? तर ते चालू आहेत, पण ते प्रयत्नही संक्रमणात आहेत, गोंधळलेले आहेत असंच सध्याचं चित्र आहे. महाराष्ट्रात मुख्यत: साहित्यसृष्टीतला थोडा भाग (सर्व नाही.), शिक्षण क्षेत्रातला थोडा भाग (सर्व नाही.), राजकीय क्षेत्रातला थोडा भाग (सर्व नाही.) मराठी भाषेच्या अस्तित्वासाठी झगडताना दिसतो आहे. पण या झगड्याचं बहुतांश स्वरूप हे 'सरकारी' आहे, सामाजिक नाही. या क्षेत्रांमधली झगडणारी मंडळी भाषेसाठी सरकार काय करतंय, सरकारनं काहीतरी करावं, सरकारी प्रयत्न या धारणेवर जगणारी आणि आधारलेली आहेत. (मराठी भाषा जगवणं-वाढवणं हे अंतिमत: सरकारचं, सरकारी काम आहे असा एक समज सर्वदूर पोहोचलेला सध्याच्या वातावरणात स्पष्ट दिसतो; आणि हीच मराठी भाषेच्या विकासाला सर्वांत मोठी घातक गोष्ट आहे.) या समजामुळं भाषेसाठी आपणही काहीतरी करायचं असतं अशी निष्ठा समाजात आणि समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये निर्माण व्हायची राहून जाते. (महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतर तशी भाषिक निष्ठा सर्व मराठी समाजात निर्माणच झालेली नाही. तशा प्रकारचे प्रयत्नच झालेले नाहीत. राज्यातली इतर सर्व क्षेत्रं तर त्याबाबतीत भाषिक ठाम नव्हतीच, पण राज्यकारभाराचं जे क्षेत्र आहे, तेही नेहमी मराठी-हिंदी-इंग्रजी या तीन भाषांमध्ये त्रिखंडित राहिलं आणि त्यातही इंग्रजी या भाषेला जास्त प्रतिष्ठा दिली गेली, वलय दिलं गेलं आणि राज्यकर्त्यांकडं बघून जगायची सवय असलेला समाज मराठी की इंग्रजी या तळ्यातमळ्यात कायम अडकून राहिला आणि त्याची भाषिक निष्ठा जन्माला यायची राहून गेली.)

राज्यातली जी जी क्षेत्रं मराठीचा वापर करतात, मराठीसाठी राबतात, ती ती क्षेत्रं हे आपण सरकारसाठी करतोय असंच समजून वागतात. न्यायव्यवस्था असेल, सार्वजनिक व्यवस्थेची कार्यालयं असतील, सरकारी अनुदानांवर अवलंबून असलेली भाषिक मंडळं, नियतकालिकं असतील, मराठी शिकवणाऱ्या शिक्षण संस्था असतील, त्या सर्वांचा भाव, आपण हे सरकारी काम म्हणून करतोय असाच असतो. हे काम आपल्या स्वत:साठी आहे, आपल्या समाजासाठी आहे, अशा आस्थेचा सर्वत्र अभाव आहे. थोडक्यात सरकारवर उपकार म्हणून मराठी भाषेचं काम असं सध्याचं स्वरूप आहे आणि हे सामाजिक काम आहे, या जाणिवेचा दुष्काळ हे सध्याचं सत्य आहे. सर्व समाजाला मराठी भाषेच्या कवेत घेईल, असं एकही सामाजिक काम कुठंही चालू नाही. सरकारशिवाय मराठी भाषेचं काम आजकाल होतच नाही, हे विदारक आहे.




ज्यांना इंग्रजी येत नाही, त्यांच्यामुळं सध्या मराठी भाषा जिवंत आहे. जेव्हा साक्षात इंग्रज इथं होते, तेव्हा मराठी कला, साहित्य, संस्कृतीतल्या इंग्रजी भाषेच्या मिसळीचं प्रमाण अत्यल्प होतं, पण ते इथून गेले आणि त्यानंतर इंग्रजी भाषेच्या आकर्षणाला मराठी प्रांतात (आणि आख्ख्या देशातच.) ऊत आला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सगळ्या देशाला आणि महाराष्ट्रालाही आपापल्या भाषा सक्षम, बळकट करण्याची संधी आली होती, पण त्यासाठीचे सर्व प्रयत्न चौकटीत अडकून राहिले, 'सामाजिक' झाले नाहीत. आणि आता तर इंग्रजी भाषेच्या जागतिकीकरणाचा काळ आहे. त्यामुळं मराठी माणसाच्या इंग्रजी भाषेच्या आकर्षणाला झळाळी आलेली आहे. ही झळाळी येत्या काळात कमी होईल असं चित्र नाही, तर ती वाढतच जाईल. काही काळानंतर इंग्रजी भाषाच मराठी समाजाच्या केंद्रस्थानी असेल हे अतिशय स्पष्ट आहे.

ज्या मराठी भाषिकांना इंग्रजीचा संसर्ग होतो, ते लोक जेवढे जमतील तेवढे इंग्रजी शब्द मराठीत पेरून वापरायला सुरुवात करतात. आश्चर्य म्हणजे याला एकही मराठी माणूस आणि एकही मराठी क्षेत्र अपवाद राहत नाही, आणि आपण काही चुकीचं करतोय असंही संबंधितांना वाटत नाही. आपल्याला अस्खलित मराठी आलं पाहिजे, भेसळ न करता आपली भाषा वापरता आली पाहिजे, याची आच कुणाकडं राहिली नाही. शाळांमध्ये मराठी शब्दांचे अर्थ सांगण्यासाठी इंग्रजी पर्यायी शब्द सांगितले जातात. मराठी भाषेत लिहिणारे सर्रास इंग्रजी शब्द लिहितात, छापतात, एवढंच नाही, तर रोमन लिपीत मराठी लिखाणात इंग्रजी शब्द वापरतात. शेती, आरोग्य, उद्योग या आणि इतर क्षेत्रांमध्ये तर इंग्रजी शिरलंच आहे.

मराठी भाषेचं सोडल्यास बाकीचं सर्व उच्च शिक्षण मराठी समाजासाठी फक्त इंग्रजीतून उपलब्ध आहे. समाजाच्या प्रत्येक अंगापर्यंत आणि तळागाळापर्यंत सर्व बाजूंनी इंग्रजी शब्द, सर्व माध्यमांतून इंग्रजी शब्द येऊन पोहोचण्याची व्यवस्था आहे. पिढी दर पिढी एकेक करत इंग्रजी शब्द (पान ५१ वर)

# संपन्न कोशवाङ्मय

कोश किंवा कोष म्हणजे खजिना. प्रस्तुत लेखाच्या संदर्भात कोश याचा साधा सरळ अर्थ ज्ञानाचा खजिना असा आहे. लक्षणेने हा शब्द ज्ञानसंग्रह या अर्थाने योजला जातो. माहिती वा ज्ञान देण्याच्या उद्देशाने हेतुत: केलेली रचना ही संकल्पना कोश या संज्ञेमागे आहे. समाजाच्या भाषिक व जीवनव्यवहाराच्या वेगवेगळया अंगांसंबंधीचे ज्ञान सर्वांना उपलब्ध करून देण्याच्या हेतूने कोशांची रचना केली जाते. जनसामान्यांना समजेल अशा प्रकारे भाषेतील शब्दसंग्रह व ज्ञानसंग्रह संकलित करून कोश निर्माण केले जातात. भाषेचा व ज्ञानाचा विकास जसजसा घडतो तसतसा कोशनिर्मितीचा प्रयत्न वाढीस लागतो असे कोशवाङ्मयाच्या इतिहासावरून आढळते. भारतीय कोशवाङ्मयाचा इतिहास वेदांइतका प्राचीन आहे. वेदांतल्या शब्दांचा संग्रह करणारा कश्यपकृत 'निघंटू' नावाचा कोश सुप्रसिद्ध आहे. निघंटूनंतरचा जुन्यातला जुना कोश म्हणजे 'अमरकोश'. मराठीतील कोशांची परंपरा आरंभी संस्कृतमधील कोशांना अनुसरून झाली. आज कोशांचे जेवढे म्हणून प्रकार आहेत त्यांपैकी बहुतेक सर्व प्रकार मराठीत आहेत. वेगवेगळ्या भारतीय भाषांत

**विलास खोले**

झालेली कोशरचना पाहाता मराठीत कोशवाङ्मयाने मारलेली मजल खरोखरी अभिमानास्पद म्हणता येईल. मराठीतील एकंदर कोशांची संख्या आठशे ते साडेआठशे आहे. ज्ञानकोश/विश्वकोश, शब्दकोश, चरित्रकोश, तिथीकोश, संख्यासंकेत कोश, सुविचार कोश, ग्रंथसूची, जंत्री आणि शकावली, निदेश पुस्तके, निर्देशिका, वार्षिके व पंचांगे, भौगोलिक कोश-ग्रामसूची, गॅझेटियर्स असे कोशांचे निरनिराळे प्रकार मराठीत आढळतात. मराठीतील निव्वळ शब्दकोशांची संख्या ३९० च्या घरात जाईल. यात वेगवेगळे उपप्रकार सामावले आहेत. मराठीतील ग्रंथसूचींची संख्याही बरीच मोठी आहे. त्यांतही दहा प्रकार आहेत. या सर्वांचा निर्देश प्रस्तुत लेखमर्यादेत करणे अगदी अशक्य आहे. वानगीदाखल वेचक कोशांचा उल्लेख तेवढा येथे केला आहे.

**समाजाच्या भाषिक व जीवनव्यवहाराच्या वेगवेगळया अंगांसंबंधीचे ज्ञान सर्वांना उपलब्ध करून देण्याच्या हेतूने कोशांची रचना केली जाते. जनसामान्यांना समजेल अशा प्रकारे भाषेतील शब्दसंग्रह व ज्ञानसंग्रह संकलित करून कोश निर्माण केले जातात. भाषेचा व ज्ञानाचा विकास जसजसा घडतो तसतसा कोशनिर्मितीचा प्रयत्न वाढीस लागतो असे कोशवाङ्मयाच्या इतिहासावरून आढळते. भारतीय कोशवाङ्मयाचा इतिहास वेदांइतका प्राचीन आहे.**



### पहिला कोश

मराठी-मराठी असा पहिला कोश १८३१ मध्ये सिद्ध झाला. जगन्नाथशास्त्री क्रमवंत आणि अन्य कोशकारांनी 'महाराष्ट्र भाषेचा कोश' भाग १ व २ अशा स्वरूपात हा तयार केला. या कोशास लिहिलेल्या प्रास्ताविकात कोशांची आवश्यकता, कोशांचे स्वरूप यासंबंधी महत्त्वपूर्ण विवेचन केले आहे. या कोशाची रचना करताना पुणे हे प्रमाणभाषेचे केंद्र मानले आहे. त्याखेरीज पंढरपूरच्या आसपासचा भाग, कोकण, राजापूर व सावंतवाडी या भागांतील शब्द त्यात आहेत. जुन्या मराठी काव्यातील दुर्बोध शब्दांचा उलगडा या कोशात केलेला आढळतो. भारतात ब्रिटिशांची सत्ता आल्यानंतर कोशनिर्मितीला विशेष चालना मिळाली. कारण ब्रिटिशांना आपली सत्ता टिकविण्याच्या दृष्टीने येथील भाषा व भूप्रदेश यांचे अधिकाधिक ज्ञान करून घेणे अत्यावश्यक वाटत होते. त्या दृष्टीने त्यांनी कोशवाङ्मयनिर्मितीला उत्तेजन व प्राधान्य दिले. याचबरोबर त्यांनी राष्ट्रीय पातळीवरील आणि प्रांत व जिल्हा पातळीवरील जी गॅझेटियर्स तयार करून घेतली त्यांद्वारा येथील भूप्रदेशाची संस्कृती, लोकजीवन इत्यादीसंबंधीची भरपूर माहिती उपलब्ध झाली. मोल्स्वर्थ, कँडी यांनी इंग्रजी-मराठी व मराठी-इंग्रजी कोश तयार केले.

### पहिला शब्दकोश

संख्येने सर्वाधिक, उपप्रकारांत सर्वाधिक आणि सर्वांच्या परिचयाचा कोशप्रकार म्हणजे शब्दकोश हा होय. मराठीतील पहिला शब्दकोश

म्हणजे विल्यम कॅरे यांनी १८१० मध्ये प्रकाशित केलेला 'मराठी-इंग्रजी कोश' (अ डिक्शनरी ऑफ दी मऱ्हाटा लँग्वेज). हा बंगालमध्ये सेरामपूर येथील ख्रिस्ती मिशनरी मंडळाकरिता विल्यम कॅरे याने छापून प्रसिद्ध केला. हा कोश पंडित विद्यानाथ (वैजनाथ शर्मा) यांच्या मदतीने तयार केल्याचे प्रस्तावनेत म्हटले आहे. वैजनाथ शर्मा हा कलकत्त्याच्या फोर्ट विल्यम कॉलेजमधील मराठीचा प्रमुख पंडित होता. या कोशाची पृष्ठसंख्या ६५२ असून यात मराठी शब्द मोडी लिपीत व अर्थ इंग्लिश भाषेत दिला आहे. दुसरा कोश ले. क. व्हान्स केनेडी या लष्करातील साहेबाने मुंबई येथे इ. स. १८२४ मध्ये प्रसिद्ध केला. या कोशाचे दोन भाग असून पहिल्या भागात मराठी शब्दांना इंग्लिश प्रतिशब्द देऊन दुसऱ्या भागात इंग्लिश शब्दांचे मराठी अर्थ दिलेले आहेत. कोशातील शब्दसंख्या आठ हजारपर्यंत आहे. ''एका 'इंटेलिजंट' ब्राह्मणाने अमरकोश मराठीत उतरून दिला व व मिस्तर अर्स्किन या विद्वानाने तयार करविलेले दोन इंग्रजी-मराठी हस्तलिखित कोश व कॅप्टन कॉक याजवळील हिंदुस्थानी मराठी हस्तलिखित कोश त्यास मिळाले. त्यांचे त्यास फार साहाय्य होऊन त्याने ही ग्रंथसिद्धी केली.'' (मराठी गद्याचा इंग्रजी अवतार, द्वितीय आवृत्ती, पृ. ३६)

**महाराष्ट्र भाषेचा कोश**

याच सुमारास 'बॉम्बे नेटिव एज्युकेशन सोसायटी'ने महाराष्ट्र भाषेच्या कोशाची रचना करण्यासाठी बाळशास्त्री घगवे, गंगाधरशास्त्री फडके, सखाराम जोशी, दाजीशास्त्री शुक्ल आणि परशुरामपंत गोडबोले असे पाच पंडित नेमले. त्यांनी बऱ्याच प्रयासाने इ. स. १८२९ मध्ये 'महाराष्ट्र भाषेचा कोश' प्रसिद्ध केला. हा कोश अत्यंत विस्तृत असून त्यात महाराष्ट्राच्या सर्व भागात प्रचलित असलेले अधिकाधिक शब्द समाविष्ट केले आहेत. इ. स. १८३१ मध्ये जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांच्या संपादकत्वाने त्याला पुरवणीखंड जोडण्यात आला. हे सर्व पंडित मोल्सवर्थ आणि कँडी यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे काम करीत होते असा उल्लेख मोल्सवर्थने आपल्या मराठी-इंग्रजी कोशाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत केला आहे. या पंडिती कोशाबरोबरच मोल्सवर्थ-कँडी यांचा मराठी-इंग्रजी शब्दकोश इ. स. १८३१ मध्येच बॉम्बे एज्युकेशन सोसायटी (मुंबई शिक्षा मंडळी) च्या मार्फत प्रकाशित झाला. त्या वेळी या कोशातील शब्दांची संख्या चाळीस हजारापर्यंत होती. कोशाची दुसरी आवृत्ती १८५७ मध्ये जेव्हा प्रसिद्ध झाली तेव्हा तीमधील शब्दसंख्या साठ हजारांपर्यंत गेली. मराठी-इंग्रजी कोशाबरोबरच इंग्रजी-मराठी कोश करण्याची कल्पना मोल्सवर्थच्या मनात होती. त्याचा तो संकल्प त्याचा सहकारी कँडी याने १८४० ते १८४७ या काळात पुरा केला. त्याने जॉन्सनचा इंग्रजी कोश आधाराला घेऊन इंग्रजी शब्दांचे निरनिराळे अर्थ इंग्रजीमध्ये प्रथम देऊन त्या त्या अर्थास समानार्थक मराठी शब्द नंतर दिले. कँडीचा हा कोश ही मराठी कोशवाङ्मयाच्या अनुषंगाने झालेली स्वागतार्ह कामगिरी मानली जाते.

> **हंसकोश**
>
> इ. स. १८६३ साली रघुनाथ भास्कर गोडबोले यांनी 'हंसकोश' नावाचा एक एकभाषिक कोश तयार केला. हा बोलीचा किंवा व्यवहारातील भाषेचा कोश नव्हता, तर महाराष्ट्रभाषेतील कवितांमधील निवडक व कठीण शब्दांचा कोश होता. याची छपाई शिळाछापाची होती.

मराठी भाषेत स्वातंत्र्यपूर्व काळात १३४ तर स्वातंत्र्योत्तर काळात २५० पेक्षा अधिक शब्दकोश निर्माण झाले. यांची विभागणी एकभाषिक, द्विभाषिक आणि बहुभाषिक अशी करता येते. 'द्विभाषिक शब्दकोशा'त मराठी-इंग्रजी, मराठी-कन्नड, मराठी-गुजराती, मराठी-जर्मन, मराठी-तमीळ, मराठी-पोर्तुगीज, मराठी-सिंधी, मराठी-संस्कृत, मराठी-हिंदी, मराठी-हिंदुस्थानी अशी विविधता आढळते. 'द्विभाषिक शब्दकोशा'चा अन्य भाषा व मराठी असा उपप्रकार केला जातो. त्यात इंग्रजी-मराठी, उर्दू-मराठी, कन्नड-मराठी, गुजराती-मराठी, जपानी-मराठी, तमीळ-मराठी, तेलुगू-मराठी, फारशी-मराठी, बंगाली-मराठी, सिंधी-मराठी, संस्कृत-मराठी, हिंदी-मराठी, हिंदुस्थानी-मराठी असे तेरा प्रकार पाहावयास मिळतात. माधवराव पटवर्धन यांनी १९२५ मध्ये रचलेला 'फार्शी-मराठी कोश' सुप्रसिद्ध आहे. ऐतिहासिक कागदपत्रांचे वाचन करण्यासाठी उपयुक्त ठरावा अशी या कोशनिर्मितीमागील दृष्टी होती. या कोशात अरबी, फार्शी, तुर्की शब्दांचे अर्थ दिलेले आहेत. या कोशास उपोद्घात जोडलेला असून त्यात व्युत्पत्तिविचार, फार्शीतून मराठीत आलेले व्याकरणविशेष, शब्दसिद्धी इत्यादींविषयीचे विवेचन आढळते.

**भाषा पंडित किंवा सोळा भाषांचा कोश**

१९२७ साली द. गो. सडेकर यांनी 'भाषा पंडित किंवा सोळा भाषांचा कोश' हा बहुभाषिक कोश प्रकाशित केला. त्यात नंदभाषा, मिताक्षरी, करपल्लवी यांचाही अंतर्भाव झाला आहे. य. न. केळकरांचा 'ऐतिहासिक शब्दकोश' (१९६२) मराठीतील ऐतिहासिक गद्य-पद्य वाङ्मयाच्या आकलनासाठी अत्यंत उपयुक्त आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने शब्दकोशाच्या संदर्भात केलेले कार्य उल्लेखनीय आहे. गुजराती-मराठी (भाऊ धर्माधिकारी), उर्दू-मराठी (श्रीपाद जोशी, एन. एस. गोरेकर), कन्नड-मराठी (पुंडलिकजी कातगडे), तमीळ-मराठी (रमाबाई जोशी, पु. दि. जोशी), मराठी-कन्नड (गुरुनाथ दिवेकर), मराठी-सिंधी (लछमन हर्दवाणी), मराठी-गुजराती (भाऊ धर्माधिकारी), पाली-मराठी (बाबा भारती) यांसारखे कोश मंडळाने प्रकाशित केले आहेत.

**मराठी शब्दरत्नाकर**

वासुदेव गोविंद आपटे यांनी १९२२ मध्ये 'मराठी शब्दरत्नाकर' हा मराठी शब्दांचा मराठीत अर्थ देणारा कोश रचला. या कोशाच्या प्रस्तावनेत त्यांनी तत्पूर्वी झालेल्या अठरा शब्दकोशांची माहिती दिली आहे. १९३० मध्ये विद्याधर वामन भिडे यांनी मराठी भाषेचा 'सरस्वती कोश' तयार केला. मराठीतील सर्वांत अव्वल दर्जाचा कोश म्हणजे य. रा. दाते, चिं. ग. कर्वे, आबा चांदोरकर, चिं. शं. दातार या संपादकमंडळाने तयार केलेला मराठी भाषेचा सर्वसमावेशक कोश. याचे नाव 'महाराष्ट्र शब्दकोश'. याचा पहिला विभाग १९३२ मध्ये तर सातवा विभाग १९३८ मध्ये प्रसिद्ध झाला.

**मराठीतील एकंदर कोशांची संख्या आठशे ते साडेआठशे तर शब्दकोशांची संख्या ३९० च्या आसपास आहे.**

सात खंडांच्या या कोशात एक लाखाहून अधिक शब्दांचे तपशीलवार अर्थ विवेचनासह दिले आहेत. १९५० मध्ये या कोशाचा पुरवणी विभाग प्रसिद्ध झाला. प्र. न. जोशी यांचा 'आदर्श मराठी शब्दकोश' इ. स. १९७० मध्ये प्रकाशित झाला. आकाराने मोठ्या असणाऱ्या या कोशात 'आदर्श' या विशेषणास न शोभणाऱ्या काही त्रुटी आढळतात.

**अभिनव मराठी-मराठी शब्दकोश**


१९८३ ते १९८५ या कालात द. ह. अग्निहोत्री यांचा पंचखंडात्मक 'अभिनव मराठी-मराठी शब्दकोश' तयार झाला. २८५० पृष्ठांच्या या कोशाच्या पहिल्या भागात आदर्श मराठी शब्दकोशासंबंधीची भूमिका, मराठी शब्दांचे प्रमाणित उच्चार, मराठीच्या प्रमुख बोली व त्यांची उच्चारवैशिष्ट्ये इत्यादीसंबंधीचे निबंध आहेत. शं. गो. तुळपुळे व ॲन फेल्डहॉस यांनी रचलेला 'डिक्शनरी ऑफ ओल्ड मराठी' (१९९९) हा शब्दकोश आठव्या शतकापासून चौदाव्या शतकापर्यंतच्या मराठी शब्दांचा कोश आहे. या शब्दकोशात मराठी व इंग्लिश भाषांत शब्दार्थ दिले आहेत.

मो. वि. भाटवडेकरनिर्मित 'राजहंस व्यावहारिक मराठी शब्दार्थ कोश' (२००७) ही मराठीतील शब्दकोशसंभारात पडलेली महत्त्वाची भर म्हणता येईल. गेल्या शतकात मराठी भाषकांच्या जीवनसरणीत जे अनेक बदल झाले, दैनंदिन व्यवहाराची संपर्कभाषा म्हणून मराठीत ज्या नवनव्या शब्दांची निर्मिती झाली/भर पडली ती विचारात घेऊन हा कोश तयार केला आहे.

**ज्ञानकोश**

श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी सिद्ध केलेला 'ज्ञानकोश' ही मराठी कोशवाङ्मयातील अत्यंत महत्त्वाची, ऐतिहासिक स्वरूपाची कामगिरी म्हणता येईल. ज्ञानकोश याचा अर्थ सर्व विद्याशाखांतील माहितीचा पद्धतशीरपणाने केलेला संग्रह. सर्वसंग्राहकत्व हा याचा मुख्य विशेष. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' (१९२०-२९) हा श्री. व्यं. केतकर यांचा मराठीतील पहिला ज्ञानकोश. केतकरांच्या आधी रामाजी केशवराव सांबारे यांचा 'विद्याकल्पतरू' (१८७०) आणि जनार्दन हरी आठल्ये यांचा 'विद्यामाला' (१८७८) हे कोश रचण्याची सुरुवात झाली होती. हे दोन्ही कोश मासिकरूपात प्रकाशित होत होते. तथापि, हे कोश अपूर्णच राहिले. त्यामुळे आद्य ज्ञानकोशकार ठरण्याचा मान केतकरांकडे जातो. अमरावतीच्या नगर वाचनालयात 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका' पाहताना महाराष्ट्रीय ज्ञानकोश करण्याची कल्पना केतकरांना सुचली. कोशरचनेत कोणत्याही प्रकारची तडजोड न करता केतकरांनी अतिशय कष्टपूर्वक आदर्श असा ज्ञानकोश निर्माण केला. त्यामुळे कोशयुगाच्या प्रवर्तकाचा मान त्यांना दिला जातो. केतकरांचा ज्ञानकोश मुख्यत्वे अभ्यासक, संशोधक, व्यासंगी वाचक यांना विशेष उपयोगी ठरला. सर्वसामान्यांच्या आकलनकक्षेत येणारे विषय घेऊन सोप्या भाषेत ज्ञानकोश रचण्याची कल्पना त्यामुळेच पुढे आली आणि य. रा. दाते व चिं. ग. कर्वे यांनी सहा भागांत (१९४९ ते १९५१ या काळात) 'सुलभ विश्वकोशा'ची निर्मिती केली. गणेश रंगो भिडे यांनी १९३५ ते १९४० या कालावधीत 'व्यावहारिक ज्ञानकोशा'ची पंचखंडात्मक रचना केली. मराठीतील ज्ञानकोशांची संख्या आता शंभरच्या घरात गेली आहे. तीत मुलांचे ज्ञानकोश, सर्वसंग्राहक कोश, विषयज्ञानकोश अशी भरपूर विविधता आहे.

**भारतीय संस्कृतिकोश**




विश्वकोशाइतकीच मराठीतील महत्त्वाची कोशनिर्मिती म्हणून महादेवशास्त्री जोशी यांनी १९६२ ते १९७९ या काळात सिद्ध केलेला दहा खंडांचा 'भारतीय संस्कृतिकोश' अत्यंत उल्लेखनीय आहे. संस्कृतीचे विविध घटक लक्षात घेऊन केलेल्या सुमारे बारा हजार नोंदी या कोशात आहेत. या कोशाप्रमाणेच दोन हजार पृष्ठांचा, चार खंडांतील मुलांचा संस्कृतिकोशही महादेवशास्त्रींनी निर्माण केला. संस्कृतिकोशाखेरीज अन्य विषयांचे स्वतंत्र कोशही मराठीत अनेक आहेत. देवीदास दत्तात्रय वाडेकर यांचा त्रिखंडात्मक 'मराठी तत्त्वज्ञान महाकोश', ह. श्री. शेणोलीकर यांचा 'मराठी संत-तत्त्वज्ञान संज्ञा कोश' (१९९३-९४) या दोहोंमधून तत्त्वज्ञानसंबद्ध बहुविध तपशील सुस्पष्टपणे आला आहे. स. मा. गर्गे यांनी संपादित केलेल्या 'भारतीय समाजविज्ञान कोशा'च्या सहा खंडांत समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र हे तीन विषय व त्या विषयास पूरक अशा नोंदी आल्या आहेत. राजेंद्र व्होरा व सुहास पळशीकर यांनी निर्मिलेला 'राज्यशास्त्र कोश' राज्यशास्त्रातील संज्ञा-संकल्पनांचा, मतमतांतरांचा व राज्यशास्त्राच्या प्रगत अभ्यासाचा परिचय करून देतो. भारतातील राजकीय विचार, त्यामागील तत्त्वज्ञान व मूल्ये, शासनसंस्था, आंतरराष्ट्रीय संबंध यांचा उलगडा करण्याचाही प्रयत्न या कोशांतून झाला आहे. शंकर अभ्यंकर यांचा पंचखंडात्मक 'भक्तिकोश', अमरेंद्र गाडगीळरचित 'श्रीरामकोश', 'हनुमान कोश', 'गणेश कोश', 'रामायण स्थलदर्शन कोश', प्र. न. जोशी यांचे 'श्री दत्तात्रेय ज्ञानकोश' व 'श्री शिवदैवत कोश', शिरीष आत्माराम कवडेनिर्मित 'श्रीनृसिंहकोश', प्रल्हाद कृष्ण प्रभुदेसाई यांचा 'श्री देवी कोश' यांसारखे देवदेवताविषयक कोशही या संदर्भात सांगण्याजोगे आहेत.

**शैक्षणिक संदर्भकोश**

शं. भा. गोंधळेकर यांचा 'शैक्षणिक संदर्भकोश' (१९५९), ल. ब. हरोलीकर व पां. ब. पानसे यांचा 'शैक्षणिक संदर्भकोश' (१९७०), शं. कृ. सोहोनी यांचा 'शैक्षणिक टीपाकोश' (१९९२) हे शिक्षणशास्त्राच्या अनुषंगाने निर्माण झालेले कोश नमूद करावयास हवेत. दु. का. संत यांनी 'शोधविज्ञानकोश : साधन व संदर्भग्रंथ' (१९८५) याची रचना करून संशोधनाच्या विद्यार्थ्यांस संशोधनपद्धतीच्या मूलतत्त्वांचा







साहित्य आणि संस्कृती मंडळ संकल्पित 'मराठी शब्दकोशाची' ना. गो. कालेलकर, वि. रा. करंदीकर, य. शं. कानिटकर अशा प्रकारे हस्तांतरित होत आलेली व प्रदीर्घ काळ रेंगाळलेली योजना अखेरीस मंडळाचे विद्यमान अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक यांनी मार्गी लावली आहे. त्यांनी हे काम रामदास डांगे यांच्या सहकार्याने पुरे करत आणले आहे. रामदास डांगे यांनी 'मराठी शब्दकोशा'चे चार खंड (२००९-२०११) प्रसिद्ध केले आहेत आणि उर्वरित खंड प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

महाराष्ट्र शासनाने लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या नेतृत्वाखाली मराठी विश्वकोशाची निर्मिती सुरू केली. १९७६ मध्ये विश्वकोशाचा पहिला खंड प्रसिद्ध झाला. तद्नंतर शास्त्रीजींच्या संपादकत्वाखाली पंधरा खंडांची निर्मिती झाली. मे. पुं. रेगे यांनी सोळाव्या खंडाची निर्मिती केली. कालांतराने विश्वकोशाच्या संपादक झालेल्या विजया वाड यांनी विश्वकोशाचे सतरा, अठरा व एकोणीस असे तीन खंड प्रकाशित केले आणि विश्वकोशाच्या प्रकाशनाची गती वाढली. एकंदर वीस खंडांची योजना असणाऱ्या विश्वकोशाचे एकोणीस खंड आता तयार झाले आहेत. सुमारे वर्षभरात विसावा खंडही पूर्ण होऊन विश्वकोशाची मूळ योजना मार्गी लागेल. विश्वकोशाच्या अनुषंगानेच विश्वकोश निर्मिती मंडळाने 'कुमार विश्वकोशा'चीही योजना आखली होती. कुमार विश्वकोशाचा 'परिचय खंड' मे. पुं. रेगे यांनी तयार केला. कुमार कोशांतर्गत 'जीवसृष्टी आणि पर्यावरण' या विषयास वाहिलेल्या खंडाचा पहिला भाग इ. स. २०१२ मध्ये प्रसिद्ध झाला आहे. त्याच्या संपादकही विजया वाड आहेत. विश्वकोश केवळ ग्रंथरूपातच राहू नये, वर्तमानयुगाची गरज म्हणून तो महाजालकावरही जावा, यादृष्टीने वाड यांनी अत्यंत प्रयत्नपूर्वक विश्वकोशाचे सोळा खंड सर्व जगास उपलब्ध करून दिले आहेत. पाश्चात्त्य कोशांतील ज्ञान ज्याप्रमाणे जगाच्या कानाकोपऱ्यात उपलब्ध होऊ शकते तसाच हा उपक्रम आहे.




परिचय करून दिला आहे. द. बा. देशपांडे यांचा कायद्याचा कोश (१९८४) आणि वसंत शिंदे यांचा 'कायदाकोश' (१९९७) हे कोश वाचकांस कायद्याची ओळख करून देणारे आहेत. जयंत नारळीकर व श्रीराम गीत यांचा 'सृष्टिविज्ञानगाथा' (१९९४), ल. वा. गुर्जर यांचा 'गणित ज्ञानकोश' (१९९५), मोहन आपटेकृत 'शतक शोधांचे', मारुती चितमपल्ली यांचा 'पक्षीकोश', सुरेशचंद्र वारघडे यांचा 'भारतीय वन्य प्राणीकोश' इत्यादी कोशांमुळे मराठीतील कोशवाङ्मयाचे वैविध्य अधोरेखित होते. कोशनिर्मितीच्या बाबतीत क्रीडा व कला ही दोन्ही क्षेत्रेही उपेक्षित राहिलेली नाहीत. १९३६ ते १९४९ या कालावधीत दत्तात्रेय चिंतामण मुजुमदार यांनी दहा खंडात पाच हजार पृष्ठांचा क्रीडाकोश रचला. अलीकडील काळात सुरेशचंद्र नाडकर्णी यांनी 'क्रीडा ज्ञानकोशा'ची रचना (१९८१) केली. याची दुसरी सुधारित आवृत्ती १९९९ मध्ये प्रसिद्ध झाली. रवींद्र पाटकर यांनी १९९६ मध्ये 'क्रिकेटचा ज्ञानकोश' तयार केला. याचा अर्थ एकेका खेळास वाहिलेल्या कोशांची निर्मितीही आता होऊ लागली आहे.

**नाट्यकोश**

इ. स. २००० मध्ये वि. भा. देशपांडे यांनी मराठीतील नाट्यवाङ्मयाला वाहिलेला 'नाट्यकोश' प्रसिद्ध केला. आकाराने प्रचंड असलेल्या या कोशात मराठी नाटक, रंगभूमी, नट, दिग्दर्शक, नाटकमंडळ्या, वेगवेगळे रंगकर्मी, नाट्यप्रयोग इत्यादींविषयीची माहिती दिलेली आहे. कोशात राहून गेलेल्या अनेक चुकांची दुरुस्ती करून सुधारित स्वरूपात या कोशाची नवी आवृत्ती नजीकच्या भविष्यात सर्व नाट्यरसिकांच्या हाती पडणार आहे. वसंत माधव खाडिलकर यांचा 'श्री गंधर्व वेद - गायन नृत्यशास्त्राचा ज्ञानकोश' (१९८२), सत्यवान तेटाबे यांनी रचलेले 'सिनेनाट्य संदर्भकोश' (१९८८), रंगभूमी चित्रपटकोश (१९९४) असे तीनही कोश संबंधित क्षेत्रांविषयीचा तपशील पुरविणारे आहेत.

**भारतवर्षीय ऐतिहासिक कोश**

भारतीय भाषांत पहिल्यांदा चरित्रकोशनिर्मिती करण्याचा मान मराठी भाषेने मिळविला आहे. या दृष्टीने रघुनाथ भास्कर गोडबोले यांनी १८७६ मध्ये रचलेला 'भारतवर्षीय ऐतिहासिक कोश' महत्त्वाचा आहे. गं. दे. खानोलकररचित 'अर्वाचीन मराठी वाङ्मय सेवक' (भाग १ ते ७) आणि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांचा 'भारतवर्षीय प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन चरित्रकोश' खंड १, २ व ३ या कोशांचा येथे गौरवपूर्वक उल्लेख करावयास हवा. अलीकडील काळात श्रीराम पांडुरंग कामत यांनी 'विश्वचरित्रकोशा'ची सहा खंडांत रचना केली आहे. अन्य कोणत्याही भारतीय भाषांत अद्याप विश्वचरित्रकोश निर्माण झालेला नाही. या कोशात मानवी संस्कृतीच्या आरंभकाळापासून विसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंतच्या काळातील विविध देशांतील, विविध क्षेत्रांतील पायाभरणीचे कार्य करणाऱ्या जवळपास बारा हजार व्यक्तींच्या चरित्रांची नोंद केली आहे. प्र. न. जोशी यांनी प्राचीन काळापासून अंतराळयुगापर्यंतच्या सुमारे २००० प्रमुख शास्त्रज्ञांचा, तंत्रज्ञांचा, संशोधकांचा नेटका परिचय करून देणारा जागतिक शास्त्रज्ञकोश निर्माण केला आहे. बा. द. सातोस्कररचित 'गोमंतकीय मराठी साहित्याचे आधुनिक शिल्पकार' या कोशाचे दोन खंड माहितीपूर्ण आहेत. सुहास कुळकर्णी व मिलिंद चंपानेरकर यांचा 'यांनी घडविले सहस्रक' (२००९) आणि अनंत जोशी यांचा द्विखंडात्मक 'मराठी सारस्वत' हे कोशही मुद्दाम निर्देश करण्याजोगे आहेत. विवेक साप्ताहिकाच्या वतीने 'आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण : शिल्पकार चरित्रकोश' नामक बारा खंडांची योजना आखली गेली असून त्यांपैकी इतिहास, साहित्य, विज्ञान-तंत्रज्ञान- शिक्षण, न्यायपालिका-प्रशासन-संरक्षण, कृषी-सहकार असे पाच खंड प्रकाशित झाले आहेत.

**सुविचार कोश**

सुविचार कोशांची निर्मिती ही मराठीतील कोशवाङ्मयाचे वैशिष्ट्य ठरावे अशा स्वरूपाची आहे. व. वि. कुलकर्णी यांनी 'पाच हजार आदर्श सुविचार कोश' (२०००) याची रचना केली आहे. या अनुषंगाने १९२९ मध्ये दामोदर सावळाराम यंदे यांनी रचलेला 'सार्थ सुभाषित संग्रह', ल. गो. विंझे यांचा 'संस्कृत मराठी सुभाषित कोश', भाऊ धर्माधिकारी यांचा 'मराठी भाषेची संस्कृत लेणी', शरद गोगटे यांचा 'वेचक विचार' हा लोकोत्तर व्यक्तींच्या

अ. पां. देशपांडे व बाळ फोंडके यांनी तयार केलेला 'विज्ञान आणि तंत्रज्ञान कोश' साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केला आहे.

अवतरणांचा कोश, शशिकला गोरे आणि वासंती भोपटकर यांचा 'काव्य-अवतरण कोश' अशा पूर्वरचित कोशांचीही नोंद करावयास हवी. ह. अ. भावे यांनी इंग्लिश व मराठी अशा प्रत्येकी पाचशे सुविचारांचा एक भाग याप्रमाणे तीस भागांत 'अ बन्च ऑफ गुड थॉट्स' रचला आहे. इ. स. २०११ मध्ये रा. शं. नगरकर यांनी ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास या पाच संतांच्या साहित्यातील वचने निवडून 'संत सुभाषित कोश' तयार केला आहे. या कोशात मराठी वाङ्मयाला व संस्कृतीला समृद्ध करणारी पाच हजार संतवचने संकलित केली आहेत.

### शब्दरत्नावली

समानार्थी, विरुद्धार्थी व पर्याय (थिसॉरस) शब्दकोशांत स्वातंत्र्यपूर्व काळात झालेला 'शब्दरत्नावली' (हेल्प टू स्टुडंट्स अ‍ॅण्ड ऑथर्स) हा पद्मनजीबाबांचा शब्दकोश विशेष उल्लेखनीय आहे. शिळाछापात छापलेल्या या शब्दकोशाचे एकत्रित स्वरूपात दोन भाग आहेत. पहिल्या भागात मूळ शब्द ३५८ व त्यांचे अर्थ किंवा विस्तारप्रदर्शक शब्द ४८५३ आहेत. दुसऱ्या भागात मूळ शब्द २६५ व त्यांचे उपशब्द व भाषणसंप्रदायिक शब्द ६५८२ आहेत. रॉजेच्या थिसॉरसच्या पद्धतीची या कोशाची मांडणी आहे. उदा. 'भांडी' या शब्दाखाली ६८-६९ भांड्यांची नावे दिली आहेत. विसाव्या शतकाच्या अखेरीस मो. वि. भाटवडेकर यांचा 'मराठी पर्यायी शब्दांचा कोश' आणि वि. शं. ठकार यांचा 'अभिनव मराठी-मराठी इंग्रजी शब्दकोश : समर्पक शब्दांचा कोश' हे दोन कोश विशेष महत्त्वपूर्ण आहेत. सत्त्वशीला सामंत यांनी २००७ मध्ये 'शब्दानंद' या कोशाची निर्मिती केली आहे. मूळ सत्तावीस हजार इंग्लिश शब्द आणि त्यांचे मराठी व हिंदी या भाषांतील प्रत्येकी तीस हजारांवर प्रतिशब्द, असा हा कोश भाषांतरकारांना उपयुक्त ठरणारा आहे.

### मराठी लेखन-कोश

शुद्धलेखन हे मिशन मानणाऱ्या अरुण फडके यांनी रचलेला 'मराठी लेखन-कोश' (२००१) विशेष उल्लेखनीय म्हणावा असा आहे. या कोशाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या असून प्रत्येक आवृत्तीत आवश्यक ठरलेले काही बदल फडके यांनी केले आहेत. याच पद्धतीचा 'मराठी शब्दलेखनकोश' (२००७) यास्मिन शेख यांनीही रचला आहे.

'फुईक वही' (१८४२) हा शिळाछापात छापलेला मराठी म्हणींचा पहिला कोश. इ. स. १८५८ मध्ये सदाशिव विश्वनाथ यांनी 'देशांतील निवडक म्हणी' (चार हजारांवर) या कोशाची निर्मिती केली. या कोशात इंग्रजी वर्णानुक्रमाने म्हणी दिल्या आहेत. विद्याधर वामन भिडे यांनी रचलेला 'मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी इत्यादी' (१९१०) हा कोश एकेकाळी अतिशय लोकप्रिय होता. वा. गो. आपटेरचित 'मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी' (१९१०), य. रा. दाते व चिं. ग. कर्वे यांचा दोन विभागातील 'महाराष्ट्र वाक्संप्रदायकोश' (१९४२-४७) हे कोशही सुप्रसिद्ध आहेत.

मराठीत ग्रंथ व ग्रंथकारांना वाहिलेले कोशही अनेक निर्माण झाले आहेत. त्र्यंबक नारायण आत्रे लिखित 'गावगाडा-' ''महाराष्ट्रातल्या गावठाण्याची तपशीलवार माहिती, विश्लेषण, ग्रामसमाजरचना व सामाजिक तत्त्वे'' विशद करणारा कोश रा. वि. मराठे यांनी परिश्रमपूर्वक सिद्ध केला आहे.

### श्रीज्ञानेश्वरी शब्दार्थ कोश

शिवाजी नरहर भावे यांनी तयार केलेला 'श्रीज्ञानेश्वरी शब्दार्थ' कोश सुप्रसिद्ध आहे. त्यांनीच 'श्रीज्ञानेश्वरी पदकोश'ही रचला आहे. 'ज्ञानेश्वरीचे शब्दभांडार' हा रामचंद्र नारायण वेलिंगकर यांचा कोश वेगवेगळ्या परिशिष्टांनी युक्त आहे. मु. श्री. कानडे यांचा 'श्रीमत ग्रंथराज दासबोध शब्दार्थ संदर्भकोश' आणि मु. श्री. कानडे व रा. शं. नगरकर यांनी मिळून तयार केलेला 'श्री तुकारामगाथा शब्दार्थ संदर्भकोश' हे शब्दकोश संबंधित अभ्यासासाठी उपयुक्त ठरले आहेत. वि. ना. गोठोस्कर यांनी 'पवित्रशास्त्र शब्दकोशा'ची रचना केली आहे. द. वा. जोग यांच्या 'वेदांत परिभाषा लघुकोशा'त उपनिषदातील पारिभाषिक शब्दांचा समावेश आहे.

### झाडीबोली मराठी शब्दकोश


मराठीत बोलीभाषांचे काही कोश रचले गेले आहेत. एस. बी. पटवर्धन आणि एम. बी. पटवर्धन यांनी मिळून अनुक्रमे गोंडी आणि माडिया भाषेचा शब्दकोश १९८१ मध्ये तयार केला आहे. हरिश्चंद्र बोरकर यांचा 'झाडीबोली मराठी शब्दकोश' झाडीबोलीची व्याप्ती सिद्ध करणारा आहे. 'वैदर्भी बोलीचा शब्दकोश' देवीदास सोटे यांनी १९७४ मध्ये प्रसिद्ध केला आहे. यात नागपुरी व वैदर्भी या दोन्ही बोलींचा संमिश्र शब्दसंग्रह व म्हणी आल्या आहेत. रमेश सूर्यवंशी यांनी 'अहिराणी भाषेतील म्हणी व वाक्प्रचारांचा कोश' १९९७ मध्ये प्रसिद्ध केला आहे. द. ता. भोसले यांनी 'ग्रामीण बोलीचा शब्दकोश' २००३ मध्ये तयार केला आहे. राज्य मराठी विकास संस्थेसाठी गंगाधर पानतावणे व त्यांचे सहकारी यांनी दलित साहित्यातील शब्दांच्या कोशाचा पहिला खंड २०१२ मध्ये प्रकाशित केला आहे.

### अभ्यासकांसाठी उपकारक

मराठीतील वाङ्मयकोशांचे दालन जसे बहुविध स्वरूपाचे आहे तसेच ते मराठी साहित्याच्या अभ्यासकांस अतिशय उपकारक ठरले आहे. नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाने १९७४ मध्ये मुख्य संपादक अ. ना.

**जीवनव्यवहारात भाषेचा समजूतदारपणे उपयोग केला जावा यासाठी पारिभाषिक शब्दकोशांची निर्मिती अतिशय उपयुक्त ठरते. विशेषतः महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर व मराठीत सर्व कारभार सुरू झाल्यानंतर पारिभाषिक शब्दकोश ही एक अपरिहार्य गरज होऊन बसली. महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या भाषासंचालनालयाने संबंधित**




**विषयांतील विद्वानांचे साहाय्य घेऊन अर्थशास्त्र, धातुशास्त्र, यंत्रअभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, औषधशास्त्र, कृषिशास्त्र, गणितशास्त्र, ग्रंथालयशास्त्र, जीवशास्त्र, तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल, लोकप्रशासन, वाणिज्यशास्त्र, न्यायवैद्यक व विषशास्त्र, व्यवसाय व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र, साहित्यसमीक्षा, संख्याशास्त्र इत्यादी विषयांना वाहिलेले पारिभाषिक संज्ञाकोश निर्माण केले. या कोशांतील अनेक संज्ञा आता व्यवहारात प्रचलित झाल्या आहेत.**

देशपांडे व अन्य संपादक वि. बा. प्रभुदेसाई, म. शं. वाबगावकर, द. भि. कुळकर्णी व म. रा. जोशी अशा संपादक मंडळाने मराठी भाषा व वाङ्मय यांच्या आरंभापासून १८५० पर्यंतच्या वाङ्मयास वाहिलेला पहिला वाङ्मयकोश तयार केला. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने चार खंडांची, मराठी वाङ्मयकोशाची एक योजना आखली होती. या योजनेअंतर्गत गं. दे. खानोलकर संपादित मराठी वाङ्मयकोशाचा पहिला खंड इ. स. १०५० ते १८५७ या काळातील मराठी ग्रंथकारांचा व्यवस्थितपणे परिचय करून देतो. अन्य संपादकांनी संपादिलेल्या दुसऱ्या व तिसऱ्या खंडांत मात्र खानोलकरांच्या संशोधनाच्या व लेखनाच्या शिस्तीचा अभाव आढळतो. वाङ्मयकोशाचा चौथा खंड 'समीक्षा संज्ञा खंड' आहे. याच्या समन्वयक विजया राजाध्यक्ष असून त्यात मराठी समीक्षाव्यवहाराशी संबंधित महत्त्वाच्या संज्ञांचा नेटका परिचय करून देण्यात आला आहे. जी. आर. भटकळ फाउंडेशन, मुंबई या संस्थेने सदानंद भटकळ यांच्या प्रेरणेने 'संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश' नामक दोन खंड प्रसिद्ध केले. आरंभापासून १९२० पर्यंतच्या वाङ्मयाशी संबंधित पहिला खंड आणि १९२० ते २००३ या कालखंडातील साहित्यिक व साहित्य यांच्याशी संबंधित दुसरा खंड. प्रभा गणोरकर, उषा टाकळकर, वसंत आबाजी डहाके, जया दडकर, सदानंद भटकळ आदी या खंडांचे संपादक आहेत. याच मालिकेतील तिसरा खंड 'वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश' आहे. साहित्यव्यवहारातील सर्व महत्त्वाचे साहित्यसिद्धांत आणि समीक्षाव्यवहारातील निवडक संज्ञा आणि संकल्पना या खंडात सुस्पष्ट केल्या आहेत. या तिन्ही खंडांना वसंत आबाजी डहाके यांनी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिल्या आहेत. या प्रस्तावनांमुळे मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास आणि मराठी संस्कृतीची वेगवेगळी अंगोपांगे सुसूत्रपणे वाचकांच्या ध्यानात येतात. तसेच कोशातील नोंदींना विस्तृत अशी पृष्ठभूमी व परिप्रेक्ष्य यांचा लाभ घडतो.

### संकल्पना कोश

मराठी कोशपरंपरेतील आणखी एक महत्त्वाचे कार्य सुरेश पांडुरंग वाघे यांच्या 'संकल्पना कोशा'मुळे पार पडले आहे. मराठीत हा कोश अनन्य स्वरूपाचा आहे. या कोशात मानवी विचारव्यापारातील विविध संकल्पना संग्रहित केल्या असून त्या संकल्पनेशी संबंधित




समानार्थी शब्द प्रथम देऊन तिच्याशी संबंधित नावे, विशेषणे, क्रियाविशेषणे व क्रियापदे दिली आहेत. या पंचखंडात्मक संकल्पनाकोशाचे मानवी जीवनव्यवहाराशी संबंधित असे धर्म, काल, विश्व, प्राणी व वनस्पती, मानवी शरीर, कुटुंबसंस्था, नागरिक जीवन, गुणावगुण, मन व स्वभाव आणि ललित कला असे दहा विभाग आहेत.

'संख्या-संकेत कोश' अशी वैशिष्ट्यपूर्ण कोशनिर्मितीदेखील मराठी भाषेत झालेली आहे. अशा कोशांत संख्येने सुरू होणाऱ्या शब्दांचे विवरण केलेले असते. उदा. नवरस, दशावतार इत्यादी. रखमाजी देवजी मुळे यांनी १८६७ मध्ये 'हिंदुशास्त्रातील संख्यावाचक दुर्बोध शब्दांचा कोश' रचला. त्यानंतर त्यात विविध संकेत व्यक्त करणाऱ्या शब्दांची भर घालून श्री. शा. हणमंते यांनी १९५८ मध्ये 'संकेत कोश' तयार केला. संख्यावाचक शब्दांपुरती मर्यादा न ठेवता रूढ व्यवहार, समाज, धर्म, संप्रदाय शास्त्र यांतीलही रूढ संकेत येथे दिले आहेत. तसेच चार परिशिष्टांमधून कटभयादी संकेत, नंदभाषा संकेत, कविसंकेत व विविध संकेत दिले आहेत. रघुनाथ लक्ष्मण उपासनी या नागपूरच्या गृहस्थांनी 'मराठी लाक्षणिक शब्दकोश' नावाच्या कोशाची रचना केली आहे.

### दिनविशेष कोश

सामाजिक, राजकीय, वाङ्मयीन, सांस्कृतिक अशा क्षेत्रांतील घडामोडींची तिथीनुसार किंवा दिनांकानुसार घडलेल्या उल्लेखनीय घटनांची नोंद करणारे तिथी-कोशही मराठीत आहेत. या कोशांत कोशकारास महत्त्वाच्या वाटणाऱ्या विविध क्षेत्रांतील घटनांचा निर्देश आढळतो. प्र. न. जोशी यांनी तयार केलेला 'दिनविशेष (भारतीय इतिहासाचे तिथीवार दर्शन') हा कोश १९५० मध्ये प्रकाशित झाला असून या कोशाला श्री. म. माटे यांची प्रस्तावना आहे. पुढील काळात या कोशाच्या सुधारित आवृत्त्या नियत राहिल्या. परशुराम हरी बर्वे आणि कमलाकर महादेव परचुरे यांनी रचलेला 'जगाचा इतिहास (वैश्विक घडामोडींचा ज्ञानकोश') इ. स. पूर्व ५००० ते इ. स. २००१ पर्यंतच्या घटनांची नोंद करणारा आहे. मानवी संस्कृतीच्या सुरुवातीपासून या विश्वात घडून आलेल्या चमत्कृतिजन्य नैसर्गिक व मानवनिर्मित घटनांचा मागोवा घेणारा कोश शे. रा. कुलकर्णी यांनी 'विश्वज्ञान-बोध' या नावाने तयार केला आहे. 'महाराष्ट्राच्या कालमुद्रा' (मधुकर विष्णू सोवनी), 'पुणे शहराचा ज्ञानकोश' खंड २ दिनविशेष (शां. ग. महाजन) या कोशात अनुक्रमे महाराष्ट्र व पुणे शहर यातील घटनांची नोंद केलेली आढळते. म. श्री. दीक्षित यांनी 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र : एक दृष्टिक्षेप' (इ. स. १८०१ ते १९०१ या शतकातील विविध घटनांची सनवार नोंद) या स्वरूपाची एक नोंदपुस्तिका तयार केली आहे.

### प्राचीन भारतीय स्थलकोश

महाराष्ट्राविषयी ऐतिहासिक, भौगोलिक व सांस्कृतिक माहिती देणारा व महाराष्ट्राच्या प्रगतीची भावी दिशा सुचविणारा 'महाराष्ट्र परिचय अर्थात संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोश' चिं. ग. कर्वे, स. आ. जोगळेकर व य. गो. जोशी यांनी निर्माण केला आहे. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी संशोधनपूर्वक 'प्राचीन भारतीय स्थलकोश' तयार केला असून यात वैदिक साहित्य, कौटिलीय अर्थशास्त्र, पाणिनीय व्याकरण, वाल्मिकी

रामायण, महाभारत, पुराणे, मध्ययुगीन संस्कृत साहित्य आणि शब्दकोश तसेच ग्रीक पर्शियन, बौद्ध, जैन, चिनी साहित्य आणि शिलालेख यांविषयीचे तपशील दिले आहेत. निर्दिष्ट भौगोलिक स्थळांची साधार माहिती देणारा हा कोश प्राचीन भारतीय भूगोलाचा ज्ञानकोश म्हणावा असा आहे.




'वार्षिक' हे वर्षभरातील घडामोडींची माहिती देणारे साधन आहे. ते ज्या वर्षाची निर्मिती असेल त्याच्या अगोदरच्या वर्षातील घडामोडींची माहिती त्यात असते. स्थूलमानाने तीन प्रकारची वार्षिके असतात. एक, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय किंवा राज्य पातळवरील भौगोलिक क्षेत्रागणिक माहिती देणारे; दोन, एखाद्या विषयास वाहिलेले वार्षिक ज्यात संबंधित विषयात पडलेली ज्ञानाची भर, प्रकाशित ग्रंथ, प्रसिद्ध झालेले लेख, विषयसंबद्ध परिषदा, चर्चासत्रे, अधिवेशने इत्यादींचे वृत्तांत; तीन, ज्ञानकोश प्रकाशित झाल्यानंतर त्यातील ज्ञानात वर्षभरात पडलेली भर नोंदविणारी पुरवणी. महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र' या नावाचे वार्षिक १९७१ मध्ये सुरू केले. शासनाच्या सर्व योजनांची, विभागीय कार्याची, वर्षातील अधिकृत माहिती मिळण्याचे हे एक महत्त्वाचे साधन होते. याचा शेवटचा खंड १९७४-७५ या वर्षी निघाला. संतोष दास्ताने यांनी सुरू केलेले 'महाराष्ट्र' ('वार्षिक') १९८९ पासून निघते आहे. याशिवाय त्यांनीच १८९५ मध्ये 'भारत - एक पहाणी' हे वार्षिक १९९५ मध्ये सुरू केले. गजानन क्षीरसागर यांनी सुरू केलेले 'प्रकाशन वार्षिक' काही वर्षे निघाले. या वार्षिकात प्रकाशनव्यवसाय, वर्षभरातील प्रकाशित ग्रंथ, मराठी लेखकांची पत्त्यांसह दिलेली यादी यांसारखा उपयुक्त तपशील आढळतो. अलीकडे मोहन वसंत वैद्य, 'प्रकाशनविश्व' या वार्षिकाद्वारे हेच कार्य करीत असतात.

### सूची-वाङ्मय

ज्ञानकोश, शब्दकोश, कोशसदृश ग्रंथनिर्मिती यांच्याइतकाच कोशवाङ्मयाचा महत्त्वाचा घटक म्हणजे 'सूची-वाङ्मय'. ग्रंथसूची, ग्रंथकार सूची, नियतकालिक सूची यांसारखे सूचीवाङ्मयाचे वेगवेगळे प्रकार सांगता येतील. कोणत्याही संशोधकाला, अभ्यासकाला त्याच्या अभ्यासविषयात त्याच्या आधी कोणकोणत्या प्रकारची कामे झाली आहेत ते जाणून घेण्यासाठी ग्रंथसूची हे पायाभूत संदर्भसाधन ठरते. मराठीत जवळपास दोनशे ग्रंथसूची आहेत. या सूचींत ग्रंथकार सूची, नियतकालिकांच्या व नियतकालिकातील लेखांच्या सूची, हस्तलिखितांच्या सूची, विषयसूची, संदर्भसाधनांच्या सूची, ऐतिहासिक साधनांच्या सूची, मराठी नियतकालिकांच्या सूची, मराठी नियतकालिकांच्या लेखसूची, प्रबंध-सार-सूची अशा विविध प्रकारच्या सूचींचा अंतर्भाव होतो.

### मराठी ग्रंथसूची

शं. ग. दाते यांनी केलेली मराठी ग्रंथसूची (१८००-१९३७ आणि १९३८-१९५०) ही ग्रंथसूची सर्वांत मोलाची सूची आहे. मराठी साहित्याच्या संशोधकास सदैव साहाय्यकारी ठरणारी या सूचीइतकी मूलभूत सूची दुसरी नाही. प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ॲक्टनुसार नोंदणीला सुरुवात होण्याअगोदर जे ग्रंथ प्रकाशित झाले त्यांचा शोध घेऊन त्यांची सूची करण्याचे कार्य अ. का. प्रियोळकर, सुरेंद्र गावसकर, गंगाधर मोरजे यांनी केले. या ग्रंथांना दोलामुद्रिते असे म्हणतात. सूचीकार दाते यांच्या स्मरणार्थ मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने पुणे येथे दाते सूची मंडळाची स्थापना केली. या मंडळाच्या वतीने मराठी नियतकालिकांच्या सूचीचे वेगवेगळे खंड प्रसिद्ध केले आहेत. १८३२ पासून १९८० पर्यंतच्या नियतकालिकांतील लेखांचे विषयवार सूचींचे खंड सिद्ध झाले आहेत. या कामाचा आरंभ शं. ग. दाते, दि. वि. काळेप्रभृतींनी केला. ते कार्य पूर्णतेस नेण्यास शं. ना. बर्वे, के. ह. बोरगावकर, व. भि. बेलसरे यांनी केलेले परिश्रम कारणीभूत ठरले आहेत. शरद केशव साठे यांनी राज्य मराठी विकास संस्थेसाठी १९५१ ते १९६२ या कालातील ग्रंथसूचीचा उपक्रम केला आहे.

ग्रंथकार सूचीच्या संदर्भात सु. रा. चुनेकर यांनी केलेल्या 'डॉ. माधवराव पटवर्धन वाङ्मयसूची', 'अ. का. प्रियोळकर यांच्या वाङ्मयाची सूची', 'बाळकृष्ण अनंत भिडे यांच्या कवितांची सूची' आणि 'बाळकृष्ण अनंत भिडे यांच्या वाङ्मयाची सूची' या सूची नमुनेदार आहेत. रवींद्र घवी यांनी केलेली 'गोमंतकीय ग्रंथकारांच्या मराठी ग्रंथांची सूची' गोव्यातील सहाशेपेक्षा अधिक ग्रंथकारांच्या साहित्यनिर्मितीची नोंद करणारी आहे. एस. एस. नाडकर्णी यांनी केलेली 'बालकवी - संदर्भसूची', बालकवींच्या समग्र अभ्यासाचा मागोवा घेणारी आहे. मंदा खांडगे आणि इतर यांनी सिद्ध केलेल्या 'स्त्रीसाहित्याचा मागोवा' (१८५० ते २०००) या ग्रंथाचा तिसरा खंड मराठीतील स्त्रीलेखकांच्या साहित्यनिर्मितीची सूची देणारा आहे. सुधा जोशी यांनी केलेली 'गंगाधर गाडगीळ वाङ्मय सूची', जया दडकर यांनी केलेली 'वि. स. खांडेकर वाङ्मय सूची', उमा दादेगावकर यांनी केलेली 'आनंद साधले साहित्यसूची', सुषमा पौडवाल यांच्या 'गो. वि. करंदीकर सूची' व 'त्र्यंबक शंकर शेजवलकर सूची', सुधा भट यांची 'राम गणेश गडकरी वाङ्मयसूची' अशा कितीतरी ग्रंथकारसूचींचा उल्लेख येथे करता येईल. १९२१ मध्ये ग. रं. दंडवते यांनी 'मराठी स्त्रीलेखकांची सूची' (इ. स. १८७२ ते १९२१) नामक सूची बडोद्याहून प्रसिद्ध केली आहे. विषयसूचीच्या अनुषंगाने मु. श्री. कानडे यांनी केलेली 'प्रयोगक्षम मराठी नाटके' ही वर्णनात्मक सूची, त्यांनीच सिद्ध केलेला 'संत साहित्य संदर्भ कोश', श्री. र. भिडे यांनी केलेली 'एकांकिका सूची', रा. वि. सोवनी यांनी केलेली 'मराठी विज्ञान वाङ्मयसूची' (१९५१ - १९९९) यांचा विशेषत्वाने उल्लेख करावयास हवा.

### नियतकालिकांच्या लेखसूची

मराठी नियतकालिकांच्या स्वतंत्र लेखसूचीही आता बऱ्याच प्रमाणावर सिद्ध झाल्या आहेत. यांत मृणालिनी कामतकृत 'अभिरुची-सूची', मीरा घांडगेकृत 'अनुष्टुभ सूची' व 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका सूची', केशव जोशीकृत 'युगवाणी सूची' व 'सत्यकथा सूची', अ. का. प्रियोळकर यांनी सिद्ध केलेली 'मराठी संशोधनपत्रिकेची बारा वर्षे' (कालखंड : १९५३ - १९६५), ही सूची, पुष्पा भावे यांनी केलेली 'विविधज्ञानविस्तार सूची' अशा सर्व सूचींचे महत्त्व निर्विवाद आहे. वेगवेगळ्या विद्यापीठांतून मराठी विषयांतर्गत पी. एच. डी. साठी स्वीकृत झालेल्या सर्व प्रबंधांची नोंद करणारी वसंत विष्णू कुलकर्णी यांनी सिद्ध केलेली 'मराठी प्रबंध सूची' मराठीतील पीएच. डी. पदवीसाठी झालेल्या संशोधनविषयांची कल्पना देणारी आहे. याचप्रमाणे श्री. रं. कुलकर्णी, व. दा. कुलकर्णी आणि द. पं. जोशी यांनी 'हैदराबादची मराठी हस्तलिखिते' ही

वर्णनात्मक सूची, वसंत स. जोशी यांनी केलेली मद्रासची मराठी हस्तलिखिते व त्रिवेंद्रमची मराठी हस्तलिखिते या मराठी हस्तलिखितांच्या वर्णनात्मक सूची, वि. बा. प्रभुदेसाई यांनी केलेली 'मराठी संशोधन मंडळातील सूक्ष्मपटांची सूची', टी. आर. भीमराम यांनी तयार केलेली तंजावरमहाराज सरफोजी यांच्या सरस्वतीमहाल ग्रंथालयातील 'मराठी हस्तलिखितांची वर्णनात्मक सूची' (पाचवा खंड) या सर्व सूचीदेखील संशोधकांस साहाय्यभूत ठरणाऱ्या आहेत.

**सूचींची सूची**

सु. रा. चुनेकर यांनी सिद्ध केलेली 'सूचींची सूची' ही मराठीतील अभिनव सूची म्हणता येईल. या सूचीत आजवर झालेल्या वेगवेगळ्या सूचींची एकत्रित नोंद पाहावयास मिळते. ही सूची १९९५ मध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतर ज्या सूची अस्तित्वात आल्या त्या सर्व सूचींची नोंदही चुनेकर यांनी करून ठेवली आहे. ही भर मूळ सूचीत घालून अद्ययावत स्वरूपात 'सूचींची सूची' प्रकाशित झाली तर ती मराठी वाङ्मयाभ्यासकांना अत्यंत उपयोगाची ठरेल.

मराठीतील कोशकार्याबद्दल समाधान वाटावे अशी कोशनिर्मितिक्षेत्राची प्रगती आहे हे निःसंशय. याचा अर्थ झालेल्या कोशकार्यात त्रुटी नाहीत असे नाही. तथापि झालेले काम मराठी भाषेच्या व वाङ्मयाच्या दृष्टीने निश्चितपणे महत्त्वाचे आहे. कोणत्याही भाषेला प्राप्त होणारी समृद्धी जशी तीत उत्पन्न होणाऱ्या बहुविध साहित्यामुळे होत असते, तशीच तीत निर्माण होणाऱ्या कोशसंपदेतून होत असते. कोशरचनेचे नवनवे संकल्प आजही केले जात आहेत. ते सिद्धीस गेले म्हणजे मराठीतील कोशकार्याची व्याप्ती आणखी वाढेल. कोशकार्याचा आजवरचा इतिहास असे सांगतो की, बहुतांश कोशकार्य हे व्यक्तिगत प्रयत्नांनीच घडले आहे. अर्थलाभाची अपेक्षा दूरच, कोशकार्यविषयक प्रेमामुळे आर्थिक झळ सोसून कोशकारांनी निरपेक्षपणे कोश सिद्ध केले आहेत. प्रसंगविशेषी संबंधितांच्या हितचिंतकांचा किंवा काही बाबतीत शासनाचा मदतीचा हात पुढे झाला असेलही, तथापि. कोशनिर्मितीची उत्कट आकांक्षाच मराठी भाषेतील कोशवाङ्मयाच्या समृद्धीस मूलतः कारण ठरली आहे.

(टीप : जिज्ञासूंनी कोशविषयक अधिक तपशिलासाठी वसंत विष्णू कुलकर्णी यांनी तयार केलेली 'मराठी कोश व संदर्भसाधने यांची समग्र सूची इ. स. १८००-२००३' (प्रकाशक : राज्य मराठी विकास संस्था, मुंबई) अवश्य पाहावी.)

संपर्क : ९९२२४०४६९४

❑ ❑

# संक्रमणातील मराठी भाषा

**(पान ४३ वरून)** मराठी शब्दांची जागा घेत आहेत. आपल्याला इंग्रजी येत नाही म्हणजे आपल्याला न्यून आहे, अशीच सर्व मराठी माणसांची मानसिकता आहे, ती इंग्रजीचं प्रचलन वाढवायला बळकटी देते आहे. समाजाच्या सर्वच स्तरांवर इंग्रजीचा उदो उदो आहे. 'इंग्रजी येत नाही' असं म्हणणाराला मागास समजण्याचा काळ आहे. मराठी माणसांची मनं इंग्रजीनं भारलेली आहेत. मराठी माणसाच्याच मनात मराठीला गौण आणि इंग्रजीला प्रतिष्ठेचं स्थान आहे. अशात पैसे खर्च करून केलेले मराठीच्या विकासाचे प्रयत्न आपोआपच प्रायोगिक आणि कृत्रिम ठरत आहेत. समाजाच्या मानसिकतेचा त्या प्रयोगांना कसलाही आधार नाही. त्यामुळं येत्या काही वर्षांत-पन्नासशंभर वर्षांत- हे मराठी टिकवण्याचे प्रयोग हरणार आहेत आणि त्यांच्यावर खर्च होत असलेला सध्याचा पैसा वाया जाणार आहे. तो काळ दूर नाही, जेव्हा मराठी भाषा, सर्वत्र फक्त इंग्रजी वापरणाऱ्या लोकांसाठी संग्रहालयाच्या भिंतींआड जतन करून ठेवली जाईल आणि अशा निरस विषयात काय पाहायचं म्हणून, त्या संग्रहालयाकडं कुणीही फिरकणार नाही. (बहुतेक भारतीय भाषांचं असंच होईल.)

हे खरंच आहे की, जी भाषा माणसाच्या पोटाची व्यवस्था करू शकत नाही, ती मरतेच. जोवर मराठी भाषेत मराठी माणसांची पोटं भरण्याची धमक आहे, तोवर ती टिकेल. जोवर मराठी आणि इंग्रजीच्या खिचडी भाषेत पोट भरण्याची धमक राहील, तोवरही ती अवशेष रूपानं टिकेल. त्यानंतरचा काळ मात्र केवळ इंग्रजीचा असेल. आज महाराष्ट्रात केवळ मराठीच्याच जिवावर जगणारी - वागणारी माणसं फक्त बोटावर मोजण्याइतकीच असतील. ती फक्त आणि शुद्ध मराठी जोपासणारी शेवटची पिढी. पुढचा काळ इंग्रजी-मराठीच्या मिश्रणाचा असेल आणि तो काळ पुढच्या पिढ्यांना केवळ आणि शुद्ध इंग्रजीकडं घेऊन जाईल.




आणि हेही खरंच की, कोणतीही एक भाषा कोणत्याही दुसऱ्या भाषेवर आक्रमण करत नाही, तर संपत जाणाऱ्या भाषेतलेच गद्दार आणि फितूर लोक त्या भाषेचा हळूहळू जीव घेत राहतात. एखाद्या भाषेत गद्दार आणि फितुरांची संख्या का वाढते, तर त्यांच्या पापी पोटांचा सवाल असतो बाबा!

जय मराठी!

संपर्क : ९४२२००५०६५

❑ ❑

# ज्ञानेश्वरी शब्दार्थकोश

प्राचार्य रामदास डांगे

‘व्यक्तिमत्त्व ज्ञानेशांचे। अलौकिक असे साचे।’ याचा प्रत्यय येतो तो त्यांच्या वाङ्मयकृतींतून 'ज्ञानेश्वरी' तर त्यांची वाङ्मयी मूर्तीच म्हणावी लागेल. ‘तिच्या आधारावर (ज्ञानेश्वरांची) थोरवी चिरंतन रूपातच पुढील पिढ्यांच्याही समोर उभी राहणार आहे,’ असा विश्वास विश्वनाथ खैरे यांनी ‘ज्ञानेश्वरांचे चमत्कार’मध्ये व्यक्त केला आहे. ‘महाराष्ट्र सारस्वत’कार भावे यांनी ‘ज्ञानेश्वरी’ ग्रंथाच्या संदर्भात ‘हे केवढे आश्चर्य!’ असेच उद्‌गार काढले आहेत. ‘ज्ञानेश्वरी’च्या संदर्भात, अभ्यासकांच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाची बाब आहे, ती म्हणजे ज्ञानेश्वरीची आणि ज्ञानेश्वरीच्या शब्दकोशांची हस्तलिखिते. मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या इतर ग्रंथांच्या हस्तलिखितांच्या संख्येपेक्षा ज्ञानेश्वरीची आणि तत्संबंधी शब्दकोशांची संख्या खूपच अधिक आहे. ‘श्रीज्ञानदेवी : चिकित्सित शुद्धपाठ आवृत्ती’ संपादित करीत असताना आम्हाला हा अनुभव आला आहे. प्रस्तुत संपादन करीत असताना आम्हाला ज्ञानेश्वरीच्या अनेक हस्तलिखित आणि प्रकाशित शब्दार्थकोशांचे साह्य झाले आहे.

‘पाठनिश्चितीच्या संदर्भात अर्थतत्त्वाला विशेष स्थान नाही,’ हे म. वा. धोंड यांचे मत अंशतः खरे आहे. कारण व. दि. कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे ‘पाठभेदाची चिकित्सा व त्याची निश्चिती करणे हीही एका परीने मूलतः अर्थनिश्चितीचीच क्रिया होय.’ (मराठी साहित्य : विमर्श आणि विमर्शक); कृ. पां. कुलकर्णी यांनीही ‘विवेकसिंधू’च्या प्रस्तावनेत **‘In selecting the readings attention has never seen allowed to devite from their phonetic and semantic aspects,’** असे स्पष्ट केले आहे. ‘भाषाशास्त्रात अर्थमीमांसेला स्थान असावे,’ असे फ्रेंच अर्थवैज्ञानिक ब्रेआल यांचे मत आहे. गोपाळाश्रमस्वामींनी भाषाशास्त्रीयदृष्ट्या ज्ञानेश्वरीची पाठनिश्चिती केली, हा खुपेरकर शास्त्री यांचा अभिप्राय ‘पदार्थाद्वैत’(पद आणि अर्थ यांचे अद्वैत) न समजल्यामुळे म्हणजे न मानल्यामुळे कसा चुकीचा ठरतो हे लक्षात येते.

‘माझा मऱ्हाठाचि बोलु कवतिकें। परि अमृतातें पैजा जिंके। शब्दाची व्याप्ति तेणें पाडें। अनुभवावी।।४.२१५।।’ असे म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांनी ‘जैसें बिंब जरि बाचके एवढें। परि काइप त्रैलोक्य थोकडें’। अशी शब्दाच्या अर्थाची महती गाइली आहे. आपल्या शब्दांच्या संदर्भात ते ‘तो शांतुनि अभिनवैल। ते परिसां मऱ्हाटे बोल। जे समुद्राहीहनि खोल। अर्थभरिता।।’ अशी ग्वाही देतात.



‘प्रतिशुद्ध ज्ञानेश्वरी’ सिद्ध करताना अभ्यासिलेल्या शब्दकोशांच्या आधारे आम्ही ज्ञानेश्वरीचा एक सर्वांगीण सर्वसमावेशक कोश तयार करीत आहोत. शब्दकोश हा उघडउघड उदात्त चोरीचा मुक्तहस्त मामला असतो. इतरांना ‘वाटावी’ अशी ही चोरी! ज्ञानेश्वरीच्या शब्दकोशाची अनेक हस्तलिखिते तंजावर, धुळे, पुणे, मुंबई, औरंगाबाद इ. ठिकाणी असलेल्या संस्थांत उपलब्ध आहेत. काही हस्तलिखिते ही व्यक्तिगत संग्रहात आहेत. यातील दोन-तीन हस्तलिखिते मुद्रित रूपात प्रकाशित झालेली आहेत.

१. पुणे येथील भा. इ. सं. मंडळातील प्रसिद्ध संशोधक ग. ह. खरे यांनी मंडळाच्या ‘संशोधन पत्रिके’तून ‘शब्दमालिका - ज्ञानेश्वरी अथवा भाषारत्नमालिका’ प्रसिद्ध केली. प्रास्ताविकात प्रस्तुत हस्तलिखिताचे काही विशेष सांगून तद्‌नुषंगिक महत्त्वाच्या गोष्टींचा ऊहापोह केला आहे. ‘पांचवेउली’ किंवा ‘सातवेउली’ या शब्दाचा अर्थ बहुतेक कोशांत ‘पांच किंवा सात नांग्यांची’ असा केलेला आहे. प्रस्तुतच्या शब्दमालिकेत ‘वेउली’ म्हणजे ‘कांडी’ असा ‘वास्तवाला अधिक जवळचा अर्थ’ केला आहे. अरबीमध्ये सवार = घोडेस्वार आणि ‘अस्वार’ हे त्या शब्दाचे बहुवचन. ‘तेव्हा हा शब्द सध्या तरी अरबी धरावा’ असे त्यांना वाटते.

२. श्रीनिरंजन रघुनाथ यांचा ‘ज्ञानेश्वरी : दृष्टान्त-परिभाषा-टीका’ हा ग्रंथ शक्तिपातयोगा साधक के. रा. जोशी यांनी संपादित केला आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या शेवटी निरंजन रघुनाथस्वामी यांनी परिश्रमपूर्वक तयार केलेली

'ज्ञानेश्वरी : दृष्टान्त-परिभाषा-टीका शब्दार्थसूची'ही जोडली आहे. प्रस्तुत शब्दार्थसूची वरवर चाळून पाहिली असता, ती संपूर्ण ज्ञानेश्वरीची शब्दार्थसूची आहे, असे निदर्शनास येते. 'धर्मधेनु' म्हणजे 'हारालि'; 'पुस लाउनि' म्हणजे 'सेपुट कापून' हे योग्य अर्थ आम्हास या शब्दार्थसूचीमध्ये आढळले.

३. जगन्नाथ बाळकृष्ण उगाउकर यांनी लिहिलेल्या 'ज्ञानेश्वरी टिपणा'चे शास्त्रपूत संपादन केले आहे मु. श्री. कानडे आणि सु. बा. कुळकर्णी या प्राध्यापकद्वयीने. बावन्न पृष्ठांची प्रस्तावना व शब्दसूचीसह मूळ ग्रंथ संपादनाचा हा आदर्श वस्तुपाठच म्हणावा लागेल. बहुतेक कोश ज्ञानेश्वरीच्या एका प्रतीवरून तयार केलेले आहेत किंवा असतात. प्रस्तुत 'ज्ञानेश्वरी टिपण' ज्ञानेश्वरीच्या कोणत्या प्रतीवरून तयार केले, याचाही (मर्यादित का होईना) शोध घेण्याचा प्रयत्न संपादकांनी केला आहे. हा शोध मुख्यत: अध्यायवार ओवीसंख्येच्या आधारे केला असल्यामुळे आणि ओवीसंख्येच्या बाबतीत एकवाक्यता नसल्यामुळे, संपादकांना निश्चित निष्कर्षाप्रत पोहोचता आले नाही. पृ. ५१ वरील तळटीपांत काही पाठभेद दिले आहेत. टीप क्र. दोन आणि तीन यामध्ये 'आरी' या ऐवजी सरकारी प्रतीत व दांडेकर प्रतीत 'अरसिकात' आणि 'जाणे-नेणे'ऐवजी सरकारी प्रतीत 'जाणणे' व दांडेकर प्रतीत 'जेसे कां करणें' असे पाठ आहेत. या पाठभेदांवरून प्रस्तुत कोश राजवाडे किंवा दांडेकर यांना मिळालेल्या हस्तलिखित प्रतीवर आधारलेला नाही, असा 'नेति नेति' निष्कर्ष काढता येईल. टीप क्र. १ मध्ये 'उत्कृष्ट ५. १७८'ऐवजी सरकारी आणि दांडेकर प्रतींत 'उक्त' असा पाठ आहे, यावरून काही शोध घेता येतो का हे तपासत असता 'उत्कृष्ट' हा पाठ कृष्णा गुरवांच्या 'पैलतीर' वार्षिकात पाहावयास मिळाला. 'ज्ञानेश्वरीचे आधुनिक कोशकार व जगन्नाथ बाळकृष्ण' या उपशीर्षकाखाली काही निवडक शब्दांच्या अर्थांची तौलनिक नोंद केली आहे. त्यात 'वेलवरिया' या शब्दाचा अर्थ इतर संपादकांनी 'वेलीच्या जाळ्या' असा केला असून जगन्नाथ बाळकृष्ण यांनी 'जर्जर' असा अर्थ केला आहे, असा स्पष्ट भेद दिसून येतो. विशेष म्हणजे या शब्दाचा 'छिन्नभिन्न' असा अर्थ निरंजन रघुनाथ यांनीही केला आहे. 'धर्मधेनु'च्या बाबतीतही या दोघांची अशीच एकवाक्यता आहे आणि ग. ह. खरे यांनी प्रकाशित केलेल्या 'शब्दमालिकेत'ही 'हरळी' असा अर्थ आहे. असे असले तरी अलीकडच्या मराठीच्या कोशकारांनी मात्र या अर्थाची नोंद घेतली नाही!' - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेल्या 'मराठी शब्दकोशा'त याची नोंद केली आहे.

> **'ज्ञानेश्वरीच्या अभ्यासासाठी अपरिहार्य एक प्रमुख लेखी साधन प्राप्त व्हावे,' या भूमिकेतून सिद्ध केलेला शिवाजीराव भावे यांचा 'श्री ज्ञानेश्वरी शब्दार्थकोश' हा सर्वार्थाने आदर्श वस्तुपाठ ठरावा असाच आहे. कोश हे एक नवे सर्जन असते, याचा साक्षात्कार घडावा असा हा कोश. प्रज्ञा, प्रतिभा आणि प्रसाद हे तीनही एकवटलेल्या शिवाजीराव भावे यांच्या पराक्रमास मराठी कोशगणनेत 'अनामिका सार्थवती बभूव' असे म्हणणे वास्तवाला धरून होईल. याच कोशात 'व्युत्पत्ती' चा समावेश आहे. 'इं' सारखा एकाक्षरी शब्द ज्ञानेश्वरीत दोन प्रकारांनी उपस्थित आहे; कारण एक 'इं' हा 'इदम'पासून आणि दुसरा 'इं' हा 'अपि' पासून! पहिला सर्वनाम, तर दुसरा 'अव्यय'. 'ज्ञानेश्वरीत 'जें' हा शब्दही सर्वनाम आणि अव्यय या दोन प्रकारांत मोडतो, हे मात्र अनवधानाने त्यांनी नोंदले नाही. 'जें' पदाचा वापर ज्ञानेश्वरीत कार्यकारणभाव दर्शविण्यासाठी माउलींनी अनेक ओव्यांतून केला आहे.'**
>
> **- स्वामी सत्यदेवानंदसरस्वती,**
> **श्री ज्ञानेश्वरी प्रस्तावना.**




एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ज्ञानेश्वरीच्या कोशरचनेचे झालेले प्रयत्नही महत्त्वाचे आहेत. त्यात गोंधळेकर, गणपत कृष्णाजी (देवस्थळी), माडगावकर यांच्या ग्रंथांचा समावेश करावा लागेल. याही ग्रंथांचा उपयोग अलीकडच्या कोशकारांनी केलेला दिसून येत नाही. 'ज्ञानेश्वरी परिभाषा पुणे येथे रावजी श्रीधर गोंधळेकर यांनी तारिख २८ सप्टेंबर स. १८९० आवृत्ति २ री.' प्रकाशित केली. ओ. १६.३२९ धर्म धेनू-हरळीमध्यें अशी सप्तम्यन्त नोंद प्रस्तुत कोशात आढळते. माडगावकर स्वत: कोश तयार करू शकले नाहीत. त्यांनी काढलेल्या टाचणांवरून परहस्ते हा कोश त्यांनी करवून घेतला, अशी स्पष्ट कबुली प्रस्तावनेत दिली आहे. तरीही रा. ग. हर्षे यांनी आपल्या 'ज्ञानेश्वरी पहिला अध्याया'च्या प्रस्तावनेत वाङ्मयचौर्याचा अप्रत्यक्ष आरोप केला आहे.

१९५० नंतर प्रकाशित झालेल्या शिवाजीराव भावे आणि वेलिंगकर यांच्या कोशांसंबंधी विवेचन करण्यापूर्वी अर्थनिष्पत्तीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या दोन ग्रंथांविषयी संक्षेपाने माहिती घेऊ या. 'शब्दमालिका : ज्ञानेश्वरी'वरील लेखात ग. ह. खरे यांनी 'ज्ञानेश्वरीत कानडी शब्द आले आहेत याविषयी मतभेद नाही,' हे स्पष्ट केले. ज्ञानेश्वरीतील कानडी शब्दांवर काही विद्वान अभ्यासकांचे लेखही प्रसिद्ध झाले आहेत; परंतु ज्ञानेश्वरीच्या आधारे 'ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेवर कन्नडचा प्रभाव' हा रं. शा. लोकापुर यांचा ग्रंथ शब्दांच्या अर्थनिर्धारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानावा लागेल. 'काळुगा', 'देशी' इ. अनेक शब्दांच्या संदर्भात त्यांनी केलेली चर्चा उद्‌बोधक आहे. असाच एक प्रयत्न आ. रा. नाडकर्णी यांनी 'ज्ञानेश्वरीतील शब्दांचा कोंकणी बोलीत शोध' घेऊन केला आहे. कोकणी भाषिक लेखकाच्या मराठी लेखनातील 'दैत्य अनुभवी अमरावती' हे उदाहरण देऊन 'अनुभवणे' म्हणजे उपभोग घेणे असा अर्थाचा नवा आयाम ते दाखवून देतात. कोकणीमध्ये 'टाळी' म्हणजे झाडाची फांदी. त्यामुळे 'टाळिये कावळा सापडे' या चरणाचा निश्चित अर्थबोध होतो. 'हाताच्या टाळीत' असाही अर्थ काही संपादकांनी केला आहे.

ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा आशय स्पष्ट करण्याच्या दृष्टीने अर्थविवरणात्मक दिलेल्या टिपा कोशसंपादनासाठी खूप महत्त्वाच्या असतात. त्यादृष्टीने ग. कृ. आगाशे आणि

धनेश्वर यांनी केलेली संपादने मार्गदर्शक ठरतील अशीच आहेत. त्यांतही धनेश्वरांचे संपादन 'नाथ संप्रदायी' असल्यामुळे शब्दांच्या अर्थाच्या दृष्टीने वेगळी भर पडते. सांप्रदायिक परिभाषेव्यतिरिक्त असलेल्या काही शब्दांचे त्यांनी केलेले अर्थ अधिक भावतात, हे मान्य केलेच पाहिजे. 'गंगावती' या शब्दाचा सर्व कोशांत असलेल्या 'निर्गुडी' या अर्थापेक्षा, गंगावती म्हणजे 'गंगथडीची भाषा' हा अर्थ अधिक चपखल आहे, हे अभ्यासान्तीच लक्षात येईल. पाठभेदचर्चेच्या माध्यमातून, स्वामी सत्यदेवानंद सरस्वती यांनी केलेली अर्थचर्चाही (उदा. खलु) शब्दकोशाच्या संदर्भात उपयुक्त ठरणारी आहे. आम्हीही 'म्हैंसा' म्हणजे 'गुग्गुळ' असा नवा अर्थ 'मूलपाठदीपिका श्रीज्ञानदेवी'मध्ये 'आरे मराठी'च्या साहाय्याने दिला आहे.

भावे-वेलिंगकरांच्या आधी मु. ग. पानसे यांच्या **'Linuistic peculiaraties'**चा विचार करावा लागेल; परंतु हा कोश विप्र हस्तलिखितावर आधारलेला आणि इंग्रजी भाषेत आहे. ज्ञानेश्वरीचा इंग्रजी भाषेत अनुवाद करण्यासाठी मात्र या कोशाची उपयुक्तता वादातीत आहे. या आणि अशा कोशांच्या साहाय्याने ॲड. सुधाकर लालसरे यांच्या ज्ञानेश्वरीचा अप्रकाशित इंग्रजी अवतार आम्ही शब्दकोशासाठी अभ्यासत आहोत.

अनवधानाने काय होऊ शकते, याचे उत्तम उदाहरण आहे, ते 'ज्ञानेश्वरीचे शब्दभांडार' ग्रंथाच्या पुरस्कारात. अनवधानाने काही नोंदी पाहावयाच्या राहून गेल्यामुळे, भावे यांच्या कोशासंबंधी 'ज्ञानेश्वरीचा स्वतंत्र असा कोश तयार करण्याची पहिली कल्पना रा. शिवाजीराव भावे यांची आहे.' असं लिहून प्रियोळकर म्हणतात, 'आरंभीच्या 'दोन शब्दांत' त्यांचे बंधू आचार्य विनोबा भावे 'ज्ञानेश्वरीतील यच्चयावत, शब्दांचे अर्थ देणारा हा कोश' असे त्याचे जे वर्णन करतात, ते यथार्थ म्हणवत नाही. काही सोपे शब्द त्यांनी वगळलेले दिसतात. उदा. तो-ती-ते.' प्रस्तावनेत स्पष्ट केलेली लिंगरहित विशेषण पद्धती स्वीकारली असल्यामुळे 'तो-ती-तें'ची नोंद 'ते' या शब्दाने केली आहे.

यादवकालीन मराठी भाषेच्या अभ्यासकांना या कोशाचा आधार घेतल्याशिवाय पुढे जाता येणार नाही, असा हा गुणवैशिष्ट्यसंपन्न कोश. असे असले तरी, या कोशासाठी भावे यांनी राजवाडे प्रत आधारास घेतली आणि राजवाडे प्रतीत नसलेल्या आणि इतर प्रतींत असलेल्या १४३ ओव्या फक्त दुसऱ्या परिशिष्टात दिल्या आहेत, ही मर्यादाही लक्षात घेतली पाहिजे.

'श्री ज्ञानेश्वरी शब्दार्थ कोशा'नंतर रा. ना. वेलिंगकरांनी 'ज्ञानेश्वरीचें शब्दभांडार' अभ्यासकांसाठी खुले केले. 'पुरस्कार' (प्रियोळकर), 'अभिप्राय' (दांडेकर) आणि 'माझे मनोगत' (फाटक) या अर्थाने 'मराठीच्या कोशभांडारात बहुमोल भर' अशा शब्दांत दिलेल्या प्रशस्तिपत्रास 'सार्थ' असेच विशेषण लावावे लागेल. इतर कोशांत नसलेले ज्ञानेश्वरीतील ओव्यांच्या चरणांचे संदर्भ ही या कोशाची फार मोठी जमेची बाजू म्हणावी लागेल. १२६ पृष्ठांत ठासून भरलेली ११ परिशिष्टे ही एक अभ्यासकांसाठी उत्तम साधनसामग्री आहे. ज्ञानेश्वरीचा काही विशिष्ट संदर्भात अभ्यास करण्यासाठी ही परिशिष्टे फार उपयोगी पडणारी आहेत.



प्रस्तुत कोशातील वर्णानुक्रमाकडे दृष्टी टाकली असता, 'क्ष' आणि 'ज्ञ' अनुक्रमे 'क' आणि 'ज' या वर्णानंतर, पण स्वतंत्र अशा स्वरूपात आले आहेत. भावे यांनीही अशीच मांडणी केली आहे; परंतु 'क्ष' आणि 'ज्ञ' ही जोडाक्षरे धरून परिणामी वेलिंगकरांच्या कोशात 'ज्वाला' शब्द 'ज्ञ' च्या आधी येतो आणि भावे यांच्या कोशात 'ज्ञ' नंतर येतो. निरंजन रघुनाथांच्या कोशातही 'क्ष', 'ज्ञ' स्वतंत्र वर्ण अनुक्रमे 'क' आणि 'ज' नंतर येतले आहेत.

या आणि अशा इतर कोशांचा (उदा. प्राचीन मराठी शब्दकोश, तुळपुळे-फेल्डहाउस) अभ्यास करून आम्ही सर्वसमावेशक असा एक ज्ञानेश्वरीचा कोश संपादित आहोत. 'सर्वसमावेशक' म्हणण्याचे कारण सर्व कोशांचा समावेश, हे तर अभिप्रेत आहेच; शिवाय ज्ञानेश्वरीच्या विविध प्रतींतील पाठभेदांचाही त्यात समावेश आहे. आतापर्यंतचे सर्वच कोश एकेका प्रतीवर आधारित आहेत. भावे-वेलिंगकरांचे कोश राजवाडे प्रतीवर, पानसे यांचा कोश विप्र यांच्या हस्तलिखित प्रतीवर आधारलेले आहेत. इतर कोशही नाथोत्तर प्रतींवर आधारलेले. पा. नां. कुळकर्णी यांनी त्यांनी संपादिलेल्या शके १४९० मधील नाथपूर्व सिद्धनाथी प्रतीतील कठीण शब्दांचा कोश किंवा धनेश्वरांचा नाथपूर्व प्रतीतील शब्दांचा महानुभावीय टीपग्रंथ पद्धतीचा कोश हेही याच प्रकारात मोडतात. एका प्रतीत असलेला पाठ दुसऱ्या प्रतीत नसेल, तर तो शब्द दुसऱ्या प्रतीच्या शब्दकोशात नसणार हे उघड आहे. अर्थाच्या बाबतीतही भिन्नतेचा विचार करणे आवश्यक असते. 'ज्ञानेश्वरी परिभाषा' ह्या कोशात '१६.३२९ धर्मधेनू हरळीमध्यें' असा अर्थ दिला आहे. 'ज्ञानेश्वरीचें शब्दभांडार' या ग्रंथाच्या पुरस्कारात या कोशाचा अ. का. प्रियोळकरांनी उल्लेखही केला आहे.

तरीही वेलिंगकरांनी 'धर्मधेनुं(नु) धर्मार्थ सोडलेली गाय १६.३२७' असा भिन्न अर्थ दिला आहे. विभक्तीनुसार अर्थ हा वेलिंगकरांच्या कोशाचा विशेष लक्षात येता 'धर्मधेनुं'मधील अनुस्वार दुर्लक्षित करून त्या शब्दांचा 'प्रथमा' अर्थ केला आहे. (शिवाजीराव भावे यांच्या कोशात आणि सर्वच संपादकांनी अनुवादात हाच अर्थ आल्यामुळे असे घडले असावे.)

ज्ञानेश्वरीच्या अभ्यासासाठी अपरिहार्य एक प्रमुख लेखी साधन, असे कोशाचे वर्णन शिवाजीराव भावे यांनी केले आहे. हे साधन प्रकाशित झाले असले, तरी आज सहज उपलब्ध होत नाही. उपलब्ध झालेच तर कोणत्या तरी एका विशिष्ट प्रतीचेच असते. अर्थाच्या बाबतीतही थोडी फार गोंधळाची अवस्था आहेच. 'सुंद' शब्द तंजावरी कोशातून, 'म्हैसा' शब्द आरे मराठी कोशातून, तर 'गंगावती' शब्द धनेश्वरांच्या टीप ग्रंथातून घेतल्यास त्या शब्दांवर नवा प्रकाश पडतो. 'मूलपाठदीपिका श्री ज्ञानदेवी'त आम्ही हे सर्व केले आहे. या प्रतिशुद्ध ज्ञानेश्वरीची सार्थ उकल व्हावी, यासाठी अभिनव शब्दार्थकोशच हवा. पूर्वसुरींच्या बळकट खांद्यावर बसल्यामुळे आम्हास थोडे दूरचे अधिक दिसले म्हणून आम्ही काही अधिक शहाणे ठरत नाही, याची आम्हास खात्रीपूर्वक जाणीव आहे. इत्यलम्।

चलभाष : ९८५०७५०६२४

# ‘मारवा’ अनुभवताना

**हेमंत टकले**

कुसुमाग्रजांचे मारवा हाती येतले आणि एका नव्या दिशेने चालू लागलो. कुसुमाग्रजांचा मारवा आस्वादताना मी ह्या महाकवीच्या काव्यातील कुणी जवळचे नातेवाईक आहेत का हे शोधण्याचा वेगळा छंद जडला. सहजच पहिलं नाव समोर आलं ते रवींद्रनाथ टागोरांचं. पुन्हा एकदा रवींद्रनाथांच्या मृत्यूविषयीच्या कवितांची उजळणी केली. वैश्विक विचारांची मांडणी करणारे रवींद्रनाथ आणि कुसुमाग्रज मला आता एकत्रित दिसू लागले. पल्याड दिसू लागल्यावर ज्या कृतार्थतेने मावळतीचा निरोप हे महाकवी घेतात तेव्हा मृत्यूतही नव्या जीवनाचा साक्षात्कार समोर येतो. रवींद्रनाथांच्या ‘एबार तोरा आमार जबार बेलाते’ ह्या कवितेत रवींद्रसंगीत असे अवतरले...

*माझ्या मित्रांनो मला शुभेच्छा द्या*
*या वियोगाच्या क्षणी*
*आभाळावर पहाटेची लाली पसरली आहे.*
*आणि माझा मार्ग सुंदर दिसतो आहे..*
*सफर माझी झाली पूर्ण की उगवेल सायंतारा*
*संधिप्रकाशाच्या तराण्यांचे*
*छेडले जातील व्याकूळ सूर*
*राजाच्या प्रवेशद्वारा पाशी।।*

हे तराणे रवींद्रनाथांचे, कुसुमाग्रजांचे, संत तुकारामांचे, संत कबीरांचे. ही परंपरा निरंतन आहे. पुन्हा रवींद्रनाथांच्या ओव्यांप्रमाणे...

*गेले पाहिजे मला आता, बंधुंनो अमुचा रामराम घ्यावा*
*करीन मी सर्व वंदन आता रजा येईन*
*आता दिस बुडाला, अंधार झाला*
*दिवा विझुनी गेला माझ्या कोपऱ्यातला*
*आला आहे सांगावा सिद्ध मी प्रयाणा।।*

आपल्या आयुष्याच्या मारव्याच्या पठारावर पोहचण्यापर्यंतच्या प्रवासात कुसुमाग्रज अनेक मुक्कामांवर थांबले होते. त्यांच्या मध्यान्हीच्या अविष्कारात रग धगधगती होती म्हणूनच त्यासमयी ‘साथ सोबत हवीय कोणाला माझंच आभाळ माझीच धरती, असाच एकटा चालत राहीन वादळ घेऊन खांद्यावरती’ असा स्फुर्तीयुक्त अविर्भाव प्रकट होतो. पण जगण्याचे सूत्र शोधताना नवी जाणीवही शब्दरूप घेऊन येते. त्यामुळे मानवी जीवन म्हणजे काय तेही कळतं. जगणं म्हणजे जागवीत जाण अमोल माती, सूर्यचंद्राचे असणे महान असले तरी माझ्या हाती एकच मशाल आहे. ती मशाल प्रकाश फुलवील मार्गावरती. इथे कवी थांबत नाही तर पुढे म्हणतो, हा प्रकाश राहील जगण्यावरती आणि मरण्यावरतीसुद्धा.

विशाखा ते मारवा ह्या कुसुमाग्रजांच्या प्रदीर्घ काव्य प्रवासाची सौंदर्यस्थळे शोधताना, त्यातला निसर्ग अनुभवताना त्यातल्या प्रखर सामाजिक जाणिवांना स्पर्श होताना, एक सुरेल संगीताची मैफल गुंजी घालत असते. शास्त्रीय संगीतातील राग मालिकेच्या मांडणीसारखी ही शब्दरचना कधी कंठस्वरासारखी तर कधी वाद्यसंगीतातल्या हरकतींसारखी नवनवीन रूपे घेऊन येते. कुसुमाग्रज समूहात वावरत असताना स्वतःमध्येच रमलेले असायचे. पण तशा अवस्थेत असताना ते अलिप्त असायचे. एक अनासक्त कर्मयोगी मानवी स्वभावांचे, निसर्गातील चमत्कारांचे, समाजातील विसंगतीचे निरीक्षण करीत शब्दरूपाने गुंफण करून आपल्यासमोर मांडतो आहे. ह्या काव्यातून शास्त्रीय संगीतातले असंख्य राग मग आपल्या मनात ताल धरू लागतात. म्हणूनच अखेरच्या काव्यसंग्रहाचे ‘मारवा’ असे नामकरण कुसुमाग्रजांनी केले असेल. मारवाची ओळखच तिन्हीसांजेच्या घटिकेची आहे. सूर्य मावळतीवर आहे. रात्रीच्या अंधाराचे राज्य आरंभ करीत आहे. ह्याला कातरवेळ म्हणतात. ह्या कातरवेळी मारव्याचे तरंग लहरींसारखे आसमंत व्यापून टाकतात. कुसुमाग्रज ‘सिद्धता हो सांग, मृतिकेच पांग, तोडीले मी’ ह्या निःसंग अवस्थेत आहेत आणि मग शब्दरूपी संगीत मारव्यातून साकार होत जाते.

आपल्या आयुष्याच्या अखेरच्या पर्वात कुसुमाग्रजांचा मारवा हा कवितासंग्रह आला. विसाव्या शतकाच्या अखेरीस कुसुमाग्रज अनंतात विलीन झाले. एकविसाव्या शतकाची सुरुवात आपण पाहणार नाही असे त्यांच्या बोलण्यातून वारंवार व्यक्त होत असे. एखादी शास्त्रीय संगीताची मैफल शेवटावर यावी, आपल्या अनोख्या कवितांमधून असंख्य स्वप्नांमधून एका भावविश्वाची निर्मिती मोहवून टाकल्यावर, आता तुमच्या बरोबरीचा सहवास पूर्णविरामाकडे निघालेला आहे. पण जाता जाता जे साठले होते ते भरभरून दिल्यावर निरोपाचे म्हणून काही सांगणे होते, ते मारवातून आपल्या भेटीला आले आहे.

*जाता जाता गाईन मी, गाता गाता जाईन मी /गेल्यावरही या गगनातील गीतांमधुनी राहिन मी.*

हा सूर सतत आपली सोबत करीत राहतो. शब्दांचे स्वर होतात, सुरांचे संगीत होते आणि नकळत ही भावमुद्रा सावलीसारखी साथ देते.

आयुष्याच्या ह्या पठारावरून मागे पाहत असताना कवीने साठविलेले, जपलेले अनेक आविष्कार एका अलौकिकाच्या मखरात पुन्हा



**‘मराठी साहित्यातील देदीप्यमान रत्न’ अशी ख्याती असणारे कवी, नाटककार, कथाकार व समीक्षक म्हणजे वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज. आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे आणि मराठी साहित्याच्या कक्षा रुंदावणारे लेखन त्यांनी केले. त्यांचे साहित्य म्हणजे मराठी वाङ्मयातील उच्च कोटीचे वैभव आहे. मराठी साहित्याला दुसरे ज्ञानपीठ त्यांनी मिळवून दिले. त्यांच्या या योगदानाबद्दल कृतज्ञता म्हणून २७ फेब्रुवारी हा त्यांचा जन्मदिवस ‘मराठी भाषा दिन’ म्हणून साजरा केला जातो. साहित्याच्या विविध प्रांतात स्वैर मुशाफिरी करूनही त्यांचा मूळ पिंड हा कवीचाच राहिला. म्हणूनच त्यांना अभिवादन करताना त्यांच्या ‘मारवा’ या गाजलेल्या काव्यसंग्रहाचे भावगर्भ रसग्रहण देत आहोत.**

नजरेसमोर येतात. आपल्या मित्रांकडून तारा भेट मिळाल्यानंतर ते म्हणतात...

*देवघरातील फूल उचलुनी / कुणास द्यावे कुणी / तशी नभातील ज्योत आणली / तू माझ्या अंगणी/*

*आणि पुढे कुसुमाग्रज म्हणतात...*

*वाचायला बघावयाला/ नसेल कुणी जरी / कातकृपेने सदैव वसतील / कुसुमाग्रज अंबरी*

एकीकडे नभांगणात अचल स्थान मिळेल असा विश्वासही आहे. पण त्यात सुद्धा देवघरातील वाहिलेल्या फुलासारखे ते अस्तित्व असेल ही भावनाही आहे. कवी हा सुंदरतेचा पाठीराखा असतो आणि कुसुमाग्रज जेव्हा निसर्गाच्या सौंदर्याच्या असंख्य प्रतिमा मांडतात. त्यावेळी मारवा एका नव्या प्रदेशात प्रवेश करतो. ते म्हणतात...

*उषा सुंदर होतीच पण अधिक सुंदर आहे ही संध्या / मावळतीवर उतरलेला हा सूर्य / दिवसभराच्या प्रकाश दानाने कृतार्थ / झालेला अधिक प्रकाशमय अधिक स्नेहशीलही.*

*आणि मी, माझे अस्तित्व प्रकाशात प्रवेश करताना पूर्ण निराशय असलेले / आता अंधारात विश्रांत होताना सर्वंकष आशयाने शिगोशिग भरलेले / असण्याचे उन्नयन जगण्यात करणारी ही संध्या.*

उषा आणि संध्या ह्या दोन रुपकातून मांडणी करताना ह्या कवितेत आलेला विश्रांत हा शब्द अस्वस्थ करणारा आहे. विश्रांती हा शब्द तसा आपल्या परिचयाचाच पण विश्रांत ऐकल्यावर वातावरणात गंभीर सूर आपोआपच घुमू लागतो.

आपल्या ह्या भूतलावर असण्याबद्दल कवी सहजतेने म्हणतो...

*निसर्गातून असणे आले निसर्गातच सरणे आहे / रित्या पात्रात चैतन्याच्या ठिणग्या तोवर भरणे आहे.*

संतांच्या रचनेशी नाते सांगणारे हे शब्द आहेत. रिता आलो रिताच जाईन पण असेन तेव्हा चैतन्याच्या ठिणग्या भरत राहीन. इथे चैतन्य सुद्धा आकारते ते म्हणजे ठिणगी म्हणजे जाळाच्या स्वरुपात. अखेरीला अस्तित्वाची राखच होणे अपरिहार्य असताना अग्नीचा सन्मान ह्यापेक्षा अधिक मोठा काय असू शकेल?


कुसुमाग्रजांचा प्रवास अखंड चाललेला असे. मारवा मध्ये प्रवासाची पाऊले अनंताकडे निघाली आहेत आणि भोवतालच्या निसर्गात विरघळण्यासाठीची तयारी ही झाली आहे. त्या क्षणाला कवीला काय दिसते ?

अपार भूमि निराशयाची तटस्थ वरती स्तब्ध निळाई

धुक्यात अंधुक लपेटलेली क्षितीजावर दिसे सराई

ही सराई त्यांच्या नजरेत सामावलेली आहे आणि दिसूही लागली आहे. आपल्याला मिळालेल्या स्थानाबद्दल अभिमानाचा लवलेशही व्यक्त होत नाही. उलट खंत मात्र जरुर व्यक्त होते आणि ही खंतही एकट्याची नाही तर त्या टप्प्यामध्ये असलेल्या पिढीची आहे, म्हणूनच

*वडीलधाऱ्या या पायांना / शताधिकांचे हात स्पर्शती / खंत एक की उरला नाही हात एकही खांद्यावरती.*



मारवा अनुभवताना कुसुमाग्रज हलके धक्के सुद्धा देत असतात. आपल्या जगण्याचा हा एक शाप आहे असे ते धैर्याने सांगतात आणि मग

*जगण्याच्या या शापासाठी उःशाप आहे मरणाचा / काळोखातील रस्त्यावरती उजेड जळत्या सरणाचा.*

मारवाची मैफल हळूहळू शेवटाकडे सरकत असते. ही मैफल जमली का जमली नाही त्याबद्दल खेद वा खंत त्यांना वाटेनासा झाला आहे, म्हणून ते म्हणतात सूत्रावाचून सरली मैफल दिवेही विझले सभाघरातील अंत नसलेल्या ह्या प्रवासात कवी सतत काहीतरी शोधित होता. कुठेतरी खोल तळाशी सत्त्व शोधण्याचा हा खटाटोप होता आणि शेवटी काय कळले आता वृथा शोध हा मृगजळात या फसलो आहे, याच पायरीवरती आता पलिती विझवून बैसलो आहे. जगण्याला जखम समजणारा हा महाकवी आपल्या रचनेतून रोमांच उभे करतो आणि मग कविता येते.

*रौद्र भीषण रुपात माझा पाठलाग करणारी आवाजाविना आक्रोशणारी गोठलेल्या नेत्रांची / चिरलेल्या गात्रांची रक्ताच्या रेषा सगळ्या चिरांवर पिसारलेले केस / पिचलेल्या शिरावर ही जखम माझीच /पण आता स्मरत नाही मी केलेली की झालेली.*

कवीची संवेदना इतकी प्रखर आहे की ही जखम त्याने स्वतःच सुद्धा केली असेल. आयुष्याच्या वाळवंटातून चालतांना शेवट कुठे होणार आहे.

आता चालताना जाणवतं वाळवंटालाही असतं वरदान एका अलौकीकाच असंदिग्ध अफाटपणाचं. येथे मीच निर्माता माझ्या रस्त्याचा, पावलं पडतील तो मार्ग आणि थांबतील ते मंझील. मारवा आता मंझीलपाशी आला आहे. आता मारवा निघाला आहे ''तेथे'' त्याठिकाणी. म्हणूनच शब्द उमटतात...

*तुझ्या चरणांचा तेथेच रियावा जेथे न विसावा वेदनांना / तुझी वाट जाई जखमांच्या गावी आर्तांच्या आसवी द्रवलेली.*

मारवा मधील अनामिकांचे जाणेही हूरहूर लावून जाते. कुणीतरी तो जातो,

*तो गेल्यावर तरंग एकही उठला नाही जनाशयावर / ओलवली ना कुठे पापणी ना स्वर झाल कोठे कातर/ एक चालणे विसावलेले रस्त्यालाही कळले नाही / अंक न गवसे आधाराला शून्य असे ते शुन्यच राही.*

आता सगळ्यांची साथ संपून मारवातून कवी निघाला आहे एकटाच आणि समजावत. सखे, आता तो क्षण आला अखेर या सराईतच थांबायचं आहे तुला आणि मी पुढे जाणार आहे. रेखीव रस्ता नसलेल्या त्या संदिग्ध प्रदेशात माझे आहे पण संबंधहिन अशा नाहीपणात, पुळणीतील सागरलाटेसारखं सहजपणानं विर्सजित होईल. सखे डोळ्यात आसवं कशाला? तुला ठाऊक आहे ना? उंबरठ्यावरील अश्रूंचे थेंब.. पांथस्थाच्या मार्गावर.. ह्या जीवन प्रवासाच्या अखेरीला आपले अस्तित्व संपण्याच्या क्षणी

*तक्रार नाही खंत नाही, पूर्तीसाठीच प्रवास असतो / केव्हातरी मिटण्यासाठी काळजामधला श्वास असतो / असणे आता असत नसण्यापाशी अडले आहे / जिव्हाळ्याच्या चिता पेटवीत बरेच चालणे घडले आहे*

*आणि मग मारवातील आर्द साद येते त्या सर्वव्यापी आकाशाला..*

*माथ्यावरचा आभाळबाबा सवाल आता पुसत नाही / पृथ्वी झाली पावलापुरती अल्याड पल्याड दिसत नाही*

हा निर्वाणीचा क्षण, मावळलेला, कृतकृत्यतेचा, प्रवास संपल्याचा, काहीतरी गवसल्याचा, काहीही न हरवल्याचा, निरोपाचा, अस्वस्थ करणारा, एक प्रचंड कोलाहल थांबल्याचा, निसर्गात विरुन जाण्याचा. हा सूर गुंजी घालतो. थांबलेल्या वाद्यातून तरंग उमटत रहातात. त्यांच्या जाण्यानंतरही आपल्या असण्याला पांघरुण असतं मारव्याच्या मायेचं.

**(लेखक विधानपरिषदेचे सदस्य आहेत.)**

संपर्क : ९८२२०५२४३३


❐ ❐

# भाषा वैभव

## वाचू आनंदे

**शासनाचे मराठी भाषाविषयक धोरण राबविणे, मराठीचा विकास करणे आणि मराठी भाषेला लोकशाही राजवटीशी सुसंगत असे स्वरूप देणे या उद्देशाने भाषा संचालनालयाची स्थापना झाली. भाषा संचालनालयाने आजतागायत एकूण ४८ प्रकाशने प्रसिद्ध केलेली आहेत. त्यामध्ये, २९ परिभाषा कोश, ३ कोश, ६ शब्दावल्या व शासन व्यवहारात मराठी वापराविषयीची १० प्रकाशने, ज्यात मराठी लघुलेखन विषयक प्रकाशने, मराठी टंकलेखन विषयक पुस्तिका, प्रमाणलेखन नियमपुस्तिका, संकीर्ण लेख संग्रह आणि भारताचे संविधान यांचा समावेश आहे. भाषा संचालनालयाच्या या प्रकाशनांना जनतेकडून प्रचंड मागणी आहे. भाषा संचालनालयाच्या काही पुस्तकांचा परिचय या ठिकाणी करून देण्यात येत आहे.**

### भाषाविज्ञान व वाङ्मयविद्या परिभाषा कोश




भाषा विज्ञान व वाङ्मयविद्या परिभाषा कोशात सुमारे ३,२२५ इंग्रजी पारिभाषिक संज्ञांना मराठी पर्याय निश्चित करण्यात आले आहेत. यात भाषा विज्ञानाच्या पारिभाषिक संज्ञा निश्चित करताना वाङ्मयविद्या (Philology) व संहिता चिकित्सा (Textual Criticism) या क्षेत्रांतील काही पारिभाषिक संज्ञांचा अंतर्भाव असलेले वाङ्मयविद्येचे परिशिष्टही (परिशिष्ट एक, सुमारे ३६० संज्ञा) या कोशाच्या शेवटी दिलेले आहे. (किं. १२१ रु.)

### साहित्य समीक्षा परिभाषा कोश




साहित्य समीक्षा परिभाषा कोशात सुमारे २ हजार इंग्रजी संज्ञांना मराठी पर्याय निश्चित करण्यात आले असून, हा कोश तयार करताना या विषयातील विद्यापीठीय स्तरावरील पारिभाषिक संज्ञा विचारात घेऊन तसेच संदर्भादाखल केंद्र सरकारने तयार केलेल्या शब्दसंग्रहाचादेखील वापर करण्यात आला आहे. (किं. १०.५० रु.)

### कार्यदर्शिका

'कार्यदर्शिका' या पुस्तिकेत दैनंदिन कार्यालयीन व्यवहारात निर्दोष मराठीचा वापर करण्यासाठी सर्व स्तरांवरील अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी हाताशी ठेवावी अशी ही मार्गदर्शक पुस्तिका आहे. नेहमीच्या कामकाजात ज्या इंग्रजी शब्दांचा, पदनामांचा, वाक्प्रयोगांचा किंवा वाक्यखंडांचा वारंवार वापर करावा लागतो त्यांच्या सुलभ मराठी अनुवादासह केलेले एक संकलन, असे या पुस्तिकेचे स्वरूप आहे. (किं. ९ रु.)


### शासन व्यवहारात मराठी

राज्यकारभाराच्या भाषेचे स्वरूप कसे असावे, याबाबत पदनाम कोश प्रसिद्ध झाल्यावर त्यातील मराठी पर्यायासंबंधात उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या होत्या. म्हणून टीकाकारांचे समाधान होईल, त्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन

गौतम शिंदे

होईल, अशा पद्धतीने शासन व्यवहाराच्या भाषेबाबतची शास्त्रीय व व्यावहारिक भूमिका स्पष्ट करणे आवश्यक होते. त्यानुसार ऐतिहासिक पार्श्वभूमी, त्यामागील शास्त्रीय भूमिका व आजचा भारतीय संदर्भ स्पष्ट होईल, अशा रीतीने शासन व्यवहारातील मराठी भाषेच्या स्वरूपासंबंधीचे सविस्तर विवेचन या पुस्तकात करण्यात आले आहे. (किं. ३५ रु.)

### राजभाषा परिचय




अमराठी भाषिक कर्मचाऱ्यांना मराठी राजभाषेची ठेवण, तिची वैशिष्ट्ये, यांचे प्राथमिक ज्ञान करून देणे महत्त्वाचे होते. याकरिता मराठी प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले होते. हे प्रशिक्षण देताना ज्या अडचणी आल्या त्यांचा बारकाईने अभ्यास करून अमराठी भाषिकांना उपयुक्त होईल अशा रीतीने 'राजभाषा परिचय' या पुस्तकाची रचना करण्यात आली आहे. (किं. ४९ रु.)


### प्रशासनिक लेखन

प्रशासनिक कामकाज ज्या प्रमुख पद्धतीतून केले जाते त्याचे मराठी नमुने या पुस्तकात दिले आहेत. नमुन्यांच्या स्वरूपात दिलेली माहिती मंत्रालयाच्या किंवा विभागीय कार्यालयांच्या फायलींमधून संकलित करण्यात आली आहे. तसेच ठरावीक मायने असलेले विविध लेखनप्रकारही यात दिलेले आहेत. प्रशासकीय लेखन कसे असावे आणि कसे नसावे याचे तुलनात्मक नमुनेदेखील यात समाविष्ट केलेले आहेत. (किं. १२५ रु.)

### प्रशासन वाक्प्रयोग

प्रशासन वाक्प्रयोग या पुस्तकात निरनिराळ्या शासकीय विभागांच्या व त्यांच्या अंतर्गत असलेल्या कार्यालयांच्या दैनंदिन कामकाजात वापरात असलेले इंग्रजी वाक्प्रयोग व शब्दसमुच्चय यांचे संकलन करण्यात आले आहे. या वाक्प्रयोगांना कार्यालयीन व्यवहारात एका विशिष्ट भाषिक परिपाठाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. मराठीतही या वाक्प्रयोगांची तशीच परिपाठी ठरवून देणे व त्यांच्या वापरात एकरूपता आणणे योग्य होईल, या कल्पनेने वरील इंग्रजी वाक्प्रयोगांचे मराठी पर्याय भाषा सल्लागार मंडळाच्या साहाय्याने निश्चित करून कोशाच्या रूपाने प्रसिद्ध करण्यात आले आहेत. (किं. ६० रु.)

### शासन व्यवहार शब्दावली




मूळ शासन व्यवहार कोश (इंग्रजी-मराठी) स्वरूपात असून, शासन व्यवहार शब्दावली (मराठी-इंग्रजी) स्वरूपात आहे. या शब्दावलीतील मराठी संज्ञांचे वर्णलेखन मूळ शासन व्यवहार कोशातील वर्णलेखनानुसार करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मराठी संज्ञांचे नाम म्हणून असलेले इंग्रजी पर्याय किंवा क्रियापद वा विशेषण म्हणून असलेले इंग्रजी पर्याय त्यांची

स्वतंत्र नोंद घेण्यात आलेली नाही तर, स्वल्पविराम देऊन ते दर्शविण्यात आले आहेत. (किं. १०५ रु.)

**राजभाषा परिचय (कार्यरूप व्याकरण)**

शासन व्यवहार जसजसा सर्वस्पर्शी होऊ लागला तसतसे मराठी भाषेचे जुजबी ज्ञान तोकडे पडू लागले. म्हणून, महाराष्ट्र शासनाने, आपल्या सेवेत असलेल्या अमराठी भाषिक सर्व राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी व अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा परीक्षा विहित केल्या. या परीक्षांमधील कार्यरूप व्याकरणाच्या प्रश्नपत्रिकेसाठी या पुस्तकाची रचना करण्यात आली आहे. (किं. ४९ रु.)

**प्रमाणलेखन नियमावली**

राजभाषा मराठीची अस्मिता व प्रतिष्ठा जपण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात मराठी शुद्धलेखनाच्या बाबतीत योग्य मार्गदर्शन व्हावे या हेतूने 'शुद्धलेखन नियमावली' ही पुस्तिका तयार करण्यात आली आहे. शुद्धलेखन हा आग्रह न राहता ती सवय झाली पाहिजे, अशी त्यामागची भूमिका आहे. मराठी साहित्य महामंडळाने तयार केलेल्या मराठी लेखनविषयक नियमांना महाराष्ट्र शासनाने १९६२ या वर्षी मान्यता दिली होती. त्यात १९७२ या वर्षी ४ नवीन नियमांची भर घालण्यात येऊन आधीच्या मान्य पावलेल्या नियमांतील काही त्रुटी दूर करण्यात आल्या. अशा प्रकारे, मराठी साहित्य महामंडळाचे १८ नियम समाविष्ट असलेल्या 'लेखनविषयक नियम' ह्या पुस्तिकेला महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली. (किं. ६ रु.)




**मंथन**

लोकशाही यशस्वी होण्याच्या दृष्टीने जनतेच्या भाषेत राज्यकारभार चालणे ही अत्यावश्यक बाब आहे. मराठी भाषेला राजभाषेचा नुसता दर्जा देऊन उपयोगाचे नाही, तर शासन व्यवहार १००% मराठीतून व्हावा यासाठी ती लोकांच्या मनात रुजण्याइतपत सोपी, सुटसुटीत तसेच अर्थवाही असायला हवी; तसेच सर्वस्पर्शी झालेल्या शासन व्यवहाराची भाषाही तितकीच सक्षम असावी, या जाणिवेतून निरनिराळ्या क्षेत्रांतील मान्यवरांनी लिहिलेल्या लेखांचे केलेले संकलन असे 'मंथन' या पुस्तकाचे स्वरूप आहे. यात प्रा. नरहर कुरुंदकर, न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, डॉ. जयंत नारळीकर, प्रा. सत्यरंजन साठे, डॉ. अशोक केळकर, डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. भालचंद्र नेमाडे, प्रा. भा. ल. भोळे, प्रा. चंद्रकांत पाटील, श्रीमती विजया चिटणीस, श्री. य. शं. कानिटकर, श्री. स. आ. सप्रे, डॉ. न. ब. पाटील यांसारख्या निरनिराळ्या क्षेत्रातील मान्यवर लेखकांच्या लेखांचा समावेश आहे. (किं. ६ रु.)




**पदनाम कोश**

पदनाम कोश हे भाषा संचालनालयाचे पहिले प्रकाशन असून त्याच्या पहिल्या आवृत्तीतील भाग - १ मध्ये मंत्रालयीन विभाग व त्या अंतर्गत कार्यालयांतील तसेच विधान मंडळ, महामंडळे, आयोग व केंद्रीय महामंडळे यांमध्ये विद्यमान असलेल्या पदांची विभागनिहाय मराठी नावे देण्यात आली आहेत. भाग - २ मध्ये इंग्रजी वर्णानुक्रमानुसार इंग्रजी पदनामे व त्यापुढे मराठी पदनामांचा भाग - १ मधील पृष्ठ क्रमांक देण्यात आला होता. परंतु, या पदनाम कोशातील मराठी पर्याय क्लिष्ट व दुर्बोध वाटल्याने व पदनामांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी दुसरी सुधारित आवृत्ती (१९९०) प्रकाशित करण्यात आली. (किं. ३५.५० रु.)




**शासन व्यवहार कोश**

शासन व्यवहार कोशात सुमारे ३० हजार इंग्रजी पारिभाषिक संज्ञांचे मराठी पर्याय निश्चित करण्यात आले आहेत. पारिभाषिक शब्दांबरोबरच प्रशासनात व अन्य क्षेत्रांत उपयोगी असलेल्या अनेक सामान्य व परिचित इंग्रजी संज्ञांना रूढ व प्रचलित शब्दांच्या साहाय्याने नेमके व अर्थवाही मराठी पर्याय दिले आहेत. या कोशाचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य म्हणजे, सजातीय व समानार्थी शब्दांची कुळे तसेच प्रशासनातील व कायद्याच्या भाषेच्या नेमक्या वापराच्या दृष्टीने अर्थच्छटांतील सूक्ष्म भेद देण्यात आले आहेत. (किं. ७७ रु.)

**शिक्षणशास्त्र परिभाषा कोश**

शिक्षणशास्त्र परिभाषा कोशात सुमारे ४ हजार इंग्रजी पारिभाषिक संज्ञाचे मराठी पर्याय निश्चित करण्यात आले आहेत. शिक्षण हे मातृभाषेतून दिले गेले पाहिजे व त्यासाठी महाराष्ट्रात शिक्षणाचे माध्यम मराठी असावे, हे आता सर्वसामान्य झाले आहे. शिक्षणशास्त्र परिभाषा कोश प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व विद्यापीठ स्तरांवरील शिक्षक व प्राध्यापक तसेच अध्यापक विद्यालये, शिक्षणशास्त्र महाविद्यालये यांमधील प्राध्यापक व भावी शिक्षक यांच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी व मार्गदर्शक आहे. (किं. ९ रु.)

**लोकप्रशासन परिभाषा कोश**

लोकप्रशासन परिभाषा कोशात सुमारे ४ हजार इंग्रजी संज्ञांना मराठी पर्याय निश्चित करण्यात आले असून हा कोश तयार करताना Robbins यांच्या Administrative Process या ग्रंथाचा तसेच R. J. S. Baker, Paul C. Partholomewच्या अनुक्रमे Administrative theory and Public administration व An outline of Public administration या ग्रंथांचा, तसेच अन्य ग्रंथांचा आधार घेतला आहे. (किं. ९.२५ रु.)

**भारताचे संविधान**

भारताचे संविधान याची मराठी भाषेतील पहिली आवृत्ती १९७९ मध्ये काढण्यात आली आणि वेळोवेळी त्यामध्ये झालेल्या सुधारणांचा समावेश करून नवीन आवृत्त्या काढण्यात आलेल्या आहेत; तसेच १९९६ मध्ये चौथ्या आवृत्तीचे पुनर्मुद्रण करण्यात आले तर २००६ मध्ये सहाव्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. भारताच्या संविधानात एकूण ३९५ अनुच्छेद असून, एकूण २२ भागांत त्यांची मांडणी करण्यात आली आहे. याशिवाय १२ अनुसूच्या यात जोडण्यात आल्या आहेत. शेवटी दिलेल्या परिशिष्टांमध्ये सुधारणा अधिनियमांचा सारांश देण्यात आला आहे आणि अखेरीस इंग्रजी-मराठी शब्दसूची व मराठी-इंग्रजी शब्दसूची देण्यात आली आहे. (किं. २४५ रु.) ❒ ❒

## पुस्तके कुठे मिळतील?

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री, प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई – ४००००४. दूरध्वनी : २३६३१४३३, २३६३१७९९.

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ.नजीक, पुणे – ४११००१. दूरध्वनी : २६१२५८०८.

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाइन्स, नागपूर – ४४०००१. दूरध्वनी : २५६२६१५.

४. सहायक संचालक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद – ४३१००१. दूरध्वनी : २३३१५२५.

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६००३. दूरध्वनी : २६५०३९५, २६५०४०२.

# जावे ग्रंथांच्या गावा...



भ्रमती

**शासकीय स्तरावर पुस्तक प्रकाशन आणि विक्रीचे कार्य मोठ्या प्रमाणावर चालते. अनेक दर्जेदार ग्रंथांची निर्मिती शासनातर्फे केली जाते. विशेष म्हणजे ही पुस्तके तुलनात्मकदृष्ट्या अल्प किमतीत मिळतात. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या शहरातील शासकीय ग्रंथ विक्री केंद्रांचा हा आढावा...**

## पुणे

शासकीय ग्रंथगार पुण्यात कुठे कुठे आहेत. एक आहे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शेजारी फोटोझिंको शासकीय ग्रंथागार, ज्याला ब्रिटीश काळापासून इतिहास आहे. दुसरे आहे सेनापती बापट रोडवर बालभारतीचे ग्रंथागार आणि तिसरे तसे साहित्याच्या व्याख्येत मोडत नसेल तरी शासकीय कर्मचारी, अशासकीय संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांच्यासाठी अतिशय माहितीपूर्ण पुस्तकं असलेलं ठिकाण म्हणजे बाणेर रोडवरील यशदा येथे असलेला यशदा प्रकाशन विभाग. या तीन ठिकाणच्या भेटीत वेगवेगळे वाचक भेटले त्यांच्या वाचनाच्या मागचे उद्देशही वेगवेगळे होते.

ठिकाण शासकीय फोटोझिंको ग्रंथागार, वेळ दुपारचे एक वाजलेले, सगळे ग्रंथागार सर्व वयोगटातील वाचकांनी फुललेले... त्यात युवकांचा भरणा मनाला उभारी देणारा... आजची पिढी वाचत नाही... याला कृतीतून मिळालेले हे उत्तर. एक युवक मोठमोठे ग्रंथ चाळताना दिसला. येथे आपल्या घरात आणि मनात संस्कार पेरणारे अनेक ग्रंथ आणि पुस्तकं उपलब्ध आहेत. त्यात तुकाराम गाथा, ज्ञानेश्वरी, भावार्थ रामायण, मराठी विश्वकोश खंड, कौटिल्याचे अर्थशास्त्र, महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील खंड, महाराष्ट्राचे शिल्पकार असे अनेक दुर्मीळ ग्रंथ या ठिकाणी अल्प किंमतीत उपलब्ध आहेत.

पत्ता : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथगार, ५, फोटोझिंको पथ, पुणे - ४११००१, दूरध्वनी ०२०- २६१२५८०८, २६१२४७५९ ई-मेल : govtpzp@yahoo.com

**बालभारती**

पुण्यातला सेनापती बापट रोड म्हणजे बालभारती असे प्रसिद्ध असलेले नाव. कित्येक पिढ्यांना इथल्या अक्षरांनी साक्षर केलं. बालभारती फक्त पाठ्यपुस्तकचं प्रकाशित करीत नाही तर अनेक संस्कार घडविणारी पुस्तकं, चरित्रं प्रकाशित करतात. हे काही जणांना माहीत नसेल तर त्यांनी या ठिकाणी भेट दिली तर कळेल, अरे हे पुस्तक तर माझ्या घरी मुलांसाठी किंवा नातवासाठीच नव्हे तर माझ्यासाठीही आवश्यक आहे. संत तुकडोजी महाराजांची ग्रामगीता केवळ बारा रुपये, उर्दू शब्दकोश ६४ रुपये तर भूगोल स्थुलनाम सूची ४९ रुपये, स्फूर्ती गीते १३ रुपये, बाहुली काम १५ रुपये, मराठी सुलभ भारती २१ रुपये अशा किमती असलेले लहान मुलांच्या संस्कार आणि मूल्य शिक्षणात अतिशय महत्त्वाची भूमिका बजावणारी अनेक पुस्तकं इथे उपलब्ध आहेत.

**पत्ता :** बालभारती ग्रंथागार : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती अभ्यासक्रम व संशोधन मंडळ, बालभारती, सेनापती बापट रोड, पुणे - ४११ ००४, दूरध्वनी- ०२०/२५६५९४६५

**यशदा**


यशवंतराव चव्हाण प्रशासन विकास प्रबोधिनी (यशदा) येथील प्रकाशन विभागातही माहिती अधिकार, प्रशासनात उपयोगी पडणारे आस्थापना आणि लेखा विषयक नव्या नियमांचे वेळोवेळी अद्ययावत केलेली अतिशय उपयोगी पुस्तकं, ग्रामविकास, शासनाच्या विविध योजनावरील पुस्तकं, प्रशिक्षण कौशल्यावर आधारित पुस्तकं, जल व्यवस्थापन आदी विषयांवरील माहितीपूर्ण पुस्तकं इथं उपलब्ध आहेत.

**पत्ता :** प्रकाशन विभाग, यशवंतराव चव्हाण प्रशासन विकास प्रबोधिनी (यशदा), राज्यभवन परिसर, बाणेर रोड , पुणे- ४११ ००७. दूरध्वनी ०२०- २५६०८२२७/२३४ ई- मेल yashadabooks@gmail.com, वेबसाईट : www.yashada.org

**- युवराज पाटील**

## मुंबई

मुंबई हे वाचन संस्कृतीचे केंद्र मानले जाते. पुस्तकवेड्या वाचकांची इथे अजिबात कमतरता नाही. वाचनाची हौस भागविण्यासाठी पुस्तकांच्या दुकानांची आणि ग्रंथालयाची एक साखळीच इथे निर्माण झाली आहे. अगदी रस्त्याच्या कडेवरील जुन्या पुस्तकाच्या दुकानापासून ते वातानुकूलीत मॉलपर्यंत इथे सर्वत्र पुस्तके मिळतात. मुंबईत शासकीय ग्रंथागाराचाही चांगलाच दबदबा आहे आणि शासकीय ग्रंथागारात जाऊन पुस्तके विकत घेणाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे. शासकीय स्तरावर निर्मित पुस्तकाची विक्री करणारी तीन



महत्त्वाची ठिकाणे मुंबईत आहेत. शासकीय ग्रंथागार, साहित्य अकादमी आणि नॅशनल बुक ट्रस्ट ही ती तीन प्रमुख ठिकाणे.

**शासकीय ग्रंथागार**

मुंबई पाहिलेल्या माणसाने मरीन ड्राईव्ह पाहिला नाही असे होत नाही. याच मरीन ड्राईव्हला नेताजी सुभाष मार्गावर शासकीय ग्रंथागार वसले आहे. शासकीय पातळीवरून प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांचा मोठा खजिना इथे दडला आहे. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभाग, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, विश्वकोश निर्मिती मंडळ, पुरातत्त्व व अभिलेख, शिक्षण विभाग, दर्शनिका विभाग, व्यवसाय मार्गदर्शन, जनगणना कार्यालय इ. विविध विभागांची पुस्तके, पुस्तिका इथे उपलब्ध आहेत. शिवाय महाराष्ट्र शासनाचे अधिनियम व नियम तसेच केंद्र शासनाचे मराठी अधिनियम इथे मिळतात. आजघडीला या ग्रंथागारात जवळपास २ हजार प्रकाशने विक्रीस उपलब्ध आहेत. दर्जेदार आणि संदर्भमूल्य असणारे ग्रंथ तेही माफक किंमतीत हे या ग्रंथागाराचे वैशिष्ट्य आहे.

**पत्ताः** शासन मुद्रण, लेखनसामग्री संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४. दूरध्वनी : २३६३१४३३ / १७९९

**साहित्य अकादमी**

मुंबई येथील साहित्य अकादमीचे कार्यालय दादर येथे आहे. १९७२ साली त्याची स्थापना झाली. या कार्यालयामार्फत मराठी, गुजराती, कोकणी व सिंधी या चार भाषेतील अकादमीचा प्रकाशन व्यवहार पाहिला जातो. शिवाय लेखक भेट, परिसंवाद, व्याख्याने, पुस्तक मेळे यांचे आयोजनही केले जाते. मुंबई येथील विभागीय कार्यालयामध्ये अकादमीचे पुस्तक विक्री केंद्र आहे. या ठिकाणी मराठीबरोबरच इतर भारतीय भाषांमधील दर्जेदार साहित्य अल्प किंमतीत उपलब्ध होते.

**पत्ता :** १७२, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग, दादर, मुंबई-४०० ०१४. दू.क्र.०२२-२४१३५७४४. वेबसाईट-http://www.sahitya.akademi.gov.in

**नॅशनल बुक ट्रस्ट**

नॅशनल बुक ट्रस्ट ही रास्त व वाजवी दरात पुस्तके प्रकाशित करणारी एक संस्था आहे.



आजवर संस्थेने हजारो पुस्तके विविध भारतीय भाषांमधून प्रसिद्ध केली आहेत. यामागे संस्थेचा उद्देश म्हणजे देशाच्या भावनात्मक व सांस्कृतिक ऐक्यास हातभार लावणे हाच असतो. नामवंत भारतीय लेखकांच्या ललित कृतींप्रमाणेच भारताविषयीची विविध प्रकारची माहिती देणारे ग्रंथही संस्थेतर्फे प्रसिद्ध होत असतात. तसेच अशा ग्रंथांखेरीज काही ग्रंथमालाही संस्थेद्वारा प्रकाशित करण्यात येतात. उदा., आदान प्रदान, नेहरू बाल पुस्तकालय, भारतदेश आणि लोक, राष्ट्रीय जीवनचरित्र माला, भारतीय लोकसंस्कृती व साहित्यमाला, तरुण-भारती, लोकोपयोगी विज्ञानमाला, आजचे विश्व इत्यादी. याखेरीज संस्थेने आजपर्यंत अनेक ठिकाणी राष्ट्रीय पुस्तक जत्रा भरविल्या आहेत; तर भारतातील विविध राज्यांतील निरनिराळ्या ठिकाणी प्रादेशिक ग्रंथप्रदर्शनेही भरविली आहेत.

**पत्ता :** नॅशनल बुक ट्रस्ट, पहिला मजला, रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५. दूरध्वनी : ०२२-२४३२०३८० .

## नागपूर

झिरो माईल्स ह्या ठिकाणाला केवळ नागपूरच्याच नाही तर संपूर्ण भारताच्या दृष्टीने एक वेगळे महत्त्व आहे. या झिरो माईल्सपासून अगदी हाकेच्या अंतरावर पुस्तकप्रेमींची वाट पाहणारे शासकीय ग्रंथागार आहे. महाराष्ट्रातील ५ ग्रंथागारांपैकी एक. शासनाच्या विविध विभागांनी प्रकाशित केलेली पुस्तके इथे मिळतात. या ग्रंथागाराला भेट दिली असता तिथले वातावरण पाहून महाराष्ट्राची वाचनसंस्कृती प्रगल्भ असल्याचे दिसले. इथे वाचक मोठ्या प्रमाणावर येतात. दिवसभर लोकांची चांगलीच वर्दळ असते. जुन्या आणि दुर्मीळ ग्रंथांची खूप मागणी असते. विशेषत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले गौरवग्रंथ, विश्वकोशाचे सर्व खंड, महाराष्ट्राचे शिल्पकार ही पुस्तक मालिका या ग्रंथांना मोठी मागणी आहे. शिवाय महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियम ही पुस्तिका अधिकाधिक विकली जाते. पुस्तकांशिवाय या



ग्रंथागारामध्ये राष्ट्रीय महापुरूषांची छायाचित्रे देखील उपलब्ध आहेत. अतिशय अभ्यासपूर्ण आणि दुर्मीळ ग्रंथे तेही कमी किमतीत हवे असतील तर शासकीय ग्रंथागार हा उत्तम पर्याय आहे.

**पत्ता :** शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन, नागपूर. दूरध्वनी : ०७१२-२५६२६१५ / १११

**- किरण केंद्रे**

## औरंगाबाद

औरंगाबाद-पैठण रस्त्यावर रेल्वे स्थानकासमोर उड्डाण पुलाच्या खाली उजव्या बाजूला सुरुवातीस शासकीय मुद्रणालयाचे आवार असून त्याच्यालगत हे ग्रंथागार आहे.

येथील ग्रंथ विक्री दालनात करण्यात आलेली मांडणीही पुस्तक प्रदर्शनासारखी आहे. शासन आणि शासनाशी संबंधित यंत्रणांनी प्रकाशित केलेली पुस्तके येथे मिळतात. औरंगाबाद हे विभागीय मुख्यालयाचे शहर. येथे असणाऱ्या शैक्षणिक संस्थांमुळे येथे विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे. उच्च न्यायालयाचे खंडपीठ, विविध शासकीय कार्यालये आदीमुळे ग्रंथागारातून होणारी विक्री वाढत आहे.

भारतीय राज्यघटनेची अद्ययावत आवृत्ती, विविध कायदे आणि अधिनियमांची पुस्तके येथे उपलब्ध आहेत. याशिवाय राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, भाषा संचालनालय, दर्शनिका विभाग इत्यादींची प्रकाशने येथे मिळतात.

कवीवर्य केशवसुतांच्या जन्मशताब्दी निमित्त प्रकाशित करण्यात आलेली त्यांच्या कवितांची यथामूल हस्तलिखित प्रत, समग्र राम गणेश गडकरी या ग्रंथांप्रमाणेच साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेली महाराष्ट्राचे शिल्पकार मालेतील पुस्तकेही येथे मिळतात. विश्वकोशांचे खंड, या कोशांची सी.डी., कुमार विश्वकोश, शब्दकोशाचे खंड येथे मिळतात.

राज्य शासनाच्या दर्शनिका विभागाने विविध जिल्ह्याचे गॅझेटीयर्स प्रसिद्ध केले आहेत. काही जुने गॅझेटीयर्स आणि नांदेड जिल्ह्याचे नवे गॅझेटीयर येथे उपलब्ध आहे.

राज्य शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लिखाण व भाषणे प्रसिद्ध केली आहेत. या संकलनाचे विविध खंड ग्रंथागारात उपलब्ध असून त्यांना सतत मागणी असते.

एकूणच शासनाने आणि शासनाशी संबंधित यंत्रणांनी प्रसिद्ध केलेली पुस्तके मिळण्याचे हे एक हमखास ठिकाण आहे.

**पत्ता :** शासकीय मुद्रणालय, रेल्वे स्थानकासमोर, औरंगाबाद-पैठण रस्ता, औरंगाबाद, दूरध्वनी - ०२४०-२३३१४६८/ २३३१५२५.

**- राधाकृष्ण मुळी**

## कोल्हापूर

कोल्हापुरात मध्यवर्ती बसस्थानकावर उतरल्यानंतर पोलीस मुख्यालयाकडे जाण्याच्या मार्गावर पितळी गणेश मंदिरासमोर हे ग्रंथ विक्री केंद्र आहे. या डेपोत सध्या रोज सरासरी ३ हजार रुपयांची ग्रंथविक्री होते. रोज दीडशेहून अधिक साहित्यप्रेमी या डेपोस भेट देतात.





कोल्हापूर दर्शनासाठी आलेल्या शालेय सहली आवर्जून या साहित्य मंदिरास भेट देतात.

या बुक डेपोमध्ये रॅकवर पुस्तके मांडून ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे हवे ते पुस्तक पाहून ते विकत घेता येते. विविध प्रकारची २५ हजारांहून पुस्तके, सहाशेहून अधिक कायदे, मौल्यवान ग्रंथ, आत्मचरित्रे, समग्र वाङ्मय येथे विक्रीसाठी उपलब्ध आहे. सध्या भारतीय संविधानास प्रचंड मागणी आहे. त्याची किंमत आकारानुसार १३०, २४५ आणि ३१९ रुपये अशी आहे. 'ज्ञानेश्वरी' हा धर्मग्रंथ म्हणून घरी असावा असे वाटणाऱ्या समाजास आता भारतीय संविधान आणि इंडियन पिनल कोडही आपल्या घरी हवा असे वाटते हा समाजातील बदल नक्कीच घटनेवरील श्रद्धा दर्शवणारा आहे. ग्रंथागारात विश्वकोशाचे १ ते १७ खंड सीडीच्या स्वरूपात उपलब्ध आहेत. फक्त १७ वा खंड पुस्तक स्वरूपात उपलब्ध आहे. कुमार विश्वकोशही सवलतीत मिळतो. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांची इंग्रजीतील गॅझेटस् आहेत. शंभर रुपये किंमत असलेले महात्मा फुले यांच्या समग्र वाङ्मयास सर्वाधिक मागणी आहे. तशीच मागणी अण्णा भाऊ साठे समग्र वाङ्मयास आहे.

विधी व न्याय विभागाने प्रकाशित केलेले सर्व कायदे उपलब्ध आहेत. त्यामध्ये इंग्रजीतील ३५० व मराठीतील ३०० कायदे आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, भाषा संचालनालय, पुरातत्त्व विभाग, दर्शनिका विभाग, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू चरित्रे साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळातर्फे प्रकाशित साहित्य येथे विक्रीसाठी ठेवले जाते. महाराष्ट्र नागरी सेवाशर्ती आठ भागांपैकी चार भाग उपलब्ध आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांना या सेवाशर्ती उपयोगी पडणाऱ्या असतात. त्यामुळे त्यास मोठी मागणी आहे. दर्शनिका विभागाने प्रकाशित केलेल्या कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, सोलापूर या जिल्ह्यांतील स्वातंत्र्यसैनिकांचा ६१० पानांचा चरित्रकोश उपलब्ध आहे. या कोशामध्ये त्या स्वातंत्र्यसैनिकांचे नाव, शिक्षण, जन्म, मृत्यू, चळवळीत काय केले व त्यांना काय शिक्षा झाली याची इत्यंभूत माहिती आहे. 'टेम्पल ऑफ महाराष्ट्रा', 'महाराष्ट्र लॅन्ड ॲन्ड इटस् पिपल' ही इंग्रजीतील पुस्तकेही आहेत. 'दासबोध', राजर्षी शाहू महाराजांचे आमदार पी. बी. साळुंखे यांनी संपादित केलेले चरित्र, सरोजिनी बाबर यांनी लिहिलेल्या कुलदैवत, श्रावण भाद्रपद, सण उत्सव, तसेच 'बहिणाईंची गाणी' आदी पुस्तकांची सतत मागणी असते. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चित्रांनाही प्रचंड मागणी आहे.

तुम्हीसुद्धा जेव्हा केव्हा कोल्हापूरला याल तेव्हा महालक्ष्मीच्या दर्शनाला जरूर जा व तांबडा-पांढरा रस्याचाही जरूर आस्वाद घ्या. परंतु एकदा या बुक डेपोसही तितक्याच आस्थेने भेट द्या तरच तुमची कोल्हापूर भेट कारणी लागल्यासारखी होईल.

पत्ता : शासकीय बुक डेपो, पितळी गणेश मंदिरासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर. दूरध्वनी : ०२३१-२६५०३९५, २६५०४०२.

**- विश्वास पाटील**

❑ ❑

# द्रष्टे निर्णय... अभिनव योजना

**नवीन शाळा सुरू करण्यासाठी अर्ज करण्याच्या मुदतीला १५ मार्चपर्यंत वाढ**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा अधिनियमानुसार शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जा वाढ करण्यासाठी अर्ज करण्याची सध्याची ३१ जानेवारीची मुदत १५ मार्च २०१३ पर्यंत वाढवून देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनिमन) अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करण्यासाठी संबंधित शिक्षण संचालकांकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता असा अर्ज १३ जानेवारी २०१३ पूर्वी करण्यात येईल, अशी तरतूद या अधिनियमात करण्यात आली आहे.

२०१३ या शैक्षणिक वर्षाकरिता विहित नमुन्यामध्ये अर्ज दाखल करण्याकरिता संबंधित शिक्षण संस्थांना उपलब्ध होणारा कालावधी तसेच आवश्यक प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्याकरिता आवश्यक कालावधी अल्प होता असे निदर्शनास आले. त्यामुळे नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करण्यासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत ३१ जानेवारी २०१३ ऐवजी १५ मार्च २०१३ पर्यंत वाढवण्यात यावी आणि ही मुदत ३१ जानेवारी २०१३ पासून वाढवण्यात आली असल्याचे मानावे, असा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.

या अधिनियमातील तरतुदीमध्ये नवीन शाळा म्हणजेच पूर्व-प्राथमिक, प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळा स्थापन करणे किंवा विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेत दर्जा वाढ करणे यांचा समावेश आहे.

**राज्य सहकारी निवडणूक आयुक्तपदी निवृत्त सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती**

राज्य सहकारी निवडणूक आयुक्तपदी निवृत्त सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. सहकार कायद्यात विविध दुरूस्त्या करण्यासंदर्भात ३० जानेवारी २०१३ रोजी मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती. यातील एक तरतूद संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण स्थापन करण्याबाबत होती. मंत्रिमंडळ बैठकीत यावर चर्चा होऊन राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर निवृत्त सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची राज्य सहकारी निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय झाला. त्यांची नेमणूक ३ वर्षांकरिता असेल. त्यांच्या नेमणुकीचा कालावधी २ वर्षांपर्यंत राज्य शासनाला वाढवून देता येईल.

**दुभत्या संकरित गाई-म्हशींचे वाटप**

राज्यातील ३३ जिल्हयात दूध उत्पादनाला चालना देण्यासाठी सहा दुभत्या संकरित गाई किंवा म्हशींचे गट वाटप करणारी योजना १२ व्या पंचवार्षिक योजनेत राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. २०११-१२ मध्ये या योजनेंतर्गत १५०३ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला असून त्यांच्या मासिक उत्पन्नात ९००० रूपये ते १२००० रूपयांपर्यंत वाढ झाली आहे. २०१२-१३ मध्ये या राज्यस्तरीय योजनेसाठी एकूण ४० कोटी १६ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला असून यामधून २०८८ लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.



चालू वर्षात ही योजना दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणार नाही, तसेच जे जिल्हे दुग्धोत्पादनात स्वयंपूर्ण नाहीत अशाच जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे.

**दूध उत्पादकता वाढविण्यासाठी योजना**

राज्यातील गायी-म्हशींची उत्पादकता वाढविण्यासाठी सर्वसमावेशक कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. यात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. 'राज्यातील गाई-म्हशींची उत्पादकता वाढविण्यासाठी सर्वसमावेशक अनुवंशिक सुधारणा कार्यक्रम'' असे या राज्यस्तरीय योजनेचे नाव असून ती चालू वर्षापासून राज्यात राबविण्यात येईल.

या योजनेत जनावरांची ओळख पटविणे व नोंद ठेवणे, त्यांच्या उत्पादनाच्या नोंदी ठेऊन त्यांचे विश्लेषण करणे, त्याआधारे प्रत्येक पिढीत उत्कृष्ट जनावरांची निवड करणे यासाठी मोठ्या प्रमाणावर माहिती गोळा करण्यात येईल. याकरिता माहिती तंत्रज्ञान आणि संगणक प्रणालीचा वापर करण्यात येईल.

**परदेशातून गोठित रेतमात्रा**

दुध उत्पादन, वंशावळ, breed characters, दुग्धस्पर्धा इ.च्या आधारे विविध जातीच्या गाई-म्हशींची या कार्यक्रमासाठी निवड करण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी अधिकारी, कर्मचारी, शेतकरी व पशुपालकांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात येणार आहे. निवड केलेल्या गाई-म्हशींना अतिउच्च अनुवांशिकतेच्या /सिध्द वळूच्या गोठित रेतमात्रेद्वारे कृत्रिम रेतन करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यकतेनुसार गोठित रेतमात्रा परदेशातून आयात करण्यात येणार आहेत.

**वासरांचा संपूर्ण तपशील**


कृत्रिम रेतन केल्यानंतर जन्मलेल्या संकरीत कालवडी/सुधारित पारड्या/नर वासरे यांचे जन्मत: वजन, कालवडीचे/पारडीचे माजावर आल्या वेळीचे वय, वजन, कृत्रिम रेतन केल्याची नोंद, तारीख, कालवड व्याल्याची तारीख, दूध उत्पादन, त्यांच्या पितृत्वाच्या व मातृत्वाच्या जनुकीय चाचणीचा तपशील तसेच या योजनेंतर्गत पैदास चाचणी कार्यक्रमासाठी उपलब्ध झालेल्या नर वासरांचाही तपशील ठेवण्यात येणार आहे.

**संगणक आज्ञावली**

पशुपालकांच्या नावांची नोंदणी करणे निवड केलेल्या गाई म्हशींना विशिष्ट ओळख क्रमांक देणे, गाई म्हशीच्या उत्पादक विषयक, अनुवांशिक, स्वास्थ्याचा तपशील, कृत्रिम रेतन, कृत्रिम रेतन केलेल्या वळूंची वंशावळ, गर्भतपासणी इ. नोंदी, इंटरनेट व एसएमएसद्वारे घेण्यासाठी संगणक आज्ञावली (Software) तयार/विकसित करण्यात येणार आहे.

**महावितरणचा पायाभूत आराखडा प्रकल्प**

महावितरण कंपनीच्या प्रस्तावित पायाभूत आराखडा (इन्फ्रा-२) प्रकल्पास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पासाठी ६ हजार ५०० कोटी रुपये खर्च येणार असून ८० टक्के म्हणजे ५ हजार २०० कोटी भागभांडवल महावितरण कंपनी कर्जरुपात उभारेल. २० टक्के म्हणजे १३०० कोटी रुपये भागभांडवल शासन उपलब्ध करून देणार आहे.



या प्रकल्पामुळे २०१३ ते २०१६ पर्यंत अंदाजे ४ लक्ष ८८ हजार कृषी पंप ग्राहक, २३ लक्ष ४८ हजार घरगुती ग्राहक, २ लक्ष ६४ हजार वाणिज्यिक ग्राहक आणि ५८ हजार २०० औद्योगिक ग्राहक असे ३१ लाख ५८ हजार ग्राहकांना विद्युत जोडण्या देणे शक्य होणार आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांना २ कोटींचा निधी**

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत टंचाई निर्माण झालेल्या गावात आवश्यकतेनुसार कामे सुरू करावीत आणि कोणतीही व्यक्ती रोजगारापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. टंचाई परिस्थितीत पाणी पुरवठ्यांच्या योजनांसाठी पाणी पुरवठा विभागाला आतापर्यंत ४१३ कोटी ९८ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. दुष्काळ निवारणाच्या व तत्सम कारणांसाठी प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना दोन कोटी रुपये आकस्मिक निधी म्हणून खर्च करण्यासाठी उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**राज्यातील १,३५६ गावांत पाणी टंचाई १,७३० टँकर्सद्वारे पाणी पुरवठा**

राज्यातील १ हजार ३५६ गावांतील ३ हजार ९३८ वाड्यांत पाणी टंचाई जाणवत असून त्या ठिकाणी १,७३० टँकर्सद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. तीव्र टंचाई जाणवत असेल त्या ठिकाणी आणखी टँकर्स तातडीने उपलब्ध करून देण्यात येतील.

टंचाई परिस्थितीत लोकांना गावातच रोजगार उपलब्ध व्हावा यादृष्टीने महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली एकूण २१ हजार ४९६ कामे सुरू असून या कामावर २ लाख ९१२ मजूर काम करीत



आहेत. राज्यात आतापर्यंत ४४१ जनावरांच्या छावण्या उघडण्यात आल्या असून यात ३ लाख ८५ हजार १४१ एवढी जनावरे आहेत. अहमदनगर जिल्ह्यात १८८, पुणे जिल्ह्यात १, सातारा जिल्ह्यात ९३, सांगली जिल्ह्यात २२, सोलापूर जिल्ह्यात ११५, बीड जिल्ह्यात १७, उस्मानाबाद जिल्ह्यात ५ गुरांच्या छावण्या उघडण्यात आल्या आहेत. यावर आतापर्यंत २५,६१८.३९ लाख रुपये



खर्च करण्यात आला आहे. चाऱ्यासाठी ६८४ कोटी २९ लाख एवढा निधी वितरित केला आहे.

पिकांची अंतिम पैसेवारी जिल्हाधिकाऱ्यांनी जाहिर केली असून त्यात ७ हजार ६४ गावातील पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आढळून आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी जाहिर केलेल्या रब्बी हंगामाच्या हंगामी पैसेवारीत ३ हजार ९०५ गावातील पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आढळून आली आहे.

**पाणी योजनेच्या वीज देयकांसाठी ६७ टक्के अनुदान**

खरीप हंगामाची अंतिम पैसेवारी ५० टक्केपेक्षा कमी असणाऱ्या गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या पाणी पुरवठा योजनेची चालू म्हणजेच १ एप्रिल २०१२ नंतरची देयके भरण्यासाठी पाणी पुरवठा विभागाकडून ५० टक्के, मदत आणि पुनर्वसन विभागाच्या टंचाई निधीतून १७ टक्के असे एकूण ६७ टक्के अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला. उर्वरित ३३ टक्के निधी हा संबंधित ग्रामपंचायत किंवा पाणी पुरवठा संस्था यांनी उभा करावयाचा आहे.

१ एप्रिल २०१२ पूर्वी थकबाकीची देयके अभय योजनेखाली १२ हप्त्यात भरण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला आहे. त्यानुसार लाभधारकांना प्रत्यक्ष ६७ टक्के रक्कम अनुदान म्हणून देण्यात येईल.

**पाणी टंचाई दूर करण्यासाठी जालना, उस्मानाबादला निधी**

मराठवाड्यातील जालना आणि उस्मानाबाद शहरांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई असून ती दूर करण्याच्या दृष्टीने तातडीने योजना हाती घेण्यासाठी दोन्ही शहरांना निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाला. जालना शहरासाठी २२ कोटी तर उस्मानाबाद शहरासाठी ५१ कोटी रुपये देण्यात येतील.

जालना शहरात UIDSSMT अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या टंचाईच्या अनुषंगाने योजना मंजूर करण्यात आली आहे. या योजनेच्या पूर्ततेसाठी २२ कोटी रुपये इतका निधी लागणार आहे. राज्य, केंद्र व महानगरपालिकेचा हिस्सा असे १८२ कोटी रुपये देण्यात आले असून १८१ कोटींचे काम पूर्ण झाले आहे. उस्मानाबाद शहरासाठी याच योजनेंतर्गत ५१ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. प्रकल्प सुरु ठेवण्यासाठी अंदाजे ७ कोटी ५० लाख रुपये प्रति वर्षी देखभाल दुरुस्तीसाठी आणि थकित वीज बिलापोटी २२ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना**



भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना राबविण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या योजनेंतर्गत नवीन पाच उपक्रम राबविण्यात येतील.

राज्य सांस्कृतिक धोरण २०१० च्या निर्णयानुसार शास्त्रीय संगीतास प्रोत्साहन देण्यासाठी भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या नावे नवीन योजना सुरू करण्यात येत आहे. याअंतर्गत भारतरत्न पंडित भीमसेन जोशी युवा शिष्यवृत्ती योजना, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत महोत्सव, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी गुरूकुल योजना, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीतातील नोंदणीकृत संस्थांना साहाय्यक अनुदान हे पाच उपक्रम राबविण्यात येतील.

□□

# महाराष्ट्राचा गौरव

## दिल्लीतील महाराष्ट्र

डिसेंबर, जानेवारी या महिन्यांमध्ये दिल्लीच्या आसमंतावर धुक्याचे सावट आणि रस्त्यावर कडाक्याची थंडी असते. मात्र याच काळात दिल्लीमध्ये संसदेच्या अधिवेशनानंतरच्या महत्त्वाच्या बैठकांची श्रृंखला सुरू होते. त्यामुळे दिल्लीच्या थंडीचे माहात्म्य गातच देशभरातील विविध राज्यांचे प्रतिनिधी मंडळ आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी महत्त्वाच्या बैठकींमध्ये सहभागी होतात. या थंडीच्या दोन महिन्यांत महाराष्ट्राच्या दृष्टीने अनेक उबदार निर्णय राजपथाच्या साक्षीने झालेले आहेत. यातील मनात साठलेला महत्त्वाचा निर्णय म्हणजे इंदू मिलच्या जागेच्या हस्तांतरणाची घोषणा होय. संसदेच्या दोन्ही सभागृहांत ५ डिसेंबर रोजी थेट विदेशी गुंतवणुकीवर वादळी चर्चा सुरू असताना सार्वमतात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रस्तावित स्मारकासाठी इंदू मिलची जागा हस्तांतरित करण्यात येत असल्याची घोषणा करण्यात आली. गेल्या वर्षभरात या भावनिक मुद्द्याला घेऊन अनेक आघाड्यांवर मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी राजधानीत प्रयत्न केले होते. एखाद्या भावनिक प्रश्नाचा शांतता व संयमाने सर्वमान्य तोडगा कसा निघू शकतो याचा वस्तुपाठ मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी या निर्णयाला देशपातळीवर पाठिंबा मिळवून घालून दिला आहे. सोबतच हे स्मारक जागतिक दर्जाचे होईल यासाठी राज्य शासनाने जबाबदारी

**मोहन राठोड**

घेतली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात लाखोंच्या भावना जोडलेल्या मुद्द्यावर मुख्यमंत्र्यांनी केलेली यशस्वी शिष्टाई म्हणून या घटनेची नोंद घ्यावी लागेल.

राज्याच्या आर्थिक वाटचालीला देशपातळीवर मांडण्याची संधीदेखील याच महिन्यात मुख्यमंत्र्यांना मिळाली. औचित्य होते राष्ट्रीय विकास परिषदेचे! या परिषदेत देशभरातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या राज्याच्या आर्थिक परिस्थितीबाबत आराखडा सादर केला. सोबतच देशाच्या विकासदरामध्ये आपल्या राज्याचा वाटा आणि केंद्राकडून मदतीची मागणी केली. या परिषदेवर महाराष्ट्रासारख्या विकसित राज्याची छाप होती. अनेक राज्यांकडून औद्योगिक विकाससंदर्भातील सादर होणाऱ्या आकडेवारी आणि घोषणांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी राज्याचा आर्थिक ताळेबंद सादर केला. महाराष्ट्र हेच देशातील सर्व आघाडीवरील राज्य असल्याचे आपल्या निवेदनात ठामपणे मांडून बाराव्या पंचवार्षिक योजनेत राज्य १०.५ टक्के विकासदर साध्य करेल असा निर्धारही व्यक्त केला. राज्यातील गेल्या दोन वर्षांपासूनच्या दुष्काळी स्थितीला सामोरे जाताना राज्याने कृषी व सिंचन क्षेत्रात केलेल्या नियोजनाची माहिती त्यांनी या बैठकीत दिली.

दुष्काळग्रस्त भागामध्ये १४५ तालुक्यांत १०५ प्रकल्प राबविण्यात येत असल्याची माहिती दिली. २२७० कोटी रुपये खर्च या भागासाठी करावा लागेल, या प्रश्नाकडे त्यांनी लक्ष वेधले. राज्यातील नवीन भूजल अधिनियम कायदा, वस्त्रोद्योग धोरण, राज्य पोषण अभियान, महा-इ-सेवा केंद्र उभारणी अशा अनेक प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. यावेळी केंद्राच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन देतानाच राज्यातील प्रलंबित रेल्वे प्रकल्प, किनारपट्टीवरील बंदराचा विकास, कोळसा व गॅसचा नियमित पुरवठा, राजीव आवास योजनेच्या नियमातील शिथिलता, मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसनासाठी भरीव मदतीच्या मागणी संदर्भात केंद्राने गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली.

**जलसंधारण परिषद**

राष्ट्रीय विकास परिषदेनंतर दुसऱ्या दिवशी झालेल्या जलसंधारण परिषदेत पंतप्रधान डॉ.



गेल्या दोन महिन्यांत देशातल्या दोन अग्रणी माध्यम समूहांकडून राज्याच्या वाटचालीचा गौरव करण्यात आला. पहिला कार्यक्रम १ नोव्हेंबरला इंडिया टुडे या समूहातर्फे झाला. पायाभूत सुविधा व ग्राहक सुविधा या क्षेत्रात चांगले कार्य करण्यासाठी हा पुरस्कार मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या परिषदेत मुख्यमंत्री चव्हाण यांना मोठ्या राज्यातील सर्व भागाला समतोल विकासाची संधी मिळेल काय? या विषयावर बोलण्यास पाचारण करण्यात आले. विकासाचे समतोल राज्य उभारण्यासाठी तालुका घटक ठरवून धोरण ठरविण्याची घोषणा त्यांनी केली. त्यानंतर राज्यात याद्दष्टीने नियोजन सुरू झाले आहे. समतोल विकासाच्या मुद्द्यावर मुख्यमंत्र्यांनी केलेले वक्तव्य या परिषदेचे मुख्य शीर्षक (हेडलाइन) ठरले. इतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांनी विकासाच्या विकेंद्रीकरणाला दिलेली नवी दिशा इतर सर्वांनी उचलून धरली.

**मुख्यमंत्री महोदयांच्या दिल्लीतील पुर्वानुभवाचा व संपर्काचा उपयोग झाला. दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाणाऱ्या वरिष्ठ मंत्र्यांच्या उच्चाधिकार समितीला त्यामुळेच महाराष्ट्रातील दुष्काळाच्या परिस्थितीचे गांभीर्य कळाले. दरम्यान, उच्चाधिकार समितीचे प्रमुख असलेल्या केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार व समिती सदस्यांसमोर नोव्हेंबर महिन्यात दुष्काळाबाबत सादरीकरण केले होते. त्यामुळे ही परिस्थिती या उच्चाधिकार मंत्रिगटाला समजून घेता आली. परिणामी, १० जानेवारीला मंत्रिगटाने राज्याच्या दुष्काळ निवारणासाठी ७७८ कोटींची घोषणा केली. त्यांनी महाराष्ट्रातील दुष्काळी भागात शेतीसाठी ५६३.२९ कोटी, फळबागासाठी ९१.२९ कोटी, पशुसंवर्धनासाठी ७२.८८ कोटी, पाणीपुरवठ्यासाठी ५०.६३ कोटी असे एकूण ७७८.९ कोटी रुपये दुष्काळ निवारण्यासाठी जाहीर केले आहेत.**



मनमोहन सिंग यांनी राज्यांनी आपली जलनीती ठरविताना काय उपाययोजना केल्या हे जाणून घेतले. परिषदेच्या सुरुवातीलाच मुख्यमंत्र्यांना बोलण्याची संधी देऊन राज्याच्या नियोजनाची माहिती घेतली. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागामध्ये सध्या सर्वाधिक समस्या आहे ती पिण्याच्या पाण्याची, महाराष्ट्रामध्ये सिंचन आणि पिण्याचे पाणी हे विषय अतिशय गंभीरतेने राज्य शासन हाताळत असून केंद्रातदेखील राष्ट्रीय जलनीती धोरण ठरविताना पुढच्या अनेक वर्षांचे नियोजन असावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी सहाव्या राष्ट्रीय जलसंधारण परिषदेत केले. महाराष्ट्र शासनाने पाण्याचे नियमित, समतोल वाटप व व्यवस्थापन व्हावे, यासाठी महाराष्ट्र भूजल विकास व व्यवस्थापन कायदा अंमलात आणला असल्याचे सांगितले.

विविध परिषदांमधून राज्याच्या ध्येयधोरणांची माहिती देतानाच मुख्यमंत्र्यांच्या केंद्र स्तरावरील विविध खात्याच्या मंत्र्यांच्या भेटीगाठी सुरू होत्या. राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी अर्थसाहाय्य मिळण्यासाठी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्याकडे त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

महाराष्ट्राच्या सर्वच क्षेत्रांतील वाटचालींचा गौरव २२ डिसेंबरला करण्यात आला. आयबीएन या वृत्तवाहिनी समूहाच्या सोहळ्यात राज्याला देशातील सर्वांत प्रगत राज्याचा पुरस्कार देण्यात आला. पायाभूत सुविधा, नागरिकांची सुरक्षितता, शिक्षण, रोजगार निर्मिती, पर्यावरण, आरोग्य सुविधा, गरिबी निर्मूलन, पेयजल आणि पाणीपुरवठा महिला सक्षमीकरण, अशा नऊ विविधांगी क्षेत्रांत हा पुरस्कार दरवर्षी दिला जातो. महाराष्ट्राला रोजगार निर्मिती आणि पेयजल व स्वच्छता या दोन गटांत सर्वांत प्रभावी राज्य म्हणून हा पुरस्कार मिळाला आहे. मुख्यमंत्र्यांच्या वतीने हा पुरस्कार दिल्लीतील महाराष्ट्राचे निवासी आयुक्त बिपीन मल्लिक यांनी स्वीकारला.

### वर्चस्व कायम

याशिवाय गेल्या महिनाभरात सहकारी साखर कारखाना महासंघाच्या वतीने देण्यात येणाऱ्या वार्षिक पुरस्कारात महाराष्ट्राने आपला अग्रक्रमांक कायम राखला. १७ पैकी ९ पुरस्कार पटकावून सहकारी साखर कारखान्याचा पाया घालणाऱ्या महाराष्ट्राने आपले वर्चस्व सिद्ध केले. कृषी विभागातर्फे दिला जाणारा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार जालन्याच्या समर्थ सहकारी साखर कारखान्याला उत्तम वित्त व्यवस्थापनासाठी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते देण्यात आला. याच महिन्यात वर्धा जिल्ह्याने आधार योजनेतील पथदर्शी प्रकल्पांत प्रभावी कार्य केल्याबद्दल स्कोच फाउंडेशनचा पुरस्कार पटकाविला तर साहित्य क्षेत्रातही जयंत पवार यांनी साहित्य अकादमीचा पुरस्कार पटकाविला. त्यांच्यासोबतच साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार, युवा नाटककार धर्मकीर्ती सुमंत यांना तर अनुवादाचा पुरस्कार शारदा साठे यांनी पटकावून राजधानीत राज्याचे नाव अधोरेखित केले. याच महिन्यात महाराष्ट्र परिचय केंद्राच्या वतीने आयोजित मराठी पत्रकार दिनाच्या कार्यक्रमात राजधानीत आपल्या लेखनीचा ठसा उमटविणाऱ्या पत्रकार बांधवांचा सत्कारही संस्मरणीय ठरला.

❑ ❑




**प्रगती मैदानावर नोव्हेंबर महिन्यात आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्याचे उद्‌घाटन झाले. या मेळ्यात राज्याचा सहभाग होता. या मेळ्यात महाराष्ट्र फूड दालनाने सर्वोत्कृष्ट खाद्य पदार्थामध्ये सुवर्ण सन्मान पटकावला. महाराष्ट्र फूडच्या प्रमुख विभा चिपळूणकर यांचा केंद्रीय उद्योग राज्यमंत्री डी. पुरंदरेश्वरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

# मोफत औषधोपचार

म संस्था राज्यातील सर्व जिल्हयात वेगवेगळे उपक्रम राबवित आहे. एड्सविषयी लोकांमध्ये जनजागृती करणे, गैरसमज दूर करणे, एचआयव्ही संसर्गित लोकांच्या बाबतीत होणारा कलंक, भेदभावाची भावना कमी करणे, त्यांच्यात एचआयव्हीशी सामना करण्यासाठी ताकद निर्माण करणे, एचआयव्ही होण्याची कारणे काय आहेत व ती टाळण्यासाठी काय केले पाहिजे तसेच एड्स संसर्गित व्यक्ती योग्य वेळी उपचार घेऊन सर्वसामान्य माणसांप्रमाणे आपले जीवन जगू शकते. असे अनेक प्रकारचे कार्यक्रम महाराष्ट्र एड्स नियंत्रण संस्था राबवीत आहे.

एचआयव्हीचा प्रसार थांबविण्यासाठी व त्याचा प्रतिबंध करण्यासाठी एचआयव्ही संसर्गित व्यक्तींना सरकारमार्फत अनेक संदर्भसेवा व मोफत औषधोपचार पुरविले जातात.

महाराष्ट्र राज्यात एकूण ५८ एआरटी केंद्रे आहेत. पैकी ९ केंद्रे मुंबई व ४९ एआरटी केंद्रे मुंबईबाहेर महाराष्ट्राच्या ३३ जिल्ह्यांत आहेत. या केंद्रामार्फत रुग्णांना दीर्घकाळ औषधे पुरविली जातात. त्यांचा सी डी ४ तपासणी करून त्यांना औषधे दिली जातात. त्यामुळे एचआयव्ही झालेल्या रुग्णांचे आयुष्य वाढण्यास मदत होते.

साधन
हेल्पलाइन
022-2411 4000

राज्यातील सर्व ग्रामीण रुग्णालये तसेच २४x७ प्राथमिक आरोग्य केंद्रात समुपदेशनाची व एचआयव्ही तपासणीची सोय उपलब्ध आहे. एकात्मिक सल्ला व तपासणी केंद्रामधून तळागाळातील लोकांपर्यंत एचआयव्ही एड्सबाबत सर्व माहिती व सेवा पाहोचविण्यास मदत होते.

रक्तामार्फत एचआयव्हीचा प्रसार टाळण्याकरिता रक्तपेढ्यांमध्ये जमा होणाऱ्या प्रत्येक रक्त नमुन्याचे एचआयव्ही/गुप्तरोग, रक्तातील काविळ व हिवताप विषाणूकरिता तपासणी केली जाते व दूषित आढळणाऱ्या रक्त बाटल्यातील रक्त नष्ट केले जाते. यामुळे शक्यता केवळ ०.१ टक्क्यावर आलेली आहे.

एचआयव्ही संसर्गित व्यक्तींमध्ये क्षयरोग होण्याचे प्रमाण हे अधिक असते. जवळ जवळ ७० टक्के एचआयव्ही संसर्गितांना क्षयरोग होऊ शकतो, परंतु क्षय झालेल्या व्यक्तीने नियमित व पूर्ण उपचार घेतल्यास क्षय पूर्णपणे बरा होऊ शकतो.

गुप्तरोग असणाऱ्या व्यक्तीस एचआयव्ही होण्याची शक्यता ५ ते १० पटीने वाढते. लैंगिक संबंधातून पसरणारे गुप्तरोग बरे होऊ शकतात. गुप्तरोगावर तत्काळ औषधोपचार करण्यासाठी राज्यात ७५ ठिकाणी गुप्तरोग चिकित्सा केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. या केंद्रामधून रुग्णांना लैंगिक आजारांबाबत निदान, औषधोपचार, समुपदेशन सेवा व निरोधचा पुरवठा केला जातो.

एचआयव्ही संसर्गित मातेकडून तिच्या होणाऱ्या बाळास एचआयव्हीचा संसर्ग होऊ नये यासाठी हा प्रकल्प राज्यात राबविण्यात येतो. गरोदर मातांचे समुपदेशन व ऐच्छिक रक्त तपासणी करून औषधोपचार केले जातात व त्यामुळे एचआयव्ही संसर्गित मातेकडून बाळास होणारा संसर्गाचा धोका टाळू शकतो. महाराष्ट्रातील सर्वच ५७८ एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्रात ही सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ईआयडी कार्यक्रमामार्फत महाराष्ट्र राज्यातील एचआयव्ही संसर्गित मातांच्या १८ महिन्यांखालील बालकांची डीएनएपीसीआर (DNA PCR) तपासणी केली जाते. या तपासणीमध्ये आढळलेल्या एचआयव्ही संसर्गित बालकांना एआरटी औषधोपचार सुरू केले जातात.

समाजातील सर्व स्तरांवरील लोकांपर्यंत पोहोचण्याचे मीडिया हे एक माध्यम आहे. आंतरराष्ट्रीय युवा दिन, रक्तदान दिन, जागतिक एड्स दिन या निमित्ताने एचआयव्ही एड्स संदर्भातील जाहिराती महाराष्ट्रातील सर्वात जास्त खप असणाऱ्या वर्तमानपत्रांमधून


दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर 'स्वस्थ भारत' या नावाने कार्यक्रम प्रसारित केला जातो. या कार्यक्रमामध्ये एचआयव्ही/एड्स विषयावर तज्ज्ञ व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या जातात तसेच सदर कार्यक्रमादरम्यान लोकांच्या मनात एचआयव्ही संबंधित असलेल्या प्रश्नांचे तज्ज्ञ व्यक्तींकडून निराकरण केले जाते.

त्याचबरोबर आकाशवाणी (AIR) महाराष्ट्रातील १९ स्टेशन्सवरून एचआयव्ही या विषयावरील ५२ भागांच्या मालिकेचे प्रसारण केले जाते. मागील वर्षी हा कार्यक्रम 'बबलीचे बोल' या नावाने प्रसारित होत होता. याही वर्षी १० जानेवारीपासून हा कार्यक्रम 'किती दूर किती जवळ' या नावाने प्रसारित होत आहे. हा कार्यक्रम स्थलांतरित कामगारांवर आधारित आहे. कामानिमित्ताने आपल्या गावापासून दूर, शहरामध्ये राहणाऱ्या लोकांचे मन हे सतत घरामध्ये, घरातील माणसांमध्ये गुंतलेले असते. अशा आपल्या घरापासून, घरातल्या माणसांपासून, नातेवाईक, मित्रमंडळींपासून दूर राहणाऱ्या लोकांच्या मनाची तगमग, आपल्या जवळच्या माणसांबद्दल त्यांना वाटणारी ओढ या कार्यक्रमातून सादर होणार आहे. तसेच आपल्या घरापासून दूर राहताना अनवधानानेही त्यांच्याकडून चुकीचे पाऊल पडू नये याबद्दल मार्गदर्शन केले जाणार आहे. जेणेकरून या कार्यक्रमाद्वारे त्यांचे मनोरंजनही होईल.


या मालिकेमधून संस्थेशी निगडीत असणारी एक व्यक्ती शहरातील लोकांच्या समस्या सोडविण्याचे, एचआयव्ही/एड्सविषयी त्यांना जागरूक करण्याचे, त्यांना मार्गदर्शन करण्याचे काम करीत आहे. एचआयव्हीपासून स्वतःचा बचाव कसा करावा, त्यासाठी काय काळजी घेतली पाहिजे हे ती सर्वांना समजावून सांगते आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क साधा. आमचा हेल्पलाईन नंबर आहे ०२२-२४११००००.

**- स्वाती हेमंत शिवशरण (बनसोडे)**



# राज्य मराठी वाङ्मय पुरस्कार २०१०-२०११




| वाङ्मय प्रकार | पुरस्कार | लेखक | पुस्तक |
|---|---|---|---|
| राज्यशास्त्र व समाजशास्त्र | (विभागून) | शरद जोशी | बळीचे राज्य येणार आहे |
| राज्यशास्त्र व समाजशास्त्र | बॅ.नाथ पै पुरस्कार | सीताराम खेर | दारिद्र्याची संकल्पना आणि निवारण |
| तत्त्वज्ञान व मानसशास्त्र | ना.गो.नांदापूरकर पुरस्कार | फादर फ्रान्सिस दिब्रिटो | सुबोध बायबल |
| शिक्षणशास्त्र | कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार | संदीपकुमार साळुंखे | हम होंगे कामयाब |
| भाषाशास्त्र व व्याकरण | ना.गो.कालेलकर पुरस्कार | सुरेश वाघे | संकल्पना कोश |
| भौतिकशास्त्र आणि तंत्रविज्ञान | डॉ.एन.आर.तावडे | अशोक वाडकर | आविष्करण आधुनिक वास्तुकलेचे |
| भौतिकशास्त्र आणि तंत्रविज्ञान | (विभागून) | जोसेफ तुस्कानो | विज्ञानवाटा |
| दलित-पददलितावरील आदर्श साहित्य | लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार | प्रा.यादव गायकवाड | सम्यक संवाद |
| अनुवादित-प्रौढ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार | सुनंदा अमरापूरकर | डिसअपिअरिंग डॉटर्स |
| अनुवादित-प्रौढ | (विभागून) | सत्यसिद्ध बर्वे | श्रीमद् भागवत महापुराण |
| अनुवादित-प्रथम | वा.रा.कांत पुरस्कार | उषा तांबे | जाणीव |
| संपादित-प्रौढ | डॉ.वि.भि.कोलते पुरस्कार | महेश केळुसकर | मधु मंगेश कर्णिक सृष्टी आणि दृष्टी |
| संपादित-प्रथम | रा.ना.चव्हाण पुरस्कार | अरुण शेवते | ऐवज |
| आधारित-प्रौढ | संत गाडगे महाराज पुरस्कार | पांडुरंग देशपांडे | ज्ञानेश्वरी (सांकेतिक शब्ददर्शन) |
| संशोधन-प्रौढ | ग.त्र्यं.माडखोलकर पुरस्कार | डॉ.कृष्णा शेंडे | मुलतानी समाज व सामाजिक परिवर्तन |
| संशोधन-प्रौढ | (विभागून) | पूर्णिमा भागवत | माधव मधुपुरीचा |
| ललितकला आस्वादपर लेखन | पु.ल.देशपांडे पुरस्कार | माधवी मेहेंदळे | दैवी प्रतिभेचा कलावंत मायकेल अँजेलो |
| ललितकला आस्वादपर लेखन | (विभागून) | महावीर जोंधळे | नाद अंतरिचा, श्रीलंका |
| शेती व शेतीपूरक लेखन | वसंतराव नाईक पुरस्कार | अशोक भेलके | सिंचन व्यवस्थापन |
| शेतीपूरक व्यवसाय लेखन | डॉ.पंजाबराव देशमुख पुरस्कार | डॉ.बी.एस. कापसे | आंबा लागवड ते निर्यात |
| क्रीडा वाङ्मय-प्रौढ | राजर्षी शाहू महाराज पुरस्कार | सुबोध मयुरे | चला क्रिकेट शिकूया |
| संगणक व इंटरनेट-प्रौढ | रँग्लर परांजपे पुरस्कार | माधव शिरवळकर | संगणकावरील मराठी आणि युनिकोड |
| पर्यावरण-प्रौढ | डॉ.सलीम अली पुरस्कार | अभिजित घोरपडे | संथ वाहते |
| बृहन्महाराष्ट्र पुरस्कार-प्रौढ | विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार | डॉ.शोभा नाईक | देखणी : जगण्याचे ऊर्ध्वपातन |
| बृहन्महाराष्ट्र पुरस्कार-प्रौढ | सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार | श्री.बा.जोशी | उत्तम मध्यम |
| कविता-बाल वाङ्मय | भा.रा.तांबे पुरस्कार | रमेश तांबे | स्वप्न |
| कविता | वा.गो.मायदेव पुरस्कार | लीला शहा | कविता पर्यावरणाच्या आणि नव्या विचारांच्या |
| चरित्रे-बाल वाङ्मय | वि.का.ओक पुरस्कार | मोहन जोशी | आपले राष्ट्रपती |
| चरित्रे | ग.ह. पाटील पुरस्कार | बाळ राणे | गाऊ त्यांना आरती |
| सर्वसामान्य ज्ञान - बाल वाङ्मय | यदुनाथ थत्ते पुरस्कार | डॉ.प्रमोद चौबे | भिंगाची करामत |
| सर्वसामान्य ज्ञान - बाल वाङ्मय | राजा केळकर पुरस्कार | राजीव तांबे | गंमत शाळा |
| नाटक व एकांकिका- बाल वाङ्मय | राम गणेश गडकरी पुरस्कार | डॉ.सतीश साळुंके | पास की नापास |
| नाटक व एकांकिका- बाल वाङ्मय | शाहीर अमरशेख पुरस्कार | शरद पिदडी | चिऊ काऊची कथा नवी |
| नाटक व एकांकिका- बाल वाङ्मय | (विभागून) | डॉ.भगवान अंजनीकर | परीक्षा |
| नाटक व एकांकिका- बाल वाङ्मय | वा.गो.आपटे पुरस्कार | मृण्मयी बारपांडे | चला लावूया झाडे, नको ते देवपण, स्वर्ग |
| बाल कादंबरी/छोट्या गोष्टी/परीकथा/लोककथा | गोपीनाथ तळवलकर पुरस्कार | संजय वझरेकर | टर्निंग पॉईंट |
| बाल कादंबरी/छोट्या गोष्टी/परीकथा/लोककथा | साने गुरुजी पुरस्कार | कविता मेहेंदळे | लल्ली |
| बाल कादंबरी/छोट्या गोष्टी/परीकथा/लोककथा | कवी दत्त पुरस्कार | संजय कप्तान | फॅनीच्या साहस कथा |
| बाल कादंबरी/छोट्या गोष्टी/परीकथा/लोककथा | ना.धों.ताम्हणकर पुरस्कार | मंगला गोडबोले | सही रे सही |
| ललित गद्य/बालसाहित्य समीक्षा आणि संकीर्ण | रेव्हरंड ना.वा.टिळक पुरस्कार | रमेश महाले | अंतराळातील स्टेशन |

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, February 2013.
Date of Publication : 10th of every Month



# जैसे दीपांमाझी दिवटी।
# कां तिथींमाझी पूर्णिमा गोमटी।
# तैसी भाषांमध्ये मऱ्हाटी सर्वोत्तम।।


## सर्वोत्तम मराठीतील अत्युत्तम मासिक लोकराज्य
## वाचा नि उजळवा ज्ञानज्योती...











O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

प्रति / To :

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे